भारतवर्षीयनररत्नमाला.

भाग पहिला

(सचित्र)

कादंबरीकल्पद्रुमाची पांचव्या सालची भेट.

प्रकाशक,

भावे आणि मंडळी वाई,

वाई 'श्रीकृष्णमुद्रणालयांत' छापलें.

किंमत १।

(कापडीबांधणीस ८४ निराळे पडतील)

अनुक्रमणिका.

१ पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर सी. आय्. ई. १–७
२ बाबू उमेशचंद्र बॉनर्जी. १–४
३ लालमोहन घोस. १–५
४ नामदार सुरेंद्रनाथ बानर्जी. १–१४
५ बंकीमचंद्र चतरजी. १–६
६ रोमेशचंद्र दत्त सी. आय्. ई. १–८
७ रा. ब. महादेव गोविंद रानडे सी. आय्. ई. १–६
८ महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडेस. १–८
९ श्री बाळसरस्वती बाळशास्त्री रानडे. १–८
१० कै. विष्णु कृष्ण चिपळूणकर. १–१०
११ कै. प्रो. जिन्सीवाले. १–६
१२ कै. ना. रा. विश्वनाथ नारायण मंडलिक सी. एस्. आय्. १–८
१३ ना. मि. ज. बद्रुदीन तय्यबजी. १–७
१४ बाळ गंगाधर टिळक. १–१३
१५ ना. सर फेरोजशहा एम् मेथा. के. सी. आय्. ई. १–७
१६ दादाभाई नवरोजी. १–८
१७ गोपाळराव आगरकर. १–१०
१८ गोपाळराव भिडे. १–१०
१९ ना. गोपाळराव गोखले सी. आय्. ई. १–८
२० रा. ब. रंगनाथ नरसिंह मुधोळकर. १–८
२१ नामदार पंडित अयोध्यानाथ. १–८
२२ पंडित मदनमोहन मालवीय. १–३
२३ रावबहादुर पी. आनंदाचार्लु. १–४
२४ राजा सर टी. माधवराव. १–६
२५ सर टी. मुथुस्वामी ऐयर. १–५

शुद्धिपत्र.

चरित्रांक	पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	२	२	मिळाळी	मिळाली
,,	,,	६	सतांनाच	असतांनाच
,,	,,	१४	असनांना	असतांना
,,	३	४	भेटूस	भेटून
,,	५	७	विहाच्या	विवाहाच्या
,,	,,	२३	पंडिर्जीचे	पंडितजींचें
,,	६	१०	विघडत	बिघडत.
,,	७	६	होते.	होतें."
२	१	११	अर्टनी	अटर्नी
,,	,,	२०	मॅर्टि	मॅट्रि
,,	३	३	कौन्सिल	कौन्सेल
४	९	८	करणें	मारणें
,,	१०	२०	हितत्पर	हिततत्पर
,,	,,	२०	सुरेंनाथा	सुरेंद्रनाथा
५	४	२६	उत्सानें	उत्साहानें
६	२	१२	हेस्कूल	हायस्कूल
,,	७	१६	सरकाच्या	सरकारच्या
७.	५	११	जवरदस्त	जबरदस्त
१०	१	२१	धर्मोन्नत्ती	धर्मोन्नति
,,	३	५	पेंडारकर	पेंढारीकर
,,	७	२५	त्यानें	तो
१२	१	२४	तरतरीपणा	तरतरितपणा
,,	२	२२	झालीही.	झाली.
,,	३	२१	रूकन	करून

चरित्रांक	पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
,,	४	५	सरकारतें	सरकारनें
१२	६	७	तथ्यम्	पथ्यम्
,,	,,	१८	असोशिअनने	असोसियेशननें
,,	७	१६	मार्सेट	फासेट
१३	१	८	निरनिळ्या	निरनिराळ्या
,,	,,	१९	टाकण्यान्या	टाकणान्या
,,	,,	२२	कतृत्व	कर्तृत्व
,,	२	१	ही	हा
१४	१	१	याचें	यांचें
,,	४	२०	अणखी	आणखी
१५	२	३	व	हि
,,	३	२०	दादाबाई	दादाभाई
,,	४	६	याजवर	याजवर
,,	,,	७	सरकांरानीं	सरकारांनीं
,,	,,	,,	कमिशर	कमिशनर
,,	५	२५	बिल. चे	बिलचे
,,	७	१	थार	थोर
१७	१	१५	सुधाणेचा	सुधारणेचा
,,	,,	१९	नेलें	गेलें
,,	९	१४	प्रगंगी	प्रसंगीं
,,	१०	२०	माराठीची	मराठीची
,,	,,	२७	सुधारणैचा	सुधारणेचा
१९	१	१०	एप्रिल	मे
,,	५	२२	मागन	मागून
,,	७	१०	त्वाचे	त्यांचें
१९	७	१४	जमाखार्चा	जमाखर्चा
,,	८	१७	वर्षे	वर्षे
२१	२	२	भ्यसाची	भ्यासाची

चरित्रांक	पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
,,	९	१८	जॅाईट	जॅाइंट
,,	,,	२९	त्याचे	तिचे
२३	२	२७	१८७४	१८७४त
,,	३	११	मिळाळे	मिळाले
२४	१	१४	मराठ्यांच	रहार्टाचें
,,	३	१७	अंतस्थिति	अंतःस्थिति
,,	,,	२९	hosrt	short
,,	,,	,,	pasce	space
,,	,,	२७	anb	and
२५	२	२४	रेकॅर्ड	रेकॉर्ड

याशिवाय कित्येक स्थळीं ' वरिष्ट ' व ' ठेऊन ' असें राहिले आहे त्या-ठिकाणी ' वरिष्ठ ' वे ' ठेवून ' असें वाचावें.

उपोद्घात.

१ गेल्या शंभर वर्षांत भरतखंडात इंग्रजी अमलाखालीं इंग्रजी विद्या शिकून जे कित्येक गृहस्थ स्वतःच्या प्रयत्नानें थोर पदवीप्रत पावले त्यांपैकीं पंचविसांचीं चरित्रें प्रस्तुत चरित्रपंचविशींत दिलीं आहेत. इंग्रजी विद्या न शिकतां व इंग्रजी अंमलांत न राहता स्वपराक्रमानें इतिहासांत आपलें नांव अजरामर करून टाकणारे थोर लोक गेल्या शंभर वर्षांत भरतखंडांत कांहीं झालेले आहेत. परंतु, त्यांच्या चरित्राची सामग्री इतकी सुलभ नसल्यामुळें, त्या कामीं प्रस्तुत पुस्तकाच्या कर्त्यांना सध्याच हात घालता आला नाहीं.

२ थोर मुत्सद्देगिरीचीं, थोर प्रतिभेची, थोर युद्धकलेचीं, वगैरे सर्व थोर कृत्यें करण्याचा मक्ता प्रस्तुत कालीं भरतखंडात युरोपियन लोकांनीं पतकरलेला आहे. ह्या एकतर्फी मक्त्यांत आपल्याला कितपत वाटा घेता येईल, हा प्रश्न सोडविण्याचा ज्यांनीं थोडा फार प्रयत्न करण्याचा व्यवसाय अलीकडील पन्नास पाऊणशे वर्षांत केला त्यांपैकीं पंचविसांचीं अत्यंत त्रोटक चरित्रें येथें दिलेलीं आहेत. अशा मतलबानें कीं, त्यापासून पुढील पिढींतील तरुण मंडळीनें कांहीं बोध घ्यावा.

३ तरुण मंडळीनीं बोध कसा घ्यावा? बोध असा घ्यावा कीं, बंगाल प्रांत इंग्लिशांच्या ताब्यांत गेल्यापासून ब्रह्मदेश त्यांच्या पदरांत पडेतोंपर्यंत जे जे थोर लोक या देशांत झाले त्यांनीं देशहिताची उत्तरोत्तर वृद्धि केली कीं क्षय केला हे त्यांनीं पहावें; आणि नंतर वृद्धिपक्ष कोणता तें कळल्यावर त्याला मिळून, आपापल्या ऐपतीप्रमाणें देशकार्य करावें व क्षयपक्षाचा पाडाव करावा.

४ देशहिताची वृद्धि झाली किंवा क्षय झाला हें कळण्याला एकच मार्ग ह्मटला ह्मणजे इतिहास होय. देशहिताच्या कोणत्याहि चळवळीचा प्रारंभापासून— अर्थात् इंग्रजी अमलाच्या सुरवातीपासून— आतांपर्यंत इतिहास कळला ह्मणजे ती चळवळ वर्धिष्णु आहे किंवा क्षयिष्णु आहे तें कळेल.

५ प्रस्तुत चरित्रपंचविशींत राजकीय, सामाजिक, वाङ्मयिक, वगैरे चळवळींत हालचाल करणारी कांहीं मंडळी आलेली आहेत. शिवाय केवळ लौकिकवंतहि कांहीं पुरुष समाविष्ट झाले आहेत. सरकारी मोठा हुद्दा

मिळाल्यामुळें, ज्यांना थोरपण लौकिकांत दिलें जातें अशी ही पांच चार मंडळी प्रस्तुत पंचविशींत घेतली आहेत. सारांश, देशहिताच्या दोन चार शाखांचे प्रतिनिधि ह्या पंचविशींत आणून तरुण वाचकांपुढें ठेविले आहेत. त्यांचें पौर्वापर्य लावून आपापल्या शाखांत उत्तरोत्तर त्यांनीं पुढें पाऊल टाकिलें किंवा उलट प्रकार केला, तें सुज्ञ वाचकांनीं मनन करून पहावयाचें आहे.

६ उदाहरणार्थ, सामाजिक सुधारणेची चळवळ घेऊन, तिचा पुरस्कार करणारे पुढारी देशहिताची वृद्धि करीत आहेत किंवा क्षय करीत आहेत तें पहावें. तसेंच धर्मसुधारक, वक्तृत्वसुधारक, स्त्रीस्वातंत्र्यसुधारक, जातिभेदविध्वंसक, वर्तमानपत्रकार, राज्यसुधारक, भाषासुधारक, आचारसुधारक. शिक्षणसुधारक, उत्सवप्रवर्तक, वीरपुरुषपूजक अशा सर्व सुधारकांच्याहि चळवळीची परीक्षा देशहितवृद्धीच्या कसाला लावून बिनधोक करावी. पृथ्वीवरील सर्व संस्कृत व स्वतंत्र देशांत निरनिराळ्या चळवळीची परीक्षा अशीच करतात. तीच पद्धत निस्पृहपणानें व निःपक्षपातानें आपण हि उचलावी.

७ देशांतील चळवळींची व चळवळी करणाऱ्याची परीक्षा करण्याचा वर सांगितलेला सोपा मार्ग पाहून, कित्येक लोक असा प्रश्न करतील कीं चळवळीची परीक्षा करण्यापूर्वी देशहित म्हणजे काय ते अगोदर कळलें पाहिजे. जातिभेद मोडला असता देशहित होईल म्हणून कोणी म्हणतो, तर तो अव्यत राखल्यानें तें साधेल म्हणून दुसरा प्रतिपादतो. एकाच्या मते विधवांचे पुनर्विवाह करण्यांत देशाचे हित आहे, दुसऱ्याच्या मते नाहीं. तिसरा एक येतो तो म्हणतो, हिंदुधर्म सोडून ब्राह्मो झाल्यावाचून देशाच्या तरणोपाय नाहीं; तर चवथा धर्माला अजीबात फाटा देण्यास सांगतो. अशीं परस्परविरोधीं मतें सर्वत्र प्रचलित झालेलीं पाहण्यांत येतात. तेव्हां अशा ह्या गोंधळांत देशहित कोणतें तें समजावें कसें ? आणि अमुक एक मार्ग स्वीकारला असतां देशहित साधेल अशी खात्री व्हावी कशी ?

८ असा प्रश्न आहे. ह्या प्रश्नाचे स्थूलमानानें देशकालवर्तमानाकडे लक्ष पुरवतां उत्तर असें:—स्वदेशाच्या राजकीय, धार्मिक, सामाजिक, औद्योगिक, वगैरे सर्वप्रकारचा कारभार स्वदेशांतील लोकांच्या हातीं जेणेंकरून येईल किंवा येण्याचा संभव असेल तें सर्व प्रस्तुत काळीं देशहिताचें म्हणून अवश्य समजावें. सर्वत्र इंग्रजी

भाषा योजण्याचा प्रघात पाडल्यानें, किंवा ब्राह्मणांच्या विधवांची लग्ने लावल्यानें, किंवा बूट पाटलोण घातल्यानें, किंवा जातिभेद मोडल्यानें, किंवा स्वधर्मत्याग केल्यानें, किंवा भाडोत्री शिपाई बनून कोणाशीं तरी लढण्यानें; किंवा स्वजन-द्रोह केल्यानें, वरील कार्य जर होत असेल तर हीं सर्व कृत्यें देशहिताच्या सदरांत अवश्य गणावीं व त्यांना कायावाचामनेकरून प्रोत्साहन द्यावें. ह्या कृत्यांनीं तें कार्य जर साक्षात् किंवा परंपरया हि होत नसेल असें विचारांतीं वाटेल तर ह्यांचा निस्पृहपणें निषेध करावा आणि स्वदेशांतील लहान मोठ्या दर्ज्यांच्या सर्व लोकांना ह्या कृत्यांपासून परावृत्त करावें.

९ आणि हें परावृत्त करण्याचें व प्रोत्साहन देण्याचें काम फार बिकट आहे. सर्व अडतें तें ह्या बिकटपणामुळेंच अडतें. हे दुहेरी काम करण्यास मानसिक व नैतिक धैर्य व धोरण लोकोत्तर लागतें. अशा लोकोत्तर धैर्याचा व धोरणाचा अंश गेल्या शंभर वर्षांत ज्या लोकांच्या ठायीं लहान मोठ्या प्रमाणानें आढळून आला असें संपादकांनीं वाटलें त्यांपैकीं पंचविसांचीं त्रोटक चरित्रें पुढें दिलेलीं आहेत.

१० प्रस्तुत चरित्रपंचविशींत हिंदु, मुसलमान व पार्शी ह्या तीन समाजांतील लोकांचीं चरित्रें दिलीं आहेत. हिंदूंपैकीं प्राय बंगाल, महाराष्ट्र व मद्रास ह्या प्रांतांतीलच तेवढे कांहीं लोक घेतले आहेत. सिंध, पंजाब, काश्मीर, बलुचिस्थान, नेपाळ, काठेवाड, रजपुतस्थान, गुजराथ, मलबार, म्हैसूर, तैलंगण, वगैरे प्रांतांतील थोर हिंदुमुसलमानांना पुढील दोन चार पंचविशींत आणण्याचा संपादकांचा संकल्प आहे. तसेंच जैन, लिंगायत, युरेजियन, एतद्देशीय खिस्ती वगैरे समाजांतलि हि कांहीं व्यक्ति वर्णावयाचा संपादकांचा विचार आहे. सारांश, हिंदुस्थानांतील सर्व समाजांत स्वदेशहितकर्त्या लोकांची त्रोटक माहिती शंभर दोनशें चरित्रांत देण्याचा संपादकांचा हेतु आहे.

११ प्रस्तुत चरित्रें गुणदोषविवेचक नाहींत; केवळ चरित्रनायकांची स्थूल माहिती देणारीं आहेत. आठ दहा वर्षांचीं लहान मुलें जगांत इकडे तिकडे वावरूं लागलीं म्हणजे त्यांच्या समकालीन किंवा किंचित् अगोदर झालेल्या थोर व्यक्तींची पहिली मुलाखत ह्या पुस्तकाच्या द्वारा त्यांना चांगली होण्यासारखी आहे. व्यक्तींचीं नांवें जरी त्यांच्या कानांवरून गेलीं तरी हि त्यांच्या पैकीं बहुतेकांच्या पुढील आयुःक्रमावर कांहीं तरी संस्कार झाल्याविना रहा-

णार नाहीं. थोरांच्या नामसंकीर्तनानेंहि सामान्य लोक पावन होतात. मुलांच्या आयु:क्रमांत असे कित्येक औदासीन्याचे क्षण येतात कीं, ज्यावेळीं पूर्वी कधीं तरी कानांवरून गेलेलीं थोरांचीं चरित्रें त्यांना ताळ्यावर आणण्यास औषधाप्रमाणें कारण होतात. महाराष्ट्रांत संतचरित्रांचा, बखरींचा व भक्तमालेचा असा उपयोग झालेला आहे. तसा उपयोग प्रस्तुत चरित्रगलंतिकेचा थोडा बहुत व्हावा असें वाटतें.

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे बी. ए.

प्रस्तावना.

अलीकडे शिक्षणाचा प्रकार झपाट्यानें होत असल्यामुळें लोकांस वाचनाची अभिरुचि लागत चालली आहे. वाचकवर्ग जसजसा वाढत आहे त्याप्रमाणेंच लेखकही निर्माण होऊं लागले आहेत; चांगले लेखक व लोकाश्रय ह्या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. महाराष्ट्रवाङ्मयाची सेवा करण्याचे अनेकांकडून अनेक रीतींनीं प्रयत्न चालले आहेत. सर्वांच्या प्रयत्नांस सारखें यश येणें केवळ अशक्य आहे. परिपक्वदशेस पोहोंचलेल्या भाषेतील नाणावलेल्या ग्रंथांचें भाषांतर करणें ही मातृभाषेची सेवा करण्याची पहिली पायरी होय; दुसऱ्या ग्रंथकाराचे प्रमुख विचार घेऊन त्याच्या आधारें स्वतंत्र ग्रंथाची रचना करणें ही दुसरी पायरी होय; व कोणाचें कांहींही उसनें न घेतां स्वतःच्या कल्पनेनें कथानक बनवून त्यावर स्वतंत्र ग्रंथ लिहावयाचा ही तिसरी व अखेरची पायरी होय. मनोरंजक व बोधपर कादंबऱ्या किंवा नाटकें प्रसिद्ध करण्याचा '**कल्पद्रुमाचा**' प्रमुख हेतु असल्यामुळें अशाच ग्रंथांसंबंधानें आम्ही विचार करीत आहों हें निराळें सांगावयास नकोच.

मातृभाषेची अभिवृद्धि करण्याचे वर जे तीन मार्ग सांगितले आहेत त्यांपैकीं '**कल्पद्रुमाकडून**' पहिल्या मार्गाचेंच अवलंबन विशेषतः झालेलें आहे. शेवटच्या दोन मार्गांनीं त्याचे हातून प्रयत्न झाले नाहींत असें नाहीं. परंतु, अशा प्रयत्नांची संख्या एकंदरीनें फार थोडी आहे. इंग्रजीसारख्या अनेक विदेशी भाषा परिपक्व झालेल्या आहेत. परंतु, त्या भाषांत जी समाजस्थिति वर्णन केलेली आहे ती आपल्यापेक्षां फार भिन्न असल्यामुळें त्या भाषांतील ग्रंथांचें भाषांतर करण्यानें विशेषसा उपयोग होणार नाहीं हें जाणूनच '**कल्पद्रुमानें**' बंगाली व हिंदी भाषांची निवड केली. हीं निवड सर्वांसच पसंत पडेल असें नाहीं; तरीपण '**कल्पद्रुमाच्या**' उत्पत्तीपासून महाराष्ट्रीयांकडून त्यास मिळणाऱ्या आश्रयाचा एकसारखा उत्कर्ष होत आहे या गोष्टीचा विचार केला म्हणजे '**कल्पद्रुमानें**' केलेली ही निवड बऱ्याच महाराष्ट्र वाचकांस संमत आहे हें निर्विवाद ठरतें; व याचमुळें '**कल्पद्रुमास**' गेल्या चार वर्षांत बरेच ग्रंथ प्रसिद्ध करतां आले.

कादंबरीचा प्रधानहेतु मनोरंजन हा होय. तरी मनोरंजनाच्या अनुषंगानें

वाचकांच्या मनावर ठसेल अशा रीतीनें नीतीतत्त्वाचें विवेचन करण्याची संधि आली असतां ती वाया न जाऊं देणें हेंही कादंबरीकाराचें कर्तव्य आहे. मनाची-स्थिति एखाद्या छांदिष्ट मुलासारखी असते. गुणकारक, परंतु, रुचीस कडू लागणारें औषध घेण्यास तें किरकिर करितें. तेंच त्यास औषध घेतल्यानंतर गोड पदार्थ खावयास देण्याची लालूच दाखविल्यास तें तेंच औषध मोठ्या तत्परतेनें घेतें. मनाची स्थिति याप्रमाणेंच कांहीं अंशीं आहे. आयुष्यास अतिशय हितावह अशा नीतितत्वाचा उपदेश एरव्ही त्यास कितीहि कष्टमय असा वाटला तरी तो मनोरंजनमिश्रित असला ह्मणजे तेंच मन त्याचे ग्रहणकरण्यास अगदीं तत्पर असतें व त्यांत त्यास विशेषसे आयासही वाटत नाहींत. इसापनीति, पंचतंत्र इत्यादि ग्रंथांस जे महत्त्व आलें तें यामुळेंच. कादंबरीसारख्या कल्पनेवर रचलेल्या व वाचकांच्या मनोवृत्तींशींच विशेषत: संबंध असलेल्या ग्रंथांच्या हातून लोक शिक्षणाचें ही काम अल्प स्वल्प रीतीनें पार पडणें शक्य असतें हें यावरून उघड होतें.

कल्पद्रुमाच्या द्वारें आजपर्यंत भाषांतररूपानेंच बहुतेक ग्रंथ प्रसिद्ध झाले हें वर सांगितलेंच आहे. या पुढे **कल्पद्रुमां** तून दुसऱ्या तऱ्हेचे ह्मणजे दुसरीकडील एखादें कथानक घेऊन त्यावर स्वतंत्र ग्रंथ तयार करून प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे. **'कल्पद्रुमां'** तून हल्लीं चालू असलेले ग्रंथ पूर्ण होतांच 'कल्पद्रुमा' च्या आश्रयदात्यास या विचारानुरूप दरमहा कांहीं नियमित पृष्ठें देण्याचें योजिलें आहे. **कल्पद्रुमा** स मिळत असलेला आश्रय असाच वृद्धिगत होत गेल्यास अशा रीतीचे ग्रंथ आमच्या हातून महज प्रसिद्ध होतील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे. मनोरंजन व बोध हीं दोन्ही कर्मे साधणारे व हल्लींच्या आपल्या समाजस्थितीस विशेष उपयुक्त असणारे असे ग्रंथ ह्मटले ह्मणजे 'ऐतिहासिक कादंबऱ्या' हे होत. 'कल्पद्रुमा'तून आजपर्यंत बऱ्याच ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत; परंतु, त्या सर्व भाषांतररूपानेंच प्रसिद्ध असल्यामुळें व त्यांचा खुद्द महाराष्ट्राच्या इतिहासाशीं फारच थोडा संबंध असल्यामुळें त्यांची—आम्ही ज्याप्रकारचे ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे योजिलें आहे त्यामध्ये—गणना करितां येत नाहीं.

गतकालीन लोकांच्या वर्तनापासून सार काढणें, त्यांच्याबद्दल सांप्रतच्या समाजाचीं मतें ठाम करणें, कार्यकारणभावाची सांगड घालणें, भूतकालीं घडलेल्या

गोष्टींपासून सामान्य नीति व राजनीति यांचे सिद्धांत काढणें हें इतिहासकाराचें काम आहे. या दृष्टीनें पाहतां इतिहास हे एक स्वतंत्र शास्त्र आहे. अर्थात सामान्य जनांचें त्यापासून मनरंजन होत नाही. अनायासें इतिहासाकडे लोकांचें मन आकर्षून घेणें हें काम ऐतिहासिक कादंबऱ्यांचें आहे. ऐतिहासिक कादंबऱ्या भूतकाळ हल्लींचाच आहे असें भासवितात; त्यांच्या योगानें वाचकांस मोठ्या लोकांचा परिचय होतो. जे पुरुष इतिहासावरून केवळ काल्पनिक वाटतात त्यांच्या खरेपणाबद्दल या खात्री करून देतात. पूर्वी लोकांच्या चाली रीति, भाषा, रहाण्याची पद्धत, ह्यांचें चित्र ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या परिशीलनानें समाजास पूर्णपणें दिसते. यावरून ऐतिहासिक कादंबऱ्यांचें महत्त्व किती आहे हें कोणासही सहज कळून येणार आहे. 'मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचा' योग्य उपयोग करून घेतल्यास अशा रीतीचे ग्रंथ प्रसिद्ध होणें सुसाध्य आहे हें सांगावयास नकोच.


कल्पद्रुमास नवीन स्वरूप कोणत्या दिशेनें द्यावयाचें याचें संक्षिप्त दिग्दर्शन वर केलेंच आहे. आजपर्यंत ' कल्पद्रुमा ' च्या आश्रयदात्यास प्रतिवर्षी भेटीदाखल एखादी कादंबरी किंवा एखादें नाटकच देण्यात आलें आहे. यंदाचे सालीं ग्राहकांस भेटीदाखल जें पुस्तक देत आहों त्यावरूनच आमच्या हेतूंचा अंदाज ग्राहकांस होणार आहे. ग्राहकांचा आश्रय वाढत गेल्यास पुढल्या वर्षीच भारतीय नररत्नांचा दुसरा भाग प्रसिद्ध करून तो ग्राहकांकडे पुढच्या वर्षाची भेट ह्मणून द्यावयाचा आमचा हेतु आहे. राष्ट्रदृष्टीनें नररत्नांचें महत्त्व किती आहे हें आमच्या आश्रयदात्यास आह्मी सांगितलें पाहिजे असें नाहीं. नररत्नांच्या या पहिल्या भागांत ज्या थोर पुरुषांच्या चरित्रांचा समावेश झाला आहे त्यांपैकीं कांहींच्या चरित्रांची पृष्ठसंख्या अगदींच थोडी झालेली आहे. त्यांवरून तीं आह्मांस कमी महत्त्वाचीं वाटलीं असें नसून त्याचें कारण त्यांचे संबंधानें मिळावी तितकी माहिती मिळाली नाहीं हेंच होय.

चरित्रांची सामग्री वक्तशीर न आल्यामुळे प्रथम प्रसिद्ध केलेल्या क्रमानें चरित्रांची जुळणी बसवितां आली नाहीं. क्रमामध्ये काय काय फेरफार करण्यांत आले आहेत हें अनुक्रमणिकेवरून वाचकांच्या ध्यानांत येईलच. कांहीं कांहीं चरित्रांची माहिती फारच उशीरा आली. प्रसिद्धीची मुदत लांबविणें प्रशस्त वाटेना यामुळे छपाईच्या कामांत घाई झाली; व ह्मणूनच बऱ्याच ठिकाणीं

अशुद्ध स्थळें राहून गेलीं. याबद्दल नुसता उल्लेख केल्यानें निर्वाह होणार नाहीं असें वाटल्यावरून पुस्तकास एक शुद्धिपत्र जोडलें आहे. पुस्तक निर्दोष करण्यांत आमच्या हातून शक्य ते प्रयत्न झाले आहेत; तरी क्वचित् ठिकाणीं दोषस्थळेंही स्वाभाविकपणें राहणारच. त्यांचा विचार आमच्या सहृदय वाचकांकडून हंसक्षीरन्यायानें होईल अशी आम्हांस बळकट आशा आहे.

प्रस्तुत पुस्तक तयार करण्याचे कामी आम्हांस अनेक मित्रांकडून निरपेक्ष सहाय्य मिळालें त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. या प्रयत्नास लोकाश्रय चांगला मिळाल्यास नररत्नांचा दुसरा भाग लवकरच प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे. शेवटीं ज्याच्या कृपेनें हे हातीं घेतलेलें काम शेवटास गेलें त्या जगच्चालकाचे अनन्यभावें आभार मानून ही अल्प प्रस्तावना पुरी करितों.

संपादक



पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर.

K. C. C. Press. Poona.

पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, सी. आय. ई.

क्रांति ही सर्वत्र आहे. कालमानानुरूप समाजास निराळें वळण लावून देणें हें प्रगतीचें निदर्शक आहे. केवळ गतानुगतिक होऊन राहणें ह्मणजे आपल्या अज्ञानाचें व भीरुत्वाचें प्रदर्शन करण्यासारखें आहे. लोकापवादास न जुमानतां आपल्या सदसद्विचारास जें न्याय्य दिसतें त्याप्रमाणें वागण्याचा समाजास कित्ता घालून देणारे हे समाजाचे खरे हितचिंतक यांत संशय नाहीं. पंडित ईश्वरचंद्र हे अशांपैकीं एक होते.

ईश्वरचंद्र यांचा जन्म इ. स. १८२० ह्यावर्षी मिदनापुर जिल्ह्यांतील एका लहानशा खेडेगांवीं झाला. ते जातीनें कुलीन ब्राह्मण होते. त्यांचे आजे रामजय बानर्जी हे मोठे सत्वशील साधुपुरुष होते. ईश्वरचंद्राचे वडील ठाकुरदास बानर्जी ह्यांना एका व्यापाऱ्याच्या दुकानांत दरमहा १० रुपयांची नोकरी होती. आमच्या चरित्रनायकाचें प्राथमिक शिक्षण खेडेगांवांत झालें व ते आपल्या वयाच्या आठव्या वर्षी संस्कृत कालेजांत भरती होण्याकरितां कलकत्त्यास गेले. त्याठिकाणीं त्यांनीं संस्कृत व्याकरण, संस्कृत वाङ्मय, ज्योतिष, न्याय व तर्कशास्त्र ह्यांचा अभ्यास केला. त्यांचा नंबर वर्गांत नेहमीं पहिला असे व त्यांस अनेक पारितोषिकेंही मिळत. ते आपल्या वयाच्या सतराव्या वर्षी त्यावेळच्या न्यायाधिशाची परीक्षा पास झाले. परीक्षा पास होतांच कोमिला येथील न्यायाधिशाची जागा त्यांना सांगून आली पण त्यांचे वडीलांची त्यांना कलकत्त्यापासून इतके दूर पाठविण्याची इच्छा नसल्यामुळें त्यांनीं ती पतकरली नाहीं. त्यांनीं आणखी दोन वर्षें आपलें अध्ययन चालू ठेवून षड्दर्शनांत प्राविण्य संपादलें. इ. स. १८३८ सालीं एका संस्कृत गद्यरचनेबद्दल शंभर रुपयांचें व पद्यरचनेबद्दल पन्नास रुपयांचें अशीं दोन पारितोषिकें त्यांना मिळालीं. इ. स. १८३९ सालीं ते हिंदुन्यायशास्त्राची सर्वांत मोठी परीक्षा पास झाले व त्यांना " विद्यासागर " ही पदवी मिळाली. मध्यंतरीं त्यांनीं इंग्रजीचेंही थोडें बहुत ज्ञान संपादलें होतें.

नंतर थोड्या दिवसांनीं त्यांना संस्कृत कॉलेजांत व्याकरण शास्त्राच्या अध्यापकाची हंगामी नोकरी मिळाली व पुढें सन १८४१ सालीं फोर्ट विल्यमकॉलेजांत दरमहा पन्नास रुपयांची मुख्य पंडिताची जागा मिळाली. नंतर त्यानीं प्रसिद्ध वक्ते बाबू सुरेंद्रनाथ बानरजी ह्यांचे वडील डा. दुर्गाचरण बानरजी ह्यांच्या मदतीनें इंग्रजीचा अभ्यास पुढें चालविला. इ. स. १८४६ सालीं त्यांना संस्कृत कॉलेजाचे दुय्यम सेक्रेटरीचें काम मिळालें व त्या जागेवर सतांनाच त्यांनीं 'वेताळपंचविशी' या नांवाचा आपला पहिला ग्रंथ प्रसिद्ध केला. भाषेसंबंधानें त्या ग्रंथाची विद्वान लोकांनीं मोठी वाखाणणी केली. त्यांनीं ह्या पुस्तकांत जी भाषासरणि उपयोगांत आणिली होती ती अगदीं नवी असून लोकांचें मन आकर्षण करून घेणारी अशी होती. त्यांनीं आपल्या कालेजांत पुष्कळ सुधारणा केल्या पण त्यांनीं केलेल्या कांहीं सूचना ' एज्युकेशन कमिशन ' नें नामंजुर केल्यामुळें पंडितजींनीं आपल्या जागेचा राजिनामा दिला. तथापि सन १८४९ सालीं त्यांनी फोर्टविल्यमकालेजांत दरमहा ८० रुपयांची हेडक्लार्कची जागा पुन्हां पतकरली. ह्या जागेवर असतांना बंगाल्यांतील स्त्रीशिक्षणासंबंधी चळवळ करणारे प्रख्यात बेथ्यून साहेब ह्यांशीं त्यांचा परिचय जडला. ह्याच्या पुढील वर्षी त्यांना संस्कृत कालेजांतच दरमहा ९० रुपयांची संस्कृत वाङ्मयाच्या अध्यापकाची व पुढें त्याच कालेजांतील प्रिन्सिपालची जागा मिळाली. ह्या हुद्यांवर असतां त्यानीं संस्कृत शिक्षणाच्या पद्धतींत पुष्कळ चांगला फेरफार केला व त्यामुळें संस्कृत शिक्षण लोकांना बरेंच सोपें जाऊं लागलें. इ. स. १८५१ सालीं त्यांचे मित्र बेथ्यून साहेब परलोकवासी झाले यामुळें बंगालचे त्यावेळचे लेफ्टेनंट गव्हर्नर सर फ्रेडरिक हॅलिडे यांनीं बेथ्यून स्कूल पंडितजींच्या व्यवस्थेखालीं सोंपविलें. इ. स. १८५४ सालीं बंगाल्यांत सरकारी मदतीनें शाळा स्थापन करण्याचा बूट पंडितजींनीं काढला. इ. स. १८५५ त यांना आपलें काम संभाळून हुगळी, नाडिया व बरद्वान ह्या तीन जिल्ह्यांतील शाळांचे तपासनीस नेमिले. ह्या दोन्ही जागांचा मिळून त्यांना दरमहा ५०० रुपये पगार मिळूं लागला. तपासनीस असतां त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं मिळून सुमारें चाळीस मुलींच्या शाळा स्थापन केल्या. ईश्वरचंद्र हे ही दुहेरी कामगिरी बजावीत असतां त्यांच्या वरिष्ठाशीं नेहमीं चकमकी उडत. बंगाल्यांतील त्यावेळचे मुख्य विद्याधिकारी मि.

यंग हे मोठे करडे व " हम् करेसो कायदा " अशाप्रकारचे अधिकारी होते. त्यांचें व आमच्या चरित्रनायकाचें मुळींच पटत नसे. अखेरीस सन १८५८ सालीं खालील गोष्टीवरून त्याचा फळस झाला. एकेदिवशीं मि. यंगसाहेबांनीं ईश्वरचंद्रास हिंदुकॉलेजाच्या प्रिन्सिपालास भेटून त्यांच्या कॉलेजांतील दोन खोल्या वापरण्यास देण्याची परवानगी मागण्यास जावयास सांगितलें. त्यावर त्यांनीं सांगितलें कीं " मी एकटा जाणार नाहीं, आपण बरोबर येत असाल तर जाईन. " पण तें सांगणें मि. यंग साहेबांस रुचलें नाहीं. त्यांनीं अधिकाराच्या जोरांत " तुह्मांला गेलेंच पाहिजे " असा हुकूम फर्माविला. ईश्वरचंद्रांनीं लागलीच आपल्या खिशांतून एक कागद काढला आणि त्यांवर आपल्या कामाचा राजिनामा खरडून तो यंगसाहेबांच्या हातीं दिला आणि नंतर ते ह्मणाले " मला माझ्या मनापासून जें करावयास नको तें करण्याचा प्रसंग यापुढें येणार नाहीं असें मला वाटतें. " ही गोष्ट लागलीच लेफ्टेनंट गव्हर्नरच्या कानीं गेली . त्यावर पंडितजींनीं आपला राजिनामा परत घ्यावा ह्मणून त्यांनीं पुष्कळ खटपट केली पण व्यर्थ गेली. अशा अकस्मिक रीतीनें त्यांची पारतंत्र्यशृंखला तुटली.

राजिनामा दिल्यावर पंडितजींचा देशाला व लोकांना अधिकच उपयोग होऊं लागला. त्यांचा ग्रंथकार, समाजसुधारक , विद्योत्साही व दानशूर ह्या गुणांनीं मोठा लौकिक झाला.त्यांचे बंगाली भाषेंतील लेख शुद्ध भाषापद्धतीचे आदर्शस्वरूप समजले जात.वर सांगितलेल्या ग्रंथा शिवाय पंडितजीनीं १८४८ सालीं 'बंगालचा इतिहास ' लिहून प्रसिद्ध केला व त्याचे मागून त्यांचे ग्रंथ भराभर प्रसिद्ध होऊं लागले. इ. स. १८५० त 'जीवन चरित्र, ' १८५१ त ' बोधोदय ' (ज्ञानाचा ओनामा), १८६५ त ' विधवा विवाह ' व १८६२ त ' सीतार बनवास ' (सीतेचा वनवास) हे ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांचे बहुतेक ग्रंथ इंग्रजी, संस्कृत आणि हिंदी ग्रंथांच्या आधारानें लिहिले होते. तथापि त्यांत स्थळ व प्रसंगविशेषीं स्वतंत्र विचारही असत.

पंडितजींना शिक्षणाची व विशेषतः स्त्रीशिक्षणाची फार कळकळ असे. बेथ्यून स्कुलशीं त्यांचा संबंध सुमारें वीस वर्षे होता व त्या शाळेची भरभराट होण्याचें सर्व श्रेय पंडितजीसच दिलें पाहिजे. बंगाल्यांतील सुशिक्षित तरुण स्त्रियांनीं पंडिजीवरील आपली कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां

त्यांच्या नांवानें शिक्षणेच्छु तरुण स्त्रियांकरतां एक छात्रवृत्ति ठेवली आहे. बेथ्यून स्कूल शिवाय पंडितजींनीं आणखीही कित्येक मुलींच्या शाळा स्थापन केल्या. ह्याशिवाय आपल्या जन्मभूमींतील गरिबांच्या मुलांस शिक्षण देण्याकरितां त्यांनीं बीरसिंह येथें १८५३ सालीं आपल्या आईच्या नांवानें एक शाळा स्थापिली. " मेट्रॉपॉलिटन इन्स्टिटयूशन " हें पंडितजींच्या शिक्षणाच्या कळकळीचें एक भक्कम स्मारक आहे. वरील इन्स्टिटयूशन स्थापण्यांत त्यांचा हेतु एवढाच होता कीं, वरिष्ठ शिक्षणाचें पहिल्या प्रतीचें कॉलेज इंग्लिश प्रोफेसराप्रमाणें एतद्देशीय प्रोफेसरांकडूनही उत्तमरीतीनें चालवितां येतें हें लोकांना दाखवावयाचें होतें. शालोपयोगी पुस्तकें लिहिण्याचा पंडितजींनींच आरंभ केला. त्यांच्या पुस्तकांचा शाळांत इतका प्रसार झाला कीं त्यांना त्यापासून दरमहा ५००० रुपयांची प्राप्ति होऊं लागली असें सांगतात. इ. स. १८५७ सालीं कलकत्ता युनिव्हर्सिटीची स्थापना झाल्याबरोबर पंडितजींना तिचें सदस्य (Fellow) केलें.

बंगाल्यांतील समाजसुधारणाग्रणींचा जरी पंडितजींस मान नाहीं तरी त्या बाबतींत त्यांच्याइतकी खटपट मात्र कोणीही केली नाहीं. त्यांचें जात्या कोमल व दयाळु अंतःकरण बालविधवांची कष्टमय स्थिति पाहून मनस्वी द्रवलें, व विशेषतः विधवाविवाहाला अनुकूल अशीं शास्त्रप्रमाणेंही आहेत असें जेव्हां त्यांना आढळून आलें तेव्हां आपल्याला कांहीं अवश्य कर्तव्य बजवावयाचें आहे असा त्यांचा निर्धार झाला. लागलीच त्यांनीं त्या कामाला कंबर बांधली. त्यांनीं विधवाविवाहाच्या सशास्त्रतेबद्दलच्या प्रमाणांचा ' विधवाविवाह ' नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. तो ग्रंथ प्रसिद्ध होतांच धर्माभिमानी शास्त्री मंडळींनें पंडितजींवर काहूर उठविलें. पण पंडितजी मुळींच डगले नाहींत. त्यांनीं केवळ शास्त्रप्रमाणांवरच भिस्त न ठेवतां स्वतःच्या पदरास खार लावून कित्येक विधवाविवाह घडवून आणले. स. १८५६ सालीं विधवाविवाहाचा जो कायदा पास झाला त्याचें सर्व श्रेय पंडितजींनाच आहे. त्या नंतर बंगाल्यांतील कुलीनब्राह्मणांच्या बहुपत्नीकत्वाकडे त्यांचें मन वळलें. पुष्कळ भार्या करून घेणें हा कुलीन ब्राह्मणांचा जणूं काय धंदाच बनून राहिला होता. कित्येक तर चाळिस चाळिस, पन्नास पन्नास बायका करून घेत व ज्यांच्याकडून पुष्कळ द्रव्य मिळे त्यांच्या घरीं

मात्र जात असत. इ. स. १८५५ सालीं ही दुष्ट चाल मोडून टाकण्याकरतां त्यांनीं पुष्कळ प्रतिष्ठित व वजनदार लोकांच्या सह्यांनिशीं सरकाराकडे एक अर्ज पाठविला. त्या अर्जाला लेफ्टेनंट गव्हर्नराची पुष्कळ सहानुभूति मिळाली; पण त्याचा कांहीं इष्ट परिणाम झाला नाहीं. पुढें इ. स. १८६२ सालीं ह्याविषयासंबंधीं कायदेकौन्सिलांत एक कायदा पास करविण्याची त्यांनीं खटपट केली. इ. स. १८७१ व १८७२ त ह्या दुष्ट चालीच्या प्रतिकारार्थ त्यांनीं अनेक पुस्तकें व लेख प्रसिद्ध केले पण विधवाविवाहाच्या खटपटींत त्यांना जसें यश आलें तसें ह्या कामांत मात्र आलें नाहीं.

ईश्वरचंद्रांचें औदार्य अनेक प्रकारचें होतें. गरीब, अनाथ, रोगी व दुबळे ह्यांना त्यांची फार मदत असे. अडीअडचणीच्या प्रसंगांत सांपडलेल्या लोकांना पंडितजीकडून द्रव्याची मदत हरहमेश होत असे. एकवेळ बंगालचे प्रसिद्ध-कवि मधुसूदन दत्त ह्यांना १५०० रुपये देऊन त्यांनीं फ्रेंच तुरुंगांतून त्यांची सुटका करविली. निराश्रित आप्तस्वजनांस पंडितजींचा मोठा आधार असे. जेव्हां जेव्हां ते आपल्या जन्मभूमीस जात त्यात्यावेळीं तेथील गरीब लोकांस वांटण्याकरितां सुमारें ५०० रुपयांचे कपडेलत्ते बरोबर नेत असत. " इंडियन असोसिएशन " करतां इमारत बांधण्यासाठीं त्यांनीं १००० रुपयांची देणगी दिली. " हिंदु फॅमिली ॲन्युइटिफंड " या नांवाची बंगाल्यांतलि प्रसिद्ध संस्था ह्यांच्याच खटपटीनें अस्तित्वांत आली. इ. स. १८६५ सालीं बंगाल्यांत मोठा दुष्काळ पडला त्यावेळीं सरकाराकडून गरीब लोकांकरतां अनेक कामें काढवून त्यांचे प्राण वांचविण्याचें श्रेय पंडितजीनींच जोडलें. खुद्द त्यांनींही आपल्या खर्चानें कित्येक दुष्काळीं कामें सुरू केलीं होतीं. इ. स. १८६९ सालीं बरद्वानास मलेरियस तापाची सांथ उद्भवली व औषधोपचार न मिळाल्यामुळें हजारों लोक प्राणास मुकूं लागले, तें पाहून पंडिजींचें अंतःकरण अतिशय द्रवलें. लागलीच त्यांनीं बरद्वानास जाऊन आपल्या बिऱ्हाडीं एक धर्मार्थ दवाखाना स्थापन केला. होम्योपाथी नांवाच्या वैद्यक्रियेवर त्यांची मोटी श्रद्धा होती. त्यांनीं त्या शास्त्राचा झटून अभ्यास केला व त्याच्यायोगें गरिबांची धर्मार्थ चिकित्सा करून व औषधें देऊन त्यांनीं त्यांच्याकडून धन्यवाद मिळविले. इ. स. १८६५ सालीं मिस मेरी कार्पेंटर ह्या सुप्रसिद्ध विदुषीबाई कलकत्त्यास गेल्या होत्या, त्यावेळीं सदरहू बाईंना मुलींच्या कांहीं शाळा दाखविण्याबद्दल त्यावेळच्या बंगालच्या विद्याखा-

त्याच्या डायरेक्टर साहेबांनीं पंडितजीस विनंति केली. त्यावरून पंडितजींनीं कार्पेंटरबाईस कांहीं शाळा दाखविण्यास नेलें, पण घरीं परत येत असतां दुर्दैवानें वाटेंत त्यांची गाडी उलटली व पंडितजी जमिनीवर बेशुद्ध पडले. लागलीच त्यांना औषधोपचार केला व त्यांची तब्येत दुरस्त झाली. त्यापुढें ते पंचवीस वर्षे वाचले पण त्यांची पूर्वीची हिम्मत मात्र कायम राहिली नाहीं. वरील अपघातांतून प्रकृति दुरुस्त झाल्यावर सांथळ परगण्यांतील "करमतर" या ठिकाणीं कायमचें वास्तव्य करण्याचा त्यांनी निश्चय केला. इ. स. १८९० च्या डिसेंबर महिन्यांत त्यांची प्रकृति एकाएकीं बिघडली. त्यावर चंद्रनगरास जाऊन त्याठिकाणीं त्यांनीं कांहीं महिने घालविले. अखेरीस तेथून ते कलकत्यास आले. तेथे त्यांची प्रकृति दिवसेंदिवस जास्तच बिघडत जाऊन ता. २९ जुलै सन १८९१ ह्यादिवशीं त्यांनीं ह्या नश्वर जगांतून प्रयाण केलें.

पंडितजींचा प्रामाणिकपणा असामान्य होता. आपल्या मृत्यूपूर्वी कांहीं दिवस आपला खासगी हिशेब तपासीत असतां आपल्या अंदाजाबाहेर आपली शिलक असल्याचें त्याना आढळून आलें. आपण सरकारी नोकर असतांना सरकारी पैसे अन्यायानें आपल्याकडे आले असावे असा त्यांचा ग्रह झाला. त्यांनीं लागलीच ते पैसे अकौंटंट जनरलकडे पाठवून दिले व ते सरकारखातीं जमा करण्यास विनंति केली. अकौंटंट जनरलास त्याचा कांहीं उमज पडेना. पण पैसे पाठवून दिल्यावर पंडितजींच्या मनाची मात्र रुखरुख नाहींशी झाली.

प्रामाणिकपणा, स्पष्टवक्तेपणा, स्वातंत्र्य, साधेपणा वगैरे गुणांनीं पंडितजी बंगाल्यांत सर्वांच्या आदरास व मान्यतेस पात्र झाले होते. कोणतीही गोष्ट नुसती बोलून न दाखवितां ते कृतीनें दाखवित असत. आपल्या देशबांधवांना आत्मत्यागाचा व नीतिधैर्याचा त्यांनीं जो धडा घालून दिला त्याबद्दल त्यांची मोठी ख्याति आहे. लोकांच्या निंदास्तुतीची मुळींच परवा न बाळगतां यांनीं आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविलें. पंडिजीचे चरित्रकार बाबू श्रीचरण चक्रवर्ती ह्यांनीं पंडितजींसंबंधानें पुढील उद्गार काढले आहेत. "खरोखर पाहतां शुद्ध मनोवृत्ति, विस्तृत भूतदया, परोपकारी स्वभाव, उदार मन, खरें स्वातंत्र्य, अद्वितीय स्वावलंबन, कुशाग्रबुद्धि, असाधारण तारतम्य, हे गुण त्यांचे अंगी पूर्णपणे वास करीत होते. जितके कोमल तितकेच कठोर,

जितके कडक तितकेच दयाळु. उत्तम प्रकारचे बुद्धिमान् व तसेच कल्पनाशक्तीनें पूर्ण, या देशांतील त्यांच्या समकालीन मनुष्यांमध्ये अतिशय सुस्वभावी जर कोणी ग्रहस्थ असतील तर ते हेच होत. पूर्वात्य व पाश्चिमात्य ज्ञानांचा संस्कार, अगाध ज्ञान व व्यवहारचातुर्य, उच्च बुद्धिमत्ता व उदार अंतःकरण, कोमल मनोवृत्ति व दृढ मनोनिग्रह, आवेश व व्यापकता यांचे दुसरीकडे क्वचितच दिसून येणारें संमेलन या महात्म्यामध्ये दृग्गोचर होत होतें.

तारीख १ जानेवारी सन १८८७ रोजीं कलकत्यास भरलेल्या दरबारात पंडितजींना एक प्रशंसापत्र मिळालें व स. १८९० सालच्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस त्यानां सी. आय. ई. ही पदवी मिळाली.

———— —



डब्लु. सी. बानर्जी.

M. C. P. P.

२

बाबू उमेशचंद्र बॉनर्जी.

(बॅरिस्टर ॲट लॉ.)

सामान्यतः बालपणच्या बऱ्यावाईट प्रवृत्तींवरून अमुक मनुष्य पुढें कोणत्या प्रकारचा निपजेल, ह्याची बरीचशी अटकळ तार्किक लोक करीत असतात. या नियमास अनुसरून मि० बॉनर्जींच्या बाल्यांतील चेष्टितांवरून त्यांच्या भावी चारित्र्याबद्दल अनुमान केलेला मनुष्य जर सध्यां कोणी जीवंत असेल तर आपलें अनुमान अगदींच चुकीचें ठरल्याबद्दल त्याला राहून राहून आश्चर्यच वाटत असलें पाहिजे.

बॉनर्जी घराणं हें पूर्वापार कुलीन व प्रतिष्ठित असें आहे. मि० बॉनर्जी यांचे वाडवडील कलकत्त्यापासून ८।१० कोसांवर, बागंद नांवाच्या एका खेडेगांवीं राहात असत. ह्यांचे वडील श्रीगिरीशचंद्र हे अटर्नी असून ते कलकत्त्यानजीक किदरपूर येथें राहत. येथेंच त्यास सन १८४४ च्या डिसेंबर महिन्याचे २९ तारखेस श्रीउमेशचंद्र हे झाले. श्रीउमेशचंद्रांचें मातुल घराणेंही चांगलें नामांकित आहे. पंडित जगन्नाथ तर्कपंचाननांची निपणती त्यांची माता होय.

चरित्रनायक हे लहानपणीं फार हूड, छांदिष्ट व निष्काळजी असत. विद्यार्जनांत त्यांचे लक्ष्य अगदीं सुद्धां नसे. प्रथम त्यांना कलकत्त्यांतील एका पाठशाळेंत घातलें होतें. तेथें बंगाली प्राथमिक शिक्षण संपविल्यावर, ओरिएंटल सेमिनरी व हिंदुस्कूल, अशा दोन शाळांत मिळून, त्यांचें मॅट्रिक्युलेशनपर्यंत इंग्रजी शिक्षण कसें बसें झालें. त्यांची आवडती गोष्ट ह्मटली ह्मणजे नाटक ही होय. नाटकें बघावयाची व त्यांत सोंगें घ्यावयाची त्यांना भारी हौस. त्यांच्या नैसर्गिक मोहक स्वरूपाची त्यांत आणखी भर पडली होती. त्यांच्या देखण्या चेहऱ्यामुळें महाराजा ज्योतींद्रमोहन टागोर यांस ते अत्यंत प्रिय झाले होते. टागोर यांचे नाटकालयांत स्त्रीपुरुषपात्रांचीं कामें त्यांनीं अनेकदां केलीं आहेत.

आपल्या मुलाचे हातून जास्त विद्यार्जन होत नाहीं अशी मि० गिरीशचंद्राची खात्री झाल्यावर त्यांस आपल्याच धंद्यात घालण्याचें त्यांनीं मनांत आणिलें. सन १८६१ व ६२ या दोन सालीं मि० बॉनर्जीच्या वडिलांनीं त्यांना कलकत्यांतील एकदोघां युरोपियन अटर्नीपाशीं क्लार्क ह्मणून चिकटवून दिलें होतें. हें काम करीत असतां आपल्या उनाडपणाचा त्यास फारच पश्चात्ताप वाटला व त्यामुळें झालेली आपली हानि भरून काढण्याचा सुनिश्चय त्यांनीं केला. ह्यावेळीं त्यांनीं वाचनाभिरुचि वाढवून आश्चर्यकारक लेखनशक्ति संपादन केली. त्याच सुमारास ह्मणजे सन १८६२ च्या मे महिन्यांत "बेंगॉली" हें सुप्रसिद्ध वर्तमान त्यानी अस्तित्वांत आणिलें.

मनुष्याचा उदयकाल समीप आला ह्मणजे त्याला सगळ्याच गोष्टी चोहोंकडून अनुकूल होऊं लागतात. बॉनर्जीची गोष्ट अशीच झाली. इंग्लंडमध्यें जाऊन "कायदा" या विषयात नैपुण्य मिळवून येण्यासाठीं मुंबईचे मि० रुस्तुमजी जमसेटजी जिजीभाई यानीं सन १८६४ सालीं तीन लाख रुपये सरकारच्या हवालीं केले होते. या रकमेच्या उत्पन्नांतून चालूं राहणाऱ्या पांच छात्रवृत्तींपैकीं बंगाल्याच्या वाटणीस एकच आली. ह्या छात्रवृत्तीसाठीं उमेदवार निवडण्यासाठीं वरिष्ट सरकारनें नेमलेल्या परीक्षकमंडळानें मि० बॉनर्जी यांचीच निवड केली. ही छात्रवृत्ति मिळवून सन १८६४ चे आक्टोबरात मि० बॉनर्जी यांनीं विलायतेचा मार्ग सुधारला. तेथें "मिडल टेंपल" नामक संस्थेत कायद्याचा अभ्यास करून परीक्षेत ते यशस्वीही झाले. सन १८६८ सालीं बॅरिस्टराचे पटात नाव दाखल होण्यापूर्वीच सेशनकोर्टापुढील एकदोन खटल्यांत आपली हुषारी दाखवून त्यांनीं चांगलाच लौकिक संपादन केला. यांचें बुद्धिचातुर्य फौजदारीपेक्षां दिवाणीबाबींत तर विशेष दृष्टीस पडे. सन १८८३ सालीं मि० सुरेंद्रनाथ बानर्जी यांजवर कोर्टाच्या बेअदबीबद्दल चाललेल्या खटल्यामुळे व स्टेटस्मन व फ्रेंड आफ् इंडिया या पत्राचे प्रसिद्ध लेखक मि० रॉबर्ट नाईट यांजवर सन १८८७ सालीं झालेल्या अब्रुनुकसानीचे खटल्यामुळें चरित्रनायकाचें नाव अगदीं अजरामर होऊन राहिलें आहे. यांच्या आगच्या कायदेपंडितता, वाक्पाटव, धूर्तता इत्यादि गुणांबद्दल थोडक्यांत इतकेंच सांगणें पुरे कीं, अद्यापपावेतों त्यांच्या तोडीचा इकडे देशी अगर विदेशी बॅरिस्टर झालाच नाही.

सन १८८१ व सन १८८७ या सालांचे दरम्यान ४ वेळां मिळून सुमार ५।६ वर्षें यांनीं हिंदुस्थानसरकारच्या कायदाविषयक सल्लामसलतगारा (स्टँडिंग कौन्सिल) चें काम केलें आहे. कलकत्ताहायकोर्टात २।३ वेळां न्यायाधीशाची जागाही त्यांना देऊं केली होती. ही जागा त्यांनीं मोठ्या मिन्नतवारीनें नाकारली. कारण त्यांची प्राप्तिच अशी असे कीं अगदीं काम कमी असले तरी सुद्धां हायकोर्टजजाचे पगाराइतकी पैदास्त ते सहज करीत.

विलायतेंत कायद्याचा अभ्यास चालूं असतां दुसऱ्या एका गोष्टीकडे त्यांचें लक्ष्य वेधून राहिलें होतें. ही गोष्ट ह्मटली ह्मणजे स्वदेशोद्धारार्थ प्रयत्न, ही होय. इंग्रजी राजनीतीचे दोष त्याच वेळीं त्याचे लक्ष्यांत पूर्णपणे येऊन चुकले होते. त्यांनीं इग्लंडांत असताना सन १८६५ सालीं लंडन इंडियन सोसायटी " नांवाची एक संस्था स्थापन केली होती. पुढें ही संस्था " ईस्ट इंडियन असोशिएशन " नामक संस्थेत अंतर्भूत झाली. सन १८६७ सालीं सर एडवर्ड हर्बट्स याचे अध्यक्षतेखालीं झालेल्या एका व्याख्यानात त्यांनीं सध्यांच्या इंग्रजी राज्यपद्धतीचा फार कडक व मुद्देसूद रीतीनें निषेध करून विलायतेप्रमाणें येथेंही हिंदुस्थानच्याच प्रतिनिधिद्वारा राज्य चालावें असें प्रतिपादिलें होतें. त्याचप्रमाणें सर जेम्स स्टीफन याचे बुद्धिकौटिल्यानें— ज्यूरीच्याच मताप्रमाणें अखेर निकाल न होण्याबद्दल व अपीलात शिक्षा वाढवितां येण्याबद्दल, झालेल्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या दुरुस्ती विषयीं व पूर्वी शाबीत झालेला गुन्हा आरोपीविरुद्ध पुनः पाहिजे तेव्हां पुराव्यांत आणूं देण्याविषयीं त्यांनीं पुष्कळदां सणसणीत टीकाही केलेली होती. एकंदरींत विलायतेंत राहून तेथील मदतगार लोकांच्या ठिकठिकाणीं सभा भरवून त्याचेपुढें हिंदी प्रजेचीं गाऱ्हाणीं गाऊन अंशतः तरी हिंदुस्थानचे वतीनें इंग्रजी लोकमत जागृत करण्याचे कामीं त्यांनीं केलेले अविश्रांत श्रम खरोखरीच अभिनंदनीय होत.

सन १८८५ सालीं मुंबईस भरलेल्या राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षतेचा मान त्यांनाच प्रथम देण्यांत आला होता; यावरून त्यांनीं चालविलेल्या देशसेवेबद्दल लोक किती अभिज्ञ आहेत हें सहजच व्यक्त होत आहे. त्या वेळचें, अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं केलेलें भाषण फारच मार्मिक व जोराचें होतें. राष्ट्रोन्नतिविषयक व समाजसुधारणाविषयक प्रत्येक गोष्टींत ते काया, वाचा, मन व द्रव्य या साधनांनीं मनापासून साहाय्य करीत असतात.

उमेशचंद्र बॉनर्जी यांचें लग्न लहानपणींच ह्मणजे वयाच्या पंधरावे वर्षी झालें. स्वानुभवावरून बालपणींच विवाह करणें अगदीं अप्रशस्त होय, असें त्यांचें मत असावें असें दिसतें. स्त्रियांना शिक्षण देण्याविषयीं त्यांची पूर्ण अनुमति आहे. संसारांत खरी सहचरी शोभण्याजोगें त्यांनीं आपल्या पत्नीस स्वतः शिक्षण दिलेलें आहे.

सगळे धर्म आपापल्या परीनें चांगले आहेत, अशी त्यांची समजूत आहे. एकदां त्यांचे मनांत खिश्चन होण्याचें आलें होतें. परंतु, धार्मिक व वेदांत विषयक पुस्तकांच्या पूर्ण परिशीलनानें त्यांचा तो बेत फिरला व तेव्हांपासून, मनुष्यानें धर्मांतर करणें अगदीं मूर्खपण होय; अशी त्यांची पक्की खात्री झाली आहे. परोपकृतीसारखा अन्य धर्म नाहीं अशी त्यांची श्रद्धा आहे. त्यांच्या मतें आपली एकत्रकुंटुबपद्धति विघातक आहे. यामुळें लोक आपापसांत भांडून ऐक्य बिघडवितात, असा त्यांचा समज आहे. स्त्रियांना पुरेसें शिक्षण दिल्याशिवाय त्यांचे विवाह होऊं नयेत, अशा मताचे ते आहेत.

ते स्वभावानें फार नीतिमान, उदार, गंभीर व सभ्य असून हाडाचे फार प्रेमळ व दयाळू आहेत. त्यांचा इंग्रजी विद्याव्यासंग फार अचाट आहे. कोणताही महत्त्वाचा इंग्रजी गद्य अगर पद्य ग्रंथ त्यांचे दृष्टीखालून गेला नाहीं असें नाहीं. चार्लस लँब व बंकिमचंद्र यांचेसारख्यांचे ग्रंथ ते मोठ्या भक्तीनें वाचतात.

सध्यां ते वयानें साठीच्या घरांत आहेत; तरी त्यांचा स्वदेशसेवेचा व्यासंग अखंड चाललेला असतो. ज्या कांहीं थोडया — स्वदेशसेवारक्त व उत्साही विद्वद्रत्नांच्या परोपकारी अस्तित्वामुळें इंग्रजी अंमलाखालचे हे दिवस आपण पहात आहों, त्यांपैकींच उमेशचंद्र बॉनर्जी हे एक आहेत. अशींच नररत्नें ह्या आर्यभूचे पोटीं वारंवार निपजून देशोद्धार होवो, अशी परमेशापाशीं प्रार्थना करून हा अल्पसा चरित्रलेख संपवितों.



एम॰ आर॰ लाल मोहन घोस॰

M.C.P.P.

३

लाल मोहन घोस

ब्रह्मप्राप्तीसाठीं ज्याप्रमाणें स्वार्थावर पाणी सोडावें लागतें त्याचप्रमाणें राजकीय वातावरणाच्या सृष्टींत मोठेपणा प्राप्त करून घेण्यासाठीं आत्मयज्ञ करावा लागतो. कधीं कधीं तर मरणापर्यंतही मजल येऊन ठेंपते. तेव्हां स्वदेशासाठीं झटणाराच्या पाठीमागें संकटपरंपरा कोठपर्यंत लागेल याची कल्पना त्यांत पडल्याशिवाय होणें शक्य नाहीं. असें पुरुष फारच विरळा जन्मास येतात आणि ह्मणूनच त्यांच्या चरित्रानें सामान्य जनांच्या मनावर कांहीं अंशतःतरी परिणाम होतो. त्यांतलेच मथळ्यावर लिहिलेले लाल मोहन घोस हे एक होत.

हिंदुस्थानाला राजकीय हक्क मिळवून घ्यावयाचे अशा उद्देशानें या ३०।३५ वर्षांत जे गृहस्थ इकडून इंग्लंडला गेले त्यांपैकीं लाल मोहन हे एक आहेत. परंतु आंग्लभूमीच्या पुत्रांस ज्यानीं आपल्या वाणीनें पान्हां फोडला, व आपल्या लोकांस त्यांच्या आदरास पात्र करून घेतलें त्यांतही यांचा नंबर वर लागेल. इतकेंच नव्हे तर त्यांनीं याहीपेक्षां एक मोठी कामगिरी बजावली आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटांत मेंबर होण्याचें प्रथमतः यांच्या मनांत आलें, व त्यांनीं जो यत्न केला त्यांत त्यांना स्वतःजरी यश आलें नाहीं तरी आत्म अनुभवानें इतरासाठीं त्यांनीं पार्लमेंटचा मार्ग चोखाळून ठेवला. दुसऱ्या एका गृहस्थांनीं यत्न करून पार्लमेंटमध्यें काळा अदमी जाऊं शकतो असें प्रत्ययास आणून दिलें आणि त्या प्रत्ययामुळें इंग्रज लोकांच्या उदार बुद्धीचा डंका चोहोंकडे वाजला. तेव्हां त्याचें चरित्र वाचावयाची इच्छा वाचकांस व्हावी व लिहिणारास तें लिहिण्याविषयीं प्रेरणा व्हावी यांत नवल तें काय?

घोस यांचें घराणें मोठें लौकिकवान् असून त्याचा इतिहास मोठा गमतीदार आहे. घोस हे पूर्वी बुलादीवा येथें रहात असत; परंतु तेथून त्यांस डाका

शेजारीं बैरगडी ह्मणून एक लहानसें शहर आहे तेथें जाऊन राहावें लागलें. कारण तेथील रहिवाशी राजा गोपाळ कृष्ण यांशीं त्यांचें भांडण झालें. राजाच्या मनांत कायस्थापासून झालेली एक कन्या घोंस घरण्यांतील कोणातरी एकाच्या पदरीं पडली पाहिजे. परंतु ही गोष्ट घोस यांस रुचली नाहीं यामुळें अखेर त्यांना ग्रामत्यागच करावा लागला. बैरगडी येथें लाल मोहन यांच्या वडिलांचा जन्म झाला. लॉर्ड आकलंड यांनीं मुख्य सदर अमीनाची जागा या गृहस्थांस प्रथमतः दिली. राजाराम मोहनरॉय हे यांचे परमस्नेही असल्यामुळें त्यांचीं मतें जुन्या चालीचीं नव्हतीं हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. डाक्याचें कॉलेज स्थापन करण्यांत हे पुढारी होते व कॉलेजच्या फंडास त्यांनीं स्वतः मोठी भर घातलेली आहे.

अशा वडिलांच्या पोटीं लालमोहन यांचें जन्म कृष्णनगर येथें सन १८४९ त झालें. कलकत्ता येथें आपलें पहिलें शिक्षण संपवून ते सन १८६९ सालीं बारिस्टरची परीक्षा देण्यासाठीं विलायतेस गेले. यावेळीं त्यांचे वडील बंधु मनोमोहन घोस बारिस्टरच्या धंद्यांत नुकताच लौकिक मिळवूं लागले होते. दोन वर्षें विलायतेंत राहून त्यांनीं कायद्याचा अभ्यास संपविला व बारिस्टर होऊन धंदा करण्यासाठीं ते हिंदुस्थानास सन १८७१ च्या अखेरीस परत आले. राजकीय चळवळींत बंगालचें पाऊल पहिल्यापासूनच पुढें आहे. याच सुमारास ब्रिटिश इंडियन असेसिएशनही कलकत्यास स्थापन झाली. व हिंदुस्थानांत इंग्लंड प्रमाणें सिव्हिल सर्विस परिक्षा व्हावी हा विषय त्या संस्थेनें हातीं घेतला; व लालमोहन यास या विषयाची चळवळ करण्यासाठीं तिनें विलायतेस पाठविलें.

मि. सुरेंद्रनाथ बानर्जी यानीं या विषयावर लोकमत जागृत करण्यासाठीं कंबर बांधली. ठिकठिकाणीं व्याख्यानें देत ते हिंडले; जागोजाग त्यानीं सभा भरविल्या; व लालमोहन घोस यांच्या हस्तें पार्लमेंटला सादर करण्यासाठीं अर्ज तयार झाले. हे अर्ज घेऊन सन १८७९ सालीं मि. घोस हे विलायतेस गेले आणि थोडक्याच दिवसांत मि. ब्राईट यांची सहानुभूति त्यांनीं संपादन करून घेतली. वुइलीजरूम (लंडन) मध्यें या विषयावर व्याख्यान देण्यासाठीं सभा बोलावून मि. ब्राईट यांनीं अध्यक्षस्थान पतकरण्याचें कबल केलें. मि० घोस यांचें भाषण तेथें झालें. आपल्या विषयाचें

प्रतिपादन मि० घोस यांनीं इतक्या मार्मिकपणानें व व्यापक दृष्टीनें केलें कीं या विषयाच्या पूर्ततेसाठीं अथवा जरूरीसाठीं मला बोलावयास व्याख्या· त्यांनीं कांहीं ठेवलेंच नाहीं असें मि० ब्राईट त्यांनीं शेवटीं अध्यक्ष या नात्यानें सांगून आमच्या चरित्रनायकाची पाठ थोपटली. याप्रमाणें मि० घोस यांच्या मोहिमेचा ठिकठिकाणीं परिणाम होऊन त्यावेळीं कान्सर्वेटिव गव्हर्मेंट असतांही हिंदुस्थानांत स्टॅटयूटरी सिव्हिल सर्विस करण्या विषयींचा खलिता हौस ऑफ कामन्सच्या सभेपुढें येऊन पडला. इंग्लंडमध्यें या वेळीं ते थोडाच वेळ राहिले तरी यांचें व्याख्यान ऐकण्याविषयींची इच्छा पुष्कळ लोकांस झाली. हिंदुस्थान सरकारची जमाबंदी, व्यापार वगैरे बाबतींत कशी काय व्यवस्था व धोरण आहे याविषयीं माहिती करून घेण्यासाठीं बार्मिंगहॅम चेंबर आफ कामर्सनें मि० घोस यांस निमंत्रण केलें व त्यांचें एक भाषण त्या ठिकाणीं झालें.

सन १८८० च्या मार्च महिन्यांत घोस कलकत्यास परत आले. त्यावेळीं तेथील लोकांनीं त्यांचें उत्तम प्रकारें स्वागत केलें. पुढें पुनः विलायतेस जाऊन ते परत आले त्यावेळीं नोव्हेंबर महिन्यांत मुंबईच्या लोकांनीं त्याचा बहुमान केला. येथपासून इंग्लंड व हिंदुस्थान यांतील राजकारस्थानाच्या विषयाचा त्यांनीं चांगला व्यासंग आरंभला; व दुसरी सफर जेव्हां त्यांनीं विलायतेस केली तेव्हां " इंग्लंडची दक्षिण आफ्रिकेविषयीं नीति " व " जगाची शांति " या दोन विषयांवर त्यांनीं फारच उत्तम व्याख्यानें दिलीं. सन १८८२ सालीं कलकत्यास एतद्देशीय वर्तमान पत्रकारांच्या मुसकटदाबीचा कायदा रद्द व्हावा असें सरकारास कळविण्यासाठीं एक सभा भरली होती. तींत त्या कायद्याचें खंडन त्यांनीं केलें. तें भाषण फारच जोरदार व अधिकाराचें असल्यासारखें झालें. सन १८८३ सालीं इल्बर्ट बिलानें सारें हिंदुस्थान हालून गेलें होतें; अपस्वार्थी, अविचारी व निव्वळ वेड्या पिशा बनलेल्या बऱ्याच अँग्लो इंडियनांनीं या बिलाविरुद्ध भलतीच ओरड करून सोडिली होती. ही ओरड इंग्रज लोकांस शोभत नाहीं असें हिंदुस्थानांतील लोकांनीं उघडपणें प्रतिपादन केलें व कांहीं थोर इंग्रज गृहस्थांनीं ती गोष्ट कबूलही केली. डाका येथें या बाबतींत मि० घोस यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं विरुद्ध पक्षाच्या हलकटपणाचा व मूर्खपणाचा बाजार कसा पसरला आहे याचा चांगलाच समाचार घेतला.

या भाषणाचे वेळीं त्यांस सरस्वती खरोखरी प्रसन्न झाली होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. युक्ति व कोटि यांची त्यांस उत्तम रीतीनें सांगड घालतां आली व यामुळें विरुद्ध पक्षाचा प्रत्येक मुद्दा त्यांनीं हाणून पाडला. सन १८८४ सालीं पार्लमेंटची निवड व्हावयाची होती, ह्मणून आपला शिरकाव करावयाच्या उद्देशानें ते पुनः विलायतेस गेले. वक्तृत्वशक्तीवरून मि० घोस यांची माहिती विलॅायतेच्या लोकांस चांगली होती यामुळें लिबरल राजकारस्थानी पुरुषांत त्यांची गणना होऊन गेली व एका परगण्यातर्फे त्याना उमेदवार ह्मणून उभें राहतां आलें. रसाळ वाणी, सभ्यवर्तन, आणि काम करण्याची उत्सुकता व याच्या मुळाशीं हिंदुस्थानांतील गरीब रयतेसाठीं पार्लमेंटांत तोंड उघडतां यावें ही इच्छा असल्यामुळें डेप्टफर्ड लिबरल मंडळींची ह्यांस सहानुभूति मिळाली व त्या ठिकाणीं मि. घोस यांस यश आलें असतें तर काळ्या अदमीला आपल्या तर्फे निवडून देण्याचें श्रय प्रथमतः या लोकांस मिळालें असतें. परंतु, जो मान सेंट्रल फिन्सबरीलाच मिळावा अशी ईश्वरी इच्छा होती तो या लोकांच्या नशीबीं कोठून येणार; डेप्टफर्डचे लोक कमनशीबी किंवा हिंदुस्थान हतभागी काय असेल तें असो मुखांत घास पडावयाच्याच वेळीं तो गळून गेला. आयत्या वेळीं बऱ्याच मतदारांनीं आपलीं मतें लालमोहन यांस देण्याचें नाकबूल केलं.

या प्रसंगीं मनोमोहन घोस तेथें हजर होते. मुंबईच्या श्रोते मंडळापुढें ती हकीकत पुढील शब्दांनीं त्यांनीं वर्णन केली. " त्या समयाचें वर्णन करावयास माझी मति कुंठित झाली आहे. तें वर्णन मी कोणत्या शब्दांनीं करूं हें मला समजत नाहीं. चोहींकडे निशाणें लागलीं होतीं. हिंदुस्थान व इंग्लंड या दोन्ही देशांचे प्रतिनिधि रस्त्यांतून एकमेकांच्या हातांत हात घालीत होते. हिंदुस्थानचा मनुष्य भेटला कीं त्याचें प्रेमपुरःसर स्वागत होत असे. बायका, मुलें यांच्यांत किती उत्कंठा उचंबळली होती याची तुह्मांस कल्पनाही होणार नाहीं. मि० लाल मोहन यांस यश येणार नाहीं अशी कोणाचीही मनोदेवता वाहत नव्हती. मी ही गोष्ट स्वानुभवापासून सांगत आहे व लालमोहन हे जरी निवडून आले नाहींत तरी त्यांत अपयश आलें असें मला वाटत नाहीं. नीतिदृष्ट्या आमचा जयच झाला. "त्या दिवशींच्या गोष्टी सांगतां येणें अशक्य आहे. कान्सरवेटिव ह्मणत कीं

' हिंदूला मत देऊं नका, स्वदेशबांधवाला द्या. " सुमारें ८० वर्षांचे वृद्ध गृहस्थ दोन होते. त्यांनीं येऊन लालमोहन यास मत दिलें. " तुह्मी असें कां केलें " असें विचारतां " तुह्मी त्यास काळा ह्मणतां ह्मणून दिलें " असें त्यानीं उत्तर दिलें. या दोहोंतील एक गृहस्थ फारच अशक्त होता त्याला मूर्छा आल्यामुळें उचलून न्यावें लागलें. लालमोहन यांस ३९६० मतें पडलीं; व आह्मांस आशेचा अंकुर दिसूं लागला; परंतु, आयरिश मेंबरांनीं आयत्यावेळीं दगा दिला. आणि त्यांत चमत्कार असा कीं लिबरल उमेदवारांस मत देऊं नका असें हस्तपत्रक खुद्द मि० पार्नेल यानें चार दिवस अगोदर काढलें होतें.

डेप्टफर्ड निवडणुकीची गोष्ट लालमोहन यांच्या स्मरणांत अगदीं उत्कृष्ट आहे. परहितबुद्धीनें आणि स्वदेशाभिमानानें श्रम केलेले आढळले ह्मणजे इंग्रजलोक गुणग्राहकता दाखविल्याशिवाय राहत नाहींत. निवडणुकीचेवेळीं त्यांनीं आपणांस चांगली मदत केली इत्यादि उद्गार कृतज्ञतापूर्वक त्यांच्या तोंडून वारंवार निघतात. त्यांनीं पुनः विलायतेस जाऊन या कारणासाठीं श्रम केले नाहींत. कारण ही गोष्ट फार खर्चाची आहे. त्यांचें वय जवळ जवळ ६० वर्षांचे झालें आहे. तेव्हां त्यांस ही गोष्ट आतां शक्य नाहीं. तथापि त्यांचें वक्तृत्व अद्याप किती खणखाणित आहे याचा प्रत्यय गेल्या राष्ट्रीय-सभेचे वेळीं आलाच आहे. या देशांत त्यांच्या हातून बरींच कामें अजून होतील यांत शंका नाहीं.



बाबू सुरेंद्र नाथ बानर्जी.

M. C. C. P. P.

४

ना. सुरेंद्रनाथ बानर्जी.

सृष्टीमध्यें जी जी गोष्ट घडून येते तिच्या उदरांतून पुढें येणाऱ्या सत्कार्यांचा उगम असतो. असें जें ह्मणतात तें प्रत्यहीं प्रत्ययास येतें. मानवी दृष्टी अकुंचित असल्यामुळें जगच्चालकाच्या सृष्टींतील अमर्याद कार्यकारणभावाचें आकलन मनुष्याच्या हातून व्हावें तसें होत नाहीं. नेकीनें चालणाऱ्या मनुष्याच्या आयुष्यक्रमांत एखादी अनर्थकारक गोष्ट घडून आली ह्मणजे सर्व शक्तिमान् जगच्चालकाच्या हातून तो एक मोठा अन्याय घडला असा त्याचेवर आरोप करण्याची मनुष्यास स्वाभाविकपणेंच बुद्धि होते. परंतु ह्या त्याच्या हातून मोठाच प्रमाद होतो. एखाद्याच्या न्यायी, अन्यायीपणाबद्दल निर्णय करावयाचा तो त्यानें हातीं घेतलेल्या कार्याचा शेवट झाला ह्मणजेच करावयाचा असतो. परंतु जगच्चालकास ही गोष्ट लागू पडत नाहीं. कारण त्याच्या कर्मास शेवट कधींच नाहीं. या सृष्टिचक्रांत आपल्या मर्यादित आकलनशक्तीनें ज्याला आपण कार्य किंवा परिणाम असें समजतों तें कार्य किंवा तो परिणाम हीं खरोखरच तशीं नसून तीं पुढें घडून येणाऱ्या सत्कार्यांचीं कारणेंच असतात. ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांचे चरित्रांत जगच्चालकाचें हें अमर्याद, अवर्णनीय, व अगम्य दूरदर्शकत्व स्पष्टपणें व्यक्त होतें. सुरेंद्रनाथ बानर्जी यांचा जन्म १८४८ मध्यें झाला. यांचे तीर्थरूप बाबू दुर्गाचरण हे कलकत्ता येथें वैद्यकीचा धंदा करीत होते. त्यांना डॉक्टरीची पदवी वगैरे नसून त्यांनीं केवळ आपल्या कर्तबगारीवर आपल्या धंद्यांत लौकिक संपादन केला व कलकत्ता येथें त्यावेळेस जे कांहीं पहिल्या दर्जाचे डॉक्टर होते त्यांमध्यें यांचें नांव प्रमुखत्वानें निघत होतें. निदान व चिकित्सा यांमध्यें त्यांचें काम हातखंडा असे. कार्यक्षमता व कर्तव्यप्रीति हे दोन गुण त्यांमध्यें पूर्णपणें वास करीत होते. ना. सुरेंद्रनाथ यांचेही अंगीं हे गुण त्यांच्या वडिलाकडूनच आले. बाबू दुर्गाचरण ह्यास पांच मुलगे होते;

त्यांपैकीं आमचे चरित्रनायक हे दुसरे होत. यांच्या इंग्रजी शिक्षणास यांच्या वयाच्या सातव्या वर्षापासून डेविटनकॉलेजमध्यें आरंभ झाला. सदर कॉलेज-मध्यें त्यावेळेस युरोपियन व युरेजियन लोकांचाच भरणा फार असे. यामुळें सुरेंद्रनाथास इंग्रजीभाषेचें ज्ञान होण्यास व्याकरण व कोश यांची विशेषशी जरूर पडली नाहीं. केवळ श्रवणानेंच त्यांचें बरेचसें काम उरकलें. इ.स.१८६३ सालीं यांच्या वयाचे १५ वे वर्षी यांची प्रवेशपरीक्षा झाली. त्या परीक्षेंत ते पहिल्या वर्गात आले. त्यांची दुसरी भाषा ल्याटिन ही होती. पुढें दोन वर्षांनीं त्यांची दुसरी परीक्षा झाली; तींतही ते पहिल्या वर्गात आले; आणि अखेर १८६८ सालीं आपल्या वयाच्या १९ व्या वर्षी ते बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात पसार झाले. त्या वेळचे डेव्हिटन कालेजचे प्रिन्सिपाल मि० साइम यांची सुरेंद्रनाथावर फारच भक्ति बसली व हा मुलगा पुढें मोठे-पणास पावून चांगला लौकिक संपादन करील असें त्यांनीं त्या वेळींच ओळ-खिलें होतें. या मुलास विलायतेमध्यें सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेकरितां पाठ-वावें अशी सदर प्रिन्सिपाल यांनीं बाबू सुरेंद्रनाथ यांचे वडिलांपाशीं शिफारस केली. वडिलांसही ही गोष्ट पसंत पडून सुरेंद्रनाथ हे १८६८ च्या मार्च महिन्यांत सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा देण्याकरितां इंग्लंडास निघाले. तेथें जाऊन त्यांनीं तेथील युनिव्हर्सिटीकॉलेजमध्यें आपला अभ्यास चालविला. या ठिकाणीं नुक-तेंच ग्ल्याडस्टन साहेबांचें चरित्र लिहिलेले प्रो मोर्ले हे त्यांचे शिक्षक होते. अशा विद्वान गृहस्थाची संगती झाल्यानंतर सुरेंद्रनाथास इंग्रजी भाषेचें ज्ञान करतलामलकवत् व्हावें हें स्वाभाविकच होतें. तेथें त्यांनीं प्रो. गोल्डस्टकर जवळ संस्कृत भाषेचाही अभ्यास केला. १८६८ सालीं सिव्हिलसर्व्हिसच्या परीक्षे करितां एकंदर ३०० उमेदवार होते त्यांत सुरेंद्रनाथ यांचा नंबर ३८वा आला याचवेळीं त्यांचेवर एक अकल्पित संकट आलें. इंग्रजी आयुष्यगणना व हिंदु आयुष्यगणना यामध्यें अंतर असतें. जें वर्ष संपतें तितक्याच वर्षाचा मनुष्य आहे असें ह्मणण्याची इंग्रजी पद्धति असते. उलटपक्षीं ज्या नवीन वर्षाला आरंभ होतो तितकींच वर्षे मनुष्यास झालीं आहेत असें ह्मणण्याचा हिंदूलोकांचा परि-पाठ आहे. यामुळें १८६३ मध्यें प्रवेश परीक्षा पास झाली त्यावेळेस जो मुलगा सोळा वर्षांचा होता तो मुलगा १८६९ मध्यें सिव्हिलसर्व्हिसचे वेळीं २० वर्षांपेक्षां जास्त असला पाहिजे अशी तिकडील अधिकाऱ्यांची समजूत

होऊन त्यांनीं बाबूसुरेंद्रनाथ यांचे नांव सिव्हिल सर्व्हिसच्या यादींतून काढून टाकलें ! परंतु बाबूसुरेंद्रनाथ यांनीं याबद्दल इंग्लंडमधील वरिष्ठ कोर्टांत अर्ज केला व अखेर या कोर्टानें दिलेल्या निकाला वरून अधिकाऱ्यांस सुरेंद्रनाथाचें नांव पुनः यादींत घालावें लागलें. रा. श्रीपाद बाबाजी ठाकूर यांचें नांवही याच कारणामुळें यादींतून काढून टाकलें होतें; परंतु वरिष्ठ कोर्टाच्या निकालावरून त्यांचाही पुनः प्रवेश झाला. बाबू सुरेंद्रनाथ हे १८७० च्या ज्यानेवारीमध्ये सिव्हिलसर्व्हिसची अखेरची परीक्षा पास झाले. परंतु, दुःखाची गोष्ट ही कीं या सुसमयास त्यांचे तीर्थरूप हयात नव्हते. एकच दिवसाची चुकामूक पडली. बाबू दुर्गाचरण बानर्जी हे फेब्रुवारी २० रोजीं इहलोक सोडून गेले व सुरेंद्रनाथ पास झाल्याची बातमी कुटुंबांतील माणसांस तारीख २१ रोजीं समजली ! वयाची भानगड मिटविण्यांत सुरेंद्रनाथांचें एक वर्ष फुकट गेलें. व दोन वर्षांचा अभ्यासक्रम एका वर्षांतच त्यांस पूर्ण करावा लागला. तरीही मुदतींत अभ्यास संपवून ते परीक्षेंत विजयी झाले ही गोष्ट त्यांच्या अद्वितीय बुद्धिमत्तेची व अविश्रांत उत्साहाची उत्तम रीतिनें साक्ष पटवीत आहे. जीवन कलहाच्या समुद्रांत आपलें जहाज हाकारल्यापासून बाबूवर अनेकप्रकारचीं संकटें आलीं व कधीं कधीं तर खडकावर आदळून या जहाजाचे फुटून तुकडे होतात कीं काय अशीही भीति वाटावयास लागली होती. आरंभींच त्यांस एक प्रचंड खडक लागला होता त्यापासून त्याचा कसा बचाव झाला त्याबद्दलची हकीकत वर दिलेलीच आहे.

याप्रमाणें सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांस सिलहट येथें असिस्टंट म्याजिस्ट्रेटची जागा मिळाली. या जागेची व सुरेंद्रनाथांची गाठ पडून दोन वर्षे झालीं नाहींत तोंच त्यांच्यावर एक अकल्पित घाला आला ! वरील स्थलीं म्याजिस्ट्रेटचें काम करीत असतां त्यांच्या पुढें एक खटला आला. तो खटला 'फरारी' यादींत घालावा असा हुकूम सोडून शिवाय त्यांनीं आरोपीस आपल्या सहीनें वारंटही सोडलें; व अशा रीतीच्या अव्यवस्थेचें कारण विचारतां त्यांनीं खोटी प्रतिज्ञा केली असा आरोप त्यांचेवर ठेवण्यांत आला. आरोप ठेवण्यास येवढयाच गोष्टी पुरेशा असतील तर फारच थोड्या अधिकाऱ्यांस अशा तऱ्हेच्या आरोपांपासून आपली मुक्तता करून घेतां येईल. किंबहुना तें अशक्यच आहे असें म्हटलें असतांही चालेल; हें पुढील हकीकतीवरून कोणाच्याही सहज

लक्ष्यांत येईल. वरील खटला 'फरारी' यादींत चालावा असा जो आपण हुकुम दिला तो बुद्धिपुरःसर नसून इतर कागदावर जशा आपण सह्या केल्या तशी या कागदावर न जाणतां आपण सही केली असा जबाब सुरेंद्रनाथ यांनीं दिला. परंतु, तेवढ्यानें सरकारचें समाधान न होऊन केवळ नजरचुकीबद्दल खोटी प्रतिज्ञा केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यांत आला ! व वरीष्ट अधिकाऱ्यांच्या अद्वितीय शोधक बुद्धीनें या एका क्षुल्लक आरोपाचें पृथक्करण होऊन त्याचे निरनिराळे चौदा स्वतंत्र आरोप बनले ! आपल्यावर चालविण्यांत येणारा खटला कलकत्ता येथें चालावा व आपणास कायद्याचा सल्ला कांहीं विशिष्ट व्यक्तींपासून घेण्याची परवानगी असावी अशा दोन विनंतींचा अर्ज सुरेंद्रनाथांनी हिंदुस्थानसरकारकडे केला होता; परंतु, तो नामंजूर होऊन दोहोंपैकीं एकही विनंति मान्य करण्यांत आली नाहीं. यावरून सरकारचें धोरण काय होतें हें आधींच कळून चुकलें होतें. यांच्यावरील आरोपांची चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत आलें होतें; त्या कमिशनचे मुख्य त्या प्रांतांत चांगला लौकिक मिळविलेले मि. प्रिन्सेप हे होते. सुरेंद्रनाथावरील आरोप कमिशननें कायम करून आपलें ह्मणणें बंगाल सरकारास कळविलें; त्यांनीं दिलेल्या निकालास बंगालसरकार व हिंदुस्थान सरकार यांची अनुमति मिळून सुरेंद्रनाथ यास १८७४ च्या मार्च महिन्यांत नोकरीवरून बडतर्फ करण्यांत आलें; व त्यांस सरकारांतून दरमहा ५० रुपये मिळण्याबद्दलचा ठराव झाला. अशा रीतीनें एका तरुण मनुष्यानें आपल्या अद्वितीय बुद्धिमत्तेनें संपादन केलेल्या आयुष्यक्रमावर अकस्मात् घाला पडला ! या शोचनीय गोष्टीबद्दल बंगाल प्रांतांतील सर्व लोकांस परमावधीचें दुःख झालें; व नेकीनें चालणाऱ्या मनुष्याचा अशा-रीतीनें छळ झालेला पाहून ईश्वराच्या दरबारांत न्याय नाहीं असे उद्गार जनतेच्या तोंडून निघावयास लागले. त्यावेळीं शोचनीय दिसणाऱ्या या गोष्टीपासून पुढें अनेक तऱ्हेच्या महत्त्वाच्या कृत्यांचा उद्भव झाला, त्यांची कल्पना जनसमूहास त्यावेळेस कशी होणार ? चरित्राच्या आरंभीं आह्मीं जें ह्मटलें आहे त्याची सत्यता सिद्ध होण्याची वेळ आतां जवळ येऊन ठेपली. जोराची गति नसलेल्या पाण्यास प्रतिबंध केला असतां तें जसें दुसऱ्यादिशेनें जोरानें वाहत जातें त्याप्रमाणेंच सरकारी नोकरीच्या नीरस वातावरणांतून हद्दपार झालेल्या यांच्या असाधारण मानसशक्तींचा प्रभाव जोरानें उत्कर्ष पावूं लागला व जी

गोष्ट शोकप्रद व अनिष्ट अशी प्रथम दिसली तीच पुढें आनंदप्रद व उत्कर्ष-द्योतक अशी ठरली. राजसेवा करण्याचे दोन मार्ग असतात; एक इतर सर्व कार्यास रजा देऊन सरकारी नोकरी पतकरावयाची व जरेची छाप पडेतोंपर्यंत तींतच आपला देह खर्चावयाचा व दुसरा लोकसेवा पत्करून राजसेवा करावयाची. खरी राजसेवा दुसऱ्या मार्गाचेंच अवलंबन करणाऱ्याच्या हातून उत्तम प्रकारें घडते. कारण, त्यांत स्वार्थसंबंध मुळींच नसतो ह्मटलें तरी चालेल. विशेषतः विदेशी राजांच्या अमदानींत दुसरा मार्ग पहिल्यापेक्षां फारच खडतर व जोखमीचा असतो; व त्याचें अवलंबन करणारास अप्रतिम बुद्धि-मत्ता, स्वार्थत्याग, दृढनिश्चय इत्यादि गुणांचें पाठबळ आवश्यक असतें. ना. सुरेंद्रनाथ यांचे अंगीं हे सर्व गुण पूर्णतेनें वास करीत आहेत. अशा पहिल्या दर्जाच्या मनुष्यानें केवळ खर्डे घाशीच्या कनिष्ठ राजसेवेंत आपलें बहुमोल आयुष्य खर्च करावें हीच गोष्ट वास्तविक पाहतां अनिष्ट होती. या दृष्टीनें सुरेंद्रनाथांच्या आयुष्यक्रमाचें निरीक्षण केलें ह्मणजे त्यांच्यावर आलेला प्रसंग लोकदृष्टीनें अनिष्ट नसून इष्टच होता असें ह्मणावें लागतें. यापुढें त्यांच्या हातून जीं अनेक देशहिताचीं महत्कार्यें घडून आलीं त्या सर्वांस कारण त्यांच्या-वर आलेला हा अनिष्ट प्रसंगच होय. असो. येथें सुरेंद्रनाथ यांच्या आयुष्यांतील एका भूमिकेची समाप्ति होऊन दुसऱ्या भूमिकेस आरंभ झाला. येथूनच त्यांच्या खऱ्या चरित्रास सुरुवात झाली. नोकरीवरून दूर झाल्यामुळें सुरेंद्रनाथांच्या मनाची जी स्थिति झाली असेल तिची कल्पना इतरांस होणें कठीण आहे. तरी निराशेनें हात जोडून स्वस्थ न बसतां ते पुनः बिलायतेस गेले व हिंदुस्थान सरकारच्या निकालावर न्याय मिळण्यासाठीं त्यांनीं तिकडे बरीच खटपट केली; परंतु, तिचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. पुढें त्यांनीं ब्यारिस्टरची परीक्षा देण्याचा प्रयत्न चालविला; परंतु, त्यांतही त्यांच्यावर शाबीत झालेल्या आरो-पाची आडकाठी येऊन त्यांस यश आलें नाहीं. निराशेनें त्यांचे भोंवतीं असा चोहोंकडून वेढा दिल्यामुळें यांस परत हिंदुस्थानांत यावें लागलें !

चोहो बाजूंनीं त्यांस निराशेनें ग्रासून टाकलें हें वर सांगितलेंच आहे. तरी त्यामुळें यत्किंचितही न डगमगतां नवीन मार्ग शोधून काढण्याचे त्यांचे प्रयत्न द्विगुणित उत्साहानें सुरू झाले ! आणि अखेर पंडित ईश्वरचंद्रविद्यासागरा-सारखा पुरस्कर्ता मिळून १८७६ मध्यें ' मेट्रापालिटन इन्स्टिटयूशन ' मध्यें

त्यांस महिना २०० रुपयांची इंग्रजी प्रोफेसराची जागा मिळाली. पुढें कलकत्ता येथें लवकरच एक ' सिटी स्कूल ' नांवाची संस्था स्थापन झाली. त्या संस्थेंतही हे, ईश्वरचंद्र विद्यासागरच्या अनुमतीनें शिकवावयास लागले. १८८१ मध्यें ईश्वरचंद्र विद्यासागर यांची शाळा सोडून देऊन हे ' फ्री चर्च कॉलेज ' मध्यें शिकवावयास लागले; तरी ' सिटी स्कूलशीं ' यांचा संबंध पहिल्याप्रमाणेंच होता. त्यांचें अस्खलित वक्तृत्व, शिष्यप्रीति व शिकविण्याचें अप्रतिम चातुर्य या योगानें त्यांचा शिष्यवर्ग त्यांजवर फारच प्रेम करूं लागला. इतकेंच नव्हे परंतु त्यांचा छात्रवर्ग त्यांस निःसीम भक्तीनें ईश्वराप्रमाणें भजूं लागला. इतक्या सर्व साधनांचें आनुकूल्य मिळतांच त्यांनीं १८८२ मध्यें कलकत्ता येथें एक स्वतंत्र पाठशाळा स्थापन केली; आरंभीं या शाळेंत १०० च मुलें होतीं; परंतु सुरेंद्रनाथासारख्या भगीरथप्रयत्न करणाऱ्या, हुषार व बुद्धिमान् गृहस्थांकडे शाळेच्या शिक्षणाचीं व व्यवस्थेचीं सूत्रें असल्यामुळें या छोटेखानी शाळेचें ' रिपन कालेज ' मध्यें लवकरच रूपांतर होऊन त्या संस्थेमध्यें अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही लवकरच २००० वर जाऊन पोहोंचली ! नेटिव लोकांनीं चालविलेल्या शिक्षणसंस्थांच्या इतिहासांत.इतक्या लवकर येवढा मोठा लौकिक संपादलेल्या शाळेचें उदाहरण फारच क्वचित् सांपडेल ! बंगाल प्रांताचे ले० गव्हर्नर १८८८ मध्यें यांची शिक्षणसंस्था पहावयास गेले होते; त्या वेळेस त्यांनीं शाळेसंबंधानें जें आपलें मत दिलें त्यावरून या संस्थेची योग्यता सहज कळून येणार आहे. ' केवळ खासगी प्रयत्नानें उत्कर्ष पावलेल्या ' रिपन कॉलेज ' सारख्या शिक्षणसंस्थेस सरकारकडून प्रोत्साहन मिळणें आवश्यक आहे. उच्च प्रतीच्या शिक्षणाची जबाबदारी लोकांवर बिनधोक टाकण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. संस्थेच्या अभिवृद्ध्यर्थ तिच्या चालकांनीं जे अविश्रांत श्रम केले आहेत ते खरोखरच प्रशंसनीय आहेत; एकट्या ' रिपन कॉलेज ' ची व्यवस्था ठेवणेंही एका मनुष्यास फारच जड वाटेल; आणि प्रस्तुत चालक आपले हजारों इतर व्यवसाय संभाळून दुसऱ्या या शाळेच्या ज्या दोन शाखा निघाल्या आहेत त्यांची व्यवस्थाही समाधानकारक रीतीनें करीत आहेत यावरून त्यांच्या अंगची कार्यक्षमता व दीर्घोद्योग हीं उत्तम रीतीनें व्यक्त होत आहेत. ' बंगालच्या मुख्य अधिकाऱ्यांचा या आशयाचा अभिप्राय आहे. खिडरपूर आणि हौर या

ठिकाणीं या शाळेच्या दोन शाखा सुरेंद्रनाथ यांनीं स्वतः स्थापन केल्या आहेत; त्यांचीही व्यवस्था हे स्वतःच पहात असतात. ह्या सर्व शाळांत विद्यार्थ्यांची संख्या हल्लीं ३५०० वर गेली आहे ! सरकारी नोकरींतून त्यांची सुटका झाली नसती तर त्यांचें अगाध वक्तृत्व जागच्या जागीं मुरून गेलें असतें; अविश्रांत परिश्रम करून जनतेचें हित साधण्याचा त्यांच्या अंगचा स्वाभाविक अंकूर, पोषण न मिळाल्यामुळें जागच्या जागींच वठून गेला असता. व अनेकविद्याव्यवसायांत पहिल्या प्रतीचा लौकिक मिळविण्याचें त्यांच्या बुद्धिमत्तेचें सामर्थ्य सरकारी नोकरीच्या नीरस व चेतनाशून्य वातावरणांत मृतप्राय व ह्मणूनच निरुपयोगी झालें असतें. या दृष्टीनें–कोणत्याही कारणानें कां होईना–सरकारी नोकरींतून त्यांची जी मुक्तता झाली तीबद्दल त्यांचें व समाजाचें अभिनंदनच करणें इष्ट आहे.

'बंगाली' नांवाच्या इंग्लिश साप्ताहिक वर्तमानपत्राची स्थापना १८६१ मध्यें झाली. त्यामध्यें बंगाल प्रांतांतील आंग्लभाषाकोविद अनेक विद्वान् लोक लिहीत होते; इ. स. १८७८ मध्यें सुरेंद्रनाथांची दृष्टि या पत्रावर गेली व त्या पत्राचें संपादकत्व आपणास मिळावें अशी इच्छा त्यांचे मनांत उत्पन्न झाली. सुरेंद्रनाथांची कीर्ति व लोकप्रियता या वेळेस बरीच विस्तृत झाली; त्यामुळें स्वतःविषयीं त्यांचे मनांत एक प्रकारचा विश्वास उत्पन्न झाला होता. एकादा योग्य मनुष्य सदर पत्राची जबाबदारी आपणावर घेण्यास आपली तत्परता दाखवील तर ती त्यास देण्यास या पत्राचे पूर्वीचे संपादक बाबू बेचाराम हे तयार होते. यामुळें सुरेंद्रनाथांनीं आपली इच्छा प्रदर्शित करितांच जुन्या संपादकाचा रुकार पडून त्यांनीं सदर पत्राचा हक्क खरेदी घेतला. यावेळीं पत्रास अवघे १०० वर्गणीदार होते. बाबू सुरेंद्रनाथ यांचे हातीं पत्राची व्यवस्था आल्यापासून दोन वर्षांतच त्यांस १४०० ग्राहक झाले ! शाळेंतील मुलांस शिक्षण देणें, म्युनिसिपालिटीची व्यवस्था पाहणें, आनररी म्याजिस्ट्रेटचें काम समाधानकारक रीतीनें पार पाडणें, वर्तमानपत्र चालविणें, जाहीरसभेंत व्याख्यानें देऊन लोकमत जागृत करणें, इत्यादि जबाबदारीचीं व जोखमीचीं महत्त्वाचीं कार्यें यांचे हातून सहज पार पडूं लागलीं ! व्याख्यानें, लेख व पाठशाळा हीं जीं लोकशिक्षणाचीं प्रधान साधनें त्या सर्व साधनांचा उत्तम रीतीनें उपयोग करून घेऊन गेलीं २५ वर्षें हे लोकनायक

या पदवीस सर्वस्वी पात्र होऊन बसले आहेत. हिंदुस्थानांत राजकीय चळवळीचा जन्म होऊन तिला योग्य पोषण ज्या कांहीं थोडया महात्म्यांच्या हातून मिळालें त्यांत बाबू सुरेंद्रनाथ यांची प्रामुख्यानें गणना करणें अगत्याचें आहे. राजकीय चळवळीची जागृति करण्याचे प्रयत्न यांच्या पूर्वी अनेक विद्वान् गृहस्थांनीं केले; परंतु त्यांचे प्रयत्न फारच मर्यादित होते. त्यांनीं आपल्या खटपटीनें राजकीय चळवळीचा पाया घातला असेंच फारतर यांचे विषयीं ह्मणतां येईल. परंतु, या चळवळीस सार्वत्रिक व स्पष्ट स्वरूप देण्याचें श्रेय सुरेंद्रनाथ बानर्जी यांसच देणें योग्य आहे. उत्तम तऱ्हेची लेखनशैली, श्रोत्यांची चित्तवृत्ति थक्क करून टाकणारी वाक्शक्ति, शिष्यवृंदावर अपत्यनिर्विशेष प्रेम ठेवून त्यांना विद्यादान देण्याचें अप्रतिम कौशल्य, आणि इतक्या सर्व कृत्यांत दिसून येणारी विलक्षण कळकळ या योगानें सुरेंद्रनाथ बानर्जी यांचें नांव बंगाल प्रांतांत सर्वतोमुखीं होऊन किंबहुना सर्व हिंदुस्थानचें नायकत्व त्यांचेकडे आलें आहे ! आपल्या अनुपम वाक्चातुर्यानें हिंदुस्थानांतील बतहेक सर्व सुशिक्षित समाजास त्यांनीं राजकीय हक्क ह्मणजे काय याचें पूर्ण ज्ञान करून दिलें आहे. अशा तऱ्हेचीं अनेक जबाबदारीचीं कामें करणारावर संकटांची कृपा असावी हें साहजिकच आहे. परंतु, मोठमोठाले अनर्थ आले असतांही आपल्या मनाची समता यत्किंचित्ही ढळूं न देतां अंगीकृत कर्तव्य नेटानें करणें हेंच खऱ्या मोठेपणाचें लक्षण होय. संकट ही उत्कर्षाची पायरी होय असेंच मोठे लोक समजतात. सुरेंद्रनाथांनीं आपल्या कर्तबगारीच्या योगानें आपल्या आयुष्यक्रमाची जी टोलेजंग इमारत बांधली त्या इमारतीस संकटापासूनच आरंभ झाला हें मागें सांगितलेंच आहे. या स्वकष्टार्जित आयुष्यक्रमावर १८८३ मध्यें दुसरा एक अनर्थ गुजरला. तेथील हायकोर्टमधील एका खटल्यांत एकदा पुराव्यासाठीं एक शाळीग्रामाची मूर्ति आणली होती. यासंबंधाचा 'ब्रह्मपब्लिक ओपिनियन' नावाच्या वर्तमानपत्रांत मजकूर प्रसिद्ध झाला. सदर वर्तमानपत्राचें संपादकत्व त्यावेळच्या एका हायकोर्ट अटर्नीकडे असल्यामुळें त्या पत्रांत असलेला मजकूर खराच असला पाहिजे असा समज होऊन सुरेंद्रनाथांनीं आपल्या 'बंगाली' च्या १८८३ सालच्या २८ एप्रिलच्या अंकांत त्यावेळचे हायकोर्ट जज्ज जस्टिस् जॉन् फ्रीमँटल नॉरिस यांच्यावर बरीच टीका केली. या गोष्टीस चार दिवस झाले नाहींत तोंच सदर

न्यायाधीशांनीं सुरेंद्रनाथावर कोर्टाचा अपमान केल्याबद्दल खटला उभा केला. या खटल्यांत सुरेंद्रनाथ यांच्या वतीनें मि. डब्ल्यू. सी. बानर्जी वगैरे गृहस्थांनीं पुष्कळ खटपट केली; परंतु तिचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं; व सुरेंद्रनाथावर अपराध शाबीत होऊन त्यास दोन महिन्यांची शिक्षा सांगण्यांत आली. ही वार्ता समजतांच सर्व समाजांत एकच कल्होळ उडून गेला. ज्या दिवशीं शिक्षा सांगितली त्या दिवशीं बाबू आपलीं आवडतीं पुस्तकें वगैरें आवश्यक सामुग्री आधींच बरोबर घेऊन गेले होते ! असल्या प्रसंगींहीं प्रसंगावधानानें त्यास सोडलें नाहीं ! एरव्ही लांबलांब गप्पा करणें फार सोपें असतें परंतु आणीबाणीच्या प्रसंगीं या गप्पांप्रमाणें जो आपलें वर्तन ठेवितो तोच खरा मोठा. या मोठेपणामुळेंच सुरेंद्रनाथांनीं आपल्या देशबांधवांचें प्रेम संपादिलें आहे. त्यांची कारागृहांत रवानगी झाली हें समजतांच त्यांचे देशबांधव शोकपर्याकुल होऊन दुःख करूं लागले ! व तुरुंगांत दुखवटयाच्या पत्रांचीं व तारांचीं एकच गर्दी उडाली ! सुरेंद्रनाथावर अन्याय झाला आहे, त्यांची मुक्तता करण्यांत यावी, वगैरे मजकुराच्या असंख्य तारा लॉर्ड रिपन यांच्या बंगल्यांत थडकूं लागल्या ! लॉर्ड रिपन यांनाही हा सर्व प्रकार पाहून फार हळहळ वाटली व असल्या खटल्यांत हात घालण्याचा त्यांस अधिकार असता तर त्यांच्या हातून सुरेंद्रनाथांची मुक्तता खास झाली असती ! लोकमतावर सुरेंद्रनाथांनीं कसें साम्राज्य मिळविलें होतें याचें प्रत्यंतर ता. ४ जुलैरोजीं त्यांची मुक्तता झाली त्यावेळेस स्पष्टपणें दिसून आलें. यांची मुक्तता झाल्यावर सार्वजनिकरीतीनें यांचें जिकडे तिकडे अभिनंदन झाल्याशिवाय राहणार नाहीं अशी अधिकाऱ्यांची खात्री असल्यामुळें त्यांस पहाटे ४ वाजतां उठवून अगदीं आडरस्त्यानें एका भाडयाच्या गाडींतून त्यांनीं त्यास घरीं पोहोंचविलें ! कित्येक ठिकाणीं सुरेंद्रनाथांच्या मुक्ततेबद्दल अभिनंदनपर सभा भरविण्याचें ठरविण्यांत आलें होतें. परंतु त्यांतही व्यत्ययआणण्याचा कांहीं अधिकाऱ्यांनीं प्रयत्न केला ! जसजसा अधिकाऱ्यांचा प्रयत्न वाढत गेला तसतशी लोकांची स्फूर्ति वृद्धिंगत होत गेली. व सुरेंद्रनाथांच्या मुक्ततेबद्दल बंगालप्रांतांत चोहोंकडे आनंदप्रदर्शन होऊं लागले. कलकत्ता येथील टाउनहॉलांत एकाच दिवशीं तीन जंगी सभा झाल्या; त्याप्रसंगीं वीस हजार लोकांचा जमाव आनंदप्रदर्शनार्थ जमला होता ! बाबू सुरेंद्रनाथ यांस शिक्षा झाली हें वर्तमान समजतांच

कृष्णनगर येथील लोकांनीं दुखवटयाची तार पाठविण्याकरितां एक सभा भरविली व त्या सभेंत ' बंगाली ' पत्राच्या १६ प्रती घेण्याबद्दलचा ठराव झाला ! सहानुभूति दाखविण्याचा हा मार्ग खरोखरच अनुकरणीय होय. असो. याप्रमाणें दुसऱ्या प्रसंगांतूनही सुरेंद्रनाथांची मुक्तता होऊन त्यांचा लौकिक पूर्वीपेक्षांही उज्वल झाला !

शिक्षणसंस्था व वर्तमानपत्र या द्वारें बाबू सुरेंद्रनाथ यांनीं जी अलौकिक सेवा केली तिचें दिग्दर्शन वर झालेंच आहे. आतां या शिवाय दुसऱ्या मार्गांनीं त्यांनीं जीं लोकहिताचीं कामें केलीं त्यांचें थोडक्यांत विवेचन करून आम्हीं हा अल्प चरित्रलेख संपवितों. पाश्चात्य शिक्षणाची अभिवृद्धि जसजशी हिंदुस्थानांत व्हावयास लागली तसतशी सर्व दर्जाच्या व जातीच्या लोकांचें प्रतिनिधित्व स्वीकारणारी एखादी राजकीय मंडळी कायमची स्थापित व्हावी अशी इच्छा बंगाल प्रांतांतील लोकांच्या मनांत उत्पन्न झाली; सुरेंद्रनाथांनीं अशा-लोकांस हातीं धरून त्यांस योग्य दिशा दाखविली व विलंब न लावितां त्यांनीं 'इंडियन असोशिएशन' नांवाची एक संस्था १८७६ मध्यें स्थापन केली. ज्या-दिवशीं ह्या सभेची स्थापना झाली त्या दिवशीं बाबूंचा एकुलता एक मुलगा इहलोक सोडून गेला ! तरी पोटच्या अपत्याचें दुःख बाजूस ठेवून ते या संस्थापनसभेस हजर राहिलेच ! याचें नांव देशहिताची कळकळ ! स्वतः अंगीकृत केलेलीं देशहिताचीं मोठीं कार्यें हींच अशा महात्म्यांचीं अपत्यें होत. ह्या अपत्यप्रेमापुढें त्यांस पोटच्या मुलांचेंही महत्त्व वाटत नाहीं ! बाबू सुरेंद्रनाथांच्या मनाच्या समतेची व देशहितत्परतेची साक्ष पटविणारी या पेक्षां हृदयद्रावक गोष्ट दुसरी कोठें सांपडेल असें आह्मांस वाटत नाहीं; किंबहुना कोणाही मोठया माणसाच्या चारित्रांत अशा तऱ्हेचा हृदयद्रावक प्रसंग क्वचित् दृष्टीस पडेल ! असो; बाबू सुरेंद्रनाथ यांनीं स्थापन केलेल्या 'इंडियन असोशिएशनच्या' हस्तें आज-पर्यंत अनेक महत्त्वाचीं कामें झालीं आहेत. स्थानिकस्वराज्य, सिव्हिलसर्विसच्या परीक्षेचें वय कमी करणें वगैरे महत्त्वाच्या प्रसंगीं सरकारास लोकमत कळविण्याचें महत्कार्य या संस्थेच्यां हातून अनेकदा झालेलें आहे. यां संस्थेचें चालकत्व बाबूसुरेंनाथासारख्या देशभक्ताकडे असल्यामुळें तिचें महत्व दिवसें दिवस वृद्धिंगत होऊन लवकरच ती हिंदुस्थानच्या लोकाच्या संघशक्तीचें एक जीवंत उदाहरण झाली आहे. निरनिराळ्या जातीच्या, धर्मांच्या व मतांच्या लोकांस

राजकीय गोष्टींचा उहापोह करण्याकरितां एकत्र जमून एक दिलानें प्रयत्न करितां येतो हें या संस्थेनें लोकांच्या पूर्णपणें दृष्टोत्पत्तीस आणलें. या सभेच्या वतीनें सुरेंद्रनाथांनीं सर्व देशभर हिंडून लोकमत जागृत केलें. सुरेंद्रनाथ यांची राजकीय चळवळ फक्त हिंदुस्थानापुरतीच होती असें नाहीं.

हिंदुस्थानच्या खऱ्या स्थितीचें इंग्लंडांतील लोकांस ज्ञान झाल्याशिवाय इकडील राज्यपद्धतींत असलेले दोष सुधारणें शक्य नाहीं असेंच त्यांचें मत असल्यामुळें ब्रिटिश कमिटीच्या विद्यमानें त्यांनीं बिलायतेंतही व्याख्यानें देऊन तिकडील लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. आपल्या रसभरित वाणीनें त्यांनीं तिकडील लोकांचीं मनेंही तल्लीन करून सोडलीं; आणि नाणावलेल्या व प्रख्यात इंग्लिश वक्त्यांकडून धन्यवाद मिळवून हिंदुलोक बुद्धिमत्तेंत पाश्चात्यलोकांपेक्षां कमी नाहींत या तत्त्वाची त्यानीं आपल्या स्वतःच्या उदाहरणानें इंग्लिश लोकांची खात्री केली ! राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांत हे प्रमुख असून तिचे प्रयत्न वृद्धिंगत व्हावेत यासाठीं त्यांची अहर्निश खटपट चालूं आहे. लोकांनींही यास राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षाचा मान दोन वेळ देऊन त्याबद्दल असलेली आपली आदरबुद्धि व्यक्त केली. १८९५ मध्यें पुणें येथें जी राष्ट्रीयसभा भरली होती त्या प्रसंगीं व १९०२ सालीं अमदाबाद येथील राष्ट्रीयसभेचे प्रसंगीं ते अध्यक्ष होते. आपण शाळेंत शिक्षक आहों हें सांगण्याचा सुरेंद्रनाथास मोठा अभिमान वाटतो; १८९५ सालीं पुण्यांतील विद्यार्थ्यांनीं त्यांस मानपत्र दिलें त्यांस उत्तर देतांना ते ह्मणाले ' राजकीय कार्यें माझ्या हातून कितीही झालीं असलीं तरी शिक्षक या नात्यानें मी जें काम करीत आहे तेंच चिरकाळ राहील. तरुण पिढीच्या मनावर शिक्षणसंस्कार करून त्यास योग्य वळण लावण्याचें काम मजकडे आहे याबद्दल मला फार अभिमान व धन्यता वाटते. सामाजिक, राजकीय किंवा नैतिक सुधारणा या सर्वांचा उत्कर्ष एकसमयावच्छेदेंकरून झाला पाहिजे. त्यांपैकीं कोणत्याही राष्ट्रांगाचीं हयगय करितां कामा नये असेंही त्यांनीं आपलें मत वरील प्रसंगीं दिलें. ते ह्मणाले ' विद्यार्थ्यांनीं राजकीय विषयांचा ऊहापोह करण्यास हरकत नाहीं असं माझें ठाम मत आहे. गतकालच्या राजकीय विषयांचा ज्यांत विचार केलेला असतो त्या इतिहासाचें परिशीलन करण्याची विद्यार्थ्यांस जर मोकळीक असते; विलायतेंतील विद्यार्थ्यांस राजकीय विषयांचा वादविवाद करण्याची जर परवानगी असते, प्रत्येक ग्रंथांत

शिक्षण मिळविण्याकरितां जर उमेदवारी करावी लागते तर नगरवासी जनांचा हा जो मोठा व्यवसाय त्याचें पूर्वशिक्षण संपादन करून घेण्यास विद्यार्थ्यांस हरकत कां व्हावी हें मला समजत नाहीं.' पाश्चिमात्य विद्येचा यांच्या मनावर पूर्ण संस्कार झाला आहे तरी इतर ज्ञानलवदुर्विदग्धाप्रमाणें यांची धर्म व नीति यासंबंधाची आदरबुद्धि यत्किंचितही कमी न होतां वृद्धिंगतच झाली आहे. कोणतेंही कार्य हातीं घेतलें तरी त्याची इमारत धर्म व नीति यांच्या मजबूत पायावरच उभारली पाहिजे असा त्यांनीं पुणें येथील विद्यार्थ्यांस उपदेश केला. 'लौकिक, द्रव्य, मोठेपणा, विद्या यांपैकीं कोणतीही गोष्ट तुझ्या वाट्यास आली नाहीं तरी हरकत नाहीं; परंतु, धर्म व नीति यांपासून कधींही पराङ्मुख होऊं नकोस' असा आपल्या मुलास ते नेहमीं उपदेश करीत असतात.

सांप्रतच्या राज्यपद्धतींत दोष आहेत ते दूर करण्याविषयीं त्यांची खटपट चालूं आहे तरी इंग्रजलोकांसंबंधानें त्यांची विशेष आदरबुद्धि आहे. 'स्थानिक कारणांमुळें येथील अधिकाऱ्यांत जरी कधीं कधीं अनिष्ट प्रकार दिसून आला तरी जसे जसे आपण वर जाऊं तसतशी इंग्रज लोकांच्या न्यायबुद्धीबद्दल आपली खात्री होत जाते,' असें त्यांनीं एकदां आपल्या भाषणांत सांगितलें होतें. राजकीय सुधारणा हांहां ह्मणतां व्हावी अशी इच्छा करणाऱ्या अधीर लोकांपैकीं ते नव्हत; किंवा दरसाल हंगामाला ओरड केली कीं हक्क मिळाले असें समजणारे जे खुशालचंद आहेत ते आपले पक्षीय नसून प्रतिबंध करणारेच आहेत असें त्यांचें मत आहे. कायदेकौन्सिलमध्यें लोकपक्षाचे सभासद असावेत अशाबद्दल सरकाराकडे मागणी करतेवेळेस त्यांनीं आपल्या भाषणांत राजकीय हक्क मिळविण्याकरितां किती प्रयत्न करावा लागतो याबद्दल जें आपलें मत दिलें तें प्रत्येकानें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. राजकीय हक्क मिळविण्याकरितां ओरड किंवा उद्योग करावयाचा त्यास काळ वेळ मुळींच नाहीं. त्याकरितां अहर्निश उद्योग केला पाहिजे. सर्व दशदिशा आपल्या ध्वनीनें गजबजून टाकल्या पाहिजेत. आणि मग सरकारचें लक्ष्य आपल्या ओरडीकडे जाईल. अशी आशा करणें समंजसपणाचें होईल असें त्यांनीं सांगितलें. दीर्घोद्योगाचा व कळकळीचा लोकांस नुसता उपदेश करूनच ते राहत नाहींत. यांचें स्वतःचेंही वर्तन तसेंच आहे. 'बंगाली' पत्रास फक्त १०० ग्राहक असतांना यांनीं तें हातीं घेतलें. तेव्हांपासून

आतांपर्यंत त्यांनीं या आपल्या अपत्याची योग्य जोपासना करून त्यांस पहिल्या वर्गांत आणलें. हल्लीं हें पत्र रोज निघत असून परदेशीय तारांची त्यांत उत्तम व्यवस्था केली आहे. नेटिवांनीं चालविलेलीं वर्तमानपत्रें आहेत त्यांत याचा नंबर पहिला आहे. जी गोष्ट वर्तमानपत्राची तीच गोष्ट यांच्या शाळेची; वस्तुतः यांनीं अंगीकृत केलेलीं जीं जीं ह्मणून कार्यें आहेत त्यांत कचेपणा बिलकुल नसून तीं आपापल्या स्वरूपांत उच्च स्थान पावलीं आहेत याचें कारण त्यांच्या उत्पादकाची व आश्रयदात्याची ह्मणजे आमच्या चरित्र-नायकांची अप्रतिम बुद्धिमत्ता, अविश्रांत उद्योगसातत्य, व विशेषेंकरून त्यांची हृदयपूर्वक आस्था व आश्चर्यजनक स्वार्थत्याग हीं होत.

आमच्या चरित्रनायकांत दुसरा एक मोठा गुण असा आहे कीं त्यांचा जन्म बंगालप्रांतांत होऊन त्याच प्रांतांत ते लहानाचे मोटे झाले तरी त्यांची मनो-दृष्टि त्याच प्रांतापुरती संकुचित नसून तिनें आपल्या प्रेमरज्जूनीं सर्व हिंदुस्थानांस बद्ध करून टाकलें आहे. पुणे शहरीं ज्यावर्षीं राष्ट्रीयसभा झाली त्याचवर्षीं शिवाजीमहोत्सवास प्रथम त्याच शहरीं सुरुवात झाली. शिवाजी-महोत्सवासारख्या राष्ट्रीय उत्सवास प्रोत्साहन देणें इष्ट आहे किंवा नाहीं ह्याचा विचार करून जागा अडविण्यापेक्षां शिवाजीसंबंधानें सुरेंद्रनाथ यांनीं आपलें जें मत दिलें तेंच येथें दिलें ह्मणजे कार्यभाग होईल असें आह्मांस वाटतें. ‘ प्रचंड बुद्धिमत्ता, अंगीकृत कार्याबद्दल एकनिष्ठपणा व कळकळ व अद्वितीय धर्मश्रद्धा या सद्गुणांबद्दल शिवाजीची जितकी प्रशंसा करावी तितकी थोडीच आहे..... या गुणांचें अनुकरण करून हातीं घेतलेलें काम तडीस नेणें आपलें कर्तव्य आहे आणि ह्मणूनच शिवमहोत्सवाबद्दल माझी पूर्ण सहा-नुभूति आहे. शिवाजीनें बंगाल प्रांतावर स्वारी करून आमची मालमत्ता लुटून नेली होती या गोष्टींचें मला स्मरण आहे. परंतु, हल्लीं इंग्रजसरकारच्या राज्यछत्राखालीं आपण सर्वजण एक झालों आहों. मी जरी बंगाली आहे तरी शिवाजीबद्दल मी आपली पूज्यबुद्धि व्यक्त करितों.’ या उद्गारांवरून बाबू सुरेंद्रनाथ यांच्या उदार तत्त्वांबद्दल सर्वांची खात्री होईलच. राष्ट्रीय महत्त्वाच्या गोष्टीस जातिभेदाचा अल्पही स्पर्श होऊं नये असें त्यांचें ठाम मत असून त्यांचें वर्तनही तदनुसारच आहे. गतवर्षीं बंगाल प्रांतांतही शिवमहोत्सव मोठ्या थाटानें करण्यांत आला; त्यांतही सुरेंद्रनाथ हेच प्रमुख होते. आणि

यांच्या प्रयत्नानें हा उत्सव तिकडे लोकप्रिय होऊन यांस लवकरच खरोखर राष्ट्रीय स्वरूप येईल असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. असो; अशा तऱ्हेच्या उदात्त मनोवृत्तींच्या व देशहित हाच आपला स्वार्थ असें मानून त्याप्रमाणें आपला प्रशंसनीय आयुष्यक्रम चालविणाऱ्या या महात्म्यास ईश्वर दीर्घायु करून त्याचे हातून अशींच महत्त्वाचीं व लोकहिताचीं कार्यें घडवून आणवो अशी अनन्य भावें प्रार्थना करून आह्मी हा चरित्रलेख संपवितों.



बांबू बंकीमचंद्र चतरजी

M. C. C. Press. Poona.

५

बंकिमचंद्र चतरजी.

स्वराज्य असतांना मातृभाषेची सेवा करणारास राजाश्रय मिळत असे; त्यामुळें निसर्गतःच ज्यांना कवित्वाची किंवा कल्पनाशक्तीची देणगी असे त्यांना आपल्या आवडत्या विषयावर व्यासंग करण्यास जड पडत नसे. आज मित्तीस या भरतभूमींत जीं जगद्विख्यात संस्कृत काव्यें दृष्टीस पडतात तीं या राजाश्रयाचींच अजरामर स्मारकें होत. इंग्लड देशामध्यें अॅन राणी व पहिला-जार्ज यांच्या कारकीर्दीत राजकीय चळवळ विशेष जोरानें चालू होती. त्या-वेळीं निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांस आपापलीं मतें ग्रंथद्वारा प्रसिद्ध करून लोकमत आपल्या बाजूचें करून घेण्याचा प्रयत्न करावा लागत असे; व त्यांच्या हातून साहजिकच लेखनपटु कवींना किंवा ग्रंथकारांना आश्रय मिळत असे; अॅडिसन व स्विफ्ट हे ग्रंथकार अशाच तऱ्हेनें वृद्धि पावलेले होत. या आश्रयाचा व या प्रोत्साहनाचा त्यावेळच्या इंग्रजी वाङ्मयावर फारच हितकर परिणाम झाला. किंबहुना इंग्लिश भाषेच्या परमावधीच्या उत्कर्षाचा जर कोणता काळ असेल तर तो वरीलच होय. हिंदुस्था-नच्या सांप्रतच्या स्थितींत वरील सर्व प्रोत्सहनांचा अभाव असल्यामुळें इकडील भाषांची जशी अभिवृद्धि व्हावी तशी ती होत नाहीं; इत-केंच नव्हे, परंतु इकडील शिक्षणपद्धतीचे सर्व विषय इंग्रजींतच शिकावे लागत असल्यामुळें आमच्या समाजांत स्वाभाविकपणें इंग्रजीचें स्तोम माजून देशी भाषांची अवनति होऊं लागली; पाश्चात्य विद्येनें सुसंस्कृत झालेल्या आमच्यां-तील विद्वान् लोकांस आपल्या मनांतील विचार प्रसिद्ध करण्याची बुद्धि सुदै-वानें झालीच तर ते तें काम इंग्रजी भाषेच्या द्वारें उरकून घेऊन मोकळे होतात ! अशा प्रसंगीं ज्या महात्म्यांच्या हातून मातृभाषेची एकमनानें सेवा केली जाते त्यांचे भाषेवरच काय परंतु स्वदेशबांधवांवरही मोठेच उपकार होतात असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. बंगाली भाषेस हल्लींचें

परिपक्व स्वरूप देण्यास जे थोर ग्रंथकार कारणीभूत झाले त्यांत बंकिमचंद्र चतरजी हे प्रमुख होत. बंकिमचंद्र चतरजी यांचा जन्म इ. स. १८३८ मध्यें झाला. यांचे वडील यादवचंद्र चतरजी हे पुष्कळ वर्षे डे. कलेक्टर होते; व त्या जागेवर असतांनाच त्यांनीं पेन्शन घेतलें. बंकिमचंद्र यांचें प्राथमिक शिक्षण चालू होतें त्यावेळेस कलकत्ता युनिव्हर्सिटीही स्थापन झाली नव्हती. यांचें उच्च शिक्षण हुगळी कॉलेज व कलकत्ता येथील प्रेसिडेन्सी कॉलेज या दोन कॉलेजांत झालें. हे हिंदुस्थानांतील पहिले बी. ए. होत. ईश्वरचंद्र गुप्त यांच्या संपादकत्वाखालीं त्यावेळेस ' प्रभाकर ' नांवाचें वर्तमानपत्र सुरू होतें; त्यांत बंकिमचंद्र हेही किरकोळ लेख लिहूं लागले; लेखनाच्या व्यासंगास त्यांनीं अगदीं लहानपणींच आरंभ केला, यामुळेंच त्यांना पुढें ग्रंथ लिहिणें जड पडलें नाहीं.

इतिहास, काव्य व कादंबरी हे वाङ्मयाचे मुख्य तीन घटकावयव होत. त्यांपैकीं इतिहासांत विशेषें करून मोठ्या लोकांच्या महत्त्वाच्या कृत्यांचाच विचार केलेला असतो. केवळ मोठ्या लोकांच्या चरित्रावरूनच त्या त्या काळच्या समाजाचा विचार करणें नेहमींच बरोबर ठरणार नाहीं. समाज साधारण लोकांचाच असतो; अशा लोकांच्या आचार विचारांवरूनच समाजाची स्थिति ठरवावयाची असते. केवळ इतिहासावरून हें कार्य होणें दुर्घट आहे. काव्य हें त्या त्या वेळच्या लोकांच्या मनोवृत्तींचें चित्र आहे. यावरूनही समाजाच्या खऱ्या स्थितीचा अंदाज बरोबर करितां येणार नाहीं; इतिहास व काव्य हीं दोन्हीं समाजनिदर्शनाचीं अंशतः साधनें आहेत; नाहीं असें नाहीं. परंतु, समाजाचें पूर्ण ज्ञान होण्यास कादंबरीसारखें दुसरें साधन नाहीं. आणि त्यांतल्या त्यांत ज्या कादंबऱ्यांत प्रत्यहीं समाजांत वावरणाऱ्या साधारण व्यक्तींचाच विचार केलेला असतो व प्रत्यहीं घडणाऱ्या गोष्टींचेंच वर्णन असतें त्या कादंबऱ्या तर समाजाची स्थिती अवलोकन करण्याचीं दर्पणेंच होत. ज्या काळांत कादंबरीकार निपजतो त्या काळाचेंच प्रतिबिंब त्याच्या ग्रंथांत दृग्गोचर होत असतें. कादंबरीकार प्रतिसृष्टि निर्माण करितो; आणि या प्रतिसृष्टीचें बाह्यांग जरी परिस्थितीपेक्षां भिन्न असें दिसत असलें तरी तिचें अंतरंग त्या त्या काळच्या परिस्थितीचें हुबेहुब चित्र असतें. कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीवर परिस्थितीचे जे संस्कार झालेले असतात ते त्याच्या प्रतिसृष्टींत त्याची इच्छा नसतांही आपलें साम्राज्य मिर-

विण्यास कधींही कमी करणार नाहींत. आपल्या कालाच्या २०० किंवा ३०० वर्षे पूर्वींच्या किंवा त्याहूनही जुन्या कालाची परिस्थिति कल्पून त्यावर ग्रंथ लिहिण्याची कांहीं कादंबरीकारांची वहिवाट आहे. अशा ग्रंथांत स्थल, काल, पोषाख, भाषापद्धति इत्यादि उपांगांची उत्तम व्यवस्था करून तीं तत्कालीन दिसतील अशी तजवीज केलेली असते आणि त्यामुळें हे ग्रंथ पूर्वींच्या कालचेच असले पाहिजेत अशी साधारण लोकांची पूर्ण खात्रीही होते. परंतु, मार्मिक वाचक यामुळें फसत नाहींत. ग्रंथाचें अवलोकन करतांच त्यांस ही गोष्ट समजून येते कीं या प्रतिसृष्टींत संचार करणाऱ्या व्यक्तींनीं जुना पोषाख चढवून मधून मधून जुनी भाषापद्धति वापरून आपण जुने आहोंत असें जरी भासविण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यांच्या मनोवृत्तींवरून ते आपणांशीं समकालीनच आहेत अशी त्यांची खात्री होते. इंग्रजींत सर वॉल्टर स्कॉट हा अशा तऱ्हेचा ग्रंथकार होय. आपल्या अनेक शतकें पूर्वींच्या कालचें वर्णन या ग्रंथकारानें आपल्या कादंबऱ्यांत केलेलें आहे. हा या कादंबरीकाराचा प्रयत्न अगदींच फसला आहे असें नाहीं. ज्या काळाचें यानें वर्णन केलें त्या काळाचें अस्पष्ट स्वरूप वाचकांपुढें उभें राहतेंच; परंतु हें स्वरूप केवळ गौण व कृत्रिम असून त्याच्या मुळाशीं त्याची समकालीन परिस्थितिच आहे अशी त्यांची खात्री होत जाते. सारांश, समकालीन परिस्थितीचें साहचर्य कादंबरीकारास अपरिहार्य होतें. ह्मणूनच परिस्थितीचें हुबेहूब प्रतिबिंब उठविण्यांत ' कादंबरीस, आह्मीं अग्रस्थान दिलें. बंकिमचंद्र चतरजी यांनीं बंगवासीय जनांचें प्रेम व आदर संपादन केला तो यामुळेंच. आपल्या ग्रंथांनीं त्यांनीं आपलेंच नांव अजरामर करून ठेविलें असें नाहीं; तर ज्या काळांत, ज्या परिस्थितींत, ज्या समाजांत ते वाढले त्या सर्वांचें प्रतिबिंब आपल्या कादंबऱ्यांत साठवून तें भावी पिढींच्या परिशीलनार्थ त्यांनीं अजरामर करून ठेविलें. बाबू रोमेशचंद्र दत्त यांनीं बंगाली ग्रंथकारांचा एक संक्षिप्त इतिहास लिहिला आहे; त्यांत त्यांनीं बंगाली कादंबरीकारांत बाबू बंकिमचंद्र चतरजी हे अद्वितीय व अनुपम ग्रंथकार आहेत असें आपलें स्पष्ट मत दिलें आहे.

बंकिमचंद्र यांच्या ग्रंथकर्तृत्वास त्यांच्या वयाच्या २६ व्या वर्षीं प्रारंभ झाला. इ. स. १८६४ या सालीं त्यांची ' दुर्गेशनंदिनी ' या नांवाची

पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीनें आपल्या उज्वल व मनोरम स्वरूपानें सर्व बंगदेशीयांस थक्क करून टाकलें. त्यापूर्वी बंगाली भाषेंत असा ग्रंथ कधींच निघाला नाहीं असें सर्व लोक ह्मणूं लागले. कथानकाचा स्पष्टपणा, तो कागदावर उतरण्याचें अद्भुत चातुर्य, वैचित्र्य, भारदस्तपणा व त्यांतील भूमिकांचा प्रशंसनीय आवेश या गुणांत या ग्रंथकाराची बरोबरी कोणाच्यानेंही करवणार नाहीं असें या ग्रंथाविषयीं लिहितांना रोमेशचंद्र दत्त ह्मणतात. यापूर्वी बंगाली भाषेमध्यें अनेक मनोरंजक व बोधप्रद ग्रंथ प्रसिद्ध झाले. परंतु त्यांचें कथानक, भूमिका वगैरे सर्व दुसरीकडून उसनीं घेतलेलीं असत. दुसऱ्याचें कांहीं एक न घेतां केवळ स्वयंभूत कल्पनाशक्तीनें रचलेला बंगाली भाषेंतील हा पहिलाच ग्रंथ होय. स्वतः गुणी असून दुसऱ्याच्या गुणाबद्दल मत्सर न बाळगणारे असे सज्जन या जगांत फारच थोडे असतात. विशेषेंकरून ज्या लोकांचें महत्त्व जनमनावर कायमचें बसलेलें असतें असे लोक, आपलें स्तोम कमी होईल या भीतीनें आपल्या नैसर्गिक गुणांनीं जर कोणी तरुण विद्वान् पुढें येण्याचा प्रयत्न करूं लागला तर ते मत्सरबुद्धीनें त्याचा उपहास करितात. जनसमूहांत बहुधा परप्रत्ययनेय लोकांचाच विशेष भरणा असल्यामुळें या मत्सरी विद्वानावर भरंसा ठेवून ते नवीन ग्रंथकाराचे गुण ग्रहण करण्यास तयार नसतात. बंकिमचंद्रांचे पूर्वी जे ग्रंथकार प्रसिद्धीस आले होते त्यांनीं ' दुर्गेशनंदिनीकडे ' पाहून नाकें मुरडण्यास सुरवात केली; इंग्रजी तऱ्हेचें अनुकरण करून मातृभाषेची अवनति यांचे हातून झाली असा शेरा मारून या लोकांनीं बंकीमचंद्रासंबंधानें समाजाचीं मनें कलुषित केलीं. परंतु ह्मातारीनें कोंबडा दडविला ह्मणून उजेडावयास राहत नाहीं. असल्या कृत्रिम कारणांनीं बंकिमचंद्रांच्या गुणावर अज्ञातवासाचें दडपण तात्कालिक बसलें तरी कालावधीनें लोकांस आपली चूक कळून आली व ' दुर्गेशनंदिनी ' ची सर्वतोमुखीं प्रशंसा होऊं लागली.

आपल्या पहिल्या प्रयत्नाची समाजावर अशी छाप पडलेली पाहून बंकिमचंद्र यांनी आपलें लेखनकार्य द्विगुणित उत्सानें सुरूं केलें. व लवकरच ' कपाल कुंडला ' व ' मृणालिनी ' या त्यांच्या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. ' कपाल कुंडलेनें आपल्या जनकाच्या अद्वितीय कल्पनाशक्तीबद्दल लोकांची पूर्ण खात्री करून सोडली व यापुढें प्रख्यात ग्रंथकारांच्या पटांत बंकिमचंद्रांचा प्रवेश

झाला. पुढें जसजसा यांच्या लेखनक्रियेचा व्यासंग वाढत गेला तसतसा वरील पटांत हळूहळू त्यांस वर नंबर मिळून अखेरीस या पटाच्या शिरोभागीं यांची स्थापना झाली ! फुटकळ कादंबऱ्या प्रसिद्ध करण्यापेक्षां त्या', एखाद्या मासिकाच्या द्वारें प्रसिद्ध केल्यास त्यांस एक प्रकारचा कायमपणा येऊन प्रसिद्धीचें कामही नियमितपणें शेवटास जाईल असें वाटल्यावरून बंकिमचंद्र यांनीं इ० स० १८७२ सालीं 'बंगदर्शन' नांवाचें मासिक पुस्तक सुरू केलें. हें ' मासिक ' उत्पादकाच्या अलौकिक लेखनचातुर्यानें लवकरच लोकप्रिय होऊन विख्यात झालें. ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याचें व ' बंगदर्शनां ' तून त्या प्रसिद्ध करण्याचें त्यांचें काम अव्याहत चालू होतें. याशिवाय त्यांनीं कित्येक सामाजिक कादंबऱ्याही लिहिल्या आहेत. 'विषवृक्ष' या नांवाची त्यांची सामाजिक कादंबरी लोकांस फारच आवडली; व ' दुर्गेशनंदिनी ' प्रमाणें तिचीं अनेक भाषांतून भाषांतरेंही झालीं. ' बंगदर्शनां' तून कादंबऱ्यांशिवाय दुसरे अनेक तऱ्हेचे ग्रंथ प्रसिद्ध होत असल्यामुळें त्यांतून बंकिमचंद्रांचे दुसऱ्या विषयावरील लेखही येत. आधींच बंकिमचंद्राची भाषाशैली मनोरम, विचार उदात्त व विस्तृत माहिती या योगानें त्यांनीं कोणत्याही विषयावर लेख लिहिला तरी तो हृदयंगम होत असे. ' बंगदर्शनांत ' अशा प्रकारें विविधता आल्यामुळें तें लोकांस अतिशय प्रिय झालें; व बंकिमचंद्र हे बंगाली वाङ्मयाचे अधिराज होऊन बसले. सर्व ग्रंथकार यांचा कित्ता गिरवूं लागले. बंकिमचंद्र हे जात्या निर्मळ अंतःकरणाचे असल्यामुळें कोणीही होतकरू व तरतरीत लेखक दिसला कीं त्यास आपल्या हाताशीं धरून व त्यास योग्य दिशा दाखवून त्याचे हातून ते उत्तम ग्रंथ लिहवीत; तरी स्वतः ग्रंथलेखनाचें काम यांचें अखेरपर्यंत चालू होतेंच. तरुणपणामुळें भाषेंत जो एक प्रकारचा कृत्रिम दिमाख असे तो नाहींसा होऊन वयापरत्वें अनुभवानें त्याचे जागीं साधेपणा व भारदस्तपणा हे दोन गुण स्पष्ट दिसूं लागले व या योगानें त्यांचे ग्रंथ फारच मनोरम व बोधप्रद होऊं लागले. बंगाली लोकांनीं सुमारें तीस वर्षेपर्यंत यांच्या अद्वितीय लेखनमिष्टान्नावर यथेच्छ ताव मारला. कुलीन स्त्रिया आपल्या पुस्तकाल्यांत यांच्या ग्रंथांचा संग्रह करूं लागल्या व वाचनाच्या कित्येक आवृत्ती झाल्या तरी त्यांस ते हातांतून खालीं ठेववेनात ! तरुण विद्यार्थी यांचे ग्रंथ वरचेवर वाचून त्यांतील पृष्ठेंच्या पृष्ठें तोंडपाठ म्हणत !

. ज्याच्या कृपेनें आपण सुमारें तीस वर्षेंपर्यंत आपल्या लेखनकौशल्यानें लोकांचीं मनें तल्लीन करून टाकलीं त्या जगच्चालकाचे अंशतः तरी उतराई होण्याकरितांच कीं काय त्यांनीं पुढें धर्मग्रंथ लिहिण्याचा उपक्रम चालविला. श्रीकृष्णावर लिहिलेला अशा तऱ्हेचा त्यांचा पहिला ग्रन्थ होय. लोकांमध्यें या ग्रंथाचीही पूर्वीप्रमाणेंच वाहवा झाली. त्यांनीं वेदांचेंही परिशीलन केलें होतें व सनातन हिंदुधर्मावर त्यांचा पूर्ण विश्वास व भक्ति असे. आपल्या नैसर्गिक गुणांनीं लोकमनावर ज्यानें पूर्ण प्रभुत्व मिळविलें त्या आमच्या चरित्रनायकांस सरकाराकडूनही रायबहादूर व सी. आय्. ई हे दोन बहुमानदर्शक किताब मिळून त्यांच्या गुणांचें योग्य चीज झालें. ज्यानें आपल्या लेखनप्रसादानें असंख्य जनांस पादाक्रान्त केलें त्या बंकिचंद्रासही, अरसिक व पाषाणहृदयी मृत्यूनें अखेर १८९४ सालीं इहलोकांतून ओढून नेलेंच.



बाबू रमेशचंद्र दत्त

Manovedhak C.C. Press Poona

रोमेशचंद्रदत्त सी० आय० ई०

इंग्रजी अमदानींत वरिष्ठ दर्जाच्या ज्या कांहीं थोड्या जागा एतद्देशीय गृहस्थांस मिळाल्या आहेत त्यांत प्रमुख रोमेशचंद्र हे होत. वार्धक्यापर्यंत राजसेवा पतकरणाऱ्या इतर लोकांत व प्रस्तुतच्या चरित्रनायकांत एक मोठा भेद होता. तो हा कीं, राजसेवा पतकरल्या दिवसापासून ' आपण हिंदुस्थानदेशांत जन्मास आलों आहों, तेव्हां आपलें स्वदेशबांधवांसंबंधानें कांहीं कर्तव्य आहे ' या गोष्टीची इतरांस पूर्ण विस्मृति पडते; व प्रसंगविशेषीं क्षणिक व यःकश्चित स्वार्थलाभाकरितां आपल्या हातून आपल्या देशबंधूंस अपायकारक अशी एखादी किंवा अनेक गोष्टी झाल्या तरी त्याबद्दल ते पर्वा बाळगीत नाहींत. उलटपक्षीं रोमेशचंद्र दत्त यांनीं आपणांस राजसेवेस वाहून घेतलें होतें तरी त्यांनीं आपली लोकहितासंबंधानें असलेली कळकळ कधींही शिथिल होऊं दिली नाहीं. मनुष्याची इच्छा असली ह्मणजे तदनुसार वर्तन ठेविण्यास त्यास परिस्थितीचा कधींही प्रतिबंध होत नाहीं हें त्यांनीं आपल्या चरित्राच्या योगानें पूर्णपणें सिद्ध केलें आहे. सरकारी नोकरास लोकहित साधणें अशक्य आहे किंबहुना सरकारी नोकरींत कायम राहावयाचें ह्मणजे इतर उठाठेव करतां कामाच नये अशी बहुतेक लोकांची समजूत झालेली दिसते. या समजुतींचा त्यांच्या मनावर सुद्धां परिणाम होतो; व स्वतंत्रपणानें आपलें मत प्रदर्शित करण्यासही असे लोक भितात. किंबहुना खुशामतीच्या संवयीनें त्यांच्या विचारासही एक प्रकारचें निराळें वळण लागून त्या योगानें त्यांच्या हातून लोकहितास प्रतिबंध होतो. बाबू रोमेशचंद्र दत्त यांच्या चरित्रापासून अशा लोकांनीं बोध घेतल्यास त्यापासून बरेंच देशकार्य होणार आहे. इंग्रज सरकारचें राज्य ह्मणजे कांहीं सुल्तानी राज्य नाहीं. लांगूलचालनानें प्रसंगविशेषीं कोणाचा फायदा होत असला तरी इंग्रज सरकारच्या अमदानींत सरकारची प्रीति संपादन करण्यास तें अपरिहार्य आहे असें नाहीं. राजहित व लोकहित हीं दोन्हीं

साध्य करणें कठिण असलें तरी तें हल्लींच्या अमदानींत दुष्प्राप्य नाहीं. प्रामाणिकपणा, शुद्ध हेतु, सरकारबद्दल आदरबुद्धि व परिस्थितीचें सत्यस्वरूप ओळखतां येण्यासाठीं कुशाग्रबुद्धि या गुणांचें साहचर्य असलें ह्मणजे नृपतिजनपदहित साधणें अशक्य तर नाहींच पण सुसाध्य आहे अशी या चरित्रावरून वाचकांची खात्री होईल. आपल्या अलौकिक गुणांनीं ज्या पुरुषानें आपणांस राजप्रिय व लोकप्रिय करून घेतलें त्या पुरुषाचें चरित्र हृदयंगम व बोधप्रद व्हावें यांत आश्चर्य तें काय ! असो. बाबु रोमेशचंद्र दत्त यांचा जन्म इ० स० १८४८ त कलकत्ता येथें झाला. लॉर्ड वुल्यिम बेंटिंक यांच्या कारकीर्दीत यांचे वडील मोठ्या हुद्याच्या जाग्यावर होते. यांचे आजे रोसोमाय दत्त हे कलकत्याच्या हायकोर्टाचे जज्ज होते. या पूर्वपीठिकेवरून रोमेशचंद्राचा जन्म कुलीन व विद्वान् घराण्यांत झाला हें निराळें सांगावयास नकोच. प्रवेशपरीक्षेपर्यंत यांचें शिक्षण कलकत्ता येथील हेस्कूलमध्यें झालें. त्यानंतर ते प्रेसिडेन्सी कालेजमध्यें जाऊं लागले. तरतरित बुद्धि व ग्राहकशक्ति याबद्दल त्यांची शिक्षकांकडून वारंवार तारीफ होत असे. त्यांची बुद्धि नुसती अनुकरणप्रिय व घोकंपट्टींत तरबेज नसून शोधक व कल्पक होती. शिवाय यांच्या मानससामर्थ्याचा मोठा व अद्वितीय गुण ह्मटला ह्मणजे तें एकदेशीय नसून पाहिजे त्या विषयांत पारंगतता मिळविण्यास सर्वस्वी लायक होतें. आपल्या आयुष्यक्रमांत त्यांनीं पुढें जीं निरनिराळ्या विषयांत महत्त्वाचीं कामें केलीं त्याचें मुळ त्यांच्या अष्टपैलू बुद्धींतच बीजरूपानें होतें. संभावितपणाचें वळण त्यांचें घरचेंच असल्यामुळें विद्यार्थीदशेंत सुद्धां त्यांच्या वर्तनांत एकप्रकारचा भारदस्तपणा दिसून येत असे. जात्या स्वभाव शांत व सात्त्विक, कुलीन घराण्यांत जन्म, अप्रतिम बुद्धिमत्ता व उत्तम प्रकारची विद्या या योगानें केवळ विशीच्या अल्लड वयांतच त्यांचे ठिकाणीं भावी मोठेपणाचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. यांच्या वडिलांनीं यांस १८६८ मध्यें सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा देण्याकरितां इंग्लंडांत पाठविलें. त्यांची परीक्षा १८६९ या वर्षी उतरली. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी, बी. एल. गुप्त, श्रीपाद बाबाजी ठाकूर इत्यादि गृहस्थ त्यांचे सहाध्यायी होते. हे सर्व गृहस्थ बहुधा एकाच वर्षी जन्मास आले व त्यांचा अभ्यासक्रमही एकाच वेळीं पूर्ण झाला. सिव्हिलसर्व्हिसपरीक्षेंत उत्तीर्ण झाल्यानंतर दोन वर्षे इंग्लंडमध्यें राहून रोमेशचंद्र १८७१ मध्यें परत हिंदु-

स्थानांत आले; व त्याच वर्षी ते सरकारी नोकरींत शिरले. तेव्हांपासून तों १८९७ पर्यंत ह्मणजे २६ वर्षेपर्यंत त्यांचा आयुष्यक्रम राजसेवेंत गेला. सरकारी नोकरींत त्यांनीं आपल्या अंगच्या हुषारीनें सरकारांतून अनेकदां शाबासकी मिळविली. इल्बर्ट बिलाचेवेळीं सरॲटनी मॅकडोनेल यांस रोमेशचंद्र दत्त यांनीं उत्तम प्रकारचें सहाय्य केलें. हे सरकारी नोकरींत होते तरी यांनीं आपल्या सदसद्विवेकबुद्धीस फाटा दिला नव्हता. जेव्हां जेव्हां योग्य प्रसंग येई तेव्हां लोकांची खरी स्थिति व राज्यव्यवस्थेंतील दोष हे सरकारचे नजरेस आणून देण्यास ते कधींही मागें पुढें पाहत नसत. याबद्दल सरकारची त्यांवर कधीं इतराजीही झाली नाहीं; इतकेंच नव्हे परंतु, इ. स. १८९२ मध्यें यांनीं केलेल्या कामगिरीबद्दल यांस सरकारांतून सी. आय्. ई. हा बहुमानाचा किताब देण्यांत आला. सरकारचें यांच्यावर उत्कृष्टतऱ्हेचें प्रेम होतें यास दुसरें प्रत्यंतर पाहिजे असेल तर तें हें कीं, यांस १८९३ मध्यें सरकारानें ओरिसाप्रांताचे कमिशनर नेमिलें. एका स्वतंत्र प्रांताच्या मुख्य अधिकाऱ्याची जागा यापूर्वी एतद्देशीय गृहस्थांस कधींही मिळाली नव्हती. त्या जागेचें कामही यांनीं उत्तम रीतीनें बजावलें व अवसर मिळाल्यास नेटिव लोकांच्या हातूनही जबाबदारीचीं कामें उत्तम रीतीनें पार पडतील हें तत्त्वही त्यांनीं सरकारच्या निदर्शनास आणून दिलें. राजसेवा व लोकसेवा ह्या परस्परावलंबी आहेत हें तत्त्व त्यांस पूर्णपणें अवगत आहे. राजहित व लोकहित हें एकाच गोष्टींत असल्यामुळें हीं दोन्ही खांद्याशीं खांदा लावूनच चाललीं पाहिजेत अशी त्यांची पक्की खात्री झाली होती.

ज्या गृहस्थाचा बहुतेक सर्व जन्म सरकारी नोकरींत गेला त्याच्या चरित्रांत महत्त्वाच्या अशा गोष्टी काय असणार ! फार झालें तर त्यांनीं हजारों रुपये मिळवून मोठी थोरली संपत्ति सांठविली असेल; व आपलें अवशिष्ट निस्तेज आयुष्य सरकारी अधिकाऱ्यांच्या पुढें पुढें करण्यांत घालविलें असेल. हा सामान्य नियम इतरांना लागू असेल; परंतु, प्रस्तुत चरित्रनायक हे त्या वर्गांतील नव्हत हें खालील हकीकतीवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल. राजसेवा हें लोकसेवेचें साधनच आहे असें यांचें ठाम मत असल्यामुळें सरकारी नोकरींत असतांना केवळ खर्डेघाशींत आपल्या आयुष्याचा दुरुपयोग न करितां जेणेंकरून आपल्या हातून उत्तम लोकसेवा होईल अशा तऱ्हेचा व्यासंग त्यांचा

एकसारखा चालूच होता. राज्यपद्धतींत कोणते दोष आहेत; ते कोणत्या रीतीनें सुधारतां येतील वगैरे महत्त्वाच्या गोष्टींचें सूक्ष्म पर्यालोचन करून त्यांनीं आपल्या कर्तव्याची दिशा पूर्वीच ठरविली होती; व अशा रीतीनें लोकहिताच्या दृष्टीनें राज्यव्यवस्थेचें निरीक्षण करण्याची त्यांस जी संधि मिळाली होती तिचा त्यांनीं योग्य उपयोग करून घेतला. लोकहिताची कळकळ त्यांच्या हृदयांत किती जागृत होती हें त्यांनीं आपल्या हुद्याच्या व किफायतीच्या जागेचा १८९७ सालीं राजीनामा दिला ह्यावरून उघड होत आहे. कधीं न संपणाऱ्या पुढच्या वर्षावर हवाला टाकून सरकारी नोकरीची कायमची रजा घेण्यास विलंब लावणाऱ्या व अखेर सरकारी नोकरींतच डोळे मिटणाऱ्या आमच्यांतील मोठ्या ह्मणविणाऱ्या लोकांच्या वर्तनाकडे पाहिलें ह्मणजे रोमेशचंद्रदत्तांच्या राजीनाम्याची प्रशंसा करणें अप्रस्तुत होईल असें आह्मांस वाटत नाहीं. नोकरी सोडल्यापासून आज सात वर्षें लेख लिहून, ग्रंथ प्रसिद्ध करून व व्याख्यानें देऊन हे हिंदुस्थानांतील व इंग्लंडांतील लोकमत जागृत करीत आहेत. सरकारी नोकरींत असतांना व नोकरी सोडल्यावर त्यांनीं जीं लोकहितार्चीं कामें केलीं तीं जनसमूहास संमत आहेत हें १९०० सालच्या लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानावर यांची सर्वानुमतें निवड झाली यावरून स्पष्ट दिसत आहे.

यांची विद्वत्ता एकदेशीय नसल्यामुळें यांचे प्रयत्नही एकदेशीय नाहींत. राजकीय, ऐतिहासिक वाङ्मयात्मक वगैरे ज्ञानाच्या ज्या निरनिराळ्या शाखा आहेत त्या सर्वांवर यांचे परिश्रम झाले असल्यामुळें या सर्व द्वारांनीं त्यांनीं लोकसेवा केली आहे. राजकीय चळवळींत पुढाकार घेऊन शिवाय स्वकपोलकल्पित वाङ्मयात्मक अनेक हृदयंगम व बोधप्रद ग्रंथ लिहून आपल्या मातृभाषेच्या ऋणांतून मुक्त झाल्याचें यांचेसारखें उदाहरण दुसरें क्वचितच सांपडेल. आधीं बुद्धीच्या निरनिराळ्या शक्तींचा सारखाच विकास होणें दुर्घट असतें. ज्याची स्मृति चांगली असते त्याची ग्राहकशक्ति कमी होते; तत्त्वज्ञानाचा काल ह्मणजे कवित्वाचा ऱ्हास असा सामान्य सिद्धांत आहे. सारांश, कोणत्याही एका विशिष्ट शाखेवर विशेष परिश्रम झाले ह्मणजे बाकीच्यांची हयगय होते; परंतु, आमच्या चरित्रनायकास निसर्गतःच अनेक विषयांचें आकलन करणारी बुद्धि लाभली असल्यामुळें त्यांच्यावर, सामान्यतः दिसून येणाऱ्या या निय-

मत्चा परिणाम झाला नाहीं. विद्येचा खरा संस्कार ज्याच्या मनावर झाला आहे त्यास कोणताही विषय अगदीं थोर वयांत सुद्धां अनायासें साध्य करून घेतां येतो. बाबू रोमेशचंद्र दत्त यांचा विशेष परिचय इंग्रजी भाषेशीं असल्यामुळें साहजिकच त्यांस इंग्रजी लिहिण्याचा अभ्यास विशेष झाला. कोणत्याही विषयासंबंधीं आपले विचार ते इंग्रजीभाषेच्या द्वारें प्रदर्शित करूं लागले. १८७२ मध्यें रोमेशचंद्र इंग्लंडमधून आले त्यावेळेस त्यांची व प्रख्यात बंगाली कादंबरीकार बंकिमचंद्र चतरजी यांची गाठ पडली. त्यावेळेस बंकिमचंद्र यांचें 'बंगदर्शन' नांवाचें मासिकपुस्तक सुरू होतें. त्यांत बंकिमचंद्र यांनीं केलेल्या कादंबऱ्या प्रसिद्ध होत असत. ह्या कादंबऱ्यांविषयीं बोलतांना त्यांतील कांहीं हृदयंगम प्रसंगांची रोमेशचंद्र यांनीं विशेष तारीफ केली; ती ऐकून बंकिमचंद्र रोमेशचंद्रास ह्मणाले 'गुणग्रहण करण्याची तुमच्या अंगांत इतकी पात्रता आहे तर तुह्मीं स्वतः कां लिहीत नाहीं ?' 'मला बंगाली भाषासरणी सुद्धां माहीत नाहीं; मग मी त्या भाषेंत ग्रंथ कसचे लिहितों ' असें रोमेशचंद्र यांनीं उत्तर दिलें. 'तुमच्यासारख्या विद्वान् माणसानें असें ह्मणतां कामा नये; अहो, तुह्मी ज्या रीतीनें लिहाल तीच तुमची भाषापद्धति, ग्रंथास लागणाऱ्या बाकीच्या गोष्टी विद्वत्तेच्या योगानें तुह्मांस साध्य आहेतच ' असा बंकिमचंद्र यांनीं त्यास उपदेश केला. या कानउघाडणीचा इतका उत्तम परिणाम झाला कीं रोमेशचंद्रदत्त यांनीं यानंतर दोनच वर्षांनीं ह्मणजे १८७४ मध्यें आपली ' बंगविजेता ' नांवाची कादंबरी प्रसिद्ध केली ! कादंबऱ्या करण्याचा त्यांचा व्यासंग पुष्कळ वर्षे चालू होता; बंगाली भाषेस ललामभूत होऊन बसलेल्या त्यांच्या कादंबऱ्या ह्मटल्या ह्मणजे वर सांगितलेली ' बंगविजेता ' ' माधवीकंकण ' व 'महाराष्ट्र-जीवनप्रभात ' ह्या होत. यांशिवाय त्यांनीं सामाजिक कादंबऱ्याही पुष्कळ लिहिल्या आहेत ! त्यांपैकीं ' संसार ' व ' समाज ' या दोन अगदीं आबालवृद्धांससुद्धां प्रिय होऊन बसल्या आहेत ! बंगाली भाषेचें मार्मिक रीतीनें परिशीलन करून त्यांनीं त्या भाषेंतील ग्रंथकारांवर गुणदोषविवेचनात्मक एक स्वतंत्र ग्रंथ इंग्रजी भाषेंत लिहिला आहे.

याशिवाय त्यांनीं हिंदुस्थानच्या इतिहासावरही पुष्कळ परिश्रम करून अनेक प्राचीन व अर्वाचीन पंडितांनीं केलेल्या ग्रंथांच्या सहाय्यानें ' प्राचीन भरतभूमीच्या सुधारणेचा इतिहास ' या नांवाचा एक स्वतंत्र ग्रंथ प्रसिद्ध केला आहे.

याप्रमाणेंच ' प्राचीन भरतभूमि ' यानांवाचा दुसरा ऐतिहासिक ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केला आहे. हे दोन्ही ग्रंथ इंग्रजींत लिहिलेले असून आंग्लसमाजांत त्यांचा बराच फैलाव झालेला आहे. आंग्लपंडितांनीं केलेल्या हिंदुस्थानच्या इतिहासांतील एकदेशीय माहितीनें हिंदुस्थानसंबंधानें पाश्चात्य लोकांचीं मनें कलुषित होत होतीं त्यांस रोमेशचंद्राच्या या ग्रंथांनीं बराच प्रतिबंध केला. वरील ग्रंथांमुळें रोमेशचंद्र दत्त यांची गणना इतिहासज्ञांत होत आहे. इंग्लंडमध्यें एका पाठशाळेंत कांहीं दिवस हिंदुस्थानच्या इतिहासाचे प्रोफेसर हे होते. कादंबऱ्या व इतिहास यांशिवाय त्यांनीं दुसरेही दोन मोठे ग्रंथ इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध केले आहेत; ते महाभारत व रामायण हे होत. भरतवासीयांस परमपूज्य असलेल्या या वीरपुरुषेतिहासग्रंथांत प्राचीन हिंदुसमाजाचें चित्र उत्तम रीतीनें रेखाटलेलें आहे. हल्लीं जे सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेले लोक आहेत ते ज्या वेळेस अगदीं रानटी स्थितींत होते त्यावेळेसच भरतभूमींतील आर्य लोकांची सुधारणा पूर्णतेस पोहोंचली होती हें जर कोणत्या ग्रंथावरून सिद्ध होत असेल तर तें या दोन ग्रंथांवरूनच. किंबहुना ज्या काळचा इतिहास या दोन ग्रंथांत ग्रथित झालेला आहे त्याकाळीं या लोकांचें अस्तित्व होतें का नाहीं याची सुद्धां शंकाच आहे! अशा ग्रंथांचे पाश्चात्य भाषेंत आणि विशेषतः इंग्रजींत भाषांतर होणें किती अगत्याचें होतें हें सांगावयास नकोच. वरील दोन ग्रंथांचें सारमय भाषांतर मि. दत्त यांनीं कविताबद्ध केलें आहे. तें इतकें लोकप्रिय झालें कीं अल्प काळांत त्याच्या दहा दहा हजार प्रती खपल्या! वर जे मि. दत्त यांचे निरनिराळे व्यासंग दिले आहेत त्यांचा विचार केला म्हणजे त्यांच्या दीर्घोद्योगाची व अकुंठित मानसशक्तीची प्रशंसा केल्याशिवाय कोणासही राहवणार नाहीं.

वरील महत्त्वाच्या गोष्टींनीं यांचा मोठा लौकिक झालाच; परंतु, त्यांतल्यात्यांत देशदृष्टीनें त्यांचें चरित्र बहुमानास पात्र ठरण्याचें कारण त्यांचे हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीसंबंधानें प्रसिद्ध झालेले लेख हें होय. हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत जे दोष आहेत; व ज्यांच्यामुळें हिंदुस्थानची स्थिति दिवसेंदिवस खालावत जात आहे त्या दोषांसंबंधानें आज मित्तीस शेंकडो गृहस्थ आपापल्या परीनें लिहीत आहेत. परंतु, यांचे हे लेख निवळ खोडसाळपणानें लिहिलेले असतात. त्यांस राजकीय गोष्टींसंबंधानें बरोबर माहिती नसल्यामुळेंच

त्यांचे हातून अशा तऱ्हेचा अतिक्रम होतो वगैरे सबबीवर या दोषारोपांतून सरकारी अधिकारी निसटून जाण्याचा प्रयत्न करितात; व सरकारी अधिकाऱ्यांच्या हातांत सत्ता असल्यामुळें त्यांचे अशा तऱ्हेचे प्रयत्न कधींही निष्फळ होत नाहींत. मि० दत्त व बाकीचे टीकाकार यांमध्यें मुख्य फरक हाच कीं, यांचे संबंधानें अधिकाऱ्यांस वरील प्रकारचे आक्षेप घेतां येत नाहींत. रोमेशचंद्र दत्त यांनीं अनेक हुद्यांचीं कामें केलीं असल्यामुळें त्यांस हिंदुस्थान सरकारची राज्यव्यवस्था पूर्णपणें माहीत आहे; यामुळें त्यांच्या लेखांत एक प्रकारचा अधिकार दिसून येतो. शिवाय टीकाकारांस आवश्यक लागणारे गुण त्यांच्या अंगीं पूर्णपणें वास करीत आहेत. ज्या दोषावर टीका करण्याचा त्यांस प्रसंग येतो तो दोष कितीही घाणेरडा किंवा अन्यायाचा असो त्यावर टीका करितांना ते आपल्या मनाची समता कधींही ढळूं देत नाहींत. खरमरीत टीकेच्या आवेशांत त्यांचे हातून सभ्यतेचा कधींही अतिक्रम होत नाहीं. लेखांत यदाकदाचित विशिष्टव्यक्तीचा संबंध आलाच तर ते त्या व्यक्तीबद्दल आपली आदरबुद्धि दर्शवून मग काय लिहावयाचें तें लिहितात. १८९९ मध्यें लखनौ येथें जी राष्ट्रीयसभेची बैठक झाली त्यावेळीं अध्यक्ष या नात्यानें त्यांचें जें भाषण झालें त्यावेळेस त्यांनीं सरकाच्या कृत्यावर टीका करण्यासंबंधानें लोकांस जो उपदेश केला तो राजकीय वातावरणांत संचार करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. टीका करितांना सौम्यपणा व सभ्यता यांचा अत्याचार कधींही करूं नये; अतिशयोक्तीचा तर टीकेस स्पर्शही होतां कामा नये, असें त्यांनीं सांगितलें. त्यांच्या स्वतःच्या टीकेंत हेच गुण जागोजाग दृष्टीस पडतात. यामुळें त्यांच्या टीकात्मक लेखांचें लोकांवर वजन पडून प्रसंगविशेषीं सरकारासही अशा तऱ्हेच्या शुद्ध मनानें व समतेनें केलेल्या टीकेकडे लक्ष्य देण्याची बुद्धि होते. स. १९०० मध्यें त्यांनीं हिंदुस्थानांतील शेतकीवर असलेल्या जबर साऱ्यासंबंधानें टीकात्मक लेख लॉर्ड कर्झन साहेबांस अनावृतपत्रांच्या रूपानें प्रसिद्ध केले होते, ते वाचून व्हाइसराय साहेबांनीं त्यांस भेटीस बोलाविलें होतें. भेटीच्या प्रसंगीं त्यांचें काय भाषण झालें हें जरी प्रसिद्ध झालें नाहीं तरी यावरून ही एक गोष्ट सिद्ध होते कीं त्यांनीं लॉर्ड कर्झनसारख्या मानी मुत्सद्यासही आपल्या भारदस्त व सौम्य लेखांनीं घटकाभर विचार करावयास लाविलें. सत्ता दुसऱ्यांच्या हातांत असल्यामुळें

अज्ञातऱ्हेच्या विचारी टीकेचाही व्हावा तसा उपयोग होत नाहीं ही गोष्ट जरी खरी आहे तरी कालानुरुपानें कां होईना रोमेशचंद्र यांनीं स्वीकारलेल्या राजमार्गानेंच भरतवासीयांचें कार्य होणार आहे हें निःसंशय आहे. हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीचा इतिहास या नांवाचा एक ग्रंथ त्यांनीं नुकताच प्रसिद्ध केला आहे; त्यांत त्यांनीं शेतीवरील जबर साऱ्यामुळें, आपल्या देशबंधूंबद्दल सरकारकडून प्रथमपासूनच फाजील पक्षपातबुद्धि दर्शविली असल्यामुळें, व वसुलाचा तिसरा हिस्सा रकम प्रतिवर्षीं ज्यांत हिंदुस्थानच्या हिताहिताचा यत्किंचित्‌ही संबंध पोहोंचत नाहीं अशा गोष्टींत आज अनेक वर्षें खर्च होत असल्यामुळें हिंदुस्थानची चोहोंबाजूंनीं कशी अवनति होत चालली आहे याबद्दल उत्कृष्ट व सप्रमाण विवेचन केलेलें आहे.

हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीसंबंधानें आजपर्यंत अनेक लहान मोठे ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केले आहेत; व अद्यापही या दिशेनें देशसेवा करण्याचे त्यांचे प्रयत्न अव्याहत चालू आहेत. त्यांचा खरा व स्वाभाविक व्यासंग म्हटला म्हणजे लेखनक्रियेचा आहे हें जरी खरें आहे तरी प्रसंगविशेषीं जाहीर सभेंतून व्याख्यान देऊनही ते इंग्लंडांतील लोकांस इकडील स्थितीचें खरें ज्ञान करून देण्याचा प्रयत्न करीत असतात. हिंदुस्थानच्या सांप्रतच्या स्थितींत त्याच्या वर्तीनें इंग्लंडांत खटपट करणाऱ्या लोकांचीच विशेष आवश्यकता आहे. व या दृष्टीनें रोमेशचंद्राची योग्यता विशेष आहे हें सांगावयास नकोच. हिंदुस्थानांत वारंवार दुष्काळ पडून असंख्य लोक मृत्युमुखीं पडतात याचें खरें कारण काय असावें याचा शोध करण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत यावें अशाबद्दल त्यांनीं माजी स्टेट सेक्रेटरी लॉर्ड जॉर्ज हामिल्टन याजवळ बरीच खटपट केली होती परंतु तिचा उपयोग झाला नाहीं; अशा रीतीनें अनेक वेळां निराशा होत असतां त्यांस न जुमानून त्यांचे प्रयत्न अव्याहत चालू आहेतच. अडचणींस भीक न घालतां अंगीकृत कार्याचा शेवट लावण्यास कायावाचामनेंकरून अहर्निश झटणें याचेंच नांव खरा थोरपणा.



न्याय मूर्ती महादेव गोविंद रानडे
एम. ए. एल्. एल्. बी. सी. आय्. ई.

रा० ब० महादेव गोविंद रानडे सी. आय्. ई.

इंग्रेजी शिक्षणानें नव्या पिढींत केवळ आपल्या बुद्धिसामर्थ्यानें जीं माणसें पुढें आलीं त्यांपैकीं माधवराव रानडे हे एक होत. ह्यांच्या पूर्वजांचें मूळचें गांव रत्नागिरी जिल्ह्यांत चिपळूण तालुक्यांत पाचेरी सडा नांवाचें आहे. ह्यांच्या पणजांचे निपणजे प्रथमतः कोंकण सोडून पेशवाईंतीले सुप्रसिद्ध सरदार पटवर्धन ह्यांच्या आश्रयास येऊन राहिले; व पंढरपुराजवळ करकंब म्हणून गांव आहे तेथें ते स्थायिक झाले. माधवरावजींचे पणजे भास्कर अप्पा उर्फ अप्पाजी भगवंत हे सांगलीकरांकडून पेशव्यांच्या दरबारीं वकील होते. भास्कर अप्पाजी ह्यांस चार पुत्र होते त्यांपैकीं अमृत अप्पाजी हे पुणें जिल्ह्यांत पुष्कळ वर्षे मामलेदार होते; ह्यांचे चिरंजीव गोविंद अमृत हेही निफाडास फडणीशीच्या कामावर होते. व नंतर ते कोल्हापूर संस्थानांत प्रथमतः जवाबनीस, पुढें मामलेदार आणि अखेरीस खासगी कारभारी ह्या हुद्यांची कामें करून नंतर पेनशनर झाले. गोविंद अमृत निफाडास फडनीस असतां तेथें माधवरावजींचा जन्म इ. स. १८४२ च्या जानेवारी महीन्याच्या १८ वे तारखेस झाला. निफाड येथील मराठी शाळेंत प्राथमिक शिक्षण पुरें झाल्यावर स. १८५१ सालीं कोल्हापूर येथें इंग्रेजी शाळेंत इंग्रेजीचा अभ्यास करण्याकरतां ते राहिले. ह्या शाळेंत स. १८५६ सालापर्यंत त्यांनीं विद्याभ्यास केला. पुढें ते मुंबईस एलफिन्स्टन विद्यालयांत जाऊं लागले. तेव्हां पासून तीन वर्षांतच त्यांची मॅट्रिकची परिक्षा उतरली. नंतर दोन वर्षांनीं दुसरी परीक्षा पास होऊन १८६२ त ते बी. ए. झाले. इतर सामान्य द्रव्यार्थीपदवीधरां प्रमाणें येथेंच त्यांनीं अभ्यासक्रम संपवला नाहीं. ते एम. एचा अभ्यास करूं लागले व त्यापरीक्षेंत ते १८६५ सालीं उत्तीर्ण झाले. नंतर कायद्याचा अभ्यास करण्यास त्यांनीं सुरवात केली व एकावर्षांत ते एल. एल. बी झाले. येथेंही त्यांची परीक्षाविषयक तृष्णा तृप्त न होतां ॲडव्होकेटच्या परीक्षेला बसण्याचें त्यांनीं मनांत आणलें; व त्याप्रमाणें स. १८७१ त त्यांची तीही परीक्षा

उतरली. सुदैवानें विश्वविद्यालयानें अगर सरकारानें अधिक परीक्षा ठेवल्या नाहींत; नाहींतर आणखीही परीक्षा ह्यांनीं दिल्या असत्या. माधवरावांसारख्या तीव्रबुद्धींच्या माणसास शुष्क परीक्षा देण्यास वयाची इतकीं वर्षे दवडावीं लागलीं ह्या वरून परीक्षासत्राच्या अनिष्ट परिणामांची थोडीबहुत कल्पना करतां येईल. विद्यालयांत शिकत असतांच माधवरावांची असामान्य बुद्धिमत्ता सर्वांच्या निदर्शनास आली. विचार करणारा विद्यार्थी सर्व कॉलेजांत रानडेच आहे असे उद्गार एके प्रसंगीं एलफिन्स्टन कॉलेजांतील अध्यापक हॉलिंग्झ ह्यांनीं काढले. माधवराव स्वतः बुद्धिमान् होते ही गोष्ट तर निर्विवाद आहेच. पण त्यांची बुद्धि सुपरिणत होण्यास तत्कालीन गुरु बऱ्याच अंशानें कारणीभूत झाले हें विसरतां कामानये. सरआलेक्झांडर ग्रँट, हार्कनेस, हावर्ड वगैरे गुरूंची विद्वत्ता हल्लींच्या नामधारी प्रोफेसर वर्गांत आढळून येणें दुर्घट झालें आहे. शिवाय छात्रवर्गाशीं अध्यापकांचे चांगलेंच संघट्टन असल्यामुळें अध्यापकांच्या स्वभाववैशिष्टयाचें प्रतिबिंब विद्यार्थ्यांच्या सर्वग्राही व अकलुपित अशा मनोजलांत अस्खलित उमटे. परंतु सांप्रत अगदीं उलट स्थिति झाली आहे. छात्रवर्गापैकीं फारच थोड्यांचीं गुरूंना प्रत्यक्ष माहिती असते. ह्यामुळें पुस्तकांतील काठिण्य थोडें बहुत कमी करण्यापलीकडे ह्या भाडोत्री शिक्षकांपासून फायदा होत नाहीं. असो. विद्यार्थीदशेंत असतांच माधवरावजींनीं लिहिलेले इंग्रजी निबंध एतद्देशीयास इंग्रजी किती उत्कृष्ट लिहितां येतें ह्याचा मासला ह्मणून हावर्ड साहेबांनीं विलायतेस मुद्दाम पाठवून दिले होते. त्याचप्रमाणें एका परीक्षेंतील त्यांचे उत्तरांचे कागद इतके अपूर्व होते कीं इकडील लोकांच्या विद्वत्तेची मर्यादा किती विस्तृत आहे हें निदर्शनास आणून देण्याच्या हेतूनें ग्रँट साहेबांनीं ते कागद ऑक्सफर्ड येथील प्रोफेसराकडे पाठवून दिले. ह्यावरून सर्व पदवीधरांत मुकुटमणी हे आहेत असें जें लोक त्यांस ह्मणत तें केवळ औपचारिक नसून अन्वर्थक होतें ह्यांत शंका नाहीं.

कॉलेजांत फेलो असतांना माधवरावजींस जीं विद्यार्थ्यांना व्याख्यानें द्यावीं लागत तीं इतकीं विद्वत्ताप्रचुर, मनोवेधक व माहितीनें ओतप्रोत भरलेलीं असत कीं, तीं ऐकण्यास कॉलेजांतील प्रोफेसरसुद्धां हजर राहात. स० १८६६ सालीं विद्याखात्यांत मराठी ट्रॅन्स्लेटरच्या जागीं माधवरावजींची नेमणूक झाली. १८६८ पासून १८७१ पर्यंत ते एलफिन्स्टन कॉलेजांत इंग्लिश भाषेचे असिस्टंट प्रोफेसर होते. ह्या मुदतींत ते अक्कलकोटास कांहीं दिवस कारभारी

व कोल्हापुरास न्यायाधीश होते. सन १८६९ साली मुंबईहायकोर्टात त्यांनीं असिस्टंट रिपोर्टरचेंही काम केलें आहे. स० १८७१ साली मुंबईच्या तिसऱ्या माजिस्ट्रेटच्या जागीं सरकारानें त्यांस नेमलें, व पुढें मुंबई स्मॉल्काज कोर्टाचे चौथे जजही हे होते. नंतर पहिला वर्ग सबजज्ज नेमून त्यांस पुण्यांत पाठविलें. सबजज्ज ह्या नात्यानें नाशीक, धुळें व पुणें ह्या ठिकाणीं त्यांनीं कामें केलीं आहेत. दरम्यान १८८१ सालीं त्यांस मुंबईस प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट नेमण्यांत आलें होतें. स० १८८७त शेतकऱ्यांच्या कायद्यान्वयें त्यांस स्पेशल जज्जाचे हुद्यावर नेमलें; व अखेर १८९३ सालीं हायकोर्टाच्या जज्जाच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. ह्याप्रमाणें निरनिराळ्या हुद्यांवर असल्याकारणानें माधवरावजींस सर्व प्रकारचा अनुभव येत गेला; व ह्यामुळें त्यांच्या ज्ञानाला एकदेशीयत्व कधीं राहिलें नाहीं. अशा निरनिराळ्या कामांचा अनुभव फारच थोडक्यांना मिळतो. ह्याशिवाय दीडवर्ष हिशेब तपासणाऱ्या कमेटींत त्यांस कमिशनर-नेमलें होतें. त्या समयीं त्यांनीं जें काम केलें तें सरकारास पसंत पडून सरकारनें त्यांस सी. आय. ई ही पदवी दिली. प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट असतां त्यांनीं दोन युरोपियनास अनुक्रमें ६ व १ महिन्याची ठेप दिली होती ह्यावरून त्यांचें नीतिधैर्य प्रथमतः किती अबाधित होतें ह्याची अटकळ करतां येईल.

हायकोर्टात न्यायाधीशाचें काम उत्कृष्ट तऱ्हेनें करण्यास मुख्यतः तीन प्रकारचे गुण अंगीं असावे लागतात. इंग्लिश भाषा अगदीं करतलामलवत पाहिजे; बुद्धि तीव्र व अकलुषित असावी लागते व ज्या लोकांच्या कज्याचा निकाल करावयाचा असतो त्या लोकांच्या आचारविचारांची पुरी माहिती असणें अवश्य आहे. हीं तीन्हीं उपकरणें रानड्यांस अनुकूल असल्यामुळें त्यांच्या हातून हें बिकट काम इतर इंग्लिश न्यायाधीशांपेक्षांही विशेष सरस रीतीनें पार पडलें ह्यांत आश्चर्य नाहीं. माधवरावजींचा कोणताही एक ठराव वाचला ह्मणजे त्यांत तत्संबंधीं पूर्वीच्या सर्व अनुकूल प्रतिकूल ठरावांचा उल्लेख केलेला आढळावयाचाच. लोकांच्या रिवाजांचें ह्यांना पूर्ण ज्ञान असल्यामुळें, पुराव्यावरून तकरारींच्या सत्यासत्यतेचा जो निर्णय ते करीत तो प्रायः निर्भ्रांत असे; व ह्मणूनच त्यांचे सांथीदार न्यायाधीश ह्या अनुमानांपासून कधीं भिन्नमतं प्रदर्शित करीत नसत. एतद्देशीयांच्या चालीरीतींचें व भाषेचें यत्किंचित् ज्ञान नसतां अमका पुरावा विश्वसनीय व अमका अविश्वसनीय हें ठरवणें फार धाडसाचें आहे. परंतु ह्या देशांत सर्वच प्रकार विचित्र आहे. अनभ्यस्त माणसाच्या हातांत न्याय करण्याचें सोपविणें व जी भाषा आप-

णांस समजत नाहीं अशा परकी भाषेंत न्यायाचें काम चालणें हा प्रकार अन्यत्र कोणच्याही सुधारलेल्या देशांत खपला नसता. असो. ह्यावरून इतकाच बोध घ्यावयाचा कीं, न्यायाचें काम बहुतेक एतद्देशीयांच्या हातीं असणें अत्यंत आवश्यक आहे. हायकोर्टांत एक दोन जागा सरकारानें एतद्देशीयांसाठीं राखून ठेवल्या आहेत ह्यांत सरकारच्या औदार्याची तारीफ करण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं.

माधवरावजींच्या मनांत देशहिताची कळकळ फार असे. व त्यांची बुद्धि सर्वव्यापी असल्यामुळें सर्व बाजूंनी समाज सुधारण्यासाठीं ते अव्याहत प्रयत्न करीत. धार्मिक, राजकीय, औद्योगिक, सामाजिक, शिक्षणात्मक वगैरे सर्व चळवळींशीं त्यांचें तादात्म्य असे. हा त्यांचा विशेष गुण होय. लौकिक संमानाला भुलूनच केवळ लोकहित साधण्यास जो उद्युक्त झाला नाहीं, प्रखर देशाभिमान ज्याच्या ठिकाणीं वसत आहे तो कोणत्याही एकदेशीय सुधारणेच्या उपायांनीं संतुष्ट होणार नाहीं, हें उघड आहे. ह्यांतच माधवरावजींच्या मोठेपणाचें बीज आहे. आपल्या देशाची जागृति व्हावी ही त्यांची उत्कट इच्छा असे. ह्यामुळें त्यांस पसंत नसणाऱ्या मार्गाचें अवलंबन करणारीं माणसेंही त्यांस प्रिय असत. माधवरावजींस सुधारक ह्मणण्याचा परिपाठ आहे पण त्यापेक्षां उज्जागरक ही संज्ञा त्यांस विशेष शोभेल. त्यांची सर्व कृति एकाच उद्दिष्ट हेतूनें प्रेरीत असल्यानें, विशेषगुण कोठेंही आढळला तरी तो ग्रहण करण्यास ते सदा तत्पर असत. ह्मणजे त्यांची दृष्टि गुणाधिष्ठानाकडे नसून गुणमात्राकडे असे. सर्व तऱ्हेचीं माणसें त्यांना खपत, ह्यातलें इंगित हेंच आहे. हें वर निर्दिष्ट केलेलें धोरण लक्ष्यांत बाळगलें ह्मणजे बाह्यतः विसंगत दिसणाऱ्या त्यांच्या आचरणाचा उलगडा होईल.

माधवरावजींचें वाचन नेहमीं चालू असल्या कारणानें त्यांच्या पूर्व समजुतींत फरक पडणें स्वाभाविक आहे; व ह्या बाबतींत ग्लॅडस्टनशीं त्यांचें बरेंच साम्य दिसतें. धर्मात्मक व मराठी वाङ्मयात्मक विचारांत उत्तरकाली अगदीं विपर्यास जरी नसला तरी बराच फरक पडलेला स्पष्टपणें दिसून येई. नाहीं तर मराठी ट्रॅन्स्लेटर असतांना मोरोपंताच्या काव्यावर ज्यांनीं अरसिकतादर्शक अभिप्राय दिला त्यांच्या कडून पुढें विश्वविद्यालयांत मराठीचा शिरकाव करण्याचे प्रयत्न कधींही झाले नसते. त्याचप्रमाणें प्रार्थना समाजाचा बालवयीन अभिमान जर पूर्णपणें जागृत असता तर शेणव्याच्या ठाकुरद्वारीं झालेल्या पुराणप्रसंगीं व विल्सनकालेजांत झालेल्या एका व्याख्यानांत त्यांनीं जे उद्गार

काढले ते काढले नसते. माधवरावजींचें संस्कृत अध्ययन जर चांगलें असतें व संस्कृत ग्रंथावलोकनाचा व्यासंग जर त्यांनीं ठेवला असता तर त्यांच्या धर्मविषयक मतांत ह्याहीपेक्षां जास्त क्रान्ति घडून आली असती. त्यांचीं एतद्विषयक मतें नवीन पिढीस ग्राह्य होतील असें वाटत नाहीं.

सामाजिक बाबतींत समाजाला बरोबर घेऊन सुधारणा करण्याचा त्यांचा हेतु स्तुत्य होता. परंतु सुधारणा विषयांची निवड करण्यांत त्यांचें धोरण थोडें चुकलें असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. जातीभेदविध्वंस व पुनर्विवाहोपक्रम ह्यासारख्या सुधारणा इष्ट आहेत असें मानलें तरी त्या हल्लींच्या स्थितींत अमलांत येणें शक्य नाहीं ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत आली नाहीं. तरी पण सुधारणेसंबंधानें त्यांच्या ठिकाणीं खरी खरी आस्था असे हा त्यांच्यांत व इतर सुधारकांत मोठा फरक होता.

हल्लीं आमच्या समाजाची स्थिति अशी आहे कीं, कोणी कितीही चांगलें काम केलें तरी त्याची परीक्षा करणारा कोणी उरला नाहीं. परंतु, माधवरावजी जीवंत असतां त्यांच्याकडे लहान मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक हितार्थ प्रयत्न करणाऱ्या सर्वांची हजेरी असे. त्यामुळें असलीं कामें करणारांस एक प्रकारचें प्रोत्साहन मिळे. ते जबरदस्त आशावादी असत. ह्या कारणास्तव कोणत्याही गोष्टीनें त्यांची नाउमेद होत नसे. कर्तृत्वशील माणसाचा असा स्वभाव बनणें अगदीं स्वाभाविक आहे. कारण जगामध्यें अत्यंत चांगलें अथवा अत्यंत वाईट असें कांहींच नसावयाचें. जें जें कांहीं घडतें तें तें सदसन्मिश्रित असतें. तेव्हां दृढभावनेचीं माणसें फक्त चांगल्याकडे दृष्टि देऊन असतात. अर्धवट धैर्याचीं व आगन्तुक देशाभिमानाचीं माणसें मात्र त्यांतील अनिष्टांशानें लागलींच निराश होतात. तात्पर्य माधवरावजींत हें आशातत्त्व फारच वर्णनीय होतें, व तें उद्योगसातत्य ठेवण्यास चांगलें साधनीभूत झालें.

मूलभूत गोष्टी घेऊन सामान्य सिद्धांत काढण्याची माधवरावांना फार हौस असे. सामाजिक धार्मिक वगैरे कोणत्याही विषयावर बोलतांना त्यांना ऐकिलें तर ऐकणाराला हा अनुभव तेव्हांच येई. त्यांच्या हायकोर्टांतील ठरावांत सुद्धां ह्या त्यांच्या स्वभावाचें प्रतिबिम्ब स्पष्ट उठलेलें दिसतें. सामान्य माणसास जे ठराव परस्पर विरोधी भासतात, त्या सर्वांची एकवाक्यता करून त्या सर्वांच्या मूळाशीं असलेलें तत्व आनावृत करण्याची हातोटी त्यांस उत्तम साधली होती. त्याचप्रमाणें, एकाद्या कथानकावरून अथवा आचारावरून ते जें बोधपर अनुमान काढीत तें त्यांच्या बुद्धीमत्तेस अगदीं शोभण्यासारखें.

असे. हीं अनुमानें केव्हां केव्हां भ्रामक असत. पण हें माधवरावांना समजत नव्हतें असें ह्मणतां येत नाहीं. परंतु कोणत्याही वक्त्याला त्यांचा प्रतिकार करणें कठीण असतें, भाषणाच्या भरांत श्रोत्यांवर त्यांचा चांगला परिणाम होई. ते मोठे वक्ते होते असें ह्मणतां यावयाचें नाहीं. तथापि इंग्रजींत किंवा मराठींत कित्येक तासपर्यंत ते अस्खलित बोलत. त्यांच्या बोलण्यांत नेहमीं नवीन असें कांहीं तरी असावयाचेंच. अर्थात् ज्यांचें वाचन सदा चालू आहे त्यालाच हें शक्य असतें.

माधवरावजींची राहणी फार साधी असे. त्यास कोणत्याही प्रकारचें व्यसन नव्हतें. व मोठेपणाच्या नश्वरछायेंतच गर्क होऊन गेल्याचें कधीं दृष्टोत्पत्तीस कोणाच्या आलें नाहीं. ते आपल्या विद्वत्तेचें प्रदर्शन केव्हाही करीत नसत. प्रसंग असो वा नसो कसें तरी करून पुढें पुढें करणारांपैकीं ते खास नव्हते. हेंच खऱ्या मोठेपणाचें लक्षण आहे. ह्या त्यांच्या विशिष्ट स्वभावामुळें, मुंबईस हायकोर्टांत त्यांची नेमणूक होईपर्यंत त्यांच्या अंगच्या गुणांचें पूर्ण आविष्करण झालें नव्हतें. प्रत्येक चळवळीच्या पाठीमागें ते असावयाचेच. हेंच त्यांच्या खऱ्या कळकळीबद्दल उत्कृष्ट प्रमाण होय. वर्तमानपत्रांपासून पुष्कळ फायदा होत आहे हें विर्विवाद आहे. परंतु त्यांपासून कांहीं अनिष्ट परिणाम होत आहेत. त्यांपैकीं एक हा आहे की, तद्द्वारा सुलभ झालेल्या लोकख्याती करतांच देशहिताची बटबट करणारीं अपात्र माणसें पुढें पुढें येत आहेत. माधवरावजी ह्या दुर्गुणा[illegible] होते

माधवरावजींचा उद्योग मोठा जबरदस्त असे. उद्योग [illegible] करतां मरण यावें असें ते ह्मणत. त्याप्रमाणेंच ह्मणजे त्यांच्या इच्छेनुरूप त्यांस मृत्यु प्राप्त झाला. ते कांहीं दिवस आजारी होते. पण त्यांचा नित्य व्यासंग बंद पाडण्याइतकी आजाराची मजल गेली नव्हती. जानेवारीच्या १६ व्या तारखेस सायंकाळीं ते नित्य क्रमाप्रमाणें बाहेरून फिरून आले. रात्रीं भोजनोत्तर घरच्या मंडळीबरोबर कांहीं गोष्टी सांगून व ग्रंथ श्रवण करून ते निजावयास गेले, तों त्यांच्या छातींत एकाएकीं कळा येऊं लागल्या आणि पंधरा मिनिटांत वैद्य येतो न येतो इतक्यांत त्यांचें प्राणोत्क्रमण झालें (१९०१). त्यांच्या स्मशानयात्रेस सर्व दर्जाची व सर्व जातीची मंडळी गेली होती, व सर्वांना त्यांच्या मरणानें खेद झाल्याचें स्पष्ट दिसत होतें. असो माधवरावजी निवर्तले तरी ते नांवेंकरून अद्यापि जिवंत आहेतच ह्मणावयाचें. नोकरी सोडून जर ते कांहीं दिवस जगते तर देशास फार फायदा झाला असता, पण तशी त्यांस बुद्धि झाली नाहीं हें ह्या देशाचें दुर्दैव होय.



महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस (कै०)

M. C. C. P. P.

८

महामहोपाध्याय राजाराम शास्त्री बोडस.

रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूर तालुका असून त्याच्याजवळच वाडेपडेल ह्मणून एक खेडेगांव आहे; तें बोडसांचें मूळ ठिकाण होय. ब्राह्मणांचीं बहुतेक प्राचीन घराणीं याजन, प्रतिग्रह इत्यादिकांवरच चरितार्थ चालविणारीं असल्यामुळें बोडसांचेंही घराणें त्यांपैकींच होतें. प्रसिद्ध कै० नारायण दीक्षित पाटणकर हे कायगांवटोक्याचे राहणारे असून बोडसांच्या घराण्याला ह्या दीक्षितघराण्याचा आश्रय होता. ह्यामुळें राजारामशास्त्री बुवांचे एक पूर्वज कायगांवास गोदातीरीं येऊन राहिले. ह्यांना बांधिलेलें एक गणपतीचें लहानसें देऊळ अद्यापि कायगांवास आहे. राजारामशास्त्रीबुवांचे पितामह मोरभट्ट हे लहानपणींच काशीस गेले व तेव्हांपासून ह्यांचें घराणें काशीकर झालें. त्यांचे पुत्र गणेशभट्ट. हेच राजारामशास्त्रीबुवांचे वडील होत. शास्त्रीबुवांस एक ज्येष्ठ व एक कनिष्ठ असे दोघे बंधु होते. ज्येष्ठबंधूंचें नांव नारायणभट्ट असून कनिष्ठ बंधूंचें नांव मोरभट्ट असें होतें. मोरभट्ट ह्यांना भिडे उपनावाच्या एका आप्त घराण्यांत दत्तक दिलें होतें. फारच मोठे वैदिक ह्मणून प्रसिद्ध असलेले मोरभट्ट भिडे ते हेच होत. हे मोरभटजी चांगले ज्योतिषी व उत्तम व्युत्पन्नही होते; व आवृत्तीचे पाठी असून प्रसंगांतही सहा सहा महिन्यांत चुकत नसत. असो. राजारामशास्त्रीबुवा श्रीक्षेत्र काशी येथें सन १८३७ च्या नोव्हेंबर महिन्यांत जन्मास आले. विष्णुभटजी खरे हे ह्यांचे वेदाचे गुरु होत. शास्त्रीबुवांचें वय सुमारें १९ वर्षांचें असतांनाच त्यांचें वेदाध्ययन ह्या गुरुजींपाशीं संपूर्ण झालें. राजारामशास्त्रीबुवा हे पुढें दोन तीन वर्षांतच अलौकिक वैदिक ह्मणून प्रसिद्ध झाले. **मनुष्याः स्खलनशीलाः** ह्या न्यायानें ह्यांच्या जिव्हेला वेदपठनसमयीं कधीं अपकार झालें असेल परंतु, ह्मणत असतांना अमुक एक ठिकाणीं ह्यांना चूक लागली असे प्रसंग त्यांच्या हयातीमध्यें दहा पांचापेक्षां जास्त आलेले नाहींत. शास्त्रीबुवा वैदिक झाले त्यावेळीं लंगडा तेलंग ह्मणून ऐक

काशीमध्यें फारच मोठा छल्क वैदिक होता. हा फारच मोठा घनपाठी व जटापाठी असून त्यानें ह्या दोन्ही विकृतींत कोणाचीही डाळ शिजूं दिली नाहीं. कितीही मोठा जटापाठी व घनपाठी असला तरी लंगड्या तेलंगापुढें त्याचा पराभव व्हावयाचाच; असें ठरून गेलें होतें. पुढें शास्त्रीबुवांनींही प्रातिशाख्यसूत्र पढून जटेची व घनाची माहिती करून घेतली; व ते प्रसंगामध्यें इतरांबरोबर एकादी दुसरी ऋचा जटेची व घनाची ह्मणूं लागले. परंतु, ह्यांचा उत्कर्ष त्या तेलंगास सहन झाला नाहीं. शेवटीं ह्यानें शास्त्रीबुवांना घन ह्मणण्याविषयीं आव्हान केलें; आणि एक संपूर्ण प्रपाठक घनाची चर्चा ह्मणावयाची आहे असें त्यानें शास्त्रीबुवांस सांगितलें; व हा प्रसंग वैदिक मंडळी जमून त्यामध्यें झाला. ह्यांत शास्त्रीबुवा मुळींच चुकले नाहींत; व तेलंगाचा मात्र पूर्ण पराभव झाला. पद्माकरदीक्षित लेले ह्मणून एक काशीमध्यें वैदिक असत. कांहींतरी खटपट करून कसल्याही मोठ्या विद्वानाला चुकविण्याबद्दल ह्यांची मोठी ख्याति असे. ह्या दीक्षितांनीं शास्त्रीबुवा बोडसांना चुकविण्याकरितां हवे तितके प्रयत्न केले; पण ते सर्वही निष्फळ झाले. शास्त्रीबुवांचें वय सुमारें वीस वर्षांचें झालें असतां हे श्रौतविद्येंत निष्णात झाले. आपस्तं , बौधायन व हिरण्यकेशी अशा तिन्ही प्रकारच्या श्रौतविद्येंत हे निपुण होते; व १८५७ च्या सुमाराला ग्वाल्हेरमध्यें श्रीमती महाराणी बायजाबाई शिंदे ह्यांच्या खर्चानें होणाऱ्या सोमयागाकरितां शास्त्रीबुवांनाही काशीहून बोलावून नेलें होतें. परंतु, पुढें थोडक्याच दिवसांनीं बंड उद्भवल्यामुळें यज्ञाचा बेत तसाच राहून इतरांबराबर शास्त्रीबुवांनाही परत जावें लागलें. ह्यांची विद्वत्ता पाहून रावराजे दिनकरराव राजवाडे ह्यांनीं आपणांजवळ राहण्याविषयीं ह्यांना पुष्कळ आग्रह केला; परंतु, अध्ययनक्रम कांहीं वर्षे तसाच चालू ठेवण्याविषयीं त्यांचा निश्चय असल्यामुळें त्यांनीं राजवाड्यांच्या ह्मणण्याला मान दिला नाहीं. ग्वालेरीहून परत आल्यावर हे शास्त्र पढूं लागले. राजारामशास्त्री कार्लेकर हे ह्यांचे शास्त्राचे गुरु होत. ह्यांनीं कार्लेकरांपाशीं व्याकरण, न्याय, ज्योतिष, अलंकार, वेदांत इत्यादिकांचा अभ्यास केला. बाळशास्त्री रानडे हे ह्यांचे वेदाध्ययनापासूनचेच सहाध्यायी होत. बाळशास्त्री रानडे व राजारामशास्त्री बोडस ह्यांच्यासारखे विद्वान् हिंदुस्थानांत आजपर्यंत कोणी निपजले नाहींत. कोणी वैदिक असतात त्यांना शास्त्राचें ज्ञान नसतें; व जे उत्तम शास्त्री असतात त्यांना वेदाक्षराचा गंध नसतो. असाच प्रकार प्रायः दृष्टीं पडतो.

पेशवाईमध्यें वेदाध्ययन करून शास्त्रांत निष्णात असलेले मेरुशास्त्री गोडबोले व त्रिंबकशास्त्री शाळिग्राम असे दोघे होते; परंतु, ह्यांचा शास्त्रामध्यें जसा अनुगम होता तसा वेदामध्यें नव्हता. वेदामध्यें निष्णात आणि शास्त्रामध्येंही पारंगत अशीं काय तीं दोनच रत्नें ह्या भरतभूमीवर जन्मास आलीं होतीं. बाळशास्त्री रानडे आणि राजारामशास्त्री बोडस हींच तीं रत्नें होत.

काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे ह्मणून एक महाविद्वान् काशीमध्यें होऊन गेले. हे प्रथमतः माध्वपंथी होते; परंतु, श्रुतिस्मृतींवरून त्यांचा तो पंथ खरा असल्याविषयीं खात्री होईनाशी झाल्यामुळें आणि "मी उद्यां भस्म लावून मणिकर्णिकेच्या घाटावर बसणार; ज्याची छाति असेल त्यानें माझ्याशीं वाद करण्यास तयार व्हावें," असें ह्यांनीं उघड उघड काशींतील माध्व मंडळीस आह्वान केलें असतांही कोणी त्यांच्यापुढें न आल्यामुळें त्यांनीं प्रसिद्धपणें अद्वैतमार्गाचा स्वीकार केला. अमृतराव साहेब पेशवे ह्यांच्या अमदानींत काशीमध्यें माध्वपंथी लोकांनीं पिष्टपशूचें बंड माजविलें होतें. परंतु, काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे ह्यांनीं त्यावेळीं उपलब्ध असलेलीं सर्व कल्पसूत्रें व ब्राह्मणें अवलोकन केलीं आणि "हृदयस्याग्रेऽवद्यत्यथ जिव्हाया अथ वक्षसः" इत्यादि श्रुतींच्या आधारावर तें बंड मोडून टाकून "ब्राह्मणांनीं पिष्टपशु करणें अनाचार आहे" हें सिद्ध केलें. असो. राजारामशास्त्री कार्लेकर हे काशीनाथशास्त्री अष्टपुत्र्यांचे शिष्य होत. हे व्याकरणशास्त्रामध्यें अनुपम असल्यामुळें ह्यांना वैयाकरणकेसरी असें ह्मणत. सुमारें ४० वर्षांपूर्वी कलकत्त्यास पुनर्विवाहाचें जें बंड उपस्थित झालें होतें व ज्यांची झील विष्णुशास्त्री पंडितप्रभृतींनीं दक्षिणेंत ओढिली तें, धर्मशास्त्राच्या आधारावर ह्यांनीं प्रथमतः निर्मूल करून टाकिलें; व पुढें जो इकडल्या पंडितप्रभृतींनीं वात्रटपणा केला होता तो, तो वात्रटपणा करणाऱ्या पंडितंमन्यांना रूपावलीचीही ओळख नाहीं हें सप्रमाण सिद्ध करून, बाळशास्त्री रानड्यांनीं खोडून काढिला. शास्त्रीबुवा सर्वोत्कृष्ट वैदिक असून शास्त्रांमध्यें हे पारंगत असतांनाही कालगतीनें काशी क्षेत्रांत त्यांचा निर्वाह चालेनासा झाल्यामुळें निरुपायास्तव मुंबईच्या एल्फिन्स्तन कालेजांत ह्यांना शास्त्री ह्या नात्यानें १८७१ सालापासून रखडणें भाग पडलें. शास्त्रीबुवांचे समीप शिष्य ह्या नात्यानें कांहीं वर्षें काढण्याचा प्रसंग पूर्वपुण्यामुळें कीं काय, कोण जाणें ह्या लेखकाला आला होता. तथापि, इतक्या काळांत शास्त्रीबुवां-

जवळ काय काय ज्ञानभांडार आहे ह्याचा अदमास त्याला झाला नाहीं. शास्त्रीबुवांचें ज्ञानभांडार केवढें होतें ह्याची अटकळ लेखकाला झालीच नाहीं. फक्त स्वानुभवाप्रमाणें कांहीं माहिती तो पुढें देत आहे त्यावरून चाणाक्ष वाचकांनीं कांहीं अटकळ झाल्यास करावी. पूर्वावलोकन मुळींच न करितां व पुस्तकांचीही विशेष जरूर न बाळगितां पूर्वमीमांसेवरील न्यायमालाप्रभृति ग्रंथांचे पाठ शास्त्रीबोवा सांगत असत हा प्रत्यक्ष अनुभव आहे. याज्ञवल्क्यस्मृतीवरील मिताक्षरेचा व्यवहार भाग शास्त्रीबोवापाशीं वाचण्याचा योग आला असतां सदरहू ग्रंथ शास्त्रीबुवांना अगदीं मुखोद्गत असल्याचें अनुभवाला आलें. नवद्वीपाकडील एक शास्त्री पातंजलभाष्याचा पाठ घेण्याकरितां शास्त्रीबुवांकडे येत होता. तेव्हां शास्त्रीबुवा त्याला पातंजलभाष्याचा पाठ पुस्तकवांचून सांगत असतांना कित्येक दिवस दृष्टीं पडलें; व “ भाष्याचा पाठ आपण पुस्तकावांचून सांगतां हें काय ” असा एकांतस्थळीं लेखकानें प्रश्न केल्यावर “ बाळशास्त्री व मी अशा दोघांनीं भाष्याचे चार अध्याय तोंडपाठ केले होते ” असें त्यास उत्तर मिळालें. अलीकडील प्रसिद्ध प्रसिद्ध शास्त्र्यांनीं पातंजल महाभाष्याचीं सगळीं पानेंही उलटलेलीं नसतात ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. पातंजलयोगशास्त्रावरील योगमणिप्रभेचा पाठ शास्त्रीबोवांनीं पुस्तकावांचून प्रत्यक्ष सांगितलाच; व व्यासभाष्य, विज्ञानभिक्षूंचें वार्तिक, भोजवृत्ति वगैरे योगशास्त्रावरील ग्रंथ तर त्यांच्यापुढें जसे हात जोडून उभे असल्याचें दृष्टोत्पत्तीसच आलें. आचार्यांचें प्रस्थानत्रयावरील भाष्य शास्त्रीबुवांना उत्तम प्रकारें अवगत होतें इतकेंच नव्हे परंतु, त्या त्या भाष्यांत प्रवीण असे रामानुजपंथी, वाल्लभपंथी व माध्वपंथी पंडित सभेमध्यें आले ह्मणजे शास्त्रीबुवांना एकाएकीं बोलावणें यावें व तेथें गेल्यानंतर इतर भाष्यांत निष्णात असलेल्या पंडितांनीं शांकरभाष्यावर अनेक आक्षेप आणून आपणांकडून शास्त्रीबुवांना कुंठित करण्याची कंबर बांधावी; परंतु, शास्त्रीबुवांनीं कोणावरही जहाल न जातां व फार भाषण न करितां हलक्या स्वरांत दोन तीन वाक्यें उच्चारूनच त्या आक्षेपांचें तत्क्षणीं निरसन करून आचार्यांचें मत स्थापित करावें. असे अनेक प्रसंग लेखकाच्या प्रत्यक्ष पाहण्यांत आले आहेत. पापय्या शास्त्री ह्मणून १२ वर्षांपूर्वी इकडे एक तेलंग विद्वान् आले होते व वेदांतील बऱ्याच भागांचा अर्थ ते भाष्याच्या

मदतीवांचून सांगत असत. परंतु, मुंबईमुक्कामीं ते आल्यावर शास्त्रीबुवांच्या ज्ञानापुढें त्यांना नुसते हात टेकावे लागले इतकेंच नव्हे परंतु, " आपणां सारिखे आपणच " असें ह्मणून त्यांनीं शास्त्रीबुवांपुढें हात जोडिल्याचें लेखकाच्या प्रत्यक्ष पाहण्यांतही आलें. आजपर्यंत पुष्कळ विद्वान् होऊन गेले व पुढेंही होतील. परंतु, शास्त्रीबुवासारिखा विनयसंपन्न विद्वान् मागेंही कोणी झाला नाहीं व पुढेंही होण्याचा संभव दिसत नाहीं. शास्त्रीबुवांच्या हातून आमरणांत कोणाचाही उपमर्द झालेला नाहीं ही गोष्ट सर्वांनीं विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. शास्त्रीबुवांच्या आंगीं जर कांहीं दोष असला तर कोणाचीही भीड न तुटणें व कसाही प्रसंग आला तरी कोणाळाही तोडून न बोलणें हाच होता; व ह्यामुळेंच कांहीं टुंग्यासुंग्या लोकांनीं शास्त्रीबुवांच्या नांवावर आपली चंगळ चालवून घेतलेली आहे. एकानें शास्त्रीबुवांचें नांव घालून स्वतः एका भाष्याचें परिशोधन केलें आहे. परंतु, तें भाष्य छापून प्रसिद्ध होईपर्यंत शास्त्रीबुवांना बातमीही समजलेली नव्हती. करितां अशुद्ध निघालेल्या सभाष्य ऋग्वेदाचें प्रकाशन, केसरीकारांनीं शास्त्रिबुवांचा मृत्युलेख लिहितेवेळीं जें, खरी हकीगत माहित नसल्यामुळें शास्त्रीबुवांच्या माथीं मारलें तें वाचकानीं खरें समजूं नये. भाष्य प्रसिद्ध होण्याशीं शास्त्रीबुवांचा कांहींएक संबंध नव्हता. शिवपुराणावरील टीका शास्त्रीबुवांनीं केलेली आहे. परंतु, पहिल्या दहा पांच अध्यायांवरील टीका निवळ त्यांची नव्हे. ती दुसऱ्या एका माध्व पंडितांच्या दुराग्रहावरून प्रसिद्ध झालेली आहे.

शास्त्रीबुवांची नेमणुक मुंबईंतील एल्फिस्टन कॉलेजांत झाली त्यावेळीं रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे त्या कॉलेजांत संस्कृताचे असिस्टंट प्रोफेसर होते. भांडारकर हे कै. अप्पाशास्त्री खाडिलकर ह्यांचे शिष्य होत. डाक्टर झालेले हे भांडारकर जरी आपल्या गुरूजींचा कोठेंही उल्लेख करीत नाहींत तरी अप्पाशास्त्री खाडिलकरांनींच ह्यांना कौमुदीची ओळख करून दिली आहे व कौमुदीपुढील व्याकरणग्रंथांची ओळख राजारामशास्त्री बोडसांच्या कृपेनें ह्यांना झाली आहे. संस्कृतासंबंधानें मुख्य अध्यापक पिटरसन साहेब होते; प्रोफेसर ह्मणून भांडारकर साहेब तेथें होते; आणि कॉलेजांत कोणी तरी शास्त्री हवा असतो ह्मणून शास्त्रीबुवांची नेमणुक झाली होती. शास्त्रीबुवांचा दरमहा फक्त पाऊणशें रुपये असे; आणि प्रोफेसर पिटरसन ह्यांचे पगार धमेल्यानें मोजण्यासारखे असत. परंतु, पगारासंबंधानें जरी शास्त्रीबुवांची अशी स्थिति

होती तरी त्याचेसंबंधानें शास्त्रीबुवांना जर मेरु कल्पिलें तर इतरांना मोहरीचें स्थान देतां येईल कीं नाहीं ह्याची आह्मांला शंकाच आहे. शास्त्रीबुवांचा सरकाराकडून जो कांहीं मोठा गौरव झाला तो १८८७ ह्या वर्षीं होय. व्हिक्टोरिया महाराणी साहेबांची जुबिली ह्या वर्षी झाली व त्यावेळीं व्हॉईसराय लॉर्ड डफरिन ह्यांचे कारकीर्दीत महामहोपाध्याय ही पदवीरूप बडी जहागीर शास्त्रीबुवांना मिळाली.

कॉलेजांतील काम संभाळून शास्त्रीबुवा फावल्यावेळांत विद्यार्थ्यांना हवा तो विषय पढवीत असत. भास्कर दामोदर पाळंदे हे पूर्वी प्रार्थनासमाजांत शिरले होते; परंतु, शास्त्रीबुवांचा आश्रय, शिष्य ह्या नात्यानें ह्यांनीं कांहीं दिवस केल्यामुळें ह्यांचीं मतें बदललीं व त्यांनीं तो पंथ सोडून दिला. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक ह्यांच्या नांवावर जी, सात टीकांसह मनुस्मृति छापलेली आहे ती छापण्याचे कामीं फक्त पैशाशिवाय रावसाहेब मंडलिकांचा संबंध नाहीं. अत्यंत परिश्रम करून जुन्या टीका वगैरे तपासण्याचें काम सर्व शास्त्रीबुवांनींच केलेलें आहे. मंडलिकांच्या नांवावर प्रसिद्ध झालेला व्यवहारमयूख व हिंदुधर्मशास्त्र ह्या ग्रंथांचा प्रकार जवळ जवळ असाच होय. ह्या ग्रंथांशिवाय शास्त्रीबुवांनीं शब्दव्युत्पत्तिकौमुदी, दयानंदखंडन वगैरे लहानसान स्वतंत्र ग्रंथ अनेक केलेले आहेत. पातंजल योगसूत्रावरील योगमणिप्रभानामक टीकेचेंही मराठी भाषांतर ह्यांनीं केलेलें आहे. मुंबईयुनिव्हर्सिटीच्या एम्. ए. च्या परीक्षेंत शास्त्रीबुवा सात आठ वर्षेंपर्यंत वेदांतविषयाचे परीक्षक होते. त्याचप्रमाणें पंजाबयुनिव्हर्सिटींतूनही हे संस्कृतविषयासंबंधानें परीक्षक नेमले जात असत; व ह्याच श्रीमंत सयाजी महाराज गायकवाडांचे कारकीर्दीत श्रावणमासपरीक्षा जेव्हां पूर्वीप्रमाणें सुरू होती तेव्हां मीमांसा, व्याकरण, वेदांत इत्यादि विषयांसंबंधानें परीक्षक ह्मणून ह्यांची नेमणुक होत असे. परीक्षेचे प्रश्न शास्त्रीबुवा अगदीं सोपे काढीत असत, व विद्यार्थ्याला गुण देण्याची पद्धति ह्यांची कांहीं चमत्कारिक असे. वेदांत घेऊन एम्. ए. ला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचें संस्कृत ज्ञान कितपत असावयाचें ह्याची अटकळ शास्त्रीबुवांना पूर्ण असे. संपूर्ण विषयाला शंभर गुण ठेविले असले आणि विद्यार्थ्यानें थोडकेच प्रश्न लिहिले असले तरी त्यानें किती लिहिलें आहे हें न पाहतां कसें लिहिलें आहे हें पाहूनच शास्त्रीबुवा गुण देत असत. शास्त्रीबुवा ज्या विषयाचे

परीक्षक असत त्या विषयांत नापास ह्मणून प्रायः कोणी झालेलाच नाहीं. लोक ज्ञानाकरितां पढत नसून केवळ पोटाकरितां पढत असतात; तेव्हां अशा लोकांची कसून परीक्षा ती काय घ्यावयाची आहे ! असें ते नेहेमीं ह्मणत असत. कॉलेजांतील वेळ खेरिज करून सकाळीं सात वाजल्यापासून रात्रीं दहा वाजेपर्यंत शास्त्रीबुवांकडे पढण्याकरितां विद्यार्थी, आणि माहिती विचारण्याकरितां इतर लोक जात असत. समाधान झाल्याशिवाय कोणीही मनुष्य शास्त्रिबुवांच्या जवळून परत आलेला नाहीं. शास्त्रिबुवांनीं जो ग्रंथ ज्या पुस्तकावरून वाचलेला होता त्या ग्रंथांतील कोणत्याही ठिकाणचा प्रश्न निघाला असतां पुस्तकाच्या अमुक अमुक पानावर हा विषय आहे असें ते नेमकें सांगत असत. **युवतिजनकथामकभावः परेषाम** हें तर शास्त्रीबुवांचें मुख्य व्रत असे. विद्यार्थ्यांच्या सोयीकरितां ते आपली स्नानसंध्या प्रायः सात वाजण्याच्या पूर्वींच संपवीत असत.

शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।

ह्या गीतावचनांत सांगितल्याप्रमाणें ब्राह्मणजातीनें संपादन करावयाचे सर्व गुण शास्त्रीबुवांच्या पाशीं वास्तव्य करीत होते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मुंबईसारख्या शहरांत त्यांचीं सुमारें पंचवीस वर्षे गेलीं असतांही त्यांचें आचरण क्षेत्रां‍त राहणाऱ्या अत्यंत धर्मनिष्ठ ब्राह्मणाप्रमाणें होतें. ह्यांनीं मरेपर्यंत कोणाचेंही मन दुखविलें नसल्यामुळें अजातशत्रु ही संज्ञा युधिष्ठिरानंतर ह्यांनाच योग्य होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. वेद पौरुषेय आहेत ह्मणून एक पदवीधर व्याख्यानें देऊं लागल्यानंतर वेदांचें अपौरुषेयत्व सिद्ध करण्याकरितां वेदप्रामाण्यचंद्रिका ह्या नांवाचें शास्त्रीबुवांनीं एक पुस्तक लिहिलें. हेंच ह्यांचें शेवटलें पुस्तक होय. असो. ह्यांना एक सुशील कन्या होती. ती कल्याण भिंवडीकडे दिलेली होती. ती क्षयाच्या आजारानें वारल्यामुळें ह्यांच्या मनाला अतिशय दुःख झालें होतें. नंतर कांहीं दिवसांनीं ह्यांची पत्नीही निवर्तली. रा. रा. महादेव राजाराम बोडस एम्. ए. एल्. एल्. बी. हेच ह्यांचे एकुलते एक चिरंजीव होत. ह्यांना सिद्धांतकौमुदी, शारीरभाष्य, अलंकारशास्त्र इत्यादिकांत शास्त्रीबुवांनीं चांगलें प्रवीण केलें आहे; व हे मुंबई इलाख्यांत प्रसिद्धही आहेत. असो. रामचंद्र, युधिष्ठिर इत्यादि पृथ्वींतील नररत्नें अदृश्य झालीं असल्यामुळें ह्या नररत्नासही केव्हांना केव्हांतरी हिंदुस्थान आंचवणार हें

ठरलेलेंच होतें; त्याप्रमाणें सन १८९१ च्या नोव्हेंबर महिन्याच्या २८ व्या तारखेस पक्षघाताच्या आजारानें हें नररत्न कैलासवासी झालें; व ही दुःखकारक वार्ता विजेच्या लवण्याप्रमाणें चोहोंकडे सत्वर पसरली. ही वार्ता ऐकून एकंदर विद्वत्समूहास जें दुःख झालें तें सांगतां येत नाहीं. न्याय, व्याकरण, अलंकार, वेदांत, योगशास्त्र, धर्मशास्त्र, मीमांसा, श्रौतविद्या आणि षडंगयुक्त वेद इतक्या विद्यांचें प्रिय वसतिस्थानच एकदम हिंदुस्थानांतून नाहींसें झाल्यामुळें भरतभूमि भूषणरहित झाली असें जें त्यावेळीं लोकांना वाटलें तें अजूनही तसेंच कायम आहे. ह्या भूमीला असा अलंकार केव्हां मिळावयाचा असेल तेव्हां मिळो.

महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस व बाळशास्त्री रानडे ह्या दोहोंमध्यें कमी कोण व अधिक कोण हें सांगतां येणें शक्य नाहीं. अश्विनीकुमार, मित्रावरुण, अग्नीषोम, इंद्राग्नी, अग्नाविष्णू इत्यादि देवताद्वंद्वांत श्रेष्ठ कोण व कनिष्ठ कोण हे ज्याप्रमाणें सांगतां येणें शक्य नाहीं त्याचप्रमाणें ह्या उभयतांत तारतम्य काय होतें हें समजणें शक्य नाहीं. बाळशास्त्री रानडे सुदैवानें काशीक्षेत्रांत राहिल्यामुळें त्यांच्या विद्येचें, अध्यापनादि द्वारानें जितकें चीज झालें तितकें चीज महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस ह्यांच्या विद्येचें झालें नाहीं. हे शास्त्री भोळे असून व्यवहारज्ञान ह्यांना मुळींच नव्हतें अशी कांहीं लोकांची समज आहे. परंतु, लोकांचें मन कोणत्याही रीतीनें दुखवावयाचें नाहीं असें ह्यांचें व्रतच असल्यामुळें सामान्य लोकांची तशी समजूत होत असे. एकदा हे वाईक्षेत्रांत आले होते; व श्रीमहाबळेश्वराचें दर्शन घेऊन कांहीं दिवस तेथेंच राहावें असें ह्यांच्या मनांत होतें. ह्मणून ह्यांच्या कामाला उपयोगीं पडण्याकरितां ह्यांनीं एक मजुर ब्राह्मण बरोबर नेला. परंतु, त्या ब्राह्मणानें ह्यांची वृत्ति पाहून ह्यांचें काम करण्याचें तर बाजूसच ठेविलें पण उलट त्याच्या स्नानाला पाणी वगैरे देण्याची तजवीज ह्यांना करावी लागली; आणि महाबळेश्वराहून परत आल्यावर ह्यांनीं आमची शुश्रूषा फार उत्तम प्रकारें केली असें इतर लोकांसमक्ष त्याला सांगून वर निर्दिष्ट केलेल्या त्याच्या कामगिरीबद्दल त्याला चार पांच रुपये बक्षीसही दिले. असा ह्यांचा स्वभाव असल्यामुळें ह्यांना व्यवहार कळत नाहीं असें लोक ह्मणत. परंतु, वास्तविक पाहूं गेलें असतां श्रीशंकर हें दैवत भोळे व व्यवहारानभिज्ञ ह्या ह्मणण्यांत जितका अर्थ आहे तितकाच अर्थ बोडसांना व्यवहार कळत नव्हता ह्या ह्मणण्यांत आहे अशी नेहमीं त्यांच्या जवळ असलेल्या शिष्यांची खात्री झालेली आहे.



बाळशास्त्री रानडे
(बाल सरस्वती)

M. C. C. Press Poona.

श्रीबालसरस्वती बाळशास्त्री रानडे

ह्या महात्म्याचें नांव सर्व भरतखंडांत प्रसिद्ध आहे. वाईमध्यें धर्मपुरींत रानडे उपनांवाचें एक कुल आहे. शंकर मोरो रानडे हे ह्याच कुलांतील असून गोविंदभट रानडे ह्मणून एक ब्राह्मण ह्याच कुलांत होऊन गेला. हे गोविंदभट वेदाध्ययन झाल्यानंतर गृहस्थाश्रम स्वीकारून श्रीक्षेत्र काशी येथें विद्यार्थी पढविण्यांत काळ घालवूं लागले. ह्यांची पत्नी सुशील परंतु, वरचेवर अकालीं प्रसूत होऊं लागल्यामुळें ह्यांच्या चित्ताचें स्वास्थ्य नाहींसें झालें. तेव्हां गर्भस्राव न होण्याकरितां ह्यांनीं शरभरूप भगवान् शंकराची उपासना केली; व त्यामुळें ह्यांना एक पुत्र झाला. त्याचें नांव विश्वनाथ असें त्यांनीं ठेविलें. विश्वनाथाचा चूडाकरणसंस्कार गोविंदभटांनीं केला आणि पांचवें वर्ष लागतांक्षणीं उपनयनसंस्कार करण्याचेंही त्यांच्या मनांत होतें; परंतु, इतक्यांत त्यांचें आयुष्य संपल्यामुळें हा सुयोग घडून आला नाहीं. विश्वनाथाला बालपणींच पितृवियोग झाल्यामुळें व तो आईचा एकुलता एक असल्यामुळें लाडीकपणानें जरी हा प्रख्यात विद्वान् होणें संभवनीय दिसत नव्हतें तरी ह्या भरतभूमीच्या सुदैवानें विश्वनाथ हा एक अद्वितीयच विद्वान् निपजला. पांचवें वर्ष लागण्यापूर्वींच विश्वनाथाला चांगलें लिहितां वाचतां येऊं लागलें; व मुलगा सुबुद्ध आहे असें पाहून त्याच्या गुरूजींनीं पांचव्या वर्षींच त्याचें उपनयन केलें. तेव्हांपासूनच विश्वनाथ तैत्तिरीयशाखेचें अध्ययन करूं लागला; आणि अनध्यायदिवशीं अमरकोश, व सूत्रादि वेदांगें त्याला पढविण्याचा त्याच्या गुरूजींनीं उपक्रम केला. विश्वनाथाला एक दोन संथांनींच पाढा पाठ येऊं लागला आणि सातवें वर्ष संपलें नाहीं तोंच हा विश्वनाथ वेदवेदांगपारंगत झाला. ह्यावेळीं चित्रकोटास विनायकराव पेशवे राहत होते. ते प्रतिवर्षी विद्वान् ब्राह्मणांची परीक्षा घेऊन योग्यतेप्रमाणें प्रत्येकाला कांहीं तरी दक्षिणा देत असत.

हें ऐकून, घरची गरीबी असल्यामुळें विश्वनाथानेंही तेथें जाऊन परीक्षा दिली. ऋग्वेदांतील ऋचांनीं होणाऱ्या शस्त्रांपैकीं वालखिल्य ह्मणून एक अति कठिण शस्त्र आहे व हें शस्त्र पाठ ह्मणणें मोठ्या मुष्किलीचें काम आहे. मोठ्या मोठ्या विद्वानांनाही चुका लागल्याशिवाय हें शस्त्र पाठ जात नाहीं. परंतु, विश्वनाथ तैत्तिरीयशाखी असतांनाही त्यानें हें वालखिल्य शस्त्र आपल्या वयाच्या आठव्याच वर्षी चित्रकोटास भरलेल्या महाविद्वानांच्या सभेंत बिनचूक ह्मणून दाखविलें; व त्यामुळें त्याला त्या विद्वत्सभेनें बालसरस्वती ही पदवी दिली. चित्रकोटास वैदिकांचे पुष्कळ प्रसंग झाले; परंतु, पदें, क्रम, जटा, घन इत्यादिकांच्या चर्चेंत हे बालसरस्वती कोणालाही हार गेले नाहींत. ही ह्यांची विद्वत्ता पाहून श्रीमंत विनायकराव पेशव्यांनीं विद्वज्जनांच्या सभेंत महावस्त्र देऊन ह्यांचा बहुमान केला. चित्रकोटाहून हे बालसरस्वती ब्रह्मावर्तास गेले. तेथेंही त्याचप्रमाणें बहुमान झाल्यानंतर ते ग्वालेरीस गेले. त्याठिकाणीं कृष्णाशास्त्री ह्मणून फारच मोठे पंडित होते. ते ह्यांची विद्या पाहून संतुष्ट झाले व त्यांच्या सांगण्यावरून अलिजाबहादर शिंदेसरकारानें बालसरस्वतींना मोठें वर्षासनही देण्याचें कबूल केलें. नंतर हे बालसरस्वती, सुमारें नऊ वर्षांचें वय झालें असतांना काशीक्षेत्रीं परत आले व पंचमहाकाव्यें, आणि षड्दर्शनें पढण्याचा त्यांनीं उपक्रम केला. थोडक्याच दिवसांत हे चांगले व्युत्पन्न झाले व न्यायशास्त्र पढण्याकरितां ते ग्वालेरीस कृष्णाशास्त्र्यांकडे गेले. त्या ठिकाणीं न्यायशास्त्राचें अध्ययन केलें. परंतु, कृष्णाशास्त्र्यांचा व त्यांचा फार दिवस समागम झाला नाहीं. कृष्णाशास्त्र्यांनंतर मोरशास्त्री साठे ग्वालेरीस आले; व त्यांच्या पाशीं त्यांनीं पूर्वमीमांसेचें अध्ययन केलें. परंतु, इतकें होईपर्यंत ह्यांचें वय सोळा वर्षांचें झालें व मोरशास्त्री साठेही स्वर्गलोकीं गेले. ह्यावेळीं व्याकरणांत अद्वितीय असलेले राजारामशास्त्री कार्लेकर तेथें आले होते व त्यांच्यापाशीं व्याकरण पढण्याची ह्यांनीं आपली मनीषा दाखविली; आणि त्यांची अनुज्ञा घेऊन ते कांहीं दिवस घरीं ह्मणजे काशीस राहण्याकरितां गेले. परंतु, बरेच दिवस ग्वालेरीस त्यांचें येणें झालें नाहीं. त्यावेळीं काशिनाथशास्त्री अष्टपुत्रे काशीमध्यें होते. हे राजारामशास्त्री कार्लेकरांचे गुरु होत. उत्तर हिंदुस्थानांत आजमित्तीस जे ह्मणून कांहीं विद्वान् आहेत ते प्रायः सर्व यांच्याच शिष्यपरंपरेंतील आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

माध्वमत वेदबाह्य आहे ह्मणून ज्यांनीं आपल्या पंथाचा त्याग करून व भस्म लावून मणिकर्णिकेच्या घाटावर प्रसिद्धपणें स्नानसंध्या करण्याचा उपक्रम केला तेच हे काशिनाथशास्त्री होत. बालसरस्वती काशीमध्यें असतांना ह्यांच्या पाशीं व्याकरणशास्त्र पढूं लागले; व कार्लेकर येईपर्यंत त्यांनीं हाच क्रम सुरू ठेविला. पुढें कलकत्याकडे विधवाविवाहाचें बंड उपस्थित झालें; व तिकडील अरण्यपंडितांचा समाचार घेण्याकरितां काशींतील लोकांनीं राजारामशास्त्री कार्लेकर ह्यांस ग्वालेरीहून आणविलें. तेव्हां येतांक्षणीं त्यांनीं आपले गुरु काशिनाथशास्त्री ह्यांची भेट घेतली असतां काशिनाथशास्त्र्यांनीं बालसरस्वतींना पढण्याकरितां त्यांच्या स्वाधीन केलें; व गुरूजींच्या आज्ञेप्रमाणें कार्लेकरांनीं बालसरस्वतींचा, शिष्य ह्मणून स्वीकार केला; व कार्लेकरांच्या आश्रयानें बालसरस्वती थोडक्याच वर्षांत तर्क, व्याकरण, साहित्यशास्त्र, नीतिशास्त्र, वेदांत, मीमांसा, सांख्यशास्त्र, योगशास्त्र व पुराणें ह्यांत निष्णात झाले. पुढें वयाच्या पंचविसाव्या वर्षी काशी येथील सरकारी संस्कृत पाठशाळेंत गृफिथसाहेबांनीं ह्यांची नेमणुक केली व तेव्हांपासून हे शिष्यजनांना सर्व शास्त्रांचा पाठ सांगूं लागले; व तेव्हांपासून शिष्यांच्या द्वारानें आणि ह्यांच्या लेखांच्या व वक्तृत्वाच्या द्वारानें ह्यांची कीर्ति सर्व भरतखंडांत दुमदुमून राहिली. पाठशालेमध्यें ह्याप्रमाणें हे विद्यार्थी पढवून राहिले असतां मुंबईत पुनर्विवाहाचें बंड उपस्थित होऊन कार्लेकरांनीं केलेल्या "विधवोद्वाहशंकासमाधिः" नामक पुस्तकावर कांहीं अरण्यपंडितांनीं आक्षेप घेतले; आणि त्या पुस्तकाचें खंडन करण्याचा आव घातला. परंतु, बालसरस्वतींनीं मुंबईकर खंडनकर्त्यांची धर्मशास्त्रविषयकज्ञानासंबंधानें खरी योग्यता प्रकट करून त्यांना रूपावलि देखील येत नाहीं ह्याविषयीं पुराव्याचें माप त्यांच्या पदरांत टाकिलें. ह्या सुमारास मंडी येथील राजा विजयसेन काशीमध्यें आला; व त्यानें तेथें सभा केली. ह्या सभेंत बालसरस्वतींचें अकुंठित वक्तृत्व कानावर पडल्यामुळें ह्यांची भेट घेण्याची त्याला इच्छा झाली. तेव्हां आपला उपाध्याय पाठवून त्या राजानें त्यांना आपल्या नगरांत बोलावून नेलें; आणि त्यांचा त्यानें मोठा गौरव केला. नंतर त्या राजानें मंत्रोपदेश देण्याविषयीं त्यांची अतिकरुणस्वरानें प्रार्थना केली असतां त्याच्या अधिकारानुरूप गणेशमंत्राचा त्यांनीं त्याला उपदेश केला; व त्यानेंही वेदमंत्रापेक्षां त्या मंत्राला

अधिक मान दिला. नंतर त्यानें बाळसरस्वतींना महावस्त्र देऊनच त्यांच्या बरोबर आलेल्या ब्राह्मणांची संभावना करून श्रीक्षेत्र काशी येथें त्यांना पोंचवून दिलें. ह्यावेळीं त्यांचें वय अठ्ठाविशीच्या सुमाराला आलें होतें. इतक्यांत तेथेंच राहणाऱ्या विनायक दीक्षित नांवाच्या अग्निहोत्र्यांनीं सर्वपृष्ठ ऋतु करण्याचें योजून उद्गातृत्व करण्याविषयीं श्री बाळसरस्वतींची प्रार्थना केली. ह्या ऋतूंत बाळशास्त्री रानडयांचें सामगायन ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून ऐकिलें त्यांच्या नेत्रांतून एकसारखे आनंदाश्रु वाहूं लागले. नंतर तेथें जनार्दनभट ह्मणून प्रसिद्ध असलेल्या एका अग्निहोत्र्यांनीं अग्निष्टोम ऋतु केला असतां त्या ऋतूंत ह्यांनीं आध्वर्यव केलें; व दुसऱ्या एका यज्ञांत त्यांनीं हौत्र करून दाखविलें. ह्याप्रमाणें तिन्ही वेदांतील आपली निपुणता भूतलावर प्रकट केली. नंतर वयाचे तिसावे वर्षी ते आपल्या कार्लेकरगुरुजींसहवर्तमान दक्षिणप्रांतांत तीर्थयात्रा करण्याकरितां आले व अनेक तीर्थें हिंडतां हिंडतां ते ह्या वाई क्षेत्रांतही येऊन कृष्णावेणीचें स्नान करून गेले. नंतर काशीक्षेत्रांत विद्यार्थ्यांना सर्व शास्त्रांचा पाठ सांगण्यांत व पुढें आलेल्या धर्मशास्त्रविषयक प्रश्नांचा निर्णय करण्यांत त्यांनीं कांहीं वर्षें घालविलीं. ह्याप्रमाणें क्रम चालला असतां त्यांचे गुरु राजारामशास्त्री कार्लेकर कैलासवासी झाले; तेव्हां ह्यांचें वय पत्तीस वर्षांचें होतें. गुरूंच्या परलोकगमनामुळें ह्यांच्या मनाला अतिशय खेद झाला; व पाठशाळेंतील काम सोडण्याचें त्यांनीं मनांत आणिलें. परंतु, ह्यांची आई व इतर आप्तवर्ग ह्यांनीं पाठशाळेंत राहण्याविषयींच आग्रह केल्यामुळें त्यांना तसेंच रखडावें लागलें. गुरुजी निवर्तल्याकारणानें विद्यार्थ्यांना सर्वशास्त्रांचे पाठ सांगणें व शेंकडो ठिकाणांहून लिहून येणाऱ्या धर्मशास्त्रविषयक प्रश्नांचीं उत्तरें देणें हें सर्व काम बाळसरस्वतींवरच पडल्यामुळें त्यांना भोजनादि व्यवहार नीटपणें उरकण्याइतकीही फुरसत सांपडेना. शेवटीं पाठशाळेचें काम कायमचें सोडून देण्याचें ठरवून यज्ञयागादि कर्मांत काळ घालविण्याचें ह्यांनीं मनामध्यें आणिलें; व त्याप्रमाणें सुमारें आपल्या वयाच्या चाळिसाव्या वर्षी ह्यांनीं तें काम सोडून दिलें. नंतर ह्यांनीं अग्निहोत्र घेऊन दर्शपूर्णमासादि याग वेळच्या वेळीं करण्याचा क्रम सुरू केला; व दौर्ब्राह्मण्यदोषपरिहारार्थ अग्निष्टोम ऋतु करण्याचा त्यांनीं निश्चय केला. ह्या यज्ञाला बुंदीच्या महाराजांनीं ह्यांना बरेंच साहाय्य केलें; आणि माघी

पौर्णिमेला अग्नीष्टोमीय याग करण्याचें ठरवून त्याप्रमाणें चोहोंकडील शेकडों विद्वान् लोकही त्यांनीं बोलावून आणिले. माघशुद्ध पंचमीला श्रीबालसरस्वतींनीं यज्ञाचें स्थल ठरवून भूमिपूजन केलें असतां आठ दिवसांच्या आंतच यज्ञमंडप तयार झाला; माघशुद्ध त्रयोदशीला त्यांनीं नांदीश्राद्ध करून अग्निष्टोमहोमाचा संकल्प केला. काशीक्षेत्रांत ह्यापूर्वी पुष्कळ यज्ञ होऊन गेले व पुढेंही होतील; परंतु, बालसरस्वतींच्या यज्ञांत एकत्र झालेलें विद्वन्मंडळ पूर्वीही कोणाला पाहावयास सांपडलें नाहीं व पुढेंही दृष्टी पडण्याचा संभव नाहीं. यज्ञाचा उपक्रम झाल्यापासून यज्ञसमाप्ति होऊन आठपंधरादिवस होईपर्यंत काशीक्षेत्र ह्मणजे देवगुरु बृहस्पतींनीं, वालखिल्य ऋषि, सप्तर्षि, नारदप्रभृति देवर्षि व सनकसनंदनप्रभृति ब्रह्मर्षि एकत्र करून धर्मरक्षणासंबंधानें विचार करण्याकरितां जुळविलेली सभाच कीं काय असें तेथील लोकांना वाटूं लागलें. ह्यांच्या यज्ञांत रामकृष्णभट धारप अध्वर्यु होते. हे त्या वेळीं फार वृद्ध होते; तथापि बालसरस्वतींना उपनयनपूर्वक संपूर्ण वेद व श्रौत ह्यांनीं पढविलें असल्यामुळें आध्वर्यव स्वीकारण्याची बालसरस्वतींनीं विनंति केली व ती त्यांनीं मान्य केली. गदाधरभट ह्यांनीं हौत्र स्वीकारिलें; जयरामशास्त्री, सदाशिव दीक्षित व राजाराम दीक्षित हे अनुक्रमें मैत्रावरुण, अच्छावाक व ग्रावस्तुत् झाले; वेणीमाधव दीक्षित प्रतिप्रस्थाते झाले; नेष्ट्याचें काम काशिनाथभटांनीं केलें; जनार्दन दीक्षितांनीं उन्नेतृत्व स्वीकारिलें; सखारामभटांनीं ब्रह्मत्व केलें; बालसरस्वतींचे सर्वविद्यांत सहाध्यायी व विद्वत्तेनें तुल्यच नव्हे परंतु, वेदविद्येमध्यें काकणभर जास्तच असूनही आयुष्याचे उत्कृष्ट दिवस मुंबईसारख्या ठिकाणीं गेल्यामुळें प्रख्यातीनें कांहींसे कमी असलेले राजारामशास्त्री बोडस ब्राह्मणाच्छंसी झाले; तिन्ही श्रौतांत पारंगत असलेले काशीनाथशास्त्री आग्नीध्र झाले; व भट्टकुलांतील गोपाळशास्त्री पोते झाले. उद्गाता, प्रस्तोता, प्रतिहर्ता, व सुब्रह्मण्य ह्यांचीं कामें अनुक्रमें गोपाळकृष्णशास्त्री, बाळदीक्षित, रघुनाथ दीक्षित व बाबुदीक्षित ह्यांनीं केलीं; आणि बापूभट्टांनीं सादस्य स्वीकारिलें. असो. ह्याप्रमाणें ऋत्विजांची योजना झाल्यानंतर बालसरस्वतींनीं सर्वांचें मधुपर्कानें पूजन केलें; व त्यावेळीं ऋत्विजांना पीतांबर, शालजोड्या, आंगठ्या व रुप्याचीं भांडीं दिलीं; व नंतर चमसाध्वर्यूंचाही त्यांनीं तसाच संमान केला. तदनंतर दीक्षणीयेष्टीचा उपक्रम करून त्यांनीं त्या इष्टीच्या द्वारानें अग्नावि-

ष्णूंना तृप्त केलें. तदनंतर क्षौर आटोपून स्नान झाल्यानंतर त्यांनीं अंजन, कृष्णाजिन, उंबराचा दंड व मृगशृंग ह्यांचा स्वीकार केला. ह्याप्रमाणें बालसरस्वती व मस्तकीं रेशमी जाळी धारण केलेली त्यांची पत्नी हीं उभयतां यज्ञदीक्षा घेऊन यज्ञशाळेंत बसलीं असतां कलियुगीं वेदांचें रक्षण करण्याकरितां ब्रह्मलोकाहून अरुंधतीसह वसिष्ठ महर्षिच प्राप्त झाले आहेत किंवा काय असें लोकांना वाटलें. दुसरे दिवशीं सोमक्रय होऊन सोमाची स्थापना झाली. नंतर, आतिथ्येष्टि होऊन सोमाचें पूजन झालें; आणि आप्यायन वगैरे झाल्यानंतर प्रवर्ग्यानुष्ठान सुरू झालें. तदनंतर उपसदिष्टि होऊन सुब्रह्मण्यानें यागाकरितां इंद्राला आह्वान केलें. ह्याप्रमाणें पूर्वाण्हसंबंधी अनुष्ठान संपूर्ण झालें; व ह्याच रीतीनें सर्व दिवसांचें अनुष्ठान समाप्त झाल्यानंतर दुसरे दिवशीं ऋत्विजांनीं विश्रांति घेतली. तिसऱ्या दिवशीं प्रवर्ग्य व उपसदा हीं अनुष्ठानें झाल्यानंतर महावेदीचें अभिमंत्रण झालें; व अपराण्हसमयीं ऋत्विजांनीं यजमानासह प्रवर्ग्य व उपसदिष्टि हीं अनुष्ठानें केलीं. ह्या दिवशीं एका संस्थानिकानें आनंदित होऊन यज्ञपुरुषाला साष्टांग नमस्कार घातला व विपुल दक्षिणा पुढें ठेविली. चवथ्या दिवशीं हजारों प्रेक्षक सकाळपासूनच तेथें आल्यामुळें यज्ञशाळेंत व बाहेर गर्दीच उडून गेली. प्रथमतः पूर्वाण्हसंबंधी व अपराण्हसंबंधी प्रवर्ग्योपसदांचें अनुष्ठान झालें व नंतर प्रवर्ग्योद्वासन झालें. हविर्धानसंबंधी विशेष कार्य, उत्तरवेदीवर अग्निप्रणयन वगैरे झाल्यानंतर अग्नीषोमीय यागासंबंधी अनुष्ठान सुरू झालें. ह्या दिवशीं अनुष्ठानं पुष्कळच असतें. तें आटोपल्यावर पांचव्या दिवशीं अनुष्ठानाला लवकरच आरंभ झाला. हाच सुत्येचा ह्मणजे सोमयागाचा दिवस होय. ह्या क्रतूंतील मुख्य अनुष्ठान ह्याच दिवशीं व्हावयाचें असतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या दिवसाचें अनुष्ठान फारच गहन आहे. तथापि महर्षितुल्य विद्वान् तेथें जमले असल्यामुळें तें प्रमादरहित पार पडलें. अशा रीतीनें सुरू झालेला क्रतु निर्विघ्नपणें शेवटास गेला. मणिकर्णिकेचे घाटावर अवभृथस्नानाचा जो समारंभ झाला तो तर अश्रुतपूर्वच झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. दीक्षित झालेल्या बालसरस्वतींच्या हातांतील उदकाचा एकादा बिंदु तरी आपल्या शरीरावर पडून आपल्या सर्व पातकांची मुक्तता व्हावी एतदर्थ हजारों लोकांच्या झुंडीच्या झुंडी पुढें येऊं लागल्या असतां सहस्रार्जुना-

प्रमाणें सहस्र बाहु ह्यांना ह्यावेळीं नाहींत एवढीच कायती त्यावेळीं लोकांना उणीव भासली. तथापि बालसरस्वती व त्यांची पत्नी ह्या उभयतांनीं तेथें येणाऱ्या व आलेल्या स्त्रीपुरुषसमूहांना कृतार्थ केलें. नंतर यज्ञमंडपांत येऊन त्यांनीं उदयनीयेष्टि केली. नंतर मैत्रावरुणी आमिक्षा झाल्यावर सर्व ऋत्विज थकले आहेत असें पाहून उदवसानीयेष्टीचें काम पूर्णाहुतीवरच त्यांना भागविणें भाग पडलें. अवभृथस्नान करून बालसरस्वती परत येत असतांना लोकांना पवित्र करण्याकरितां हा प्रत्यक्ष काशी-विश्वेश्वरच अवतीर्ण झाला आहे अशा प्रकारचे उद्गार लोकांच्या तोंडांतून निघाले. सर्वजगद्वंद्य बालसरस्वतींनीं अवभृथस्नानानंतर आपल्या मातेला जेव्हां अत्यंत नम्रपणें वंदन केलें तेव्हां ह्या जननीची बरोबरी लोपामुद्रा, अरुंधती इत्यादि जगद्वंद्य पतिव्रतांशिवाय इतरांच्यानें होणें शक्य नाहीं असें सर्वांना वाटलें. ह्याप्रमाणें महाक्रतु केल्यानंतर पूर्तकर्मांनीं ती यज्ञभूमि भूषित व्हावी एतदर्थ त्यांनीं तेथें एक बाग तयार करविली. इतक्यांत विजयसेनराजाचें बोलावणें आल्यामुळें ते तिकडे गेले. जातांना प्रयागक्षेत्रीं उतरून त्यांनीं तीर्थविधि केला व राजाच्या नगरांत जाऊन त्यानें भक्तिपूर्वक केलेल्या पूजेचा त्यांनीं स्वीकार केला. नंतर हा राजा आपला परम भक्त आहे असें आढळून आल्यावर त्याची कांहीं मदत होईल असें समजून काशीक्षेत्रांतील आपल्या यज्ञभूमीमध्यें एक देवालय बांधण्याचा त्यांनीं निश्चय केला; व शुभ मुहूर्तावर शिलान्यास केल्यानंतर शिल्पी लोकांकडून त्यांनीं सुंदर देवालयही तयार करविलें. परंतु, **श्रेयांसि बहु विघ्नानि** हा न्याय ह्या प्रसंगींही दत्त उभा राहिला. देवालय तयार झाल्यानंतर बालसरस्वतींची पत्नी प्रसूत होऊन, उभयतांना राहण्यास योग्य असें स्थान पाहण्याकरितांच कीं काय इहलोक सोडून गेली. हें संकट ओढवणार असें वाटतांक्षणीं श्रीबालसरस्वतींनीं एक पांच वर्षांचा मुलगा दत्तक घेतला; व त्याच्याकडून आपल्या पत्नीचा और्ध्वदेहिक संस्कार करविला. हें दुःसह दुःख एकसारखें अंतःकरणाला टोंचीत असतांनाही शिवाची स्थापना करण्याचा त्यांनीं आपला विचार सत्वर शेवटास नेण्याचें मनांत आणिलें. नंतर सर्व सामग्री तयार करून आपल्या वयाचे त्रेचाळिसाव्या वर्षीं आषाढशुद्ध दशमीला त्यांनीं एकादश रुद्र, विष्णु, सूर्य, गणपति, पार्वती, गंगा, भैरव, गरुड, मारुती, नंदी व दक्षिणामूर्ति

ह्यांची स्थापना केली. ह्यावेळीं त्यांची प्रकृति अतिशय बिघडली होती व त्यामुळें दोन पावलें चालण्याचें किंवा दोन शब्द बोलण्याचेंही सामर्थ्य त्यांना नव्हतें. तथापि देवांच्या स्थापना करण्याविषयीं त्यांचें मन अतिशय उत्सुक झाल्यामुळेंच ही गोष्ट पार पडली. नंतर कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं असें समजून ह्या किंवा

अर्धो वा एष आत्मनो यत्पत्नी

अशा श्रुति असल्यामुळें एकच असलेल्या आत्म्याचे, एक स्वर्गात व एक भूलोकांत असे दोन तुकडे होऊन राहणें योग्य नव्हे अशा समजुतीनेंच कीं काय कोण जाणे; बाळसरस्वतींनीं मर्त्यलोकसंबंधी सर्व बंधनांचा त्याग करून केवळ देवप्रतिष्ठाविधि पूर्ण होतांक्षणींच परमात्म्याकडे आपलें लक्ष्य लाविलें. बाळसरस्वती अति आजारी आहेत हें ऐकून लोकांच्या झुंडींच्याझुंडी त्यांच्या घराकडे जाऊं लागल्या आणि प्रपंचांतील त्यांचें लक्ष्य मुळींच नाहींसें झाल्यामुळें प्रपंचसंबंधी केलेल्या प्रश्नांचीं उत्तरें त्यांच्या मुखांतून विसंगत येऊं लागलीं व ह्यावरून सन्निपातज्वरानें ह्यांच्या चित्ताला भ्रम झाला आहे असें वैद्यांनीं ठरविलें. परंतु, वेळच्यावेळीं संध्यावंदन, शिवपूजा वगैरे कर्मासंबंधानें त्यांची तत्परता तशा स्थितींतही स्पष्ट दृष्टीं पडल्यामुळें वैद्यलोकांच्या त्या परीक्षेंत कांहींच अर्थ नाहीं अशी सतत जवळ असलेल्या शिष्यादिकांची खात्री झाली. ह्याप्रमाणें ब्रह्माकडे लक्ष्य लावून उत्तरायण एक दिवस शिल्लक आहे तोंच त्यांनीं आपल्या वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षी स्वर्गारोहण केलें. ही अत्यंत शोकजनक वार्ता हां हां ह्मणतां सर्व काशीक्षेत्रांत व तारायंत्राच्या द्वारानें सर्व भरतखंडांत पसरली; तेव्हां त्यांना ओळखणाऱ्या लोकांच्या अंतःकरणाची वृत्ति काय झाली हें हुबेहुब सांगतां येत नाहीं. पृथ्वीचें रक्षण करण्याकरितां नरनारायण कोठें तरी अवतीर्ण होत असतात असा नियम असल्यामुळें श्रीकाशीक्षेत्रांत बाळशास्त्री रानडे व राजारामशास्त्री बोडस हे दोन अवतारी पुरुष जन्मले होते. पैकीं एकानें आपल्या आयुष्याचे दिवस काशीक्षेत्रांत घालवून दुसऱ्यानें दक्षिणप्रांतांत शेवटपर्यंत वास्तव्य केलें.



(कै०) विष्णू कृष्ण चिपळूणकर.

M.C.P.P.

१०

कै० विष्णु कृष्ण चिपळूणकर यांचें चरित्र.

राष्ट्राची पूर्वी स्थिति कशी होती व सध्यां कशी आहे याचा विचार करून राष्ट्रोन्नत्तीस योग्य असें जो वर्तन ठेवितो व आपल्या वर्तनानें आणि कृतीनें समाजास जो योग्य वळण लावितो त्याची पुढारी पुरुषांत गणना होते. कै० **विष्णु कृष्ण चिपळूणकर** हे अशांपैकीं एक होते. त्यांचें अल्प चरित्र येथें सादर करितों.

कै० विष्णुशास्त्री यांचा जन्म पुणें येथें इ० स० १८५० मध्यें झाला. हे सहासात वर्षांचे होईपर्यंत घरींच शिकत होते. पुढें गांवठी शाळेंत थोडा बहुत मराठीचा व इंग्रजीचा अभ्यास झाल्यावर ते १८६१ सालीं पुणें येथील सरकारी हायस्कुलांत शिकावयास गेले. तेथें तीन चार वर्षें अभ्यास करून ते म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत पास झाले व पुढें १८६६ मध्यें डेक्कन कॉलिज-मध्यें जाऊन त्यांनीं पुढील अभ्यास सुरू केला व अखेर १८७१ मध्यें ते बी० ए० ची परीक्षा पास झाले.

लहानपणीं मनुष्यावर जे संस्कार घडतात त्याचा तारुण्यावर परिणाम होऊन तदनुरोधानें पुढें त्याचें वर्तन होत असतें, असा एक सामान्य नियम आहे. या नियमास अनुसरूनच विष्णुशास्त्री यांची पुढील वागणूक होती. यांचा आजा हरिपंतमामा व आजी भागीरथीमामी हीं फार सालस, अब्रूदार व धर्मनिष्ठ असून त्यांच्याच सहवासांत हे लहानपणीं नेहमीं असल्यामुळें धर्म, नीति, आचारविचार यांच्याविषयीं त्यांच्या मनावर चांगला संस्कार घडला होता; व पुढें स्वधर्मोन्नत्तीविषयीं जी त्यांनीं कळकळ दाखविली व जे परिश्रम केले त्यांचें बीज या पूर्वसंस्कारांतच होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हायस्कूल-मध्यें गेल्यावर यांनीं कृष्णशास्त्री वैजापूरकर ह्मणून कोणी शास्त्री होते त्यांजपाशीं संस्कृताचा अभ्यास केला, व वचंभटमामा ह्मणून कोणी सत्वशील

ब्राह्मण होते त्यांचेपाशीं थोडें वेदाध्ययनही केलें. पुढें संस्कृत भाषेवर प्रेम जडण्यास व स्वकर्माविषयीं अभिमान उत्पन्न होण्यास विष्णुशास्त्री यांचा हा पूर्वाभ्यास बराच कारणीभूत झाला असें ह्मटलें असतां गैरवाजवी होणार नाहीं.

विष्णुशास्त्री यांचें मराठी भाषेवर प्रेम जडण्यास पूर्ववयांत जीं कारणें झालीं त्यांपैकीं त्यांचे वडील कृष्णशास्त्री यांचा सहवास हें मुख्य होय. कृष्णशास्त्री हे जाडे विद्वान् असून संस्कृत व इंग्रजी भाषेमध्यें ते प्रवीण होते. त्यांच्या विद्वत्तेवरून यांस 'बृहस्पती' असें ह्मणत असत. हे बरेच दिवस दक्षिणा प्राइझ कमिटीचे परीक्षक होते. त्यामुळें यांचेकडे तपासण्याकरितां बरेच नवीन मराठी ग्रंथ येत असत. हे ग्रंथ व त्यांचें त्यांनीं केलेलें परीक्षण हें विष्णुशास्त्री यांना सहजीं पाहण्यास मिळे. तसेंच कृष्णशास्त्री यांजकडे त्यावेळचे पुष्कळ विद्वान् भेटीस येत असत. त्यावेळीं अनेक विषयांवरील संभाषण, ग्रंथांवरील टीका व कधीं राजकीय आणि सामाजिक विषयावरील चर्चा हींही त्यांस ऐकावयास मिळत. विष्णुशास्त्री यांना मराठी कविता वाचण्याचा जो नाद लागला तोही त्यांच्या वडिलांच्या सान्निध्यानेंच लागला. कृष्णशास्त्री हे ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल असतांना तेथील लायब्ररींत 'सर्वसंग्रह' नांवाच्या मासिकपुस्तकाचे अंक एकत्र बांधून ठेवलेले होते ते विष्णुशास्त्री यांनीं वाचून टाकले व पुढें दुसरींही कांहीं कवितेचीं पुस्तकें त्यांनीं वाचलीं. त्यांची कवितेवरील भक्ति वाढविण्यास त्यावेळीं पुण्यास आलेले पन्हाळकर हरिदासबोवाही पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले. या हरिदासबोवांच्या कीर्तनाची मुख्य सामग्री अलीकडील कित्येक हरिदासांप्रमाणें गायनवादन ही नसून रसाळ वाणी, उत्कृष्ट वक्तृत्व व मराठी कवितेंतील उत्तम उत्तम पद्यरत्नांचा सांठा ही होती. याशिवाय या बोवांचें वर्तनही शुद्ध व चोख असल्यामुळें तिकडूनही त्यांचें वजन पडे. अशा हरिदासाचीं कीर्तनें वर्षभर पुण्यास चाललीं असल्यामुळें विष्णुशास्त्री यांना सहजासहजी तीं ऐकण्याचा योग आला व त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं मराठी कवितेबद्दल असलेलें प्रेम अधिक वृद्धिंगत झालें.

कॉलेजमध्यें असतांना विष्णुशास्त्री यांनीं आपला अभ्यास संभाळून संस्कृत व इंग्रजी ग्रंथांचें परिशीलन उत्कृष्ट रीतीनें केलें. त्यावेळीं आतांप्रमाणें साचांतला अभ्यासक्रम नसून हल्लींप्रमाणें अभ्यासाची ठरीव कवाईतही नव्हती. विद्यार्थ्यांचीं मनें जेणेंकरून सुसंस्कृत होतील व त्यांच्या बुद्धीचा

विकास होऊन जेणेंकरून त्यांच्या अंगीं बहुश्रुतपणा येईल अशाच प्रकारचें शिक्षण त्यावेळीं मिळत असे. त्यावेळचे प्रोफेसरही कमी दर्जाचे नसून विद्वत्ता व सद्वर्तन हीं त्यांचे अंगीं बाणलेलीं असत. विष्णुशास्त्री यांचेवेळीं डेक्कन कॉलेजांत प्रो० वर्डस्वर्थ, डॉ० किल्हार्न, केरोपंत नाना छत्रे, अनंतशास्त्री पेंडारकर वगैरे अध्यापक असून त्यांचें विद्यार्थ्यांवर चांगलें वजन असे. विष्णुशास्त्री यांनीं सदर अध्यापकांपासून जेवढें ज्ञान पैदा करतां आलें तेवढें केलें. इतर कित्येक विद्यार्थी वर्ग चालला असतां प्रोफेसरांच्या तोंडांतून जी बारीक सारीक माहिती पडे त्याकडे लक्ष देत नसत; पण विष्णुशास्त्री यांचें लक्ष अशा गोष्टीकडे असून कुशाग्रबुद्धीनें ते तिचें टांचणही करीत. कॉलेजची लॉयब्ररीही मोठी असल्यामुळें हवा तो ग्रंथ तेथें वाचण्यास मिळे व त्यामुळें विष्णुशास्त्री यांनीं बी० ए० ची परीक्षा पास होण्यापूर्वींच अनेक विषयांचें ज्ञान डोक्यांत सांठवून ठेविलें होतें. यांस भाषा व इतिहास या विषयांची जितकी आवड असे तितकी गणिताची नसे, व त्यामुळें ते त्या विषयाचा कधीं कधीं कंटाळाही करीत असत. कॉलेजांत विद्यार्थ्यांच्या दर आठवड्यास ज्या सभा होत असत त्यांत विष्णुशास्त्री हे भाषण करीत नसत. तथापि ते निबंध लिहून वाचीत असत व तो महत्त्वाचा असल्यामुळें त्याबद्दल त्यांची वाहवाही होत असे.

विष्णुशास्त्री यांनीं बी० ए० ची परीक्षा पास झाल्यावर पुणें येथील हायस्कुलांत शिक्षकाची नोकरी पतकरिली. सरकारी नोकरी धरूं नये असा कांहीं त्यांचा पहिल्यापासून हेतु नव्हता. पण कॉलेजांत अभ्यास करून युनिव्हर्सिटीची डिग्री मिळविल्यावर मोठी हुद्याची जागा पतकरणें हेंच इतिकर्तव्य समजून त्यावेळचे कित्येक लोक जसे सरकारी नोकरीकरितां खटपट करीत तशी विष्णुशास्त्री यांनीं केली नाहीं. वडिलांच्या लौकिकानें अनायासें त्यांस नोकरी मिळाली व ती त्यांनीं पतकरिली. नोकरी धरल्यावर बढतीच्या पाठीस लागावें, द्रव्यसंचय करावा, ऐषआरामी भोगावी याचाच ध्यास न धरतां इंग्लंडमध्यें ॲडिसन, जॉनसन, मेकॉले वगैरे ग्रंथकारांनीं ज्या व्यासंगांत आपलें आयुष्य घालविलें त्यांतच आपण घालवून मराठी भाषेंत नवी ग्रंथरचना करावी अशी महत्वाकांक्षा त्यांनीं धरिली व त्याप्रमाणें त्या प्रयत्नासही ते लागले. कृष्णशास्त्री यांजकडे ‘ मराठी शाळापत्रका ’ चें काम होतें त्यांत

ते ' रॅसेलस ' चें भाषांतर प्रसिद्ध करीत असत. त्याचे अठरा वीस भाग झाल्यावर पुढील भाग त्यांनीं विष्णुशास्त्री यांजकडून लिहविले. हा प्रसंग डिग्री घेण्यापूर्वीचा होता. पुढें डिग्री घेतल्यावर कालिदास, भवभूति, बाण, सुबंधु व दंडी या पांच संस्कृत कवींवर टीकात्मक ग्रंथ लिहून तो भागशः त्या मासिक पुस्तकांतून त्यांनीं प्रसिद्ध केला. या एका टीकाग्रंथावरूनच विष्णुशास्त्री यांचें संस्कृत भाषेचें अध्ययन, स्वतंत्र लेख लिहिण्याची शैली व भाषासौष्ठव इत्यादि गुण चांगले व्यक्त होतात. याप्रमाणें पहिल्याप्रथम हातांत लेखणी धरल्यावर मराठी भाषेंत स्वतंत्र ग्रंथरचना करण्याचा जो उपक्रम त्यांनीं केला तो किती उत्तम केला याची साक्ष हा ग्रंथ वाचला असतां कोणासही सहजी पटेल.

यावेळीं शास्त्रीबोवांचे अध्ययन, अध्यापन व लेखन असे तिन्ही उद्योग अव्याहत चालले होते. वर्तमानपत्रांतील विषयांपेक्षां ग्रंथावलोकन जरी ते जास्त करीत असत तरी इंग्रजी शिक्षणानें नव्या समजुती व नवे विचार लोकांच्या मनांत घोळावयास लागून त्याचा जो सामाजिक स्थितीवर परिणाम घडत होता व त्यानें लोकांत एकप्रकारची खळबळ सुरू केली होती त्याबद्दल जी वर्तमानपत्रांतून चर्चा होत असे ती ते वाचीत असत. यांचें अध्ययन जसें कळकळीचें असे, तसेंच अध्यापनही कळकळीचें असे. आतां वक्तशीर शाळेंत जाणें, वर्गांत टापटीप ठेवणें, वरिष्ठाच्या मर्जीनुरूप वागणें वगैरे गोष्टी यांच्या अंगीं नसल्यामुळें हेडमास्तर मि. कुंटे व यांचें केव्हां केव्हां पटत नसे. त्यांतून मि. कुंटे यांचा स्वभाव तापट पण तसाच भितराही असल्यामुळें व शास्त्रीबुवा गरीब पण उणे अधिक बोललेलें सहजासहजी न विसरणारे असल्यामुळें कुंट्यांचे व यांचे दोन शब्द होऊन दोघेही एकमेकांवर रागावत. पण लवकरच शांत होऊन दोघेही पुन्हां सलोख्यानें वागावयास लागत. बाकी विद्वत्ता, शिकविण्याची हातोटी, उमेद इत्यादि गोष्टींत शास्त्रीबुवासारखा बाकबगार इसम त्यावेळच्या शिक्षकांत कचित् सांपडेल. त्यांच्या हौसेप्रमाणें त्यांस भाषा किंवा इतिहास हे विषय शिकविण्याची संधि मिळाली नाहीं; त्यामुळें त्यांच्या अंगचे वरील गुण यात्रे तसे दृष्टोत्पत्तीस आले नाहींत.

असो. यानंतरचा शास्त्रीबोवांचा मोठा उद्योग ह्मटला ह्मणजे ' निबंधमाला ' काढणें हा होय. निबंधमाला ज्यावेळीं प्रसिद्ध होऊं लागली त्यावेळीं महाराष्ट्रां-

तील लोकस्थिति कशी होती हें कळल्याशिवाय शास्त्रीबोवांच्या लेखांची योग्यता व महत्व लक्षांत येणार नाहीं ह्मणून त्यासंबंधानें दोन शब्द लिहिणें इष्ट आहे: पेशवाई बुडून इंग्रजसरकारचा अम्मल सुरू झाल्यावर त्याबरोबरच इंग्रजी शिक्षणास सुरवात झाली. हें शिक्षण एकांगी असून धर्म, नीति वगैरेंचा सरकारी शाळांतून अभाव असल्यामुळें त्याचे अनिष्ट परिणाम नव्या पिढींतील लोकांवर होऊं लागले होते; व नव्या तऱ्हेनें शिकलेल्या लोकांचे ठायीं स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, समाजाबद्दल आदर व प्रेम, सदाचरणाची चाड हीं नसून स्वतःस ते फार विद्वान् मानीत असत, व स्वहितापलीकडे ते फारशी दृष्टि पोंचवीत नसत. इंग्रज सरकारास राज्यव्यवस्थेकरितां नेटिव लोकांची जरूर असल्यामुळें कुलशील, पराक्रम, सदाचरण, संपत्ति इत्यादि गुणांनीं ज्यांच्या पूर्वजांनीं लोकनायकत्व संपादिलें होतें त्यांच्या वंशजांस एकीकडे ठेऊन सरकारानें सामान्य जनसमूहांतून इंग्रजीविद्येनें विभूषित झालेल्या विद्वानांस त्यांनीं हातीं धरल्यामुळें सरकारी नोकरी हें पुष्कळांना परब्रह्म होऊन बसलें होतें व खावंदचरणी मिलिंदायमान होण्यांतच त्यांना पुरुषार्थ वाटे. इकडे धर्माच्या बाबतींत औदासिन्य वाढून मिशनरी वगैरे परधर्मीय लोकांचे स्वधर्मप्रसारार्थ सारखे प्रयत्न सुरू झाले होते; व आमच्यापैकीं कित्येक पुढाऱ्यांनाही आमचा धर्म टाकाऊ वाटूं लागून त्यांनीं प्रार्थनासमाजासारखे नवीन पंथ सुरू केले होते. तसेंच आमच्या चालीरीतींत व समाजव्यवस्थेंत अनेक दोष असून ते सुधारण्याविषयीं कित्येकांचे प्रयत्न चालले होते; व स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह इत्यादि सुधारणा घडवून आणण्याच्या खटपटीसही कित्येक लागले होते. याप्रमाणें नव्या राज्यव्यवस्थेनें व नव्या शिक्षणानें सर्वांचे डोळे दिपावून जाऊन आपले पूर्वज, आपला इतिहास, आपला धर्म यांबद्दल जो अभिमान असावयास पाहिजे होता तो नाहींसा होऊन उलट अनेक बाबतींत राष्ट्रहितविघातक कल्पनांचा, आचारांचा व विचारांचा पगडा मनावर बसून तदनुरोधानें समाजांतील पुढाऱ्यांचें वर्तन होऊं लागलें होतें. वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांचीही स्थिति अशीच होती. मराठी भाषेंत लेख लिहिणें हें पुष्कळांना कमीपणाचें वाटत असून विद्वान् ह्मणून नांवाजलेले लोक बहुधा इंग्रजींत लिहीत असत. मुंबईस व पुण्यास 'इंदुप्रकाश,' 'ज्ञानप्रकाश' अशा सारखीं जीं पत्रें होतीं त्यांत मराठींत जरी कांहीं चांगले लेख येत असत तरी त्यांची विशेष भिस्त इंग्रजी लेखावरच

असे. मासिक पुस्तकांत स्वतंत्र विषय बहुधां क्वचित् येत असत. 'विविधज्ञानविस्तारा' सारखीं कांहीं मासिक पुस्तकें चांगलीं निघत; पण मोटमोठ्या विषयांवर स्वतंत्र रीतीनें उत्तम लेख लिहिलेले क्वचित् दृष्टीस पडत. त्या वेळच्या मासिक पुस्तकांतून किंवा वर्तमानपत्रांतून बहुधा इंग्रजी निबंधांचीं भाषांतरें, रूपांतरें किंवा इंग्रजी लेखांतील विचारास धरून लिहिलेले लेख प्रसिद्ध होत. तसेंच नव्या शिक्षणानें ज्यांचे डोळे दिपावून गेले होते अशा कित्येक गृहस्थांच्या लेखांतून परकीयांचे ग्रंथ, भाषा, चालीरीति, राज्यव्यवस्था, धर्म, इत्यादिकांची ओतप्रोत स्तुति येत असून कोणतेंही आपलें ह्मटलें कीं, त्याकडे ते नाकें मुरडीत असत; एवढेंच नव्हे तर त्याचा विपर्यास करून उलट त्यावर विरुद्ध टीका करीत असत. 'लोकहितवादी' वगैरे मासिक पुस्तकांवरून या ह्मणण्याची साक्ष आमच्या वाचकांस सहजी पटेल. तसेंच मिशनरींनीं चालविलेल्या कित्येक मासिक पुस्तकांतून आमच्या धर्मावर व समाजव्यवस्थेवर यथेच्छ निंदावर्षाव होत असून त्याचा अनुवाद करण्यासही कित्येक मंडळी प्रवृत्त झाली होती. अशा स्थितींत निबंधमालेसारख्या पुस्तकाची किती आवश्यकता होती हें सांगावयास नकोच.

निबंधमाला हें मासिक पुस्तक १८७४ सालापासून निघूं लागलें; व तें निघूं लागल्यापासूनच महाराष्ट्रांत जिकडे तिकडे चळवळ सुरू झाली. याचें कारण शास्त्रीबोवांची विषयप्रतिपादन करण्याची शैली, त्यांची जोमदार भाषा, मजेदार कोटिक्रम व प्रतिपक्ष्यांवर सोडण्याचें टीकास्त्र हीं अपूर्व असून त्यांत स्वाभिमान व स्वदेशाभिमान यांची तेजस्विताही कांहीं अपूर्व होती. यांच्या सणसणीत व विचारपरिप्लुत लेखांनीं सामान्य जनांस वाचनाची अभिरुचि उत्पन्न झाली, अर्धेमुर्धे शिकलेल्या लोकांस अधिक ज्ञानप्राप्ति होऊं लागली; विद्वानांस विद्येची जास्त आवड उत्पन्न झाली, विद्यामदानें धुंद झालेल्या लोकांची धुंदी उतरली, दिशाभूल झालेल्या लोकांना खरा मार्ग दिसूं लागला; व आपला देश, आपला धर्म, आपला इतिहास यांविषयीं अभिमानजागृति होऊन लोकांत एकप्रकारचें चैतन्य उत्पन्न झालें. शास्त्रीबुवांच्या लेखांचे सामान्यपणें (१) टीकात्मक लेख, (२) चरित्रात्मक लेख, (३) इतिहासपर लेख व (४) ज्ञानपर लेख असे चार वर्ग करितां येतील. या चार सदरांखालीं मिळून लोकहितवादी, वेदार्थयत्न, मोरोपंताची कविता, लोक-

श्रम, आमच्या देशाची स्थिति, डॉक्टर जॉनसन, इतिहास, इंग्रजी भाषा, वक्तृत्व, विद्वत्व आणि कवित्व हे मोठमोठे विषय येतात. हे विषय वरील चार· सदरांपैकीं कोणत्याना कोणत्या सदरांत जरी घालतां आले तरी त्या प्रत्येकांत वरील चारी सदरांचाही समविश होतो. ह्मणजे टीकात्मक लेखांत माहिती असते; ज्ञानपर लेखांत इतिहासाचाही उहापोह असतो व इतिहासपर लेखांत टीकाही असते. याखेरीज लेखनशुद्धि, वाचन, पुस्तकपरीक्षण इत्यादि लहान लहान लेखांतूनही वरील गोष्टी दृष्टोत्पत्तीस येतात. या ठिकाणीं त्यांच्या लेखांसंबंधानें विशेष विवरण करतां येणें अशक्य आहे. तथापि, सामान्यपणें एवढें येथें नमूद करितों कीं, इतिहास, माहिती, ज्ञान व टीका यांनीं हे लेख परिपूर्ण असून ते कंटाळवाणे न वाटतां भाषेच्या खुमारीनें एकसारखे वाचीत जावें असें वाटूं लागतें. ही गोडी त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या इतर कित्येक प्रख्यात गृहस्थांच्याही लेखांत उतरली नाहीं यावरून शास्त्रीबोवांची लेखनशैली किती अप्रतीम होती हें कोणासही समजून येईल.

निबंधमालेसंबंधानें ज्या अनेक गोष्टी लक्ष्यांत ठेवण्यासारख्या आहेत त्यांत मुख्यत्वेंकरून ही एक आहे कीं, शास्त्रीबोवा कोणाची प्रत्यक्ष आपल्या वडिलांचीही भीडमुर्वत न ठेवतां स्वतःस जे विचार योग्य वाटतील ते त्यांतून प्रसिद्ध करीत असत. यामुळें कधीं कधीं त्यांच्या मित्रांचा व कधीं कधीं त्यांच्या वरिष्ठांचाही रोष होत असे. एकेप्रसंगीं तर ‘ इंग्रजीभाषा ’ हा विषय प्रसिद्ध होत असतां इंग्रजी इतिहासकार प्राच्य देशाचे इतिहास लिहितांना जे तर्कवितर्क काढतात त्यांचें यथास्थित खंडण केल्यामुळें त्याचे वरिष्ठ अधिकारी व कित्येक युरोपियन गृहस्थ यांच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन त्यांनीं इंग्रजी पत्रांतून शास्त्रीबोवांविरुद्ध काहूर उठविलें. इतकेंच नव्हे, तर त्यांचे लेख राजद्रोहात्मक आहेत असें ह्मणण्यासही त्यांनीं कमी केलें नाहीं ! याप्रसंगीं शास्त्रीबोवांच्या ठिकाणीं जर कमी निश्चयाचा व कमी हिंमतीचा मनुष्य असता तर त्यानें ‘ क्षमस्व ’ ह्मणून सरकारी अधिकाऱ्यापुढें नाक घासून कधींच प्रायश्चित्त घेऊन मोकळा झाला असता ! पण शास्त्रीबोवांची गोष्ट अगदीं निराळी होती. बेहेत्तर आहे नोकरी गेली तरी असें ह्मणून आपल्या मनोदेवतेस जें पटलें त्याविरुद्ध त्यांनीं एक अक्षरही लिहिलें नाहीं. उलट आपण केलें तें बरोबर केलें असें निक्षून सांगण्यास त्यांनीं

मुळींच कचर खाल्ली नाहीं. विचारस्वातंत्र्याची चाड ह्मणावी तर यासच ह्मणावी. यापूर्वी शाळापत्रकांत मराठी कवितेवर लेख लिहीत असतां वरिष्ठ अधिकाऱ्यांची गैरमर्जी होऊन त्यांनीं तें पुस्तकच बंद केलें होतें; आणि आतां राजद्रोहाचें काहूर उसळून त्यांत आपल्या नोकरीचीच नव्हे तर स्वाभिमान, स्वदेशाभिमान विचारस्वातंत्र्य इत्यादिकांची आहुति पडते कीं काय अशी भीति उत्पन्न होऊन हळू हळू त्यांच्या मनांत नोकरीचा कंटाळा उत्पन्न झाला. पुढें पुण्याहून रत्नागिरीस बदली झाल्यावर तेथील परिस्थितीनें जास्तीच कंटाळून जाऊन त्यांनीं अखेर आपल्या नोकरीचा राजीनामा दिला !

त्यावेळीं नोकरीस केवढा मान ! त्यांतून दहा वीस रुपयांची नोकरी असती तर गोष्ट वेगळी होती. चांगली शंभर रुपयांची नोकरी. तीवर मागचा पुढचा विचार न करितां एकदम लाथ मारून घरीं आले हा शास्त्रीबोवांनीं मोठाच वेडेपणा केला असें त्यावेळच्या कित्येक लोकांनीं तर ह्मटलेंच, पण हल्लींचेही कित्येक लोक तसें ह्मणण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत. पण हा शास्त्रीबोवांचा वेडेपणा नसून वरीलप्रमाणें त्यांजविषयीं शंका घेणारांचाच आहे. तनख्याची रास, हांजी हांजी करण्यास सेवकजन, मानमरातबांची रेलचेल, सुट्या, रजा, पेन्शन इत्यादि सरकारी नोकरींत शारीरसुखांची असलेली रेलचेल पाहून शास्त्रीबोवांना जितकें समाधान वाटे त्यापेक्षां नोकरीच्या पायीं स्वाभिमान, स्वमताभिमान, विचारस्वातंत्र्य देशाभिमान इत्यादि आपल्या कित्येक उन्नत मानसिक वृत्तींची होत असलेली राखरांगोळी पाहून त्यांस अधिक दुःख होई; व अशा रीतीनें उदरपोषण करण्यापेक्षां जेणेंकरून आपल्या लोकांत स्वाभिमानाची चाड उत्पन्न होईल, जेणेंकरून त्यांस स्वधर्म व स्वेतिहास यांची ओळख पटेल, सारांश, राष्ट्रोन्नतिकारक जे जे उद्योग असतील ते ते हातीं घेऊन त्यांत अल्प जरी प्राप्ति झाली तरी तीवर तृप्त राहणें चांगलें अशा उदात्त विचारांनींच त्यांनीं नोकरीस रामराम ठोकला. यापुढें शास्त्रीबोवांनीं जे जे उद्योग हातीं घेतले त्यांचा इतिहास पाहिला ह्मणजे त्यांनीं यावेळीं आंखलेला कर्तव्याचा मार्ग किती उत्तम रीतीनें आक्रमिला ह्याची वाचकांना सहजी ओळख पटेल.

१८७९ मध्यें प्रथमतः सहा महिन्यांची रजा घेऊन शास्त्रीबोवा रत्नागि-

रीहून पुण्यास आले व तेथूनच त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा पाठविला. त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे या पूर्वींच वारले असल्यामुळें नोकरीचा राजीनामा देऊन त्यांना असंतुष्ट करण्याचा प्रसंग टळला होता. नोकरी सोडल्यावर त्यांनीं चित्रशाळा, किताबखाना, न्यूइंग्लिश स्कूल, आर्यभूषण छापखाना व केसरी आणि मराठा हीं वर्तमानपत्रें इतके उद्योग एकापाठीमागून एक सुरू केले व महाराष्ट्रांतील लोकांना यावेळेपर्यंत विशेष रीतीनें माहित नसलेल्या स्वतंत्र धंद्याचा व त्यांत नेकीनें आणि शहाणपणानें काम करण्याचा उत्तम धडा घालून दिला. याखेरीज त्यांचा 'निबंधमाला' गुंफण्याचा क्रम चालला असून मोठमोठ्या व गहन विषयांवर 'ग्रंथमाला' रचण्याचेंही त्यांनीं मनांत आणलें होतें. वरील उद्योग कलेच्या, धंद्याच्या, शिक्षणाच्या वगैरे बाबतींत किती महत्वाचे होते व त्यांनीं महाराष्ट्रांतील लोकांवर आज काय कार्यें घडवून आणलीं आहेत हें प्रत्यक्ष लोकांच्या पुढें आहे; तेव्हां त्यासंबंधानें विस्तृत विवेचन करण्याचें कारण नाहीं. थोडक्यांत एवढें सांगतों कीं, सरकारी शिक्षण एकांगीं असून त्यापासून लोकांची मानसिक उन्नति व्हावी तशी होत नव्हती. ती व्हावी हा हेतु मनांत धरून त्यांनीं 'न्यूइंग्लिश स्कूल' ची स्थापना केली; लोकांत ज्ञानाचा प्रसार व्हावा आपली राजकीय स्थिति कशी आहे हें त्यांना कळावें व स्वतःच्या हक्कांचें संरक्षण करण्यास त्यांना शिकवावें इत्यादि उन्नत उद्धारांनीं 'आर्यभूषण' छापखाना व 'केसरी' आणि 'मराठा' हीं वर्तमानपत्रें काढलीं; लोकांत कलांची अभिवृद्धि होऊन त्यांना निरनिराळे धंदे करतां यावेत या उद्देशानें त्यांनीं 'किताबखाना' 'चित्रशाळा' या संस्था काढल्या. खेरीज 'काव्येतिहास संग्रहा' सारख्या जुना इतिहास व जुनीं काव्यें यांच्या प्रकाशनाचे कामींही त्यांनीं पुष्कळ खटपट केली. वरील संस्था स्थापन करण्यास द्रव्य, माणसें वगैरे ज्या गोष्टींची जरूर होती त्या सर्व त्यांनीं मोठ्या कुशलतेनें पैदा करून थोडक्याच कालांत त्या इतक्या ऊर्जितावस्थेला आणल्या कीं, महाराष्ट्रांत जिकडे तिकडे या संस्थांचें नांव ऐकूं येऊं लागलें. पण शास्त्रीबोवांची दैवगति अशी विचित्र होती कीं, या संस्थांची उत्तरोत्तर अधिकाधिक झालेली भरभराट पाहण्यास ईश्वरानें त्यांस फार आयुष्य दिलें नाहीं. १८८२ सालांतील अर्धा मार्च उलटतो न उलटतो तोंच या संस्थांच्या जनकावर

यमाचा आकस्मिक घाला पडून इहलोकांतून त्यांस पार नाहींसें केलें ! अवघ्या बत्तीस वर्षांच्या अवधींतच या असामान्य पुरुषाचा अंत झालेला पाहून सर्व महाराष्ट्रीयांस जें दुःख झालें त्याचें वर्णनही करवत नाहीं !

अशा रीतीनें शास्त्रीबोवांचा अकालीं अंत झाला तरी त्यांनीं आरंभिलेल्या उद्योगानें पुढें अनेक कार्यें निर्माण झालीं. भाषा हें एक राष्ट्राचें उत्तम हत्यार आहे. तें त्यानीं मोठ्या कुशलतेनें तयार करून त्याला इतकें अस्सल पाणी दिलें कीं, त्याच्या जोरावर कोणाही हिम्मतवान व पराक्रमी पुरुषास अज्ञान, भ्रांति, दुराग्रह इत्यादिकांचे कसलेही बळकट किल्ले असले तरी ते सर करतां येतील; स्वतंत्र उद्योगांत अल्प मोबदल्यावर संतुष्ट राहून स्वावलंबन, स्वतःचा प्रयत्न, कार्यक्षमता, दृढनिश्चय इत्यादिकांच्या दिव्य प्रकाशानें स्वदेशोन्नतीचा जो मार्ग प्रकाशित केला त्यानें कोणाही राष्ट्रहितचिंतकास न चाचपडतां सहज जातां येईल; आपली भाषा, आपला इतिहास, आपलें वाङ्मय याविषयीं स्वतःच्या लेखानें उत्पन्न केलेली गोडी इतकी विलक्षण आहे कीं, ती चाखणारा लेचापेचा न निघतां त्याच्या हातून तशींच कार्यें झाल्याविना राहणार नाहींत; व त्यांनीं घालून दिलेला स्वार्थत्यागाचा व जनहिताचा धडा जो काळजीपूर्वक बळवील तो राष्ट्रोद्धारक निपजेल यांत तिळमात्र संशय नाहीं. अशा पुरुषाच्या स्मरणार्थ पुणें मुक्कामीं आज पुष्कळ वर्षें सभा भरून त्यांचें स्मारक होत आहे; तरी लेखनद्वारा व आपण उत्पन्न केलेल्या संस्थांच्या द्वारा त्यांनीं स्वतःच असें कांहीं भरभक्कम स्मारक करून ठेविलें आहे कीं, जोंपर्यंत महाराष्ट्रदेश आणि मराठी भाषा हीं अस्तित्वांत आहेत तोंपर्यंत त्यास कशाचाही भंग लागणार नाहीं. असे पुरुष राष्ट्रांत दुर्मिळ उत्पन्न होतात. त्यांचा लाभ महाराष्ट्रीयांस झाला ही त्यांची पुण्याई समजली पाहिजे; एवढें सांगून हा अल्पचरित्रलेख येथें संपवितों.



प्रोफेसर श्रीधर गणेश जिन्सीवाले.(कै.)

M.C.C.P.P.

११

कै० प्रो० जिन्सीवाले यांचें त्रोटक चरित्र.

मानो हि महतां धनम्

चारित्रनायकाचें जन्म उज्जनी येथें सन १८९२ त झालें. ग्वाल्हेरी शिंदे सरकारचे पदरीं जिनशीचें अथवा तोफखान्याचें काम यांचे घराण्याकडे आल्यापासून जिनशीवाले असें उपनांव या घराण्याला पडलें. मूळचें हें घराणें नगरजिल्ह्यांतील सांकूर गांवचे असून त्यास सांकूरकर ही संज्ञा होती. इ० स० १८९२ त ह्मणजे चरित्रनायकाचे जननसमयीं त्यांचे वडील गणेशपंत हे चांगले धनसंपन्न होते. परंतु, पुढें लवकरच घरांत भाऊबंदकी उपस्थित होऊन वांटण्या झाल्या. परंतु, करारी स्वभावाच्या गणेशपंतास योग्य तो वाटा न मिळाल्यामुळें स्वारी सर्व इष्टेटीवर लाथ मारून नगरास आली व त्यांनीं मधुकरवृत्तीचा आश्रय केला. नगरास आल्यावर त्यांनीं दावा लावला. परंतु, तो नादारींत लावलेला तेव्हां त्याचा व्हावा तितका उपयोग झाला नाहीं. यांचा पुरावा ह्यांच्या हातीं न लागावा अशी वादीनें व्यवस्था करून ठेविली होती. अखेरीस नब्बद हजारांवर वादी तोड करण्यास कबूल झाला. परंतु, 'मारीन तर हत्ती आणि लुटीन तर भांडार' असल्या तऱ्हेची त्यांची वाट असल्यामुळें गणेशपंतांना ही तोड रुचली नाहीं. पुढें वयपरत्वें मधुकरीचें काम वडीलांच्या हातून होत नाहींसें झालें; तेव्हां तें काम नुकतेंच उपनयन झालेल्या बाल चिरंजीवावर पडलें व तें त्यानें मोठ्या खुषीनें पत्करलें. गणेशपंत हे स्वतः मोठे कर्मठ ब्राह्मण होते व त्यांच्या चिरंजीवानींही पाश्चिमात्य शिक्षणानें दुर्विदग्ध न होतां आरमणांत आपला कर्मठपणा चालविला. ह्याच सुमारास चरित्रनायकाचें मराठी शिक्षण पूर्ण होऊन त्यास त्याच्या वडिलांनीं इंग्रजी शाळेंत घातलें होतें. येथें त्यानें आपल्या बुद्धिवैभवानें कै० केरूनाना छत्रे, कै. वामनराव बापट, वामनराव परांजपे वगैरे गुरुवर्यांची प्रीति संपादिली. श्रीधरास रात्रीं वाचावयास दिव्याची सोय नसे तेव्हां कधीं कधीं तुळसी-पाळटिच्या दिव्यावर किंवा झाडाखालीं पडलेला पांचोळा जाळून त्याच्या उजेडावर त्यास अभ्यास करावा लागत असे. ज्या घरीं ते पिता पुत्र बिऱ्हाडास

असत त्या मालकांच्या दिव्यावरही श्रीधर कधीं कधीं निर्वाह करीत असे. एकदां अशी मजा झाली कीं घरांतील सर्व मंडळी कीर्तनास गेली व घरांतील दिवा नाहींसा झाला. तेव्हां श्रीधर मुनसीपालटीच्या दिव्याजवळ वाचीत उभा राहिला व तो कीर्तनाहून मंडळी परत येईपर्यंत तसाच वाचीत उभा होता. सर्व मंडळी रस्त्यानें गेली. परंतु, कोणाचीही नजर या मुलाकडे गेली नाहीं; याला अपवाद काय ते वामनराव परांजपेच झाले. त्यांच्या मनांत याला अशा स्थितींत पहातांच दया आली व त्यांनीं श्रीधरास आपल्या वडिलांची परवानगी घेऊन दररोज रात्रीं आपल्या घरीं अभ्यासास येण्यास सांगितलें. यापुढें या गुरुशिष्यांचें एकमेकांवर इतकें अकृत्रिम प्रेम जडलें कीं तें पुढें आमरणांत कायम राहिलें; तसेंच यापुढें गुरुवर्य केरुनाना छत्रे यांचेंही प्रेम या शिष्यानें आपल्या निबंधलेखनानें व गणितविषयकज्ञानानें संपादिलें. श्रीधराचा स्वभाव करारी निस्पृह असा होता. त्यामुळें कधीं कधीं इतर सहाध्यायांबरोबर यांचें द्वंद्व होई व त्यांत श्रीधरास यश आलें कीं या गुरुवर्यास फार आनंद होई. श्रीधराचा करारी स्वभाव खालील एकाच उदाहरणांवरून चांगला व्यक्त होईल.

नगरास एका सरकारी कामावर बरेच मजूर लागले होते. त्यांच्यावर देखरेख करणाऱ्या साहेबांना त्यांच्या नांवाची याद पाहिजे होती. त्यावेळीं हल्लीं इतकीं इंग्रजी जाणणारीं माणसें स्वस्त नव्हतीं हें उघड आहे. मुकदम अशी यादी करून घेण्याकरितां कोणीतरी मनुष्य पहात होता. त्यानें श्रीधरास इंग्रजी येतें असें वाटून जवळ बोलाविलें. श्रीधरानें आपण करून देऊं म्हणून सांगितलें व लागलीच करूनही दिली. ती पहातांच मुकदम त्यास घेऊन साहेबाच्या बंगल्यावर गेला, व साहेबानें ही यादी कोणी केली असें विचारतांच 'यानें केली' असें म्हणून श्रीधरास पुढें केलें. ह्या बालमूर्तीनें याद केलेली ऐकतांच त्यास फार नवल वाटलें व त्यानें तुला इंग्रजी किती येतें ? घरची स्थिति काय आहे वगैरे प्रश्न केले. श्रीधराकडून अपेक्षित उत्तरें मिळतांच साहेबांस वाटलें कीं ज्याअर्थी हा घरीं आहे त्याअर्थी यास जर आपण नोकरी दिली तर हा खूष होईल; परंतु, श्रीधरानें आपणास अद्याप पुष्कळ शिकावयाचें आहे म्हणून सांगितलें. त्यावर तूं किती शिकणार म्हणून विचारतांच 'एम्. ए.' पर्यंत म्हणून स्वारीनें जवाब ठोकून दिला. अशा गरीबीच्या

स्थितींत इतकें कसें शिक्षण होईल असें त्यानें विचारतांच Where there is a will there is a way अथवा 'निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंचि फळ.'. असें उत्तर दिलें. तें ऐकतांच साहेब अगदीं निरुत्तर झाला व 'तुला कांहीं रुपये देऊं का' ह्मणून विचारतांच मधुकरवृत्ती मुलानें तेंही नाकारिलें. अखेरीस त्या साहेबानें मोठ्या मिन्नतवारीनें ७५ रुपयांचीं पुस्तकें या स्वावलंबी मुलास घ्यावयास लाविलें.

अशा स्थितींत नगरास पांच यत्तांपर्यंत श्रीधराचा अभ्यास झाला. यापुढें प्रवेशपरीक्षेपर्यंतही नगरास अभ्यास झाला असता, नाहीं असें नाहीं. परंतु, श्रीधराचे सहाध्यायी पुण्यास अभ्यासास गेले. तेव्हां श्रीधरासही जावेंसें वाटलें; त्याप्रमाणें १८६८ त श्रीधर पुण्यास आला व केरुनाना छत्र्यांच्या शिफारसीनें बाबागोखल्यांच्या शाळेंत नादार राहिला. पहिल्यानें आठ पंधरा दिवस आज ह्या वर्गांत तर उद्यां त्या वर्गांत असे काढावे लागले. पुढें एक दिवस बाबा गोखल्यांनीं सदाशिव जोग नांवाच्या एका सहाव्या वर्गांतील मुलास चांचणी घेण्यास सांगितलें. परंतु चांचणी घेतांना सदाशिवास हा आपल्यापेक्षांही जास्त हुषार आहे असें कळलें. तेव्हां बाबांनीं त्यास सातव्या इयत्तेंत बसविलें. त्याच वर्षी श्रीधर पास झाला व चार स्कॉलरशिपा मिळवून कालेजांत जाऊं लागला.

ह्यावेळेस डेक्कन कॉलेजांत. प्रो. वर्डस्वर्थ, प्रो. छत्रे, डा. किल्हार्न हे अध्यापक असून अनंत शास्त्री पेंढारकर हे मुख्य शास्त्री असत व आबासाहेब काथवटे हे उपगुरु होते, व रावसाहेब वि. मो. महाजनी, कै. वि. कृ. चिपळूणकर, शंकर मोरो रानडे वगैरे मंडळी विद्यार्थीदशेंत होती.

यावेळीं कॉलेजांत शिकणाऱ्या मुलांना पायांत बूट घालून जेवणें संध्या न करणें वगैरे अनाचार करण्यांतच मोठें भूषण वाटत असे व आमचे श्रीधरपंत पडले बालबोध वळणाचे. त्यामुळें वर सांगितलेल्या स्वच्छंदी व अनाचारी मंडळीकडून त्यांना फार त्रास होत असे. परंतु, त्यांनीं आपल्या नित्यकर्मांत कधींही खंड पडूं दिला नाहीं. त्यामुळें थट्टा करणारांचे दांत बहुधा त्यांच्याच घशांत पडत.

कालेजांत आल्यापासून श्रीधरपंतांचें मन गणितापेक्षां वाङ्मय व इतिहास याकडे जास्त वेधलें व त्याच्या व्यासंगांत ते आपला बहुतेक काळ घालवूं

लागलें; तें इतकें कीं आजपर्यंत त्यांच्या इतका दुसरा इतिहासज्ञ सांपडणें कठीण. एकदां सहज बोलतां बोलतां ते सांगत होते कीं त्यांनीं एकट्या नेपोलिअनचीं छप्पन चरित्रें वाचलीं होतीं. या एका गोष्टीवरूनच त्यांच्या वाचनाची वाचकांस कल्पना येईल. पुढें ते इ. स. १८७३ त बी. ए. दुसऱ्या वर्गांत पास झाले व १८७६ सालीं एम. ए. ही दुसऱ्या वर्गांतच झाले.

कॉलेज सोडल्यावर दीड वर्षपर्यंत ते हायस्कुलांत शिक्षक राहिले नंतर १८७८ सालीं वुइल्सन कालेजांत संस्कृताचे अध्यापक झाले; येथें प्रथमतः त्यांस फक्त १५० रुपये मिळत असत पुढें वाढतां वाढतां त्यांना ३५० रुपये मिळूं लागले मुंबईस आल्यावर थोडेच दिवसांत त्यांचे वडिल गणेशपंत निवर्तले.


मुंबईस आल्यानंतर दोन वर्षांनीं ह्मणजे त्यांच्या वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी त्यांचा सुरतेकडील उमाकांत नामक एका जाहागीरदाराच्या मुलीशीं विवाह झाला. परंतु, हा विवाह त्यांना कोणच्याही प्रकारें सुखप्रद न होतां दुःखमूल मात्र झाला. त्यांच्या पत्नी लग्नापूर्वी थोडें बहुत शिकल्या होत्या व लग्नानंतरही प्रोफेसर साहेबांकडून संस्कृत वगैरेचें शिक्षण मिळालें. परंतु, जहागिरदारांच्या घराण्यांतला जन्म, त्याली खुशालींत गेलेलें बालवय, धर्मपराङ्मुख वडिलांची तालीम अशा स्थितींत वाढल्यामुळें प्रोफेसर साहेबांचें कडकडीत आचरण, साधें राहणें वगैरे गोष्टी त्यांच्या पत्नीस रुचेनात. अशा स्थितींत कांहीं वर्षें गेलीं. पुढें एकदां प्रोफेसरसाहेबांनीं आपल्या पत्नीस माहेरीं पाठविली असतां मुदतीबाहेर राहिली ह्मणून एक दोन पत्रें पाठविलीं. परंतु, उत्तर आलें नाहीं व पत्नीचीही रवानगी केली नाहीं. तेव्हां अर्थातच यांनीं ते धाडतील तेव्हां धाडतील, आपण आणावयाची नाहीं असा निश्चय केला व तिकडे प्रो. साहेबांच्या श्वशुरांनीही हिताहित न बघतां तसाच बेत केला; व अखेरपर्यंत ह्मणजे प्रोफेसर साहेबांची पत्नी मरेपर्यंत तिला घरींच ठेवून उभयतांची ताटातूट केल्याचें पूर्ण श्रेय घेतलें. इतकेंच नव्हे तर प्रो. साहेबांचा एकुलता-एक मुलगा मुंजीला झाला होता;. त्याचे मौंजीबंधनसमयीं तरी आपणांस बोलावतील अशी त्यांना आशा होती पण तीही निष्फळ झाली. श्वशुरांनीं उपनयनाचें निमंत्रण अशा बेतानें पाठविलें कीं तें त्यांनां मागाहून पोहोचावें. अशा रीतीनें ह्या भोळ्या व पुत्रवत्सल पित्याची त्यांच्या श्वशुरांनीं पूर्ण निरा-

शा करून टाकिली. पुढें हीं मायलेकरें प्रो. साहेबांच्या श्वशुरांच्या घरींच प्लेगनें ८।१० दिवसांच्या अंतरानें मेलीं.

ज्यावेळीं प्रोफेसर साहेबांचा पत्नीशीं वियोग झाला त्याचवेळीं तितक्याच क्षुल्लक कारणावरून त्याना नोकरीचाही राजीनामा द्यावा लागला. एकेवेळीं कांहीं सुधारकी मतांवर टीका करितानां आपण आपल्या पत्नीस कांहीं कारणावरून एकदा एक चापट मारिली होती व एका मडमेनें आपलें उष्टें केळें एका उच्च वर्णाचे विद्यार्थिनीस खावयास दिलें होतें अशीं विधानें केलीं होतीं. ही गोष्ट कांहीं कृतघ्न मंडळींनीं त्यांच्या वरीष्ठ मंडळीस कळविली तेव्हां वरिष्ठांनीं, नोकरी सोडावी किंवा लेखी माफी मागावी असा हुकूम सोडला. त्या बरोबर ह्या मानधन गृहस्थानीं १८९० सालीं परीक्षा होतांच राजीनामा दिला. ही नोकरी सोडल्यावर बडोदें, रतलाम, जुनागड वगैरे दोनतीन ठिकाणीं ३००।५०० रुपये दरमहाच्या नोकऱ्या आल्या होत्या. परंतु त्यांनीं यापुढें नोकरीची रुपेरी बिडी कधींही अडकवून घेतली नाहीं. प्रोफेसर असतांना ह्यानीं जो द्रव्यसंचय केला होता त्याचें सालीना सुमारें ३००।४०० रुपयेपर्यंत व्याज येई; तितक्यावरच त्यानीं पुढें राहावयाचा निश्चय केला. ह्यांचें खासगी पुस्तकालय फारच मोठें होतें तें इतकें कीं रा. सा. मंडलिकांच्या पुस्तकाल्याशिवाय याची बरोबरी करणारें दुसरें खासगी पुस्तकाल्य मिळणें कठीण. त्यांना इतिहासाचा अतिशय नाद असलेमुळें सदर्हू विषयावरचींच बहुतेक पुस्तकें त्याचे पुस्तकालयांत होतीं. शिवाय अलीकडे त्यांना ज्योतिषाचा अतिशय नाद लागला होता. शिवाय वेदपठणही चालूं असेच. अशा रीतीनें नोकरी सुटल्यापासून पुणें मुक्कामीं ते आपला काल घालवीत असत. १८९९ त वेदांच्या अपौरुषेयत्वाबद्दल वाद सुरूं झाला. तेव्हां यानीं वेद पौरुषेय आहेत असें आपलें मत दिलें व तेव्हांपासून सर्वत्र तेंच मत आमरणांत प्रतिपादित असत. हें मत ह्मणजे त्यांच्या शुद्धाचरणाला व उद्धारक मतांना गालबोटासारखेंच झालें होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

नुकतीच ह्मणजे १९०३ सालीं राजारामशास्त्री भागवत यांनीं बडोद्यास जीं वेदोक्तासंबंधीं आपलीं अश्रद्ध मतें तेथील जनसमूहापुढें मांडलीं तेसमयीं प्रोफेसर साहेबांनीं त्यांचीं मतें सप्रमाण खोडून काढिलीं व नंतर तेथून मुंबई मुक्कामीं ते दांत बसवून घेण्याकरितां गेले होते. तेथेंही त्यांनीं नेहमींप्रमाणें

सुश्राव्य व्याख्यानें दिलीं. मुंबईंत आल्यावर मृत्युपत्र वगैरे करावें असा त्यांचा बेत होता. परंतु, रविवार ता. १६ आगष्ट १९०३ रोजीं ब्राह्मणसभेंतून नित्याप्रमाणें उठून ते घरीं आले व संध्या व फराळ झाल्यावर निजले असतां मध्यरात्रींचे सुमारास अर्धांगवायूचा झटका आला व त्यांचीं सर्व अंगें लटकीं पडलीं. डा० देशमुख तावडतोब आले; परंतु विशेष उपयोग झाला नाहीं. प्रकृति उत्तरोत्तर बिघडतच गेली. रा. टिळक यांस तार पाठविली होती. ते आले तों यांची वाचा बसलेली होती. फक्त दृष्टादृष्ट मात्र झाली. पुढें ता. १८ रोजीं त्यांच्या मित्राच्या घरीं त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. स्मशानयात्रेस पुष्कळ मंडळी दोन्ही मतांची जमली होती. यांच्यासारखे धर्माभिमानी, श्रद्धाळू, देशाभिमानी व बाणेदार पुरुष मिळणें कठीण.



(कै०) ना. रा. विश्वनाथ नारायण मंडलिक.

M. C. P. P.

कै० नामदार रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, सी. एस. आय. यांचें त्रोटक चरित्र.

आचारः प्रथमो धर्मः

चरित्रनायकाचें जन्म ता० ८ माहे मार्च सन १८३३ इ० रोजीं रत्नागिरी जिल्ह्यांत मुरुड येथें झालें. अंगणांत रेताळ, परसांत खळखळ, असल्या अस्सल कोकणांत जन्मून-कोकणस्थांच्या कुशाग्रबुद्धीची आणि उद्योगशीलाची ह्या मुलाच्या ठिकाणीं चांगलीच जोड जमलेली पुढें ह्यांच्या आयुःक्रमांत दिसून आली. मंडलिकांच्या ह्या घराण्याचा पेशव्यांच्या घराण्याशीं शरीरसंबंध होता आणि चरित्रनायकाचा पणजा पेशवाईंतील प्रांतिक सुभेदार असे. अशा ऐतिहासिक प्रसिद्धीस असलेल्या कुलांत जन्मलेला आमचा चरित्रविषय विश्वनाथ लहानपणीं आपल्या पुढील तेजस्वितेचें स्पष्ट चिन्ह दाखवी. काळ बदलला होता. स्वराज्याच्या ठिकाणीं परराज्य आलें होतें. त्यामुळें ह्या मुलाचें पुढील चरित्र ह्या बदललेल्या परिस्थितीस अनुसरूनच चमकावयाचें हें विसरतां कामा नये. प्रथम धुळाक्षरशिक्षण विश्वनाथास त्याच्या आज्यापासून मिळालें. पुढें मुरूडच्या पंतोजीच्या शाळेंतील सर्व ज्ञानभाण्डार उपसून दहाव्याच वर्षी विश्वनाथास रत्नागिरीस इंग्रजी शिकण्यास जावें लागलें. रत्नागिरीसही तेथील शिक्षकोत्तम रावबहादुर रामचंद्र बाळकृष्ण यांचें ह्या नव्या शिष्यावर फारच प्रेम जडलें. त्यांनीं त्यांस रत्नागिरीचें शिक्षण संपतांच मुंबईस एलफिन्स्टन हायस्कुलांत जाण्याची भर दिली. चवदाव्याच वर्षी विश्वनाथ अनेक अडचणींतून निसटून मुंबईस आला; आणि हायस्कुलांत जाऊं लागून त्यानें लवकरच क्लेअर-विद्यार्थी वृत्ति (स्कॉलरशिप) पटकाविली. हायस्कुलांतील पंडित—डॉक्टर हार्क्नेस, पॅटन आणि ग्रीन-ह्यांची मंडलिकावर अत्यंत कृपा होऊन अर्थात् ह्याच्या अंगच्या तरतरीपणा व अभ्यासशील ह्या

गुणांनीं ह्याला भराभर अनेक बक्षिसें मिळत गेलीं; इतकेंच नव्हे; तर गणिताचा पंडित पॅटन साहेब महिन्याच्या रजेवर जात असतां मंडलिक हा केवळ विद्यार्थीच होता तरी त्यास पॅटनच्या जागीं हंगामी पंडितही नेमण्यांत आलें. हें काम विश्वनाथानें इतकें उत्तम बजावलें कीं 'तृतीय वार्षिक विद्यार्थ्यास गणित शिकविण्याचें काम विश्वनाथ नारायण मंडलिक यानें उत्तम केलें' अशा अर्थाचा–शिक्षणसंस्थेच्या नियंतृवर्गानें आपल्या १८५१।५२ च्या वार्षिक वृत्तांतांत–स्पष्टशेरा दिला आहे. त्यावेळचा सर्वांत उच्च परीक्षेंत मंडलिक उत्तम ठरला. कारण एकाखेरीज सर्व विषयांत तो पहिला आला होता. तथापि दोहोंपेक्षां जास्त विषयाचीं बक्षिसें एकासच देण्यांत संस्थेच्या नियमाचा भंग होत असल्यानें त्यास दोनच बक्षिसें मिळालीं. १९ साव्या वर्षी कालेजक्रम पुरा होतांच पंडित पॅटनसाहेब मंडलिकास विलायतेस सिव्हिल सर्विसच्या परिक्षेस जाण्याचा फार आग्रह करीत होता. आचारप्रधानधर्मी सत्कुलांत जन्मलेल्या ह्या होतकरूस नौकायानानें परदेशगमन करणें अशक्य झाल्यामुळें झाल्या इतक्याच परीक्षांवर त्यास आपलें स्वतंत्र चरित्र सुरू करावें लागलें. रा० मंडलिक यानीं प्रथमतः सरकारी नोकरीवर आपल्या जीवितचरित्रास आरंभ केला. तो असा. त्यावेळीं सिंधमधें असलेले पोलिटिकल एजंट कर्नल–नंतरसर–ली ग्रँड जेकब यानां स्वतःकरितां मदत ह्मणून एक मनुष्य नेमावयाचा होता. त्यानीं रा. मंडलिकांचे गुरु डा. हार्कनेस यानां एक मनुष्य पाहून देण्याबद्दल सांगितलें. तेव्हां अर्थातच त्यांनीं आपल्या प्रिय शिष्याची शिफारस केली. रा. मंडलिकांनींही आपण त्या शिफारसीस किती पूर्णपणें पात्र आहों, हें जेकब साहेबांच्या नजरेस आणून दिलें. येथें असतानांच त्यांची सर बार्टर फ्रीअर, गिब्स, वगैरे थोर मनाच्या युरोपिअन गृहस्थाबरोबर ओळख झालीही. सर्व मंडळी व विशेषें करून गिब्स हे रा. मंडलिकांस फार चाहात असत; व सरकारी नोकरींत त्यांची भरभराट करण्यास हेंच कारण झालें इतकेंच नव्हे तर रा. मंडलिकांचे करारीपणा, उद्योगशीलता वगैरे जे स्वभावसिद्ध गुण त्यांमध्यें या गृहस्थांच्या सहवासामुळें बरीच भर पडली; असें रा. मंडलिक आपल्या मित्रमंडळीजवळ मोठ्या प्रेमानें सांगत असत.

परंतु रा. मंडलीक यांजसारख्या नरपुंगवास ही रुपेरी बेडी फार दिवस वागविणें शक्य नव्हतें. त्यांनीं सुमारें दहा वर्षें सरकारी नोकरींत घालविलीं व

तेवढ्या अवकाशांत डे. ए. इन्स्पेक्टर, सब जज, क्यूरेटर वगैरे वगैरे हुद्यांच्या जाग्यांवर नोकरी केली. त्यामुळें त्यांच्या पुढील कार्यक्रमास या नोकरींत मिळविलेल्या राजकीय माहितीचा पुष्कळ उपयोग झाला. शेवटीं इ. स. १८६२ त नोकरीचा राजीनामा देऊन त्यानीं वकीलीची परीक्षा दिली; व पुढील वर्षापासून ह्मणजे १८६३ पासून वकीलीस सुरवात केली. ह्या सुमारास पूर्वीची सदर अदालत मोडून त्या ठिकाणीं हायकोर्ट झालें होतें. परंतु, त्यावेळेस हायकोर्टांत देशी भाषा जाणणारे न्यायाधिश व इंग्रेजी बोलणारे वकील मुळींच नसल्यामुळें व मंडलिकांना इंग्रजी येत असले मुळें त्यांना पुष्कळ काम मिळूं लागलें व धंद्यांत लवकरच भरभराट झाली. ते आपल्या धंद्यांत अतिशय दक्ष असत. एकदां असें झालें कीं त्यानां पुण्यास खटला चालविण्यास जावयाचें होतें व हायकोर्टांत कांहीं काम असल्यामुळें त्यांनां गाडीवर वेळेवर येतां आलें नाहीं. तेव्हां त्यानां अतिशय वाईट वाटलें व लागलींच स्पेशल ट्रेन सोडून ते पुण्यास वेळेवर खटला चालविण्यास गेले. त्याप्रमाणेंच खोतीबिलासंबंधीं प्रकारण चालूं असतां त्यानां कोकणांत कांहीं खटल्याकरितां जावयाचें होतें. तेथें रोजच्या बोटीनें योग्यवेळांत जाणें शक्य नसल्यामुळें ते स्पेशल बोट काढून वेळेवर हजर झाले. त्यांनीं पैशाची विशेष पर्वा बाळगिली नाहीं. नियमितपणा हा एक अलौकिक गुण त्यांच्या अंगीं असे. एकदां एक पैसेवाला गृहस्थ त्यांजकडे एक कज्जा घेऊन आला होता. रा. मंडळीक यांस ठाऊक होतें कीं यांत आपणांस चांगला पैसा मिळेल. तरीही तो गृहस्थ वेळेवर आला नाहीं. सबब त्यांनीं त्याचा कज्जा घेतला नाहीं. हायकोर्टच्या वकीलांना अपिलेटसाइड प्रमाणेंच ओरिजनल साईडकडेही प्रॅक्टीस करितां यावी ह्मणून त्यांनीं पुष्कळ श्रम करून व तो हक्क त्यांच्याचपुरता मिळाला असतां त्यांनीं आपखुषीनें तो नाकारला. कारण स्वतःकरितां ते भांडत नव्हते. तर सर्व वकीलांचें कल्याण व्हावें हाच त्यांचा उद्देश होता.

इ० स० १८६४ त त्यांनीं नेटिव ओपिनियन प्रेस व पत्र हीं सुरू केलीं. व १८७१ पर्यंत इंग्रजींत तें पत्र चालविलें. हें पत्र काढण्यांतही लोकांची बाजू सरकारपुढें चांगली मांडतां यावी हाच उद्देश होता. पुढें त्यांना अतिशय काम पडूं लागल्यामुळें वर्तमानपत्राचें काम चालवितां येईना. तरीही त्या

पत्रांत रा० मंडलिकांचीं मतेंच मांडलीं जात असत; व नेटिव ओपिनियन 'ह्मणजे रा० मंडलिकांचा पेपर असें सर्व ह्मणत असत.

इ० स० १८६९ त हे जस्टिसआफ्धीपीस झाले. यावेळीं मुंबईच्या स्वच्छते-संबंधीं देखरेख करणें जस्टिस आफ् धी पीस यांजकडेच असे. परंतु, हे सर्व नामधारी असत व सरकारतें नेमिलेल्या मुख्याध्याच हातांत सर्व सत्ता असे व तो करील तें प्रमाण अशी स्थिति होती. मंडलीक जे. पी. झाले तेव्हां आर्थर टी. क्रॉफर्ड हे जगत्प्रसिद्ध उपद्रवापी गृहस्थ म्युनिसिपालिटींत मुख्य असून त्यांनीं आपल्या अमदानींत म्युनिसिपालिटीस अगदीं कर्जबाजारी करून ठेविलें होतें. रा. मंडलीक यांनीं नौरोजी फर्दुनजी, मि० फोर्ब्स वगैरे मंडळींना आपल्या कटांत घेऊन क्रॉफर्डसाहेबांच्या वर्तनाला आळा घालण्याचा प्रयत्न केला. परंतु, सरकारास वाटेल तेवढे जे. पी. करण्याची मुभा असल्यामुळें यांचा पक्ष लंगडा पडे. असें होतां होतां शेवटीं अशी स्थिति येऊन पोहोंचली कीं, सरकारला म्युनिसिपालिटीची निकृष्टावस्था कळून क्रॉफर्ड साहेबांस काढून दुसरा चांगला मनुष्य नेमणें भाग पडलें. सरकारनें दुसरा मनुष्य नेमला ही संधी साधून रा० मंडलिकांनीं आपल्या सांथीदारांसह म्युनिसिपालिटीच्या अंतर्व्यवस्थेंत सुधारणा करण्याचा प्रयत्न चालूं केला व त्या कामांत सरतेशेवटीं १८७२ सालीं त्यांना यश आलें. त्याच्या योगानें बेंच ऑफ जस्टिसेस ही संस्था नाहींशी होऊन त्या ठिकाणीं ६४ सभासदांचें कार्पोरेशन आलें. त्यांपैकीं ३९ सभासद लोकनियुक्त असावेत. १६ सरकारचे व १६ जस्टिस ऑफ धी पीसांनीं निवडलेले असावेत असें ठरलें. हें केवळ राजश्री मंडलीक यांच्या श्रमाचें फळ होय. नवीन कार्पोरेशनमध्येंही त्यांची निवडणूक झाली व त्यांत त्यांनीं सांसर्गिक रोगांच्या कायद्याविषयीं व ड्रेनेजसंबंधाच्या वादविवादांत बराच पुढारीपणा घेतला होता. असे यांचे श्रम पाहून त्यांच्या सभासद मित्रांनीं त्यांस १८७९–८० त अध्यक्षाचे जागीं नेमिलें. हे मुंबईम्युनिसिपालिटीचे पहिले नेटिव्ह अध्यक्ष होते. हे अध्यक्ष असतां तुळशी तलाव सर रीचर्ड टेंपल यांच्या हातून सुरू करण्यांत आला. ह्यांच्या कारकीर्दीतच लॉक हॉस्पिटलसंबंधीं व मलबार हिल रिझर्व्हॉयरसंबंधीं कडाक्याचे वादविवाद झाले. एकंदरींत त्यांचें वर्तन युरोपियन व नेटिव यांच्याशीं सारखेंच असे. म्युनिसिपालिटीच्या कामांत पैशाचा अपव्यय न व्हावा

एवढयाकरितां ते फार काळजी घेत असत. ह्या त्यांच्या गुणाबद्दल युरोपियन व नेटिव त्यांनां अतिशय चाहात असत. त्यांच्याबद्दल युरोपियन लोकांच्या मनांत किती पूज्य बुद्धि होती हें त्यांच्या मृत्यूनंतर डा. ब्लेनी. मि. गॅटन गेरी. टाइम्स वगैरेंचे अभिप्राय वाचले असतां खात्री होईल. स्थलसंकोचास्तव आह्मास ते येथें देतां येत नाहींत याबद्दल दिलगिरी वाटते. १८७३ सालीं न्यायाधीशाची जागा रिकामी झाली असतां रा. मंडलिक व शांताराम नारायण या दोघांची त्या जागेबद्दल शिफारस झाली. परंतु, दोघांपैकीं कोणाला द्यावी हा घोटाळ्याचा प्रश्न असल्यामुळें ती नानाभाई हरीदास यांस देण्यांत आली; व राजश्री मंडलीक हे सरकारी वकील झाले. नानाभाई हरीदास यांचे पश्चात् जर ते जगते तर न्यायाधीशाची जागाही त्यांस खात्रीनें मिळाली असती.

रा. मंडलिक हे शुद्ध सनातनधर्माचे पूर्णाभिमानी असून त्यांस अलीकडील सुधारणा बिलकुल पसंत नव्हती. तरी ते अगदीं एककल्ली होते असें मात्र नाहीं. स्त्रीशिक्षणासंबंधीं त्यांचें मत अनुकूल असेंच होतें व त्यांच्या घरांतील सर्व स्त्रीवर्गास योग्य तेवढें शिक्षण दिलेलें असे. परंतु, अलेक्झांड्रा गर्लस्कूल, शारदासदन, पुण्याचें फीमेल हायस्कूल अशा संस्थांच्या मात्र ते अगदीं विरुद्ध होते. योग्य तें स्त्रीशिक्षण मिळण्याविषयीं जशी त्यांना आवड असे तशी किंबहुना त्याहून अधिक मुलांचे शिक्षणाविषयीं असे. सन १८६२ त त्यांना विश्वविद्याल्यांत 'फेलो' निवडले. मराठी, गुजराथी, व सिंधी या भाषेंत कितीएक वर्षेंपर्यंत ते परीक्षक होते. तसेंच एल्. एल्. बी. च्या परीक्षेंतही ते चवदा वर्षे सारखे परीक्षक होते. परीक्षक या नात्यानें त्यांचें विद्यार्थ्यांशीं फार ममताळूपणाचें वर्तन असे. तरी त्यांस घोकंपट्टी कधींही रुचत नसे. आपले मित्राचे किंवा नातेवाईकांचे मुलांनाही ते नापास करण्यास कधीं कमी करीत नसत. कॉलेजांतील उच्च प्रतीच्या परिक्षांतून उच्च प्रतीचें गणीत ऐच्छिक करून ठेविलें तें त्यास रुचलें नाहीं; असें जरी होतें तरी परीक्षांमागें परीक्षा ठेवून मुलाची सर्व शक्ति परिक्षांतच खर्च करावी ही गोष्टही त्यास पसंत नव्हती. इ. स. १८७३ पासून १८८८ पर्यंत ते सिंडिकचे सभासद होते. व सन १८८९ सालीं डीन ऑफ आर्टस ही बहुमानाची पदवी त्यांस देण्यांत आली. जर ते आणखी कांहीं वर्षे जगते तर

व्हाईसचान्सलर ही झाले असते. विश्वविद्यालयांतही रा. मंडलिकांनीं आपली कामगिरी किती उत्तम रीतीनें बजाविली हें त्यावेळीं व्हाईस चान्सलर असलेल्या सर रेमंड वेस्ट, डा. मेकीगन वगैरेंच्या भाषणावरून स्पष्ट दिसून येत आहे.

१८७४ सालापासून ते मुंबईलेजिस्लेटिव्ह कौंसिलचे सभासद झाले व १८८४ सालपर्यंत ते सालोसाल निवडले गेले. येथेंही त्यांनीं आपल्या बाण्या-प्रमाणें ' अप्रियमपि तथ्यम् ' या न्यायानें सरकारचे दोष स्पष्टपणें पुढें मांडून सरकारच्या व लोकांच्या मनांतील त्याजविषयींची असलेली पूज्य बुद्धि वाढविली. पुढें १८८४ सालीं लार्ड रीपन साहेबांच्या कारकीर्दींत त्यांची कलकत्याच्या इम्पीरिअल लेजिस्लेटिव्ह कौंसिलमध्यें नेमणूक झाली. पश्चिम हिंदुस्थानांतील रहिवाशांत हा मान रा. मंडलिकांनाच प्रथम मिळाला. कलकत्यास जाण्यापूर्वी त्यांना एक पानसुपारी देण्यांत आली. या समयीं सर जमशेटजी जीजीभाई यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें होतें. त्यावेळचें त्यांचें भाषण ह्मणजे मंडलिकांविषयीं असलेल्या पूज्यबुद्धीचा उत्तम आदर्शच आहे असें ह्मणण्यास चिंता नाहीं.

कलकत्यास जातांनां वाटेंत त्यास निफाडच्या स्टेशनावर नाशीक जिल्ह्यांतील सरदारांनीं एक पान सुपारी दिली. कलकत्यासही त्यांचा असाच सन्मान झाला. तेथील इंडियन असोशिअननेंही एक सभा भरवून, रा. मंडलीकांची, लार्ड डफरीन साहेबांच्या व्हाईसरीगल कौंसिलांत निवडणूक झाली ह्मणून आनंद प्रदर्शित केला. पुढें सन १८८७ चे सुमारास त्यांच्या अशक्ततेमुळें त्यांनां तें काम सोडावें लागलें.

याप्रमाणें सुप्रीम कौन्सील सोडल्यावर त्यांच्या मित्रमंडळींनीं त्यांचें स्मारक करण्याचें ठरविलें, तन्निमित्त भरलेल्या सभेचे अध्यक्ष सर दिनशा माणिकजी पेटीट यानीं असें बोलून दाखविलें कीं ; " एखाद्या लोकोपयोगी कामांत गुंतलेल्या मनुष्याचें स्मारक करणें हें अकालीं होय असें कांहीं जणानां वाटतें. परंतु, माझें मत तसें नाहीं.रा. मंडलीक यांनीं आपल्या देशाची जी सेवा केली आहे त्यामुळें ते या बहुमानास अगदीं पात्र आहेत. 'सदहू गोष्ट अमलांत आणण्याकरितां मोठी रक्कम गोळा केली व तींमधून त्यांचा एक पुतळा तयार करावयाचा असें ठरून बाकी रकमेंतून सिंडिकेटनें ठरविलेल्या संस्कृत वाङ्मयाच्या विषयावर

उत्तम ठरलेल्या निबंधास एक सुवर्णपदक बक्षीस द्यावयाचें असें ठरलें. अशाच तऱ्हेची एक सभा पुण्यास होऊन तेथील पाठशाळेंतही एक इनाम ठेविण्यांत आलें.

असल्या सार्वजनिक सन्मानापुढें सरकारच्या पदव्यांची मोठीशी किंमत नाहीं. परंतु, चरित्र लिहिणें आहे यास्तव त्यांना येथें वगळतां येत नाहीं. डे.ए. इन्स्पेक्टरचें काम सोडल्यावर एका विशेष नियमान्वयें ह्यांस रावसाहेब हा किताब कायमचा मिळाला. मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सील व कलकत्ता कौन्सील याचे ते सभासद झाल्याचें मागें लिहिलेंच आहे. मुंबईच्या शेरीफची जागा त्यांस दिली होती; परंतु, त्यानीं ती नाकारली. पुढें १८७७ त राणी साहेबांच्या दिल्लीदरबारचे वेळींही त्यांस बोलाविलें होते व ते गेले असते तर रावबहादर किताब त्यांस मिळणार होता. परंतु ते गेले नाहींत. ह्मणून त्यांस एक रुप्याचें पदक व सी.एस. आय्. ही पदवी देण्यांत आली.

रा. मंडलीक यांस वाङ्मयाचाही अतीशय नाद होता. त्यांच्या पुस्तकालया-एवढें खासगी पुस्तकालय सगळ्या मुंबईत सापडणें कठीण. कॉलेजांत असतांना त्यांनीं मिस एजवर्थच्या ' लॉटरी ' नामक पुस्तकाचें मराठी भाषांतर करून सुंदरजी जीवजीचें बक्षिस मिळविलें. पुढें मिस मार्सेटच्या अर्थशास्त्राचें भाषांतर केलें. त्यानंतर एल्फिस्टन् साहेबाच्या इतिहासाचें भाषांतर केलें हें यु. एस्. एफ्च्या विद्यार्थ्यांसाठीं युनिव्हर्सिटीनें पुष्कळ वर्षें नेमिलें होतें. किंडर्सच्या एव्हिडन्सचेंही एक भाषांतर केलें. नंतर खोतीबिलावरील निबंध प्रसिद्ध झाले. ह्यांचा हिंदु लॉ तर सर्वत्र प्रसिद्धच आहे. त्यांनीं पद्मपुराणही टीका व टिपणी देऊन छापण्याचें मनांत आणलें होतें; परंतु, त्यांच्या अकालीं मरणानें तें काम तसेंच राहिलें.

शेवटीं शेवटीं अतिशय काम पडल्यामुळें ते अगदीं अशक्त झाले होते. डाक्टरांनीं त्यांस आपलें काम बंद ठेवण्यास सांगितलें. परंतु, स्वस्थ बसण्या-पेक्षां काम बरें असें ह्मणून तें त्यांनीं सारखें चालूं ठेविलें. त्याचा त्यांच्या शरीरावर फार वाईट परिणाम झाला व जात्या फारच चांगली शक्ति असूनही व या ५७ व्या वर्षीं ह्म० इ. स. १८८९ मे रोजीं ३ वाजतां त्यांचा डिस्पेप्शिआनें अंत झाला. अजारी असतांना डा. देशमुख. डा. खरे. डा. होजेल यांच्या देख-रेखी खालीं ते होते. ते शुद्ध सनातन धर्माचे अभिमानी व पुरस्कर्ते होते. त्यांच्या

मरणानें उद्धारक पक्षाचा मुंबईचा पुढारी नाहींसा झाला. स्त्रीशिक्षणसंबंधी वगैरे त्यांचीं मतें काय होतीं हें मागें सांगितलेंच आहे. त्यांचें आराध्य दैवत राम असे व त्यास ते कधींही विसरले नाहींत. मरणसमयीं ते बराच वेळ स्तब्ध असतां त्यांस झोप लागली असें समजून देशमुख वगैरे मडळी बोलत बसली होती इतक्यांत राम राम असा मोठ्यानें आवाज झाला. डाक्टर जवळ येऊन पाहतात तों प्राणोत्क्रमण झालेलें. अशा रीतीनें मरणसमयींही ते आपल्या आराध्य दैवतास विसरले नाहींत. केवढी निस्सीम भक्तिही !



ना० मि-जस्टि. बद्रुदिन तयबजी बारिस्टर अॅटलॉ.

M. C. P. P.

१३

नामदार मिस्टर जस्टिस बद्रुद्दिन तय्यबजी बॅरिस्टर ऍटलॉ.

हिंदुस्थानदेश परतंत्र असावा असाच जर ईश्वरी संकेत असेल तर तो इंग्रजांसारख्या सुधारलेल्या लोकांच्याच राज्यछत्राखालीं असणें बरें असे जे आमच्या पुढाऱ्यांपैकीं कांहींनीं अनेक वेळां उद्गार काढले आहेत त्यांची सार्थकता आपणास प्रत्यहीं भासत आहे. इंग्रजसरकारच्या राज्यांत ज्ञानार्जनाचीं द्वारें खुलीं झालीं, दूर दूर देशामध्यें दळणवळणाचे मार्ग सुलभ झाल्यामुळें हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशांतील निरनिराळ्या जातींच्या लोकांमध्यें एकप्रकारचें ऐक्य उत्पन्न झालें, पाश्चात्य लोकांच्या संगतीनें ऐहिक शास्त्राचें महत्व समजून आल्यामुळें भारतवासीयांत साहस, उद्योगप्रियता, विधर्मीयांबद्दल सहिष्णुता इत्यादि मानवी सुखांत भर टाकण्याऱ्या सद्गुणांचें बीजारोपण झालें, आणि पूर्वीची अकुंचित दृष्टी जाऊन एकराष्ट्रीयत्वाची कल्पना जागृत होऊं लागली; एकंदरींत पराधीनतेपासून स्वभाविक उत्पन्न होणाऱ्या दुष्परिणामाचें स्वरूप जितकें सौम्य होणें शक्य आहे तितकें तें सौम्य करण्यास आमच्या राज्यकर्त्यांकडून यत्किंचितही कसूर झाली नाहीं हें कोणासही कबूल करावें लागेल.

ज्या अमदानींत आमच्या चरित्रनायकासारखे मोठे पुरुष निपजून त्यांच्या गुणांचें योग्य चीज होतें ती आमदानी केवळ दोषमय आहे असें कसें ह्मणतां येईल? कायदे कौन्सिलमध्यें सभासद होणें, इंग्रजसरकारच्या राज्यांत वरिष्ठप्रतीची जागा मिळणें किंवा हिंदुस्थानांतील लोकांची राजकीय उन्नति करण्याकरितां कायदेशीर चळवळ करणाऱ्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष होणें हेच काय ते हल्लींच्या परिस्थितींत हिंदुस्थानांतील बुद्धिवान् व कर्तृत्ववान् पुरुषांस मिळणारे मोठे मान होत. यांतील शेवटच्या दोहोंपैकीं एक पद ज्या गृहस्थास लाभतें त्यास दुसऱ्याचा लाभ होणें मुष्किलीचें किंबहुना अशक्यच असतें. राजा व प्रजा या दोहोंकडून सारखाच मान मिळालेले असे आमचे कडे दोनच गृहस्थ आहेत. ते बद्रुद्दिन तय्यबजी व रोमेशचंद्र दत्त

हे होत. न्यायमूर्ति तय्यबजी यांच्या चरित्रांत आणखी एक विशेष ही आहे कीं शहाणपण व मोठेपणा हीं व्यक्तीच्या कर्तबगारीवर अवलंबून असतात, त्याचा वर्णाशीं किंवा जातीशीं फारच थोडा संबंध असतो. हें तत्व त्यांनीं आपल्या आयुष्यक्रमाच्या योगानें पूर्णपणें सिद्ध करून दाखविलें आहे.

न्यायमूर्तींचा जन्म तारीख ८ माहे आकटोबर १८४० इसवी रोजीं खंबायत येथें झाला. तय्यबजींचें घराणें मुळचें अरबस्थानांतील असून सुप्रसिद्ध आहे. न्यायमूर्तींचे वडील, तय्यबजी भाई मियन साहेब, हे मुंबईतील चांगल्या सुप्रसिद्ध व्यापाऱ्यांपैकीं असून चांगले शिकले सवरलेले होते. प्रस्तुत चरित्रनायक हे आज ज्या स्थितींत आहेत ती त्यांस प्राप्त होण्यास मुख्यत्वें त्यांचे वडील सुशिक्षित होते, हीच गोष्ट कारण झाली आहे. त्यांनीं आपल्या सर्व मुलांस देशकालानुरूप योग्य शिक्षण देण्यास बिलकूल कसर केली नाहीं. त्यांनीं आपल्या सर्व मुलांस विलायतेस पाठवून त्यांजकडून तेथें अभ्यास करविला. त्यांपैकीं एक—मि. कमुद्दीन तय्यबजी हे सालिसिटर, व बद्रुद्दीन हे बारिष्टर होऊन इकडे आले. ही गोष्ट एकंदर मुसलमान समाजांतील शिक्षणासंबंधाचा विचार करितां तय्यबजीभाई मियन साहेबांस फार भूषणावह आहे.

नामदारांची बुद्धि कुशाग्र असल्याकारणानें, त्यांनीं उर्दु व पारशी भाषेचा अभ्यास मुंबई येथें ' दादा मखरांचा मद्रेसा ' मध्यें फार जलद केला; व ते तेथून ' एल्फिन्स्टन इस्टिट्यूशन ' मध्यें इंग्रजीचा अभ्यास करण्याकरितां गेले. तेथें त्यांनीं कांहीं दिवस घालविल्यानंतर आपले वयाचे केवळ सोळावे वर्षीं त्यांस विलायतेंत अभ्यासाकरितां जावें लागलें. या ठिकाणीं तय्यबजी भाई मियनसाहेबांची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच ! आपल्या मुलांच्या भावी कल्याणासाठीं त्यांस आपले अपत्यस्नेहादि प्रबल मनोविकार आपले दाबांत ठेवण्यास केवढे प्रयास पडले असतील ! केवळ वडिलांचा अपत्यस्नेह आड आल्यामुळें आपल्याकडील कैक तरुणांच्या भावी आशा जागींच करपून गेल्या असतील ! केवळ पुणें मुंबई सारख्या सोयीच्या ठिकाणीं पराकाष्ठा एक दोन दिवसांच्या रस्त्यावर ज्यास आपलीं मुलें प्रेमामुळें पाठवत नाहींत, त्यांच्यापेक्षां मियन साहेबांचे हृदयांत आपल्या मुलांसाठीं कांहीं कमी प्रेम होतें काय ? परंतु नाहीं ! आपल्या मुलांच्या भावी कल्याणाकडेच त्यांनीं दृष्टि देऊन त्यांना एवढ्याशा कोंवळ्या वयांत विलायतेसारख्या दूर

देशीं पाठवून दिलें ! असो ! पाठविणारांची धन्य ! आणि जाणारांची ही धन्य धन्य ! !

इंग्लडांत गेल्यावर त्यांनीं ' न्यू बेरी हायपार्क कॉलेज' मध्यें प्रवेश केला; व तेथेंच त्यांनीं लंडन युनिवर्सिटीची प्रवेश परीक्षा दिली. नंतर त्यांनीं कॉलेजांतील उच्च शिक्षण मिळविण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें ते कॉलिजांत गेलेही. परंतु, या ठिकाणीं त्यांचें दुर्दैव त्यांस आडवें आलें ! सन १८६४ सालीं त्यांची प्रकृति बिघडल्यामुळें त्यांस स्वदेशीं परत यावें लागलें ! सुदैवानें इकडे एक वर्ष घालविल्यानंतर त्यांचे प्रकृतीस चांगला आराम पडला. व लौकरच ते विद्याभ्यासाकरितां फिरून इंग्लंडास परत गेले ! तेथें गेल्यावर डॉक्टर लोकांचा सल्ला घेतां, त्यांनीं असें सांगितलें कीं, बद्रुदिनचे प्रकृतीवर कॉलिजांतील अभ्यासाचा फार वाईट परिणाम होईल; विशेषतः त्यांचे डोळे बिघडतील. असें डाक्टर लोकांचें मत पडल्यामुळें बद्रुदीन साहेबांनीं तो नाद सोडून दिला; व कायद्याचा अभ्यास करण्याकरितां त्यांनीं ' मिड्ल टेंपल ' मध्यें प्रवेश केला. व सुमारें दोनच वर्षांत ते बॅरिष्टर झाले !

सन १८६७ च्या एप्रिलमध्यें बॅरिष्टर होऊन ते त्याच वर्षी नोव्हेंबरांत मुंबईस आले; व मुंबईहायकोर्टांत आपला बॅरिष्टराचा धंदा चालवूं लागले. बॅरिष्टर व्हावें तें गौरकायांनींच; नेटिव्ह बॅरिष्टर म्हटला कीं लोकांनीं नाकें मुरडलींच म्हणून समजावें; अशी हल्लींही जर स्थिति दृष्टोत्पत्तीस येते तर, चाळीस वर्षांपूर्वी काय स्थिति असेल याची वाचकांनींच कल्पना करावी ! त्यांतल्या त्यांत मिस्तर तय्यबजी पडले पहिलेच नेटिव्ह बॅरिष्टर ! त्यांत तरुण ! आणि त्यांत मुसलमानासारख्या मागसलेल्या जातीचे ! मग काय विचारता ? लोकांनीं तर त्यांची पुरी पुरी फजिती करण्याचा घाट घातला ! नेटिव्ह म्हटलें कीं हंसावयाचें अशी ज्या ठिकाणीं दुर्दैवानें समजूत, तेथें बद्रुदिनसारख्या तरुण मुसलमान बॅरिष्टरास नांवें ठेवण्यास कोण सोडतो ? परंतु, ही बहुजनसमाजाची समजूत त्यांनीं आपल्या शुद्धाचरणानें व शहाणपणानें पार नाहींशी करून टाकिली ! ' नर करणी करे सो नर का नारायण हो ' ही म्हण नेटिव्हांसही लागू आहे; त्याप्रमाणेंच नेटिव्ह लोकांतही चांगले बॅरिष्टर, चांगले व्यापारी; चांगले वक्ते, चांगले विद्वान्, असें सर्व कांहीं चांगलें पैदा होतें, याची साक्ष या आर्यभूमीस भूषणभूत झालेल्या पुष्कळ

लोकांच्या उदाहरणावरून पटेल ! बद्रुद्दिन तय्यबजी यांनीं लोकनिंदेस बिलकुल न जुमानतां, सतत दाहा वर्षे दुसरा कांहीं एक उद्योग न करितां, केवळ आपला धंदा बरा, कीं आपण बरे, असें करून फार चांगला लौकिक मिळविला. नेटिव्ह लोकांचे अंगांतही चांगले बरिष्टर होण्याजोगें पाणी आहे, हें त्यांनीं आपल्या उदाहरणानें लोकांस सिद्ध करून दाखविलें ! हायकोर्टक्रिमिनल सेशन्समधील एका खटल्यांत आरोपीतर्फे काम चालवित असतांनां, त्यांनीं फार उत्तम भाषण करून ज. वेस्ट्राप व जूरी यांची समजूत केली, व आपल्या पक्षकारास निरपराधी ह्मणून सोडवून घेतलें. त्या बाबतींत लिहितांना मुंबई गॅझिट' च्या कर्त्यानें कांहीं नालस्तीचा मजकूर लिहिला. ते दिवशीं जेव्हां न्या० वेस्ट्राप आपल्या स्थानापन्न झाले, तेव्हां मुद्दाम बद्रुद्दिन ह्यांस हाका मारून त्यांनीं सांगितलें कीं, ' बद्रुद्दिन, आपण आज येथें आहांत हें पाहून मला फार आनंद होतो. त्याचप्रमाणें, अनायासें ' मुंबई गॅझिट ' पत्राचे रिपोर्टर ही येथें आहेत – कालच्या खटल्यांतील तुमचें भाषण फार वाईट झालें असें त्या पत्राचें ह्मणणें आहे. हें त्याचें ह्मणणें अर्थात् खोडसाळपणाचें असून त्यामुळें तुह्मांस तुमचे धंद्यांत कदाचित् नुकसान होण्याचा संभव आहे. या त्याच्या करण्यास बिलकुल आधार नाहीं. मी तुह्मांस त्यासंबंधानें इतकेंच ह्मणतों कीं, आपण तो खटला फार चांगला चालविला; इतकेंच नव्हे, तर जूरीपुढें आपण केलेल्या उत्तम भाषणामुळेंच कालचा आरोपी सुटला ! एरवीं सुटताना ! ' हें न्यायमूर्तींचें भाषण चाललें असतांना, रिपोर्टरचा चेहरा कसा झाला असेल ! त्याचा फोटो वाचकांनीं आपले मनःकॅमेऱ्यानेंच काढावा !

बद्रुद्दिन तय्यबजी हे सतत दहा वर्षेपर्यंत कोणत्याही दुसऱ्या धंद्यांत पडले नाहींत, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. तितक्या अवकाशांत त्यांचा धंद्यासंबंधानेंच फक्त लौकिक झाला. त्या काळांत सार्वजनिक संबंधांत त्यांनीं बिलकुल लक्ष घातलें नाहीं. परंतु, सन १८७९ सालीं सरकारानें मांचेस्टरवाल्यांच्या आयात मालावरील जकात अजिबात माफ केल्यामुळें मुंबईतील गिरणीवाल्यांचें फार नुकसान होईल ही गोष्ट सरकाराचे नजरेस आणण्याकरितां मुंबईस एक जाहिरसभा भरली होती. त्या ठिकाणीं बद्रुद्दिन साहेबांनीं सार्वजनिक दृष्टीनें भाषण केलें. तें मुद्देसूद व चहूंबाजूंनीं विचारपूर्वक केलेलें असें झालें. त्यामुळें त्यांचा फार लौकिक झाला. त्यामुळें सरकारच्या कावेबाज वर्तनावर किंचित्‌ही

परिणाम झाला नाहीं ही गोष्ट खास आहे. परंतु, बद्रुद्दिन आदिकरून पुढारी मंडळींनीं आपलें कर्तव्य तें केलें ही गोष्ट विसरतां कामा नये. लोकपक्षाचें ह्मणणें न्यायदृष्टीनें कितीही सयुक्तिक असलें तरी ज्या ठिकाणीं आपल्या अगर आपल्या जातभाईंच्या एका कवडीचेंही नुकसान सोसावयाचें नाहीं तेथें न्याय कसला? आणि युक्ति कसली? आणि हीच गोष्ट खरी आहे. कारण, आपल्या प्रभूंच्या ठिकाणीं आपलेपणाचा अभिमान खरोखर वाखाणण्यासारखा आहे. कांहीं असो, सर्व जगत् इंग्रजमय आणि इंग्रजीमय झालें पाहिजे ही त्यांची महत्त्वाकांक्षा आहे! मग त्यापायीं अमेरिकेंतील तांबड्या इंडियन लोकांची कत्तल करावयास लागो! अगर, हिंदुस्थानांतील लोकांच्या उद्योगधंद्यांवरून पाटावरवंटा फिरो! त्याची ह्मणून बिलकुल क्षिति बाळगावयाची नाहीं! आपल्या मनांतील हेतूपुढें सब झूट! त्याकरितां सर्व दुनियेचें वाटोळें झालें तरी कांहीं हरकत नाहीं! असल्या कावेबाज राज्यकर्त्यांपुढें बद्रुद्दिन साहेबांचें व्याख्यान; आणि तेंही त्यांच्या जातवाल्यांच्या हिताहितसंबंधांत! मग तें कितीही चांगलें, वक्तृत्वपूर्ण, न्यायबुद्धिप्रेरित, सद्धेतुक असलें तरी त्याचा परिणाम काय व्हावयाचा? हें निराळें सांगावयास नकोच!

असो. वर सांगितलेल्या स्थितींत प्रजापक्षाची बाजू उचलून धरणें किती कठीण आहे? हें ज्याचें त्यासच माहीत! लोकमतास आह्मी फार मानतों, लोकांस जें सुख तें आह्मांसही सुख, असल्या प्रकारचीं विधानें आपण सर्वत्र —राजदंडधारी पुरुषाच्या जाहिरनाम्यापासून तों एखाद्या अगदीं हलक्या प्रतीच्या सरकारी अंमलदारापर्यंत—सर्वत्र पाहतों व ऐकतों! परंतु, कृति मात्र अगदीं उलट असावयाची! अशा स्थितींतही प्रजापक्षाची बाजू सरकारापुढें मोठ्या शहाणपणानें धीर न सोडतां मांडावयाची, मग प्रयत्नांतीं परमेश्वर, हें बद्रुद्दीन साहेबांचें व्रत आहे. सन १८८२ सालीं सर जेम्स फर्ग्युसन साहेबांनीं बद्रुद्दीन साहेबांस आपल्या कायदेकौंसिलचे सभासद नेमिलें. ती वेळ मोठी आणीबाणीची होती. स्थानिकस्वराज्याचा हक्क लोकांस द्यावा, असा लॉर्ड रिपन साहेबांनीं एक सरकारी ठराव प्रसिद्ध केला होता. त्याबद्दल कायद्याचा मसुदा मुंबई सरकारच्या कौंसिलांत आला होता. मोठ्या उदारपणानें (!) लॉर्ड साहेबांनीं लोकांस हक्क दिला खरा. परंतु, कायद्याचा मसुदा तयार करणाराच्या मात्र पोटांत दुखूं लागलें होतें! त्यानें मसुदा तयार करण्यांत जितका खोडसाळपणा करितां येईल तितका केला!

परंतु, त्याच्या दुर्दैवानें त्यावेळीं प्रजापक्षाचे प्रतिनिधि नामदार मेथा, तेलंग व बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या सारखी प्रजाहितैकतत्पर मंडळी होती. यामुळें त्याचा उद्देश आपल्या सुदैवानें जावा तितका सिद्धीस गेला नाहीं. त्यावेळीं सर जेम्स फर्ग्युसन साहेबांनीं कौन्सिलचे अध्यक्ष या नात्यानें बद्रुद्दिनसाहेबांची फार तारीफ केली. बद्रुद्दिन साहेबांनीं त्या वेळीं केलेलीं सर्व भाषणें खरोखर त्यांस भूषणावह होत असे ते भर कौंसिलांत बोलले ! यापुढें बद्रुद्दिन साहेबांची, उत्तम वक्ते ह्मणून फार प्रसिद्ध झाली. सन १८८३।८४ सालांत मुंबईस झालेल्या हरएक सभेंत त्यांनीं भाषण केलें आहे; व प्रत्येक वेळीं श्रोतृसमुदायानें त्यांची वाहवा केली आहे. त्यांनीं ' फ्रामजी कावसजी हॉलांत सिव्हिल सर्व्हिस प्रश्नासंबंधी केलेलें भाषण, त्याच प्रमाणें इल्बर्ट बिल संबंधांत केलेलें भाषण, लार्ड रिपन साहेबांच्या संमानार्थ मुंबईस भरलेल्या सभेंत दिलेलें व्याख्यान हीं वाचलीं असतां, त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची साक्ष तेव्हांच पटेल.

बद्रुद्दिन तय्यबजी हे कॉंग्रेस सभेचे कट्टे अभिमानी आहेत. त्यांस कॉंग्रेसच्या अध्यक्षाचा मान सन १८८७ सालींच मिळाला आहे. नामदार मेथा, नामदार तेलंग यांच्याप्रमाणेंच बद्रुद्दिनच्या हातून ही कॉंग्रेस प्राणप्रतिष्ठा मुंबई येथें झाली आहे. मद्रास येथील कॉंग्रेसचे वेळीं ह्मणजे सन १८८७ सालीं अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं केलेल्या भाषणावरून त्यांच्या मनांत लोकहिताची कळकळ किती जबरदस्त आहे, हें सहज कळून येईल.

बद्रुद्दिन साहेब हे आपल्या ज्ञातीबांधवांसंबंधानें फार कळकळ बाळगतात. आपले धर्मबंधु हे हरएक बाबदींत फार मागसलेले आहेत, त्यांस सर्वपरी मदत केली पाहिजे; त्यांस योग्य शिक्षण दिलें पाहिजे; असले विचार रात्रंदिवस त्यांच्या मनांत घोळत असतात; व त्या दिशेनें रात्रंदिवस त्यांचे प्रयत्न चालू आहेत. या त्यांच्या प्रयत्नास उत्तम फळ येत चाललें आहे. आज 'अंजूमान-इ-इसलाम्' च्या द्वारें पुष्कळ मुसलमान तरुण विद्वान होत आहेत. कोणी बॅरिष्टर, कोणी वकील कोणी बी.ए. कोणी एम्. ए. कोणी कांहीं, कोणी कांहीं, असे मुसलमान विद्वान दृष्टीस पडूं लागले आहेत. हें केवळ बद्रुद्दिन तय्यबजींच्या श्रमाचें फल आहे असें कोण ह्मणणार नाहीं ? व ही स्थिति पाहून त्यांचे अंतःकरण आनंदयुक्त व साभिमान कां होऊं नये ? परमेश्वरकृपेनें त्यांच्या हातून आपल्या ज्ञातिबांधवांचा असाच उत्कर्ष होवो !

अलीकडे पांच सात वर्षांपूर्वी बद्रुद्दिन तय्यबजी यांजला सरकारांनीं मुंबई हायकोर्टाचे जज्ज नेमिलें आहे. तेथेंही आपल्या निर्भिड वर्तनानें सरकार व प्रजा या उभयतांसही त्यांनीं संतुष्ट केलें आहे. नामदार लार्ड रिपन यांचे संमानार्थ मुंबई येथें त्यांनीं केलेल्या भाषणांत त्यांनीं नेटिव्ह लोकांस न्यायाधीशाचें काम जातिमत्सर न बाळगतां करितां येईल कीं नाहीं ! याबद्दल ऊहापोह केला आहे. त्यांत त्यांनीं नेटिव्ह लोकांसही उत्तम न्यायाधिश होतां येईल म्हणून सांगितलें व हल्लीं आपल्या उदाहरणानें नेटीव्ह न्यायाधीश किती उत्तम काम करितात हें ते जगास दाखवीत आहेत ! ईश्वरकृपेनें त्यांच्या हातून ही जबाबदारी उत्तम रीतीनें पार पडो !



रा· बाळ गंगाधरटिळक.

M·C·P.P.

रा॰ बाळ गंगाधर टिळक याचें चरित्र.

परोपकाराय सतां विभूतयः ।
भर्तृहरि.

राष्ट्रोन्नति होण्यास ज्या गोष्टींची आवश्यकता लागते त्यांत कर्तव्यदक्ष व परोपकारी पुढारी असणें ही एक मुख्य होय. सांप्रतच्या स्थितींत हिंदुस्थानास अशा पुरुषांची फार जरूरी आहे. प्रस्तुतचे चरित्रनायक **रा. बाळ गंगाधर टिळक** हे अशांपैकीं एक आहेत. त्यांचें अल्प चरित्र वाचकांस सादर करितों.

रा. टिळक यांचा जन्म रत्नागिरी येथें इ. स. १८५६ मध्यें झाला; यांचे वडील उत्तम शिक्षक असून ते पुणें—ठाणें येथें असिष्टंट डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर होते व त्यांच्याच देखरेखीखालीं यांचा मराठी अभ्यास झाला; पुढें डेक्कन कॉलेज व शेवटीं कांहीं दिवस एल्फिस्टनकॉलेज या विद्यालयांतून त्यांचा इंग्रजी अभ्यास होऊन इ॰ स॰ १८७६ मध्यें बी॰ ए॰ व १८७९ मध्यें एल् एल्. बी या परीक्षेंत ते पास झाले. इत्यादि अनेक गोष्टींचा जरी त्यांच्या चरित्रांत अंतर्भाव होतो, तथापि त्या सर्व येथें न सांगतां त्यांनीं ज्या लोकोपयोगी संस्था काढल्या; जीं सार्वजनिक हिताचीं कामें केलीं; जें बुद्धिकौशल्य दाखविलें; जो लोकशिक्षणाचा मार्ग घालून दिला; जें धैर्य प्रकट केलें; सारांश, ज्या कारणांनीं ते मोठ्या योग्यतेस चढून लोकप्रिय झाले आहेत व नुसत्या हिंदुस्थानांतील लोकांचेंच नव्हे तर अवघ्या भूमंडळावरील लोकांचें लक्ष्य त्यांनीं आपल्याकडे वेधलें आहे तीं कारणें कोणतीं व त्यापासून आपल्या समाजाचें काय हित झालें आहे याच गोष्टी मुख्यत्वें करून येथें सांगतों.

आपण पुढें काय करावयाचें हें बिनचूक रीतीनें अगोदर ठरविणें हा आयुष्यक्रमाचा मूळ पाया आहे; व तो जितका भरभक्कम असतो त्या मानानें वरील इमारत टुमदार उठते. रा. टिळक यांनीं विश्वविद्यालयांतील परीक्षा आटोपल्यावर जो आयुष्यक्रम पतकरला तो विचार करूनच पतकरला; व

त्यांत त्यांस आजपर्यंत जरी अनेक अडचणी व बिकट प्रसंग आले तरी त्यांची त्यांनीं उत्तम रीतीनें सार्थकता केली ही गोष्ट निर्विवाद आहे. विश्वविद्यालयांतून हे जेव्हां बाहेर पडले त्या वेळची व आजची लोकस्थिति यांत बरेंच अंतर पडलें आहे. त्या वेळीं आमचे लोक दारिद्र्यानें आतांइतके ग्रस्त झाले नव्हते ही गोष्ट खरी आहे. तथापि अज्ञान, दुराग्रह, पुढील पोंचेचा अभाव इत्यादि गोष्टींनीं त्यांस घेरलें असून त्यांच्या अनिष्ट परिणामांत ते सारखे मुरत होते. इंग्रजी शिक्षण, स्वधर्म, स्वसामर्थ्य यांबद्दल खोट्या कल्पना लोकांत भरल्या असून आत्मोन्नतीचे व स्वदेशोन्नतीचे मार्ग कोणते याची कित्येक पुढारी ह्मणविणारांनाही चांगली कल्पना नव्हती. अशा स्थितींत कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रि. गोपाळ गणेश आगरकर वगैरे सन्मित्रांबरोबर आरंभिलेल्या उद्योगांत तनमनधन अर्पण करून त्यांनीं जें अग्रेसरत्व मिळविलें त्याचा इतिहास वाचकांस मनोरम वाटल्यावांचून खचित राहणार नाहीं.

रा. टिळक हे विश्वविद्यालयांतून पदवीधर होऊन जेव्हां बाहेर पडले, तेव्हां एखादी सरकारी नोकरी मिळवून पगार सांठवावा व गाडी घोडा उडवून चैन मारावी अशा क्षुद्र दृष्टीनें संकुचित व खोल जागेंतून आपल्या आयुष्यक्रमाकडे न पाहतां होईल तेवढा स्वार्थत्याग करावा; स्वदेशहिताच्या संस्था स्थापाव्या; लोकांत स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान जागृत करावा इत्यादि उदात्त व उन्नत कल्पना मनांत येऊन त्यांनीं उच्च पर्वताच्या शिखरावरून आपल्या आयुष्यक्रमाचा मार्ग रोखून ठेविला होता. या मार्गांत त्यांनीं ज्या पहिल्या इमारतीस हात दिला ती ' न्यू इंग्लिश स्कूल ' ही होय. देशांतील लोकांस जें शिक्षण मिळालें पाहिजे तें स्वस्त आणि सुलभ असून त्यांचे ठायीं त्यानें स्वावलंबन, स्वतःचा प्रयत्न इत्यादि गुण उत्पन्न केले पाहिजेत; व एकंदरीनें तें राष्ट्रोन्नतीस कारणीभूत झालें पाहिजे; अशा महत्त्वाकांक्षेनें वर सांगितलेल्या मित्रांबरोबर त्यांनीं न्यूइंग्लिशस्कूल स्थापन केलें व इतर संस्थापकांप्रमाणेंच अल्पवेतनावर संतुष्ट राहून त्यांनीं आपलें तनमन अर्पण करून ती संस्था लवकरच उदयास आणली; इतकी कीं, मुलांची संख्या व शाळेंतील शिक्षणपद्धति यांनीं लवकरच ती महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं होऊन तिनें लोकांची मनें आपल्याकडे वेधून घेतलीं; व राजेरजवाडे आणि धनिक लोक यांच्या आश्रयानें त्यांत उच्च शिक्षणाचे वर्ग जोडण्याची व तिच्या ठिकठिकाणीं शाखा स्थापन करण्याचा सुयोग येण्याचीं

चिन्हें दिसूं लागलीं. पण पुढें न्यू इंग्लिशस्कूलच्या दुर्दैवानें ह्मणा किंवा रा. टिळक यांच्या हातून याहीपेक्षां अधिक महत्वाचीं कामें व्हावयाचीं होतीं ह्मणून त्यांच्या सुदैवानें ह्मणा त्यांना या संस्थेंतून आपलें आंग काढून घ्यावें लागलें. येथें एवढें नमूद केल्यावांचून राहवत नाहीं कीं, ही गोष्ट घडून येण्यास रा. टिळक यांचा करारी स्वभावच पुष्कळ अंशीं कारणीभूत झाला. न्यू इंग्लिशस्कूल स्थापन करतेवेळीं संस्थापकाचे हेतु, हिय्या व वर्तन हीं ज्या प्रकारचीं होतीं तशीं तीं न राहतां त्यांत पुष्कळ फरक पडल्यामुळें व हा फरक रा० टिळक यांच्या करारी स्वभावास न खपल्यामुळें त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा देऊन त्या संस्थेशीं असलेला आपला संबंध कायमचा तोडून टाकला. असो; अशा प्रकारें त्या संस्थेचा संबंध जरी त्यांनीं तोडला तरी तिच्याशीं त्यांनीं कधीं वैमनस्य केलें नाहीं किंवा कोणत्याही रीतीनें ते तिच्यावर तुटून पडले नाहींत. उलट या संस्थेबद्दल त्यांना चांगली कळकळ असून प्रसंगविशेषीं कटु पण हितकारक उपदेश करण्यास ते तयार असतात.

अशा प्रकारें एका शिक्षणसंस्थेंतून त्यांनीं जरी आपलें अंग काढून घेतलें तरी लोकशिक्षण हीच आपल्या कर्तव्याची दिशा ठरविली असल्यामुळें तिला अनुसरून त्यांनीं दुसऱ्या एका मोठ्या संस्थेची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. ही संस्था ह्मणजे केसरी-मराठा वर्तमानपत्रें हीं होय. वर्तमानपत्रांची संस्था इंग्रजी अंमलामुळेंच आमच्या देशांत अस्तित्वांत आली आहे. हिचें शुद्ध स्वरूप स्वतंत्र अशा परराष्ट्रांत जसें पाहावयास मिळतें तसें येथें मिळत नाहीं. याचें कारण परकीय अमलाखालीं ही संस्था हिंदुस्थानांत उत्पन्न झाली आहे व जात्या ती संस्था कितीही मनोरम असली तरी परकीय अंमलाखालीं तिची व्हावी तशी वाढ होणें अशक्य आहे. अशी जरी स्थिति आहे तरी त्यांतल्या त्यांत स्वार्थत्यागी व धैर्यशील पुरुष तिला कोणत्या योग्यतेस चढवितो याचें उत्कृष्ट उदाहरण रा० टिळक यांनीं चालविलेल्या पत्रांवरून कोणाच्याही नजरेस आल्यावांचून राहणार नाहीं.

केसरी-मराठा हीं पत्रें १८८१ सालीं निघालीं. हीं काढतेवेळीं कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर हे जिवंत होते व त्यांचे मधून मधून त्यांत लेखही येत असत. पण पुढें एक वर्षांतच त्यांचा अंत झाल्यामुळें या पत्रांची बहुतेक जबाबदारी रा. टिळक व आगरकर यांचे शिरावर पडली. रा. टिळक व आगरकर हे न्यू इंग्लिश

स्कूल मधील अध्यापकाचें काम संभाळून हीं वर्तमानपत्रें चालवीत असत; व दोघेही विद्वान्, एकदिलाचे व एकनिश्चयाचे असल्यामुळें त्या वेळच्या इतर वर्तमानपत्रांस मागें सारून या पत्रांनीं अग्रेसरत्व मिळविलें. हा अग्रेसरत्वाचा काल कोठें नुकता येतो न येतो तोंच पत्रांतील लेखावरून बर्वेप्रकरण उपस्थित झालें व रा. टिळक आणि आगरकर यांच्यावर अब्रुनुकसानीची फिर्याद होऊन त्यांस डोंगरीवर १०१ दिवसांचा तुरुंगवास भोगावा लागला. नव्या तऱ्हेनें शिकून पदवी मिळविलेल्या व सार्वजनिक कामें आंगावर घेऊन वर्तमानपत्रासारखी लोकोपयोगी संस्था चालविणाऱ्या विद्वान् गृहस्थांना कारागृहवास भोगावा लागल्याचें हें महाराष्ट्रांत पहिलेंच उदाहरण म्हटलें तरी चालेल. ज्या कालीं लोकांना सार्वजनिक कामाची जबाबदारी केवढी असते; त्यांत प्राप्ति नसतां स्वतःच्या पदराला किती खार लावावा लागतो; त्यांत किती परिश्रम करावे लागतात इत्यादि गोष्टींची कल्पना नसते त्या कालीं लोकांची सहानुभूति असणें कठिण असतें; व अशीच कांहीं अंशीं जरी त्या वेळची स्थिति होती तरी रा. टिळक व आगरकर यांचा दृढनिश्चय, आरंभिलेल्या कार्यांत आंग मोडून मेहनत करण्याची यांची तऱ्हा व लोकांचा विश्वास संपादन करण्यासारखें त्यांचें करारीपणाचें वर्तन हीं पाहून लोकांना अशा गृहस्थावर आलेल्या प्रसंगाबद्दल फार वाईट वाटलें; व त्यांचे स्नेही आणि इतर मंडळी यांनीं त्यांच्या गैरहजिरींत त्यांनीं चालविलेलीं पत्रें तितकींच जोमानें चालविलीं. महाराष्ट्राच्या सुदैवानें त्यांचें तुरुंगांतील १०१ दिवस लवकरच निघून गेले; व ' कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें ' या न्यायानें त्यांनीं वर्तमानपत्रांचें काम पुन्हां हातीं घेऊन पूर्वीपेक्षांही जास्त नेटानें चालविलें. केसरीपत्र सुरू झालें त्यावेळीं महाराष्ट्रांतील लोकांना विद्याव्यासंगाची फारशी आवड व मोठमोठ्या विद्वानांचीही महाराष्ट्र भाषेंत लेख लिहिण्याकडे प्रवृत्ति नव्हती. सामान्य जन तर बातम्या व वर्तमानसार यावर खूष असून गहन विषयांवरील लेख मोठ्या आवडीनें वाचण्याची लालसा फारच थोड्यांत दिसून येत असे. केसरी सुरू झाल्यानंतर हा मनु बराच पालटला व त्यांत निरनिराळ्या विषयांवर सणसणीत पण विचारपूर्वक लिहिलेले लेख येऊं लागल्यामुळें लोक ते मोठ्या भक्तीनें वाचूं लागले. केसरींतील पहिल्या सात आठ वर्षांतील लेखांकडे पाहिलें ह्मणजे त्यांत राजकीय, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक

वगैरे विषयांवर जरी लेख येत असत तरी ते हल्लीं ज्या रीतीनें येतात त्या रीतीनें येत नसून त्यावेळीं त्या त्या विषयांची सामान्य जनास थोडीबहुत माहिती व्हावी अशाच रीतीनें येत असत. तसेंच अनेकविद्यावाङ्मय यावरही लेख येत असून वाचकांना सर्वबाजूंनीं सर्व: विषयाची थोडी बहुत माहिती करून देण्याकडे त्यांची विशेष प्रवृत्ति होती; व वीस पंचवीस वर्षापूर्वी महाराष्ट्रांतील देशी भाषेंत निवणाऱ्या पत्राची अशी स्थिति असणें स्वाभाविकही होतें. पण पुढें लोकसमाज जसजसा शिक्षित होत चालला व त्याला बऱ्याच विषयांचीं सामान्य तत्वें जेव्हां कळूं लागलीं तेव्हां निरनिराळ्या विषयांवर या पत्रांतून गहन लेख येऊं लागले व कित्येक बाबतींत पत्राची दिशाही कायम ठरल्यासारखी झाली. सुमारें १८८६ पर्यंत रा. टिळक व आगरकर यांच्या एकमतानें केसरीपत्र चालत होतें. पण पुढें ' मूर्ति तितक्या प्रकृति ' या न्यायानें या उभयतांमध्यें सामाजिक-विषय व केसरीचें धोरण या संबंधानें मतभेद होऊन व हा मतभेद पुढें विकोपास जाऊन रा. टिळकांपासून आगरकर हे वेगळे झाले व त्यांनीं ' सुधारक ' पत्र काढून त्यांतून ते आपलीं मतें विशेष जोरानें प्रतिपादन करूं लागले. या वेळीं राजकीय विषयाची चर्चा करणें ही जरी केसरीची मुख्य दिशा ठरली होती तरी सामाजिक बाबतींत बरोबरीचा प्रतिस्पर्धी मिळाल्यामुळें व सामाजिक विषयासंबंधानें लोकमतांत घटकोघटकी चलबिचल होऊन सुधारणेचें तारूं वारा येईल तिकडे भटकत सुटल्यामुळें रा. टिळक यांनींही या विषयावर आपली लेखणी उचलली. इंग्रजी शिक्षणामुळें डोळे दिपावून जाऊन त्यांच्या चालीरीती चांगल्या, त्यांचा धर्म चांगला, अनुकरण करावयाचें असेल तर त्यांचेंच केलें पाहिजे इत्यादि कित्येक पुढारी गृहस्थांच्याही समजुती झाल्या असून ते समाजिक बाबतींत हवी तशी ढवळाढवळ करूं लागले होते. त्यांना पूर्वींची शास्त्राज्ञा नकोशी झाली होती; पूर्वींचा धर्म टाकाऊ झाला होता व स्वत:स वाटतें तशी सुधारणा पाहिजे झाली असून त्याप्रमाणें त्यांचें स्वैर वर्तन होऊं लागलें होतें; एवढेंच नव्हे तर, कायद्याच्या जोरावर सामाजिक सुधारणा घडवून आणावी इतक्या पर्यंतही कित्येक पुढाऱ्यांची मजल पोंचली होती. रा. टिळक यांना सुधारकांचे सामाजिक सुधारणेविषयींचे हे प्रयत्न मान्य नव्हते. आपले आचार, विचार, आपला धर्म, आपणावर घडलेला पूर्वसंस्कार, आपल्या चालीरीती, आपणांतील

जातिभेद यांत कांहीं विशिष्ट धर्म असून ते कांहीं विशिष्ट कारणानेंच अस्तित्वांत आले आहेत; अर्थात त्यांचा उच्छेद न करितां देशकालस्थित्यनुरूप व समाजास सुशिक्षित करून योग्य त्याच सुधारणा व त्याही बेताबातानें अमलांत आणाव्या असें त्यांस वाटत होतें; व ह्मणून कित्येक उतावळ्या सुधारकांच्या प्रयत्नास त्यांनीं आपल्या सणसणीत लेखांनीं आळा घालण्याचा प्रयत्न केला. डा. भांडारकर, मि. मलबारी, न्या. रानडे अशांसारखे विद्वान्, वजनदार व सरकारच्या विश्वासांतले गृहस्थ सामाजिक बाबतींत त्यांना प्रतिस्पर्धी होते व संमतीवयासारखे कायदे पास होऊन लोकमत अनुकूल नसतां, कायद्यानें सामाजिक सुधारणा होऊं लागली होती. ही सुधारणा अनिष्ट असून देशास हानिकारक आहे असें रा० टिळक यांचें ठाममत होतें व तें मत निर्भिडपणें त्यांनीं त्यावेळीं लोकांपुढें मांडलें आहे. १८९१ सालीं सामाजिक बाबतींत जी दोहोपक्षांचीं रणें माजलीं होतीं त्याचा इतिहास वाचला असतां रा. टिळक यांनीं या बाबतींत लोकांची किती कामगिरी बजावली आहे हें स्पष्ट समजून येईल.

सुमारें १८९१ सालापर्यंत केसरी व मराठा या पत्रांची पूर्ण मालकी रा० टिळक यांच्याकडे नव्हती; व त्यामुळें कित्येक बाबतींत दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागत असल्यामुळें त्यांत मनाप्रमाणें सुधारणा करण्यास त्यांना योग्य अवसर मिळाला नाहीं. पण यानंतर पत्राची मालकी पूर्णपणें त्यांच्याकडे आल्यामुळें लोकशिक्षणाच्या जहाजाचें सुकाणू स्वतंत्रपणें त्यांनीं आपल्या हातांत घेतलें. या पुढील सात आठ वर्षांचा काल ह्मणजे त्यांच्या आयुष्यांतीलच नव्हे तर, महाराष्ट्राच्या गेल्या २५ वर्षांच्या इतिहासांतील अत्यंत महत्वाचा काल होय. इंग्रजी शिक्षणाचे स्वाभाविक परिणाम होऊन आमच्या सुशिक्षित लोकांची राजकीय हक्क संपादन करण्याविषयींची झालेली प्रवृत्ति व तदनुरोधानें होत असलेलें वर्तन, समाज, धर्म, आधिभौतिक शास्त्रें, पाश्चात्य सुधारणा, व्यापार, उद्योग धंदे, तत्त्वज्ञान यासंबंधानें आपली स्थिति कशी आहे व आपण काय केलें पाहिजे याचा ऊहापोह होऊन त्याचे आमच्या समाजावर हळू हळू होत असलेले परिणाम, तसेंच राष्ट्राभिमान व धर्माभिमान जागृत होण्यास धार्मिक व ऐतिहासिक थोर पुरुषांचे उत्सव किती कारणीभूत आहेत हें जाणून त्या बाबतींत महाराष्ट्रानें पुढें टाकलेलें पाऊल हीं या इति-

हासांतील मुख्य अंगें असून त्यांचें जो कोणी विवेचन करील त्याला त्यांशीं प्रमुखत्वानें संबंध असलेल्या रा. टिळक यांच्यावरील आठ वर्षांच्या चरित्राची जोड दिल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. राष्ट्रीयसभेची कामगिरी, स्थानिक स्वराज्याचे हक्क, कायदेकौन्सिलची सुधारणा, हिंदुमुसलमानांतील दंगे, औद्योगिक परिषदेची स्थापना व तिचीं कामें, शिवाजी व गणेशोत्सवाची सुरवात, प्लेग व दुष्काळासंबंधानें सरकारची व्यवस्था इत्यादि अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी हातीं घेऊन त्या बाबतींत त्यांनीं स्पष्ट व निर्भिडपणें लेख लिहून लोकमतास लावलेलें वळण व त्यांत उत्पन्न केलेली शक्तिही खरोखरच प्रशंसनीय आहेत. तसेंच लोकांच्या तर्फे पुणें येथील म्युनिसिपाळिटींत व मध्यभागांतील लोकलबोर्डाच्या तर्फे मुंबईसरकारच्या कायदेकौन्सिलांत बजावलेली कामगिरी व सार्वजनिक सभेमार्फत सरकारची राज्यव्यवस्था कोणत्या धोरणावर आहे याचें लोकांस करून दिलेलें ज्ञान व लोकांचीं गाऱ्हाणीं कोणतीं आहेत याची सरकाराकडे लावलेली दाद याही गोष्टी त्यांनीं मोठ्या परिश्रमानें आणि कळकळीनें केल्या आहेत. यावेळीं त्यांनीं ' लॉ क्लास ' सुरू करून लोकांना कायद्याचें शिक्षण सुलभ करून ठेवलें, तसेंच ' ओराइन' ह्मणून वेदाचा काल ठरविण्यासंबंधाचा एक ग्रंथ इंग्रजींत प्रसिद्ध केला व त्यावरून त्यांच्या विद्वत्तेचा व शोधांचा पाश्चात्य देशांतही मोठा गौरव झाला.

यांप्रमाणें त्यावेळीं देशांत सुरू झालेल्या अनेक चळवळींची माहिती देऊन व स्वतः त्या चळवळींत जेवढा पुढाकार घेतां आला तेवढा घेऊन लोकमत तयार करण्याचें ब्रीद त्यांनीं उचलिलें होतें. हें ब्रीद पाळीत असतां त्यांच्यावर किती तरी संकटें आलीं ! पण त्यांनीं त्यांस मुळींच दाद दिली नाहीं. भिन्नमतांमुळें पक्ष उत्पन्न झाले, पक्षाभिमानामुळें दुही माजली व दुहीमुळें शत्रुत्व वाढून सामाजिक आणि राजकीय बाबतींत नरम—गरम अथवा नेमस्त जहाल असे पंथ उद्भवून एकीची बेकी झाली व त्याचा परिणाम पुण्यांतील सुशिक्षित लोकांवरच नव्हे तर महाराष्ट्रांतील सुशिक्षित समाजावर होऊन महाराष्ट्राच्या प्रगतीस जबर धक्का बसला ! या बेकीचें पूर्ण स्वरूप सार्वजनिक सभेंतून कांहीं मंडळी निघून तिनें जेव्हां डेक्कन सभा काढली व १८९५सालीं पुणें येथें राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरूं नये ह्मणून जे तंटे झाले त्यावेळीं चांगलें निदर्शनास आलें. टाळी कांहीं एकाच हातानें

बाजत नसते व त्याबद्दल थोडाबहुत दोष दोन्ही पक्षांकडे येतो ही गोष्ट खरी आहे. पण पक्षाभिमानावरून व्यक्तीवर येऊन व्यक्तिविषयक द्वेष जो वाढत चालला व ज्याचा परिणाम रा. टिळकांसारख्यांस पुढें भोगावा लागून त्यानें समाजाच्या प्रगतीसच नव्हे तर एकंदर राष्ट्राच्या हितास जबर धक्का दिला ही गोष्ट महाराष्ट्राच्या इतिहासांत फार घातुक झाली असून सर्वांनीं ती मनन करण्यासारखी आहे; एवढें येथें सांगणें गैरवाजवी होणार नाहीं. असो; रा० टिळक यांचें त्या वेळचें चित्र थोडक्यांत रेखटावयाचें ह्मणजे तें पुढीलप्रमाणेंच रेखटलें पाहिजे:— निर्भिड व स्पष्टपणें लोकांचें ह्मणणें सरकारापुढें मांडल्याशिवाय सरकारचे कान उघडणार नाहींत असें टिळक ह्मणणार तर दुसरी बाजू अशानें सरकार रागावेल; आपण नेमस्तपणाचीच भाषा वापरली पाहिजे असें ह्मणणार; लोकमत अनुकूल नसतां अनुकूल आहे असें सरकारास भासवून कायद्यानें सामाजिक सुधारणा घडवून आणण्यापेक्षां सामाजिक परिषद मुळीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांतच नको असें रा. टिळक ह्मणणार तर दुसरी बाजू राष्ट्रीय सभेच्या मंडपांतच सामाजिक परिषद भरविण्याचा हट्ट धरणार; रा. टिळक हे लोकमत जागृत करून लोकांस बरोबर घेऊन सुधारणा करणार तर दुसरी बाजू लोकमत ह्मणजे जनावरांचें मत असें ह्मणून लोकांस कस्पटाप्रमाणें मानणार. अशा स्थितींत दुसऱ्या पक्षाशीं गोड बोलून कानउघडणी करणें अपरिहार्य दिसून आल्यावरूनच रा० टिळक यांनीं कडक लेखणीचा आश्रय केला व ‘ जनावरें कोण ? ’ ‘ सामाजिक सुधारणेचे मार्ग कोणते ? ’ इत्यादि लेख लिहून उलट बाजूच्या डोळ्यांत चांगलें चरचरीत अंजन घातलें !

अशा रीतीनें प्रतिपक्ष्यांशीं निकरानें लढून लोकमत तयार करीत असतां त्यांना अनेक अडचणी उत्पन्न झाल्या व १८९७ सालीं त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला उपस्थित होऊन या अडचणींचा अगदीं कळस झाला. रा. टिळक यांच्यावरील राजद्रोहाचा खटला हा सकृद्दर्शनीं जरी व्यक्तिविषयक खटला दिसतो तरी तो व्यक्तिविषयक नसून त्याचें स्वरूप फारच व्यापक होतें. तसेंच हा खटला ह्मणजे रा. टिळक यांच्या जिवावरचा घाला नसून हिंदुस्थानांतील वृर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्यावरील गदा असेंच ह्मटलें पाहिजे. हा खटला उत्पन्न होण्यास प्लेगच्या जुलमास कंटाळून ज्युबिलीच्या वेळीं रँड व आयर्स्ट

साहेबांचे, कांहीं माथेफिरू गृहस्थांनीं केलेले खून जरी कांहीं अंशीं कारणीभूत झाले तरी या जवळच्या कारणापेक्षां दुसरीं अनेक महत्त्वाचीं कारणें होतीं हें कोणाही इतिहासवाचकाच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं. ज्यूबिलीसारख्या आनंदोत्सवाचे प्रसंगांत रँड–आयर्स्टच्या खुनांनीं कालविलेली माती पाहून कोणाचेंही पित्त खवळल्यावांचून राहणार नाहीं व त्याप्रमाणें कित्येक सरकारी अधिकारी खवळून जाऊन त्यांनीं ज्या कित्येक गृहस्थांवर निष्कारण संकटें आणलीं त्यांतच रा. टिळक यांच्याही वाटयास जरी एक आलें तरी रा. टिळक यांच्यावरील सरकारी अधिकाऱ्यांची करडी नजरही त्यावेळेसच उत्पन्न झाली नसून त्यापूर्वी पुष्कळ दिवसांपासून ते सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत सलत होते ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि असें सलण्याचें कारण ते सरकारची राज्यव्यवस्था निर्भिडपणें लोकांपुढें मांडून त्यांतील दोष दाखवीत होते व लोकमत जागृत करून लोकांस कायदेशीर रीतीनें आपले हक्क संरक्षण करण्यास सांगत होते असें म्हटल्यास त्यांत चूक होईल असें वाटत नाहीं. पण राज्यव्यवस्थेवर टीका करून लोकमत जागृत करणें हा कांहीं गुन्हा नव्हे. उलट इंग्रजी शिक्षणानें ज्यांचीं मनें सुसंस्कृत झालीं आहेत अशा पुढाऱ्यांचें तें कर्तव्य आहे व तें कर्तव्य योग्य रीतीनें बजावलेलें पाहून आमच्या सरकारानेंही अशा गृहस्थांची पाठ थोपटावयास पाहिजे होती. एवढेंच नव्हे तर अशा प्रकारच्या महत्त्वाकांक्षा उत्पन्न होणें हेंच इंग्रजी अमलाचें सत्कार्य असें समजणाऱ्या सरकारास याचा अभिमान वाटावयास पाहिजे होता. पण तें एकीकडेच राहून राजद्रोहाच्या काहुरांत रा० टिळक यांची सरकारानें जी होरपळ केली व त्याबरोबर कायद्यांत दुरुस्ती करून वर्तमानपत्रांचे जे गळे दाबले त्यानें लोकांच्या स्वातंत्र्यास मोठा धक्का बसून त्यांच्या हक्कांची किती पायमल्ली केली हें सांगावयास नको. सुदैवानें रा. टिळक यांस लोकांची चांगली सहानुभूति मिळून त्यांच्याकरितां एक मोठा डिफेन्सफंड उभारण्यांत आला व त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि अधिक वाढून पूर्वीपेक्षांही लोक त्यांच्यावर अधिक प्रेम करूं लागले. राजद्रोहाच्या खटल्यांत १८ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा ही रा. टिळक यांच्या शरीराची हानि करण्यास जितकी कारणीभूत झाली तितकी त्यांच्या धैर्याची, सोशिकपणाची व लोकहिततत्परतेची तेजी वाढविण्यासही कारणीभूत झाली; व अशा लोकोत्तर पुरुषावर

असा बिकट प्रसंग आलेला पाहून हिंदुस्थानांतील लोकांचींच नव्हेत तर मॅक्समूलरसारख्या पाश्चात्य विद्वद्रत्नांचींही अंतःकरणें द्रवून जाऊन त्यांनीं उघडपणें सहानुभूति प्रदर्शित केली. बर्वेप्रकरणानंतर केसरीपत्रावर अशा प्रकारच्या संकटाचा हा दुसरा घाला होय; व रा. केळकर, खाडिलकर वगैरे मित्रांनीं त्यास मोठ्या धैर्यानें मदत केल्यामुळें पूर्वीप्रमाणेंच त्यांतूनही तें निभावलें, एवढेंच नव्हे तर रा. टिळक यांच्या गैरहजिरींत त्याच्या पूर्वीच्या स्वरूपांत किंचित्‌ही फेरबदल झाला नाहीं. राष्ट्राचा जिवंतपणा व्यक्त होण्याचे जे कांहीं प्रसंग असतात त्यांतीलच हा एक प्रसंग म्हटला पाहिजे व तो रा. टिळक यांच्या हितचिंतकांनीं व मित्रांनीं चांगल्या रीतीनें तडीस नेला ही गोष्ट खरोखर त्यांना भूषणास्पद आहे.

असो; १८९७ सालचें वावटळ लवकरच शांत झालें; रा. टिळक यांजवरील सरकारचा रोष कमी झाला; व सरकारानें त्यांस बारा महिन्यांतच बंधमुक्त केलें; १८९७ सालच्या संकटांचा लोकांवर कांहीं थोडा परिणाम झाला नाहीं! भित्रे होते ते जास्तच गर्भगळित झाले; नेमस्त होते ते जास्त नेमस्त झाले व धड इकडे ना तिकडे अशांना टेंकावयास कांहीं तरी कारण पाहिजे होतें तें अनायासें त्यांना मिळालें. ही सामान्य मनुष्याची गोष्ट झाली. पण सत्याची कास धरून कर्तव्याचें कंकण बांधलेल्या रा० टिळकासारख्या असामान्य धैर्याच्या पुरुषाची गोष्ट याहून फार निराळी होती. क्लेशानें त्यांचें शरीर खचलें; पण कर्तव्य बजावल्याचें समाधान उत्पन्न होऊन त्यांचें धैर्य अधिक वाढलें; अधिकाऱ्यांची निंदा व सरकारचा रोष त्यांना पतकरावा लागला; पण त्याबरोबर वाहवा होऊन लोकांत त्यांची कीर्ति वाढली; काल्पनिक भीतीनें गांगरून जाणारे कांहीं उतावळे लोक त्यांच्यापासून मागें मागें सरूं लागले तर सत्यनिष्ठ व धैर्यपरीक्षक लोक पुढें सरसावून त्यांच्या सहवासाची इच्छा बाळगूं लागले; व खुद्द तावून सुलाखून तयार झालेल्या त्यांच्या हिमतींत, धैर्यांत व शांतींत अधिक स्थैर्य आलें. या हिमतीची, धैर्याची व शांतीची पारख होण्याची वेळ पुन्हा लवकरच आली. राजद्रोहाच्या खटल्यानंतर त्यांची लेखणी सौम्य होईल; सरकारच्या राजव्यवस्थेवर ते कडक टीका करणार नाहींत व सार्वजनिक चळवळींत पुढाकार घेऊन पुन्हा लोकमतें जागृत करणार नाहींत अशी कित्येकांची अटकळ होती. पण या अटक-

ळींत कांहींच अर्थ नसून त्यांनीं सत्याला स्मरून जें एकदां कर्तव्याचें व्रत उचलिलें तें यावेळेपर्यंत अबाधितपणें चालविलें आहे. कारागृहांतून सुटका झाल्यावर ' पुनश्च हरिःॐ ' ह्मणून त्यांनीं पत्राची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली; व लोकशिक्षणाचा मार्ग पुन्हां सुरू केला. यावेळीं हा मार्ग त्यांना पूर्वींपेक्षांही कठीण होऊन बसला होता. याचें कारण एक तर शारीर-स्वास्थ्य बिघडून पूर्वी इतके श्रम करण्याची ताकद येण्यास बराच अवधी पाहिजे होता; दुसरें असें कीं, ९७ सालच्या भयंकर प्रसंगानें लोकस्थिति, बुजालेल्या घोड्याप्रमाणें पालटून गेली असल्यामुळें त्यांना पूर्वस्थितीवर आण-ण्याचें काम कठीण झालें होतें; व दिवसेंदिवस कायद्याचे गळफांस जास्त बळकट होऊन त्यांतून निसटून लोकशिक्षणासंबंधी पूर्वींची स्थितिस्थापकता आणणें दुर्घट झालें होतें. अशा वेळीं रा० टिळक यांनीं कंबर बांधली नसती तर महाराष्ट्राचें घसरलेलें पाऊल पुन्हां लौकर मार्गावर आलें असतें किंवा नाहीं याची वानवाच आहे. रा० टिळक यांनीं पुन्हां लेखणी हातीं धरल्यावर गेल्या पांच सहा वर्षांत प्रांतिकसभा व राष्ट्रीयसभा यांची रचना आणि त्यांचीं कामें, दिल्लीदरबार, जमिनमहसुलाचा कायदा, ट्रान्सवालचें युद्ध, युनिव्हर्सि-ट्यांचा कायदा, रशिया व जपान यांच्यामधील लढाई, गौप्यगोपनाचा कायदा, साम्राज्याचा विस्तार, संरक्षित व्यापार वगैरे अनेक विषय उत्पन्न झाले व त्या त्या विषयांवर पूर्वीप्रमाणेंच प्रसंगास अनुसरून त्यांनीं खरमरीत व निर्भिड-पणाची टीका केली आहे; एवढेंच नव्हे तर ही टीका करीत असतां गेल्या पंच-वीस वर्षांत सुशिक्षित झालेल्या लोकसमाजास जितकें प्रौढ व गंभीर विचा-रांचें शिक्षण द्यावयास पाहिजे तितकें त्यांनीं दिलें आहे; ही गोष्ट निदान केसरीच्या वाचकांस तरी नव्यानें सांगावयास नको. असो; अशा रीतीनें स्वकर्तव्य बजावीत असतां त्यांच्या दुर्दैवानें पुन्हां उचल खाल्ली व बाबा महाराजांच्या इस्टेटीसंबंधानें प्रकरण उद्भवून त्यांत त्यांना फिरून गोते खाण्याचा प्रसंग आला !

बाबामहाराजासंबंधीं प्रकरण ह्मणजे रा. टिळक यांच्या खासगी वर्तनावर आकाशाची कुऱ्हाडच होती असें ह्मटलें तरी चालेल. बाबामहाराज मरावयास टेकले त्या वेळीं टिळक हे आपले स्नेही, तेव्हां आपल्या पश्चात् इस्टेटीची जर कांहीं सुरळीत व्यवस्था चालेल तर ती टिळकांच्याच देखरेखी खालीं चालेल,

असें समजून त्यांनीं मृत्युपत्र केलें व त्यांत रा० टिळक यांना एक ट्रस्टी नेमून त्यांस इस्टेटीची व्यवस्था पाहण्यास सांगितलें. रा० टिळक यांची व्यवस्था बाबामहाराजांच्या बायकोस पसंत न पडून तिनें ट्रस्टी रद्द करण्याविषयीं डि. कोर्टात दावा आणला. टिळकांविषयीं दांत ओंठ खाणाऱ्या आस्टनप्रभृति सरकारी अधिकाऱ्यांस अनायासें चालून आलेली ही शिकार सरकारच्या घशांत घालावी असें वाटून त्यांनीं टिळकांची पंधरा दिवस कसून जबानी घेतली व त्यावरून त्यानीं खोटी साक्ष दिली व खोटे कागदपत्र तयार केले असे त्यांजवर एकापेक्षां एक भयंकर आरोप ठेऊन फौजदारींत काम चालविलें. वास्तविक हा खटला दोन खासगी पक्षकारांमध्येंच चालावयास पाहिजे होता; पण तसें न करितां ताईमहाराजांचा पक्ष उचलून सरकारानें खटला चालविण्याचें काम आपल्या अंगावर घेतलें; त्याकरितां स्पेशल म्याजिस्टेट नेमिला, खटला दीड दोनशें दिवस सारखा चालू झाला; कागदपत्र, साक्षीपुरावा यांचें एक भारत झालें; सुमारें १ लाख रुपये खर्च केले; आणि अखेर खटल्यांत कांहीं जीव नसतां म्याजिस्ट्रेटानें रा. टिळक यांस १८ महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली! 'गुळाचा गणपती आणि गुळाचाच नैवद्य' असल्यावर असा प्रकार होणार अशी अटकळ पूर्वीच रा. टिळक यांनीं बांधली होती. पण इंग्रज सरकारच्या न्यायाचा लौकिक मोठा म्हणून त्यावर भिस्त ठेऊन डि. जज्जाकडे अपील केलें. पण 'भरंवशाच्या म्हशीस टोणगा' या न्यायानें तेथेंही शिक्षा कायम झाली! नाहीं म्हणावयास दगडाची वीट होऊन १८ महिन्यांची शिक्षा ६ महिन्यांवर आली. आपणाकडे कांहीं एक अपराध नसतां व पुराव्यावरूनही तसें सिद्ध झालें असतां केवळ दुराग्रहानें आपल्यावर घाला होत आहे असें पाहून रा. टिळक यांस किती वाईट वाटावें व त्याबरोबर त्यांना किती संताप यावा याची वाचकांनींच कल्पना करावी. पण हा संताप एकीकडे ठेऊन केवळ 'आलिया भोगासी असावें सादर' असें म्हणून त्यांनीं निमुटपणें तो प्रसंग सहन केला व 'सत्यमेव जयते' या वचनावर विश्वास ठेऊन शांतवृत्तीनें व धिमेपणानें हायकोर्टांत अपील करून पुन्हां काम चालविलें. सुदैवानें या महाकोर्टानें अनुकूल निकाल दिला व रा. टिळक यांच्या वरील सर्व आरोप निघून ते धुतल्या तांदुळाप्रमाणें निर्मळ झाले व त्याबरोबर ब्रिटिश न्यायाची इभ्रत वाढून तिचा चोहोंकडे जयजयकार झाला.

येणेंप्रमाणें एका पाठीमागून एक अशीं भयंकर संकटें ओढवलीं असतां यत्किंचित् न डगमगतां त्यांशीं धैर्यानें तोंड देऊन देशहिताचा आंखलेला मार्ग त्यांनीं भराभर आक्रमण केला व पुढेंही तोच मार्ग आक्रमण्याचें त्यांनीं योजिलें आहे. यांचा विद्याव्यासंग जबर असून अडचणींतच वेळ काढून यांनीं ' आर्यांचें मूलस्थान ' या नांवाचा नुकताच एक नवा ग्रंथ इंग्रजींत लिहिला आहे व त्यांतील अपूर्व शोधावरून जगांतील विद्वानांनीं त्यांची तारीफ केली आहे. यांनीं सीलोन, ब्रह्मदेश, हिंदुस्थान वगैरे ठिकाणचा प्रवास करून तेथील लोकस्थितीचें मार्मिक रीतीनें अवलोकन केलें आहे. यांचें खासगी व सार्वजनिक वर्तन चोख रीतीचें असून सर्वांना अनुकरणीय असें आहे. यांनीं आपल्या विरुद्ध लिहिणाऱ्या विलायतेंतील ' ग्लोब ' सारख्या वजनदार पत्रावरही अब्रुनुकसानीची फिर्याद करून त्यास माफी मागावयास लाविलें यावरून ते किती करारी व निश्चयी आहेत याची साक्ष पटेल. यांना दहाबारा वर्षांचीं दोन लहान मुलें असून तीन मुली आहेत व त्या सर्वांना चांगलें लिहितां वाचतां येतें. कॉलेजमध्यें शिकत असलेले यांचे वडील चिरंजीव गेल्या सालीं प्लेगनें वारले त्यावेळीं त्यांना फार दुःख झालें; पण पुत्रशोक निमूटपणें गिळून टाकून त्यांनीं आपला नित्यक्रम सुरू केला. गोरगरीबांस सल्ला देण्यास हे नेहमीं तयार असतात. यांना भेटण्याची कोणास मज्जाव नसल्यामुळें गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्व लोक यांच्या भेटीस येत असतात. हे विनयशील असून स्पष्टवक्तेपणाबरोबर नम्रताही यांच्या आंगीं बाणली आहे. यां खेरीज अलौकिक बुद्धिमत्ता, असामान्य धैर्य व विलक्षण शांति हे गुण यांचे ठायीं असून स्वार्थत्याग, देशसेवा व लोककल्याण यांची हे केवळ मूर्तिच आहेत. अशा परोपकारी विभूतीला ईश्वर दीर्घायू करो अशी त्याजपाशीं प्रार्थना करून हा अल्प चरित्रलेख पुरा करितों.



नामदार फरोजशहा एम्. मेथा.

१५

नामदार सर फेरोजशहा एम्. मेथा. के. सी. आय्. ई.

आपल्या ह्या आर्यभूमीच्या उद्धाराकरितां अनेक सत्पुरुषांनीं आपलें सर्वस्व खर्ची घातलें आहे. महाराष्ट्रराज्यसंस्थापक छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांणीं कोणती कामगिरी बजाविली हें सर्वविश्रुत आहे. तसेंच ह्या देशाच्या उद्धारार्थ श्रीमंत थोरले बाजीराव साहेब, त्यांचे सहोदर चिमाजी, आपासाहेब, नानासाहेब, थोरले माधवराव, नाना फडणीस, छत्रपति राजाराममहाराज, व त्यांचे बरोबर काम करणारा प्रत्येक लहान मोठा मराठा, जनकोजी शिंदे, महादजी शिंदे यांणीं काय केलें ! हें इतिहासज्ञ वाचकांस सांगावयास नकोच. त्यांणीं आपल्या कडून देशाचा उद्धार केला; परंतु दुर्दैवानें त्यांच्या वंशजांकडून त्यांचें व्रत चालूं राहिलें नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट आहे; आणि त्यामुळेंच आपल्यास ही सोन्याच्या पिंजऱ्यांतील पोपटाची स्थिति प्राप्त झाली आहे ! असो ! गतं न शोच्यम् ! ! !

हल्लीं आपण पारतंत्र्यांत पडलों आहोंत; तथापि मुसलमानांसारख्या रानदांडग्या लोकांचें आपल्यावर प्रभुत्व नाहीं, ही समाधानाची गोष्ट आहे. हल्लींचे प्रभु आपल्यास शाहाणे करून पारतंत्र्याचें जूं जितकें कमी असह्य होईल तितकें करावयाचें, असें निदान तोंडानें तरी ह्मणत आहेत. तथापि कांहीं कृति न होतां ' वचने किं दरिद्रता ' झाल्यास आपल्या दैवदुर्विलसिताची पराकाष्ठा होईल ह्मणावयाची !

आपल्या प्रभूंच्या हातून वर सांगितल्याप्रमाणें कांहीं कृति व्हावी, ह्मणून देशकालानुरूप आपल्यांतील हल्लींचे पुढारी खटपट करीत आहेत. त्यांत प्रस्तुत चरित्रनायक नामदार फेरोजशा मेथा यांची प्रमुखत्वें गणना केली पाहिजे.

फेरोजशा मेथा यांचा जन्म ता. ५ आगष्ट सन १८४५ इ.

रार्जी मुंबई मुकामीं झाला. त्यांचे वडील मुंबईतील प्रसिद्ध 'कामा आणि कंपनी' नामक पेढीचे सहभागीदार असून त्यांस व्यापारांत चांगली किफायत होत असे. ते सारासारविचारी असून व्यापारी डावपेच व त्यांस पूर्णपणें अवगत असत. व्यापारी शिक्षणाचें महत्त्व त्यांस पूर्णपणें अवगत असून ते जबरदस्त विद्याव्यासंगी असत. त्यांनीं व्यापारी दृष्टीनें इतिहास, भूगोल या शास्त्रांवर सर्वमान्य ग्रंथ लिहिले असून, त्यांच्या वेळचे तरुण पारशी लोक सदरहु ग्रंथांचा फार उत्सुकतेनें अभ्यास करीत.

प्रस्तुत चारित्रनायक विलक्षण बुद्धिमान असल्यामुळें त्यांनीं आपला शाळें-तील शिक्षणक्रम फार जलद संपविला. आपल्या वयाच्या केवळ अठराव्या वर्षी ह्मणजे सन १८६१ त मुंबई विश्वविद्यालयाची प्रवेश परीक्षा देऊन पुढें तीनच वर्षांत सन १८६४ सालीं एल्फिन्स्टन कॉलेजांतून ते बि. ए. झाले. पुढें फक्त सहा महिन्यांच्या अवकाशांत फार झटून अभ्यास करून ते एम्. ए. झाले; व त्यास एल्फिन्स्टन् कालेजांतच फेलो नेमिलें. कॉलेजचे मुख्याध्यापक सर अलेक्झांडर ग्रांट यांची, आपल्या तरुण पारशी विद्यार्थ्याच्या बुद्धिमत्तेविषयीं पहिल्या पासून खात्री होती; ह्मणून त्यांनीं आपल्या विद्यार्थ्यास मरहुम रुस्तु-मजी जमशेटजी जीजीभाई यांनीं त्यावेळीं सुरू केलेली 'ट्राव्हलिंग फेलोशिप' मिळावी ह्मणून शिफारस केली. आपला विद्यार्थी पारशी ज्ञातींत पहिला एम्. ए. आहे; त्याप्रमाणेंच त्यानें विलायतेस जाऊन कायद्याचा अभ्यास करून पहिला बॅरिष्टर होऊन यावें, अशी त्याची मनापासून इच्छा होती. परंतु, ही गोष्ट मेथांचे वडिलांस पसंत पडली नाहीं. त्यांचा स्वभाव जात्याच मानी असल्या-मुळें आपल्या मुलाचें शिक्षण दुसऱ्याच्या धर्मावर व्हावें हें त्यास पसंत पडेना. अखेरीस आपल्या गोड व मोहक वक्तृत्वानें प्रि. साहेबांनीं त्यांचें मन वळ-विलें; व फेरोजशाहा मेथा हे विलायतेस बॅरिष्टरचा अभ्यास करण्याकरितां निघून गेले.

मि. मेथा यांणीं विलायतेस जाऊन सारखा तीन वर्षें अभ्यास केला; व सन १८६८ मध्यें लिंकन्स इनचे बॅरिष्टर झाले. आपले परम पूज्य गुरु व प्रसिद्ध राष्ट्र-भक्त मि० दादाभाई नवरोजी यांच्या, व कलकत्याचे प्रसिद्ध बॅरिष्टर उमेश-चंद्र बानर्जी यांच्या साह्यानें त्यांनीं 'लंडन लिटररी सोसायटी' या नांवाची एक सभा स्थापन केली; व सदर सोसायटीपुढें हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धती-

वर एक निबंध वाचला. त्या वेळीं निबंधकार जरी अल्पवयी होते तरी निबंधांत दर्शित केलेले विचार त्यांच्या मार्मिक बुद्धिमत्तेची उत्तम साक्ष देत आहेत.

जे दिवशीं मि० मेथा विलायतेहून बॅरिष्टर होऊन मुंबईस परत आले, तेच दिवशीं त्यांचे परम पूज्य अध्यापक–सर ए. ग्रांट—यास मानपत्र देण्याचा समारंभ 'फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट' च्या दिवाणखान्यांत होणार होता. प्रि. ग्रांट यांची एडिन्बरो विश्वविद्यालयाच्या मुख्याध्यापकाच्या जागेवर निवडणूक झाल्यामुळें तिकडे रुजु व्हावयास निघाले होते. ही बातमी त्यांचे कृतज्ञ विद्यार्थ्यास जहाजावरून उतरतांच कळली; व आपल्या परम संमान्य गुरुजींचा अखेरचा निरोप घेण्यास तावडतोब ते समारंभस्थळीं दाखल झाले. त्यावेळीं परस्परांस झालेल्या आनंदास पारावार नाहीं !

मि. मेथा यांणीं मुंबईस आल्यावर आपल्या धंद्यास सुरवात केली. व जसजसा त्यांस अनुभव येत चालला तसतसें त्यांस यश येत चाललें. हल्लीं नामदार मेथा यांचा मुंबईतील बॅरिष्टर मंडळींत फार चांगला लौकिक आहे.

नामदार मेथा फक्त एखाद्या उदरंभरी वकीलाप्रमाणें आपल्या धंद्याकडेच लक्ष देत नसून या आर्यभूमीचें कायमचें हित कशानें होईल, याचा ते एखाद्या योग्याप्रमाणें विचार करीत असतात. कायावाचामनानें राष्ट्रहित जेणेंकरून साधेल तें करावयाचें, हें त्यांचें आद्यकर्तव्य होय असें ते समजतात. सार्वजनिक कामांत त्यांची पहिली मोठी कामगिरी म्हटली म्हणजे, प्रसिद्ध देशभक्त दादाभाई नवरोजी यांचे संबंधाची होय. सन १८६९ सालीं, मिस्तर नवरोजी यांणीं केलेल्या देशकार्याबद्दल द्रव्यरूपानें त्यांचे उतराई व्हावयाचें असा बूट निघाला. त्या कामीं मेथासाहेबांनीं पुढाकार घेऊन मुंबईतील धनाढ्य लोकांचें मन वळविलें, व त्यांस त्या कामीं उत्कृष्ट यश आलें.

मुंबईइलाख्याचे सुप्रसिद्ध गव्हर्नर सर बार्टल फ्रियर यांणीं सन १८६८चे सुमारास मुंबई शहरास स्थानिक स्वराज्याचे हक्क दिले. त्या बाबदींत सन १८७० चे सुमारास एक गोष्ट घडून आली, तिचा उल्लेख येथें करणें अवश्य आहे. त्यावेळचे म्यु० कमिशनर मिस्तर आर्थर क्राफर्ड यांचे मनांत मुंबई-शहर प्रतिपारिस बनविण्याचें आलें. मुंबईचे रस्ते, घरें, वगैरे सर्व नवें बनवून, ठिकठिकाणीं सुंदर तळाव, नवे पूल, मनोहर बगिचे, मोठ्या सोयीचीं

क्रयविक्रय–स्थानें वगैरे कामें झालीं पाहिजेत, असें त्यांच्या मनानें घेतलें. ह्या एका गोष्टीपुढें म्युनिसिपालिटीजवळ कांहीं शिल्लक आहे कीं नाहीं ? असल्यास ती किती आहे ? आपल्या मनांतील उद्देश तडीस नेण्यापुरती आहे कीं नाहीं; वगैरे गोष्टींबद्दल त्यांनीं बिलकुल विचार केला नाहीं ! यामुळें मुंबई म्युनिसीपालिटीस भयंकर कर्ज झालें ! लोकांनीं म्यु० कमिशनर याजवर शिव्याशापांचा सारखा भडिमार सुरू केला ! याचा परिणाम असा झाला कीं, सदर्हू गोष्ट सरकारचे कानावर जाऊन सरकारांनीं म्यु० कमिशनर यास कामावरून दूर केलें ! इतक्यांत ' फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट ' पुढें ' स्थानिक—स्वराज्याची सुधारणा ' याविषयावर मेथा यांनीं एक उत्कृष्ट निबंध वाचला. त्यांत त्यांनीं असें सिद्ध केलें कीं, अशा संस्थेंत लोकांनीं निवडून दिलेले मुखत्यार असावेत, काम पाहणारी एक जबाबदार कमिटी नेमावी आणि एक एक्झिक्युटिव्ह कमिशनर नेमून त्यानें सर्व काम करावें. अनेकांच्या हातीं काम देणें ह्मणजे ' आठशें लष्कर, नऊशे न्हावी ' अशी बजबज व्हावयाची, असें त्यांनीं फार छान सिद्ध करून दाखविलें. परंतु, ही गोष्ट जमलेल्या मंडळींस अज्ञानामुळें बिलकुल समजली नाहीं. त्यांनीं मेथा साहेबांची भरसभेंत हुर्यो केली. लोकांनीं त्यांजवर, हे म्यु० कमिशनर मि. क्राफर्ड यांचे साथीदार आहेत, असा आरोप केला ! वस्तुतः त्यांनीं निरपेक्ष टीकाकार ह्मणून व्याख्यान दिलें होतें. येथें ही गोष्ट सांगणें जरूर आहे कीं, त्यांनीं लोकांपुढें स्थानिक स्वराज्यासंबंधी जीं उत्तम तत्त्वें आपल्या व्याख्यानांत मांडिलीं होतीं, त्याच तत्त्वांवर सरकारांनीं सन १८७२ चा म्यु० आक्ट पास केला आहे. असो. जी गोष्ट सन १८७०।७१ चे सुमारास त्यांनीं प्रतिपादन केली, व जी सांगितल्याबद्दल लोकांनीं त्याजवर भलभलते आरोप घेतले, ती गोष्ट हल्लीं सर्वमान्य होऊन बसली आहे यांत शंका नाहीं. या वेळेपासून मेथासाहेब हे स्थानिक स्वराज्याचे बाबतींत—विशेषतः त्याच्या रचनेसंबंधांत फार लक्ष घालीत असतात.

' टॉवर ऑफ सायलेन्स् रायट केस ' नामक प्रसिद्ध फौजदारी खटल्यांत सन १८७२।७३ सालीं मेथासाहेबांचा उत्तम कायदेपंडित ह्मणून फार लौकिक झाला. तो खटला त्यांनीं प्रसिद्ध ॲन्स्टे बॅरिस्टर याजबरोबर दुय्यम ह्मणून चालविला होता. त्या वेळींच ॲन्स्टे साहेबांनीं मेथा साहेब यांचा फार

लौकिक होईल ह्मणून भविष्य केलें होतें; व तें आज रोजीं अक्षरशः खरें झालें आहे. त्याचप्रमाणें ' सुरत रायट केस ' नामक प्रसिद्ध खटल्यांत त्यांनीं काम चालविलें; त्यांत त्यांचा सर्व इलाखाभर इतका लौकिक झाला कीं, त्यांना सर्व ठिकाणीं चांगलें काम मिळूं लागलें. हल्लीं तर त्यांकडे इतकें काम येतें कीं, त्यांना त्याचा उरक न पडल्यामुळें त्यांजला पुष्कळ पक्षकारांस नाहीं ह्मणून सांगून निराश करावें लागतें. मेथासाहेब यांच्याकडे काठेवाडांतील लहान मोठ्या राजेलोकांच्या दरबारचेंही काम फार येतें. इतकें कीं, साधारणतः दरबाराकडील काम नाहीं असा एकही महिना जात नाहीं.

याप्रमाणें सन १८७२।७३ चे सुमारास त्यास वकिलीचे कामांत जय येत चालला होता; तरी त्यांचें लक्ष्य लोकहिताचे कामींही बिलकुल कमी नव्हतें. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक, नौरोजी फरदोनजी अशांसारख्या उत्तम माणसांबरोबर त्यांनीं म्युनिसिपालिटींत राहून मुंबापुरीची उत्तम सेवा केली आहे; व या मिळालेल्या अनुभवाचा त्यांनीं आजपर्यंत सदुपयोग केला आहे. वस्तुतः जर कोणी मुंबई म्युनिसिपालिटीची, आपल्या माहितीनें, वक्तृत्वानें व तसेंच शहाणपणानें, सर्व बाबतींत उत्तम सेवा केली असेल तर ती नामदार मेथा साहेबांनींच ! सन १८८४ सालीं ते कारपोरेशनचे अध्यक्ष असतांना त्यांनीं जी कामगिरी बजाविली त्याबद्दल लिहितांना, मुंबईच्या ' टाइम्स ऑफ् इंडिया ' पत्रांत खालील आशयाचे उद्गार निघाले आहेत. ' युरोपियन व नेटिव या दोघांच्याही मतानें ना० मेथा यांच्या इतकी उत्तम कामगिरी कॉरपोरेशनचे अध्यक्ष या नात्यानें कोणीही बजाविली नाहीं ! '

नामदार मेथा यांची लोकहिताबद्दल कळकळ फक्त मुंबई शहर, अगर इलाख्यापुरतीच नसून, ते या हतभाग्य आर्यभूमीबद्दल रात्रंदिवस काळजी करीत असतात. ' मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशन ' या नांवाची एक लोकोपयोगी संस्था त्यांनीं व न्या. काशीनाथ त्रिंबक तेलंग व न्या. तय्यबजी यांनीं मुंबई येथें स्थापन केली आहे .या संस्थेनें प्रसिद्ध ,इल्बर्ट बिल, चे वेळीं केलेली कामगिरी लोकविश्रुत असून, हल्लींही वेळोवेळीं ही संस्था उत्तम लोकसेवा करीत आहे. सन १८८६ सालीं नेक नामदार लार्ड रे साहेब मुंबई इलाख्याचे गव्हरनर असतांना नामदार मेथा यांस मुंबई सरकारचे कायदे कौन्सिलचे सभासद नेमलें; त्यावेळींही मेथा साहेबानीं अधिकाऱ्यांची भीड

मुरवत न धरितां, लोकांची बाजू फार स्पष्ट रीतीनें सरकारापुढें मांडिली आहे. सन १८८८ च्या म्युनिसिपल आक्टाचें बिल ह्या वेळीं कौन्सिल पुढें आलें होतें. सुदैवानें नामदार मेथा यांचेबरोबर काम करण्यास न्या. तेलंग हेही कौंसिलदार झाले होते. आपल्या पुष्कळ वर्षांच्या स्थानिक स्वराज्यासंबंधी आलेल्या अनुभवानें उभयतांनीं ही लोकपक्षाची बाजू सरकारापुढें इतक्या स्पष्ट व जोरदार रीतीनें मांडली कीं, सरकारास आपले बिलांतील पहिलें धोरण पार बदलून टाकावें लागलें. प्रथमतः कौंसिलापुढें आलेलें बिल अतिशय खोडसाळपणाचें होतें. परंतु, सिलेक्ट कमिटींत ना. मेथा व तेलंग या उभयतांची ही नेमणूक झाल्यामुळें, त्यांनीं रात्रंदिवस जिवापाड श्रम करून हें बिल लोकांस जसें पाहिजे तसें करण्याची खटपट केली. सदरहु कायदा लोकांच्या दृष्टीनें जसा व्हावा तसा जरी झाला नाहीं; तरी, बहुतेक बाबतींत लोकांस सोईकर असाच झाला आहे; व त्याचें सर्व श्रेय या उभय लोकाग्रणींसच दिलें पाहिजे.

नामदार मेथा साहेब हे राष्ट्रीय सभेचे कट्टे अभिमानी आहेत. सन १८९० सालीं कलकत्ता येथें झालेल्या राष्ट्रीयसभेचे त्यांस अध्यक्ष केलें होतें. त्यावेळीं त्यांनीं अध्यक्ष या नात्यानें सभेपुढें केलेलें भाषण फार जोरदार, वक्तृत्वपूर्ण, मुत्सद्दीपणाचें, असें होतें. तें वाचलें असतां ना. मेथा पहिल्या प्रतीचे मुत्सद्दी आहेत, अशी वाचकांची खात्री होईल. त्या भाषणाचा परिणाम नामदार श्वान व केन या दोन प्रसिद्ध इंग्रज सद्गृहस्थांच्या मनावर फार चांगला झाला. असो.

सन १८९२ सालीं कॉंग्रेसच्या खटपटीस यश येऊन, सरकारच्या कायदेकौन्सिलांत लोकांनीं निवडलेले प्रतिनिधि असावेत, असा कायदा पास झाला. त्याप्रमाणें मुंबई कारपोरेशनचे वतीनें नामदार मेथा हे मुंबई इलाख्याच्या कौन्सिलचे सभासद झाले. त्या ठिकाणीं नामदारांनीं केलेली लोकसेवा त्यांच्या नांवास शोभण्यासारखी आहे. मेथासाहेब हे आज बारा वर्षें सतत सभासद असून मुंबई इलाख्यातर्फे ते इंडिया सरकारचे कायदेकौन्सिलचेही दोन वेळ सभासद झाले होते. नामदार गोपाल कृष्ण गोखले यांच्या सारखा तरूण व होतकरु गृहस्थ आपल्या बुद्धिबलानें जनतेपुढें येत आहे असें दिसून आल्याबरोबर त्यांनीं वरिष्ठ कौन्सिलांतील आपल्या जागेचा राजीनामा दिला; व

गोखल्यासारख्या तरुणास योग्य संधी दिली, ही त्याच्या थोर स्वभावाची उत्तम साक्ष आहे. वरिष्ठ कौन्सिलांतील त्यांनीं केलेली कामगिरी सर्वविश्रुतच. आहे. विशेषतः पोलिसआक्टांत सुधारणा करण्यासंबंधी मसुदा ज्या वेळीं कौन्सिलपुढें आला, त्यावेळीं त्यांनीं केलेल्या लोकसेवेचा विचार केला असतां, आपल्या मुंबई इलाख्यातर्फे काम करण्यास नामदार मेथा सारखे लोकाग्रणी पैदा होतात हें पाहून मनाला एकप्रकारचा अभिमान वाटतो.

महात्मा ए. ओ. ह्युम यानें वार्धक्यामुळें कॉंग्रेसचें काम पाहण्याचें सोडून दिलें तेव्हांपासून मेथा साहेब यांच्याच धोरणानें राष्ट्रीय सभेचें काम चाललें आहे. आपल्या ह्या लोकनायकाचा संमान सरकारानेंही वेळोवेळीं केला आहे. नुकतेंच राजेसाहेबांच्या जन्मदिवशीं झालेल्या पदवीदानसमारंभांत नामदार मेथा यांस सरकारांनीं ' नामदार सर फेरोजशाहा एम् मेथा, के. सी. आय. ई. केलें आहे. परमेश्वर करो आणि नामदार सर फेरोजशाहा मेथा यांस, सदरहु मिळालेल्या मानाचा उपभोग घेण्याकरितां दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो ! व त्यांच्या हातून या आर्यमातेची सेवा निरंतर घडो ! असें चिंतून हा चरित्र-लेख पुरा करतों.



दादाभाई नवरोजी-

JW. C. P. P.

१६

दादाभाई नवरोजी

इंग्लिश अमदानीच्या प्रारंभीं पाश्चिमात्य शिक्षणानें एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पना मनांत उद्भवून आमरणांत एकनिष्ठपणानें देशसेवा करण्याचें व्रत ज्यांनीं स्वीकारलें त्या सर्वांत दादाभाई प्रमुख होत.

आजमित्तीस साठ वर्षांहून अधिक कालपर्यंत देशहित करीत असलेल्या ह्या महात्म्याचें चरित्र इतकें हृदयंगम व बोधप्रद आहे कीं, नियमित स्थलांत तें विस्तारपूर्वक कथन करणें प्रायः अशक्यच आहे. विस्तृत चरित्र वाचण्याची जर कोणाची इच्छा असेल तर त्यानें इ. स. १८८९ सालीं मुंबईसमाचार छापखान्यांत प्रसिद्ध झालेली ' हिंदुस्थानांतील प्रसिद्ध देशभक्त ' ह्या नांवाची माला पाहिली असतां अंशतः तरी ती इच्छा तृप्त होण्याचा संभव आहे. वस्तुतःपाहतां हेंही चरित्र असावें तसें विस्तृत आहे असें नाहीं. बॉसवेलनें जान्सनचें चरित्र लिहिलें आहे त्याप्रमाणें कोणी तरी हिंदुस्थानवासीयानें ह्या नरपुंगवाचें चरित्र लिहून आपलें व आपल्या चरित्रनायकाचें नांव चिरकालीन करून ठेवावयास पाहिजे होतें; व प्रत्यहीं घडलेल्या गोष्टींचें टिपण करून ठेवण्याची वहिवाट शेटजींची असल्यामुळें, हा योग घडून येणें अशक्यही नव्हतें. परंतु, दुर्दैवानें बऱ्याच वर्षांचीं टिपणें नष्ट झाल्यामुळें सध्यां तरी विस्तृत चरित्राची अपेक्षा करणें व्यर्थ होय.

दादाभाईचा जन्म मुंबईस इ. स. १८२५ च्या सप्टेंबर महिन्यांत चवथ्या तारखेला झाला. कमींतकमी सहाशे वर्षांमधील तरी ह्यांच्या पूर्वजांकडे पारशी जातींतील धर्मगुरूचा अधिकार असे. दादाभाई चार वर्षांचे झाले नाहींत तोंच दुर्दैवानें त्यांचे वडील निवर्तले: तथापि ह्या प्रसंगानें पडलेला दुहेरी बोजा संभाळण्याचें सामर्थ्य त्यांच्या आईत होतें. आपल्या मुलानें पुढें नांवालौकिकास चढावें अशी दृढ इच्छा बाळगणाऱ्या ह्या स्त्रीनें नेकीनें संसारयात्रा आक्रमण्यास लागणारें अवश्य शिक्षण आपल्या मुलास देण्यांत

यत्किंचितही कसूर केली नाहीं. ती जरी स्वतः शिकलेली नव्हती तरी खऱ्या शिक्षणाचें महत्त्व तिच्या मनांत प्रथमपासूनच पूर्णपणें बिनलें होतें. ती आपल्या मुलाला मोठ्या प्रेमानें दादी ह्या नांवानें हाक मारी. "दादीला शाळेंतील व घरांतील शिक्षणाचा पूर्ण फायदा मिळावा ह्मणून तिचे सारखे प्रयत्न चालू असत. अशा रीतीनें ह्या स्त्रीनें आपली जबाबदारी मोठ्या कळकळीनें व उत्कृष्ट तऱ्हेनें पार पाडली. व सुदैवानें आस्थापूर्वक पाणी घालून वाढविलेल्या झाडास उत्तम फळें आलेलीं पाहण्यास ती पुष्कळ दिवस वाचलीहि.

एलफिन्स्टन पाठशाळेंत असतां दादाभाईची विलक्षण हुशारी दिसून आली; तीबद्दल त्या वेळच्या "विद्यामंडळानें" सुद्धां प्रशंसा केली आहे. ह्या पाणीदार विद्यार्थ्याच्या बुद्धिमत्तेची त्यांस चांगली परीक्षा झाली होती असें दिसतें. इ. सन १८५४ सालीं एलफिन्स्टन कॉलेजांतील गणित विषयाच्या अध्यापकाची जागा त्यांस त्या वेळीं देण्यांत आली. ह्या "विद्यामंडळानें" काढलेले उद्गार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. "गणित विषयाचें बरेच दिवस लक्ष्यपूर्वक अध्ययन करून व पाठशाळेंतील आपलीं कर्तव्यें उत्तम रीतीनें बजावून ह्यांनीं जी प्रतिष्ठा मिळविली आहे तीमुळें ह्यांस अधिक उद्योग करण्यास उत्तेजन येईल अशी आमची खात्री आहे. ह्यांस मिळालेला मान फार मोठा आहे." आणि खरोखरच ह्या प्रांतांत तरी एतद्देशीयाला कॉलेजांतील वरिष्ठ अध्यापकाची जागा मिळणें हा निःसंशय बहुमान होय. मुंबई इलाख्यांतील विद्याखात्याच्या इतिहासांत ही विषेश महत्वाची गोष्ट होय.

सन १८४९ पासून १८५५ पर्यंत आपल्या ज्ञातींत सामाजिक व शिक्षणात्मक बाबतींत सुधारणा घडवून आणण्याची खटपट दादा भाईंनीं चालविली. "ज्ञानप्रकाशक मंडळी" "इराणीफंड" "बाम्बे जिम्नाझिअम् !" "फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट ," नेटिव जनरल लायब्ररी, "स्टूडंटस लिटररी अँड सायंटिफिकसोसायटी" इत्यादि संस्था स्थापण्याचें बरेंचसें श्रेय दादा–भाईकडे आहे. हे फार धूर्त असल्यामुळें नवीन सुधारणा अमलांत आणतांना आरंभीं त्या सर्व लोकांना ग्राह्य होणार नाहींत हें ते जाणून होते. लोकांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर सुधारणा दडपावी अशा मताचा अंगीकार त्यांनीं कधींच केला नाहीं. ह्या विचारसरणीमुळें त्यांच्या प्रयत्नांस थोडेंबहूत यश आलें. उद्दिष्ट कार्य साधण्याकरतां कैसो रावजी शापुरजी व

नवरोजी फरदुनजी ह्या दोन प्रसिद्ध गृहस्थांच्या साहाय्यानें दादाभाईनीं रास्त-गोफ्तार नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें. सुधारणाविषयक मतें प्रतिपादन करण्याचें हें वर्तमानपत्र जोमदार साधन झालें. देशी भाषेंत स्वतंत्र व भारदस्त विचारांच्या वर्तमानपत्रांचा पाया वस्तुतः पाहतां रास्त गोफ्तारानेंच घातला म्हटलें तरी चालेल. दुसऱ्यांच्या आचारविचारांबद्दल योग्य आदर ठेवणें हा ह्या पत्राचा बाणा असे. शिवाय, सार्वजनिक हिताहिताच्या बाबतींत आपआपसांतील जातिभेद व धर्मभेद विसरून जाऊन सर्वांनीं एक जुटीनें वागणें अवश्य आहे असले उदात्त विचार ह्या पत्रांतून वारंवार येत असत. अशा प्रकारची प्रगल्भविचारसरणि ह्या पत्राची असल्यामुळें, त्याकाळच्या सर्व देशी पत्रांत ह्या पत्रानें लवकरच उत्कृष्ट लौकिक संपादन केला. परंतु अलीकडे कांहीं वर्षें ह्यापत्राचें चालकत्व विपरीत विचारांच्या गृहस्थांच्या हातीं गेल्यामुळें हा लौकिक कायम राहिला नाहीं ह्याबद्दल वाईट वाटतें. काब्राजी शेट नुकतेच निवर्तल्यामुळें ह्या पत्राचीं सूत्रें पुन्हा एकवार दुसऱ्याच्या हातीं गेलीं आहेत; तेव्हां आतां ह्या पत्राचें धोरण आहे असेंच कायम राहतें किंवा पूर्ववत् होतें हें अद्यापि पाहणें आहे. काब्राजींच्या कारकीर्दींत ह्या पत्रांतील विचार एकदेशी व कोत्या बुद्धीचे असत. प्रचलित राजकीय विषयांचें विवेचन दादाभाईनीं घालून दिलेल्या उदात्त तत्त्वांवर होत नाहीं. ह्यामुळें साहजिकच हे विचार लोकांना ग्राह्य होईनातसे झाले आहेत.

इ० स० १८५५ सालीं विद्याव्यासंग सोडून दादाभाई व्यापारांत शिरले. ह्याच्यापूर्वी खुद्द लंडनमध्यें कांहीं पारशी लोकांनीं एक कंपनी काढून व्यापार चालविला होता. ह्या कंपनीला जाऊन मिळण्याकरितां दादाभाईनीं ह्या.च-सालीं हिंदुस्थान सोडलें. परंतु, एवढ्या अल्प कालांत त्यावेळच्या सर्व पुढाऱ्यांमध्यें प्रमुखत्वाचा मान त्यांस मिळाला होता. तसेंच केवळ आपल्या ज्ञातिबांधवानांच नव्हे तर मुंबईतील इतर सर्व जातींच्या लोकांस ते ह्यावेळीं प्रिय झाले होते. विलक्षण तऱ्हेची चलाख बुद्धिमत्ता, विवादपटुत्व, ज्ञानबद्ध भाषण, भाषानैपुण्य व आनंदप्रद वर्तन, ह्या गुणांनीं त्यांचें वजन सर्वांवर पडून सर्वांच्या ठिकाणीं त्यांच्याविषयीं आदरबुद्धि उत्पन्न झाली होती. त्याचप्रमाणें त्यांचें खाजगी व बाह्य आचरण अगदीं निर्दोष असे. अशा गुणवान् पुरुषानें इंग्लंडमध्यें राहून अधिक उपयुक्त होण्याची इच्छा धरावी ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ज्यांच्या ज्यांच्याशीं म्हणून शेटजीचा संबंध येईल त्या सर्वांनीं त्यांची

चहाच करावी असा कांहीं त्यांच्या नशीबाचाच गुण दिसतो. फार मेहनत करून व्यापारांत त्यांनीं यश संपादन केलें हें खरेंच; पण त्याहीपेक्षां स्वभूमीची सेवा करण्यांत त्यांनीं जिवापाड श्रम केले. स्वातंत्र्यसुखाचा पूर्ण आस्वाद घेणाऱ्या इंग्लिशलोकांमध्यें जाऊन राहिल्यानें आपल्या अंगभूत शक्तींचा हिंदुस्थानच्या वतीनें दादाभाईस चांगला उपयोग करतां आला. ह्या देशाच्या राज्यकारभारांत सुधारणा व्हावी ह्या हेतूनें सुरू झालेल्या राजकीय चळवळीचें बीज प्रथमत: ह्यांनींच पेरलें. सिव्हलसर्व्हिस परीक्षेंत युरोपियनांबरोबर टक्कर मारण्यास एतद्देशीयांस जी सवलत मिळाली तिचें श्रेय दादाभाईच्या अव्याहत खटपटीला आहे. इंडिआआफीसाशीं सतत १० वर्षे भांडून अखेरीस त्यांनीं स. १८७० सालीं एक कायदा करून घेतला; ह्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांस एकपंचमांश जागा तरी हक्कानें मिळत आहेत.

तसेंच, जॉनडिकिन्सन व दुसऱ्या थोड्या हितेच्छु इंग्लिश गृहस्थांच्या साहाय्यानें ह्यांनींच प्रथम " लंडन इंडिअन सोसायटी " नामक संस्था स्थापन केली. इंग्लंडला गेल्यानंतर पहिल्या बारा वर्षांत तर त्यांनीं लंडनमध्यें राहून हिंदुस्थानासंबंधीं सर्व राजकीय प्रचलित प्रश्नांची माहिती इंग्लिशलोकांस करून देण्याची अतोनात खटपट केली. हिंदुस्थानांतील लोकांचीं गाऱ्हाणीं व मागणें इंग्लिश लोकांच्या कानावर घालण्याची संधि त्यांनीं कधींहि वाया जाऊं दिली नाहीं. हाच उद्देश पूर्णपणें सिद्धीस जाण्याकरतां त्यांनीं " इस्ट-इंडिआ असोसिएशन " नांवाची दुसरी सभा स्थापन केली. व ह्या सभेच्या चिटणिशीचें काम आपण स्वत: पतकरलें. हिंदुस्थानच्या लोकांशी सहानुभूति बाळगणाऱ्या सर्व विद्वान् व नामांकित इंग्लिशलोकांस एकत्र जमवून त्यांच्याकडून आपलीं गाऱ्हाणीं ऐकविणें हें कांहीं लहानसहान काम नाहीं. ही राजकीय संस्था भक्कम पायावर उभारली जावी ह्मणून त्यांनीं फार श्रम सोसून आपला वेळ खर्ची घातला इतकेंच नाहीं तर पैशाचीहि झीज सोसली. ह्या संस्थेंत दादाभाईचें अंग प्रमुखत्वानें असल्यामुळें इंदूरच्या महाराजांसारख्या कांहीं संस्थानिकांची द्रव्यद्वारा अनुकूलता संपादन करतां आली. इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन देशांचें हिताहित एकच आहे अशा समजुतीवर स्थापलेल्या ह्या संस्थेचा हेतु इंग्लिश व इंडियन ह्या दोघांसही सारखाच संमत झाला ह्यांत आश्चर्य नाहीं. परंतु, अलीकडे हा मूळचा उद्देश विसरला

जाऊन आंग्लोइंडिअन लोकांच्या स्वार्थविषयक गोष्टींचा फक्त ऊहापोह करण्याचें हें एक स्थळ होऊन बसलें आहे. ह्या वस्तुविपर्यासाबद्दल दादाभाईस फार वाईट वाटतें. ह्याप्रमाणें, दादाभाईंनीं केलेली देशसेवा फार महत्त्वाची असल्यामुळें, सन १८६९ सालीं ते हिंदुस्थानांत आले तेव्हां इंग्लंडांतून नुकतेच परत आलेले, व त्यांची कामगिरी स्वतः पाहिलेले फेरोजशहा मेथा ह्यांच्या खटपटीनें, त्यास कांहीं द्रव्य अर्पण करण्यांत आलें.

इ. स. १८७१–७२ सालीं पार्लमेंटच्या कमेटीपुढें दादाभाईंची साक्ष झाली. त्यावेळीं हिंदुस्थानदेश अत्यन्त दरिद्री झाला आहे ही गोष्ट त्यांनीं प्रमुखपणानें कमिटीपुढें मांडली. ह्याच जबानींत त्यांनीं स्वतः गोळा केलेल्या माहितीवरून, असें सांगितलें कीं ह्या देशांतील दर माणसाचें उत्पन्न सालीना २० रुपयांवर पडत नसून कर मात्र तीन रुपये द्यावा लागतो. इतर देशांच्या मानानें हा कर थोडा दिसतो खरा, पण उत्पन्नाच्या मानानें तो असह्य आहे; असा त्यांचा मुद्दा होता. दर तीस वर्षांनीं जमिनीची मोजणी करणें रयतेच्या दृष्टीनें घातक आहे अशीही त्यांनीं तक्रार केली; व त्रावणकोरसारख्या एत्तद्देशीय संस्थानांतल्या लोकांची स्थिति ब्रिटिश मुलखांतील लोकांच्या स्थितीहून पुष्कळ पटीनें चांगली आहे असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. उघडच आहे कीं एत्तद्देशीयसंस्थानांतून लोकांकडून कराच्या रूपानें जें घेतलें जातें तें दुसऱ्या कोणत्या तरी रूपानें लोकांकडेच परत जातें. परंतु, इंग्लिशसरकारची गोष्ट तशी नाहीं. हिंदुस्थानांतून प्रतिवर्षी इंग्लंडला जी संपत्ति जात आहे तिचा ओघ कधींही मागें फिरत नाहीं. इंग्लंडहून हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति फारच निकृष्ट असतां इंग्लंडचा राज्यकारभार फार कसोशीनें चालविला जातो व हिंदुस्थानचा खर्च उधळेपणाचा असतो. ही अत्यंत अश्लाघ्य गोष्ट दादाभाईंनीं कमिटीच्या कानावर घातली. इतकें असूनही मोठ्या पगाराच्या हुद्याच्या जागा एतद्देशीयांस न मिळाल्यामुळें हा उधळेपणाचा राज्यकारभार लोकांस फारच दुःसह होतो; हेंही त्यांनीं कमिटीपुढें निक्षून सांगितलें. १८५८ सालच्या राणीच्या जाहीरनाम्यांतील वचनें सरकाराकडून कधींही पाळलीं जात नाहींत ही गोष्टहि त्यांनीं उघडकीस आणली.

दादा भाईंच्या जबानींतील दुसरी महत्वाची बाब ह्मटली ह्मणजे हिंदुस्थान सरकार जें कर्ज काढतें त्यास ब्रिटिश सरकार जामीन रहात नसल्यामुळें

हिंदुस्थानसरकाराला विनाकारण जास्त व्याज भरावें लागतें. ब्रिटिशसरकारचें पैचें नुसकान नसतां नुसत्या आपल्या शब्दांनीं हिंदुस्थानचा नफा करण्यास इंग्लिश सरकार तयार नाहीं ह्यावरून इंग्लिश मुत्सद्यांची सहानुभूति किती आहे हें चांगलें व्यक्त होत आहे. हिंदुस्थान सरकारचें दिवाळें वाजण्याचा संभव फार कमी आहे; आणि यदाकदाचित् वाजलें अशी कल्पना केली तरी तें ब्रिटिश सरकारच्या कृतीनेंच वाजणार आहे. कर्जाची हमी घेण्यास इतकी दिरंगाई कां असावी समजत नाहीं. इंग्लिश सावकारांना हल्लीं व्याज मिळतें त्याहून कमी मिळेल एवढी मात्र त्यांत अडचण आहे खरी. ज्या वेळेस राष्ट्रीय व प्रांतिक सभांचें अस्तित्व कोणाच्या स्वप्नींही नव्हतें; काउन्सिलांत एतद्देशीयांचा प्रवेश होत नव्हता; व एकंदर राजकीय चळवळीला विशेष जोम नव्हता अशा काळीं, ह्या महत्वाच्या व कठीण विषयांचें मुद्देसूद विवेचन करणें ह्मणजे लहानसहान बुद्धिमत्तेचें काम नाहीं. त्यावरून दादाभाईंची मातृभूमीबद्दलची आस्थाहि दिसून येते. ह्याशिवाय त्यांच्या जबानींत इतर पुष्कळ गोष्टी आल्या आहेत, परंतु त्या सर्वांचा नुसता उल्लेख करणेंहि येथें शक्य नाहीं.

ह्या नंतर, पुढल्या वीस वर्षांत दादाभाईंनीं हिंदुस्थानांतील महत्वाच्या राजकीय विषयांवर ग्रंथ लिहून ते प्रसिद्ध केले. स. १८७६ त त्यांचें " हिंदुस्थानचें दारिद्र्य " बाहेर पडलें व स. १८८० सालीं " हिंदुस्थानची स्थिति " हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. ह्या ग्रंथांतून दादाभाईंचा उत्साह, शहाणपणा व दूरदृष्टि हीं पदोपदीं व्यक्त होतात. हिंदुस्थान दरिद्री होत चाललें आहे हें सिद्ध करण्या करतां दादाभाईंना चिम्मेपणानें किती सतत श्रम करावे लागले, ह्याची कल्पना त्यांच्या कांहीं विशेष परिचित स्नेह्यांवांचून इतरास होणें कठीण आहे. दादाभाईंचा हा सिद्धांत अर्थातच इंडियाआफिसांतील मुत्सद्यांस पसंत पडला नाहीं. त्यांनीं तो खोडून टाकण्याचा निष्फल प्रयत्न केला. तथापि सरशेवटीं लॉर्ड-रिपन गव्हर्नरजनरल ह्यांस तो मान्य करावा लागला. ह्या शिवाय लंडन येथें ईस्ट इंडिआ असोसिएशनपुढें त्यांनीं राजकीय विषयांवर निबंध वाचले ते निराळे.

ह्या वीस वर्षांतली विशेष स्मरणीय गोष्ट ह्मटली ह्मणजे बडोद्याच्या हतभागी , मल्हारराव महाराजांच्या दिवाणगिरीवर दादाभाईंस जावें

लागलें ही होय. हें काम त्यांनीं किती निःस्पृहपणानें पार पाडलें हें महाराष्ट्रांत तरी सर्वांस विदित आहे. संस्थानांतील निरनिराळ्या जातीच्या लोकांस त्यांनीं सारखेंच वागवलें. ते स्वतः पारशी असूनही कोणत्याहि विशिष्ट जातीकडे त्यांचा निष्कारण ओढा असल्याचें कधींहि दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं. ते जाण्याच्यापूर्वी लाच खाण्याचा प्रघात संस्थानांत बराच चालू होता. परंतु, दादाभाईंनीं ह्याचा अगदीं मोड करून टाकला. ह्याप्रमाणें दादाभाईंची कर्तबगारी व निष्कलंक आचरण वर्णनीय असूनहि त्यांचें व रेसिडेंटाचें जमेना व रेसिडेंटाच्या एकतर्फी रिपोर्टावरून मुंबई व हिंदुस्थानसरकार ह्यांचीं मनें ह्यांच्याविषयीं विनाकारण कलुषित झालीं. तथापि पुढें त्यांची चुकी लक्ष्यांत आली व हिंदुस्थानचे सेक्रेटरी लॉर्ड सालिसबेरी ह्यांनीं स्वतः दादाभाईंच्या कामगिरीची तारीफ केली.

इंग्लिशांची राज्यपद्धति इतकी अनुदार बुद्धीची आहे कीं कितीहि निःसीम देशाभिमानी असो; कालानें त्याच्यावर निराशेचें आवरण पडल्यावांचून रहात नाहीं. इंग्लिशांच्या अमदानींत आजपर्यंत जेवढे ह्मणून मातृभूमीची सेवा करण्यास पुढें आले त्या सर्वांवर एकेकदां तरी निराशेची छटा पडली आहे. दादाभाईंची सुद्धां एकाकालीं तीच स्थिति झाली होती. स. १८८० पासून १८८४ पर्यंत दादाभाई मुंबईस असतां मुद्दाम उकरून काढलेलें अफगाण युद्ध, व गव्हर्नरजनरल लॉर्ड लिटन ह्यांची अनुदार कारकीर्द ह्यांगोष्टींनीं त्यांचा अगदीं उत्साहभंग झाला व सार्वजनिक कामांत पडण्याचें बहुतेक त्यांनीं वर्ज केलें. सुदैवानें, लवकरच रिपन साहेबांचा अम्मल प्रजेस सुखावह होऊं लागल्या कारणानें दादाभाईंच्या मनांत पुनः आशांकुर फुटला व पूर्ववत् ते उत्साहानें काम करूं लागले. ह्या कामीं ह्मणजे सार्वजनिक कामाकडे दादाभाईंचें मन वळवण्यांत फेरोजशाहा मेथा व कै० तेलंग ह्यांनीं बरेच परिश्रम केले. ह्याच सुमारास मुंबईस त्यांच्या खटपटीनें "प्रेसिडेन्सी असोसिएशन" नामक सभा स्थापन झाली. ह्या सभेचें सार्वजनिक कामाला अद्यापि चांगलें साहाय्य होत आहे. मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड रे असतां त्यांनीं १८८५ मध्यें दादाभाईंची कौंसिलांत नेमणूक केली. व दुसऱ्याच सालीं कलकत्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेचे त्यांस अध्यक्ष नेमण्यांत आलें. १८८७ च्या जानेवारी महिन्यांत पब्लीकसर्व्हिस कमिशन पुढें साक्ष



प्रीन्सिपाल गोपाळ गणेश आगरकर (कै.)

M.C.C.P.P.

१७

प्रि. गोपाळराव आगरकर.

आधीं सामाजिक कीं आधीं राजकीय ? हा वाद कांहीं आजचा नाहीं. आमच्या पुण्यपत्तनांत तर या वादामुळें एकवेळ रणें माजून राहिलीं होतीं व अखेर राष्ट्रियसभेच्या मंडपांतून सामाजिक परिषदेस अर्धचंद्र मिळण्यांत त्यांचें पर्यवसान झालें. राष्ट्रियसभा, सामाजिक परिषद, औद्योगिक प्रदर्शन, धर्मपरिषद वगैरे ज्या संस्था आजमित्तीस आपल्या देशांत अस्तित्वांत आल्या आहेत त्या सर्वांचें आदिकारण समाज हेंच होय. यावरून हें उघड होतें कीं अशा तऱ्हेच्या बहुविध कर्तव्याची जबाबदारी ज्या समाजाच्या शिरावर पडत आहे तो समाज सुसंस्कृत व सुधारणाभिमुख असला पाहिजे; आधीं या कर्तव्यांतून आपण पार पडूं व मग समाजसुधारणेकडे सवडीनुसार लक्ष्य पुरवूं ह्मणणें ह्मणजे घोड्यापुढें गाडी जोडण्यासारखेंच उपहासास्पद होय. या वादाशीं आह्मांस येथें कांहीं कर्तव्य नाहीं. परंतु, आमच्या चरित्रनायकांनीं जी भूमिका स्वीकारिली होती तिचा या प्रश्नाशीं विशेष निकट संबंध असल्यामुळें या प्रश्नाचा उल्लेख आरंभींच करणें इष्ट आहे असें आह्मांस वाटलें. आमच्या चरित्रनायकानें समाजसुधारणेचा जो मार्ग स्वीकारला होता तो सुविचारानें, दूरदर्शित्वानें व समाजधुरीणास अवश्य लागणाऱ्या स्वार्थनिरपेक्षतेनेंच स्वीकारिला होता. ज्या महात्म्याचे हातून अस्खलित मनोधैर्यानें, संकटपरंपरेस न जुमानणाऱ्या दृढ निश्चयानें, व निरुपम स्वार्थनिरपेक्षतेनें सुशिक्षित समाजाची मनोभूमि कर्तव्यानुरूप तयार करण्याचें महत्कार्य उत्तम रीतीनें शेवटास नेलें; त्याचें चरित्र महाराष्ट्रीयांस, किंबहुना हिंदुस्थानवासीयांस बोधप्रद व मनोविनोद करणारें व्हावें हें साहजिकच आहे. असो; आमचे चरित्रनायक गोपाळराव आगरकर यांचा जन्म इ. १८५६ मध्यें सातारा जिल्ह्यांत कऱ्हाड येथें झाला. यांचें मूळ गांव कोंकणांत आगरी हें होय. परंतु, कऱ्हाड तालुक्यांतील टेंभू या गांवीं त्यांचे आजोबा प्रथम रहावयास आले व तेव्हांपासून गोपाळरावांच्या जन्मापर्यंत व पुढेंही बरींच वर्षे तेंच स्थळ त्यांच्या घराण्याचें कायम वसतिस्थान झालें. गोपाळरावांचे घरची

फारच गरिबी होती. परंतु, गोपाळरावांपुढें या गरीबीचें कांहींच चाललें नाहीं. मन थोर असलें ह्मणजे मनुष्य परिस्थितीचा दास न बनतां तिलाच आपलें दास्यत्व स्वीकारण्यास लावून ज्या दिशेस आपणास जावयाचें आहे त्या दिशेस स्वतःच्या आंगच्या पराक्रमानें तिलाच तो खेंचून नेतो व आपलीं इष्ट कार्यें तिच्या हातून घडवून आणतो. गोपाळरावांच्या चरित्रांत हीच गोष्ट पूर्णपणें सिद्ध होते. गोपाळरावांचे वडील ज्याप्रमाणें साल्स व एकमार्गी होते त्याप्रमाणेंच त्यांच्या मातोश्रीही भक्तिपरायण व नेमधर्मरत असत. गोपाळरावांचे वडील गणुआण्णा व त्यांच्या मातुश्री सरस्वतीकाकू यांमध्यें फारच उत्तमतऱ्हेचें प्रेम असे. संतति चांगली निपजण्यास आईबापांचें परस्परांवरील प्रेम विशेषतः कारणीभूत असतें असें ह्मणतात तें प्रस्तुत ठिकाणीं उत्तमतऱ्हेनें प्रत्ययास आलें. गरीबी असल्यामुळे गोपाळरावांचें प्राथमिक शिक्षण कऱ्हाड येथें त्यांच्या आजोळीं झालें. त्यांचे मातुल दत्तोपंत भागवत हे त्यांशीं समवयस्क असल्यामुळें या दोघांचेंही शिक्षण अखेरपर्यंत बहुधा एके ठिकाणींच झालें. कऱ्हाडांत गोपाळरावांच्या इंग्रजी तीन यत्ता पूर्ण झाल्या त्यावेळेस त्यांचें वय सुमारें बारा तेरा वर्षांचें होतें. इतक्या अल्प वयांत सुद्धां त्यांच्या भावी महत्त्वाचीं चिन्हें स्पष्टपणें दृग्गोचर होऊं लागलीं. निरनिराळ्या विषयांवर भाषण करून आपलीं मतें स्वतंत्र रीतीनें आपले शिक्षक व सहाध्यायी यांपुढें मांडणें, अनेक विषयांवर स्वतंत्र निबंध लिहिणें वगैरे गोष्टींस याच वयांत त्यांनीं आरंभ केला. बहुतेक मुलांचें जें वय केवळ खेळांत जावयाचें, ज्या वयांत साधारण मुलांस पुरता निरोप सांगतां येण्याचीहि मारामार, ज्या वयांत बहुतेक मुलें बहुधा आईच्या पाठीशींच असणार, त्या वयांत गोपाळरावांनीं निबंध लिहून व भाषणें करून आपल्या शिक्षकांकडून व सहाध्यायांकडून वाहवा मिळवावी इतकेंच नव्हे परंतु "या मुलानें हीं भाषणें कोणत्या तरी ग्रंथांतून पाठ केलीं असावींत किंवा हे लेख कोणत्या तरी ग्रंथांतून उतरले असावेत" अशी शंकाही त्यांनीं श्रोत्यांच्या मनांत उत्पन्न करावी हें त्यांच्या पुढील लौकिकाचेंच द्योतक होतें. बुद्धि इतकी तरतरित व तेजदार होती तरी शारीरिक सामर्थ्याकडे यांचें कधींही दुर्लक्ष्य झालें नाहीं. व्यायोगानें शरीर सुदृढ होतें असे व्यायामाचे खेळ त्यांस फार आवडत. कुशाग्रबुद्धि, शरीरसामर्थ्य व दृढनिश्चय हे तीन गुण असल्यावर इष्टार्थसिद्धीची कधींही उणीव पडत नाहीं.

कऱ्हाड मुक्कामीं यांच्या इंग्रजी तीन यत्ता पूर्ण झाल्या, हें वर सांगितलेंच आहे. यावेळीं गोपाळरावास एका संकटानें गांठलें. यांच्या घरची गरीबी असल्यामुळें ज्या गृहस्थांनीं अहेतुकबुद्धीनें यांच्या शिक्षणाची जबाबदारी आपणांवर घेतली होती ते त्यांचे आजोबा विष्णुपंत भागवत इहलोक सोडून गेले ! अर्थात गोपाळरावास आपल्या शिक्षणाची रजा घ्यावी लागून तेथील मुनसिफ कोर्टात उमेदवारी पत्करावी लागली. गोपाळरावांसारख्या मानी व साहसप्रिय स्वभावास अल्प काळांतच या खर्ची करणाऱ्या उमेदवारीचा वीट आला; व आपला शिक्षणक्रम पुढें चालविण्यासाठीं रत्नागिरीस आपल्या एका आप्ताकडे जाण्याचा त्यांनीं संकल्प केला. या संकल्पानुरूप ते रत्नागिरीस तर गेलेच. परंतु, ज्यांवर त्यांची भिस्त होती त्यांचे हातून आपणास विशेषसा उपयोग होणार नाहीं हें गोपाळरावांस तेव्हांच समजून आलें. अशा निराशेच्या स्थितींत एखाद्या मनुष्यानें डोळे चोळीत पुनरपि ' उमेदवारी ' चाच रस्ता सुधारला असता. परंतु, धैर्य हा त्यांचा विश्वासू व प्रेमळ आप्त असल्यामुळें त्याच्या सहाय्यानें तेही या प्रसंगांतून पार पडले. दुसऱ्या कित्येक आप्तांनीं ह्यांस ऐन वेळीं दगा दिला असेल, कित्येक जिवलग मित्रांनीं आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांचा त्याग केला असेल; परंतु या आप्तानें, या जिवलग मित्रानें अखेरपर्यंत त्यांची अनन्यभावें सेवाच केली. रत्नागिरी येथें असतांना केवळ विद्यार्जनार्थ त्यांनीं अनेक तऱ्हेचे हाल सोसले. चरितार्थ चालविण्याकरितां त्यांस वारही लावावे लागले, कधीं कधीं माधुकरी वृत्तीही पत्करावी लागली, व कधीं कधीं अगदीं कनिष्ट दर्जाच्या सेवाधर्माचाही त्यांना स्वीकार करावा लागला; तरी इतक्या सर्व अडचणींतून पार पडून त्यांनीं रत्नागिरी येथें इंग्रजी पांच यत्तेपर्यंत आपलें शिक्षण पुरें केलें; व पुढें रत्नागिरीची रजा घेऊन ते कऱ्हाडांत गेले.

कऱ्हाडांत त्यांचे दुसरे मामा नोकरीस हो[illegible] त्याचे येथें राहून त्यांनीं प्रवेश परीक्षेपर्यंतचा आपला अभ्यास संपवून आपल्या वयाच्या १९ व्या वर्षी ते या परीक्षेंत पास झाले. गोपाळरावजींच्या आयुष्यांतला हा काळ खरा कसोटीचा होता. अकोला हायस्कुलामध्यें असतांना त्यांचे शिक्षक रा० सा० महाजनी यांची व त्यांची बोलाचाली होऊन ' आपणांसारखा एम. ए. होईन तर नांवाचा गोपाळ ' असें त्यांनीं त्यांस उत्तर दिलें होतें. तें उत्तर खरें करण्याचा समय आतां आला. उत्तर त्यांनीं सहज दिलें; परंतु गरीबी स्थितीमुळें तें पुरें करणें मात्र तितकें सोपें नव्हतें. उच्च शिक्षणाचें काम केवळ बुद्धिसामर्थ्यानेंच होणें अशक्य

असतें. त्यास द्रव्यसामर्थ्यही आवश्यक असतें. परंतु थोर माणसांच्या इष्ट कार्यांत केवळ द्रव्याभावानें कधींही अडथळा येत नाहीं. द्रव्य हें साध्य नसून साधन आहे अशी त्यांची पूर्ण खात्री असल्यामुळें जे कांहीं द्रव्य हातीं येईल त्याचा संग्रह करण्याची त्यांस कधींही वासना होत नाहीं. त्याचा व्यय ते उद्यांची काळजी न करितां इष्टकार्यार्थ बिनधोक करितात. ज्या शिक्षकांस त्यांनीं हें उत्तर दिलें तेही खरे विद्वान् असल्यामुळें त्यांस त्या उत्तरानें क्रोध तर आलाच नाहीं, परंतु हा मुलगा विलक्षण पाणीदार आहे अशीच त्यांची खात्री झाली व तदनुरूप त्यांनीं आपल्या मित्रांच्या सहाय्यानें उच्च शिक्षण प्राप्त करून घेण्याच्या त्याच्या मनोवृत्तिस प्रोत्साहन देण्यासाठीं या पाणीदार विद्यार्थ्यास ९० रुपयांची रकम दिली. ही रकम घेऊन गोपाळराव पुण्यास आले व त्यांनीं डेकन कॉलेजमध्यें आपलें नांव घातलें. परंतु ९० रुपयांची रकम किती दिवस पुरणार ! ती रकम लवकरच नाहींशी झाली. परंतु, उच्चशिक्षणाविषयींची उत्कट इच्छा व तीस लागणारा दृढ निश्चय हीं दिवसेंदिवस दुणावत चालल्यामुळें असल्या क्षुल्लक अडचणींचा वरचेवर पाडाव होत गेला. गोपाळरावांचे जवळचे ९० रुपये संपतात न संपतात तोंच त्यांस पुणे येथील **वक्तृत्वोत्तेजक सभेंतील** ४० **रुपयांचें व डेकन कॉलेज ग्यादरिंगचें** ९० रुपयांचें अशीं दोन बक्षिसें मिळालीं. त्यांपैकीं पहिलें बक्षिस भाषणाबद्दल व दुसरें लेखाबद्दल मिळालें होतें. दोन्ही प्रसंगीं त्यांच्या विषयप्रतिपादनाची व विलक्षण कोटिक्रमाची सारखीच तारीफ झाली. तरी यापुढेंही दारिद्र्याशीं त्यांचा एकसारखा झगडा सुरू होताच. कधीं कधीं तर त्यांच्याजवळ विश्वविद्यालयांतील परीक्षेच्या फीपुरतेही पैसे नसत ! परंतु केरूनाना छत्रे वगैरे मंडळीच्या साहाय्यानें त्यांची ही अडचण दूर होई. अशा अडचणींतून अखेर ते १८७८ मध्यें आपल्या वयाच्या २२ व्या वर्षी बी० ए० ची परीक्षा पास झाले. व त्यांस कॉलेजमध्येंच फेलोची जागा मिळून १८८० मध्यें ते एम्. ए. ची परीक्षाही पास झाले. याप्रमाणें अनेक अडचणी व हाल अपेष्टा सोसून लहानपणचें आपलें वचन त्यांनीं खरें करून दाखविलें.

कॉलेजमध्यें असतांना आपल्या समवयस्क मित्रांबरोबर गोपाळरावांचा अनेक विषयांवर वाद होई. त्यावेळीं प्रत्येकानें देशी कापड वापरावें असा उपदेश ते आपल्या सहाध्यायांस करीत. कॉलेजमध्यें अनेक ग्रंथांचें परिशीलन झाल्यामुळें गोपाळरावांच्या बुद्धीस चौकसपणाची जोड मिळून केवळ अमुक

एक मोठा ग्रंथकार एक विशिष्ट मत प्रतिपादन करीत आहे ह्मणूनच तें ग्राह्य-मानावें असें त्यांस कधींही वाटत नसे. पुढील आयुष्यक्रमांत त्यांनीं जो लौकिक व लोकादर संपादन केला त्याची गुरुकिल्ली याच गोष्टींत आहे. याचवेळेसच गोपाळरावास दम्याचा विकार जडला. हा विकार त्यांच्या कुलांत आनुवंशिक होता. आजपर्यंत त्यांच्या आयुष्यक्रमांत दुसऱ्या हजारों अडचणी आल्या तरी शारीरिक आपत्तीनें त्यांस कधींही त्रास झाला नव्हता. त्यांच्या दृढ निश्चयाची कसोटी पाहण्याकरितांच कीं काय दम्यानें त्यांवर विद्यार्थिदशेंतच झडप घातली ! परंतु निघर्षण, छेदन, ताप, आणि ताडन या चौकडींतूनही सुवर्ण आपलें तेज व आपली थोरवी कायम राखतें. याप्रमाणेंच गोपाळरावांसारख्या असाधारण बुद्धीच्या व उदात्त मनोवृत्तीच्या माणसाची गोष्ट असते. बी. ए. च्या वर्गांत असतांना गोपाळरावांनीं गृहस्थाश्रमाचा अंगीकार केला. त्यांचा विवाह उंब्रेज येथील मोरभट केळकर यांची कन्या अंबूताई इजशीं झाला. अंबूताईचें सासरचें नांव यशोदाबाई असें ठेविलें. गृहस्थाश्रमी झाल्यानंतर आतां आपण कोणत्या मार्गानें चरितार्थ चालवावा ह्या प्रश्नाचा विचार गोपाळरावास एम्. ए. झाल्यानंतर करावा लागला नाहीं. कारण विद्यार्जन झाल्यानंतरचा आयुष्यक्रम त्यांनीं आधींच आंखून ठेविला होता.

गोपाळराव विश्वविद्यालयाची सर्वांत श्रेष्ठ परीक्षा पसार झाले होते. व त्यांच्या वेळचा काळ हल्लींपेक्षां निराळा होता, या गोष्टींचा विचार केला ह्मणजे विद्यार्जन ह्मणजे विपुल द्रव्यार्जनाचें साधन अशीच जर त्यांची समजूत असती तर त्यांना थोडयाच दिवसांत बरेंच द्रव्य संपादन करून रावसाहेब किंवा रावबहादुर होतां आलें असतें. परंतु येवढया प्रबल मनोवृत्तींच्या गृहस्थांस अशा क्षुद्र महत्वाकांक्षेचा कधीं स्पर्शही न व्हावा हें अगदीं स्वाभाविक होतें. ह्मणूनच दावणीला बांधून घेऊन दरमहा मिळणाऱ्या चंदीवर पुष्ट न होतां आपल्या बुद्धीचा व विद्येचा उपयोग देशकार्यार्थ व्हावा असा त्यांचा दृढ निश्चय झालेला होता. आपले प्रौढपणचे स्नेही ना० बाळ गंगाधर टिळक यांच्या समवेत कालेजांत असतांनाच त्यांनीं हा संकल्प ठरविला होता. पाश्चिमात्य विद्येमध्यें प्राविण्य मिळविलेले जे एतद्देशीय लोक असतील त्यांनींच एकेक विषयांत पारंगतता मिळवून स्वदेशबंधूंस पाश्चात्य शिक्षण अल्पायासानें व अल्प खर्चांत संपादन करितां येईल अशी तजवीज करणें इष्ट आहे असें त्यांचें ठाम मत झालें असल्यामुळें पुण्यास अशा तऱ्हेची एक पाठशाळा

काढावी असा त्यांचा संकल्प झाला. टिळक १८७९ मध्यें एल्. एल्. बी. झाले. परंतु त्या वर्षी आगरकरांची एम्. ए. ची परीक्षा नापास झाली. यामुळें वर ठरलेल्या संकल्पानुरूप नवीन पाठशाळा निघाली त्यावेळेस गोपाळरावांस शाळेच्या उत्पादकांस मिळतां आलें नाहीं. कै० विष्णु शास्त्री चिपळूणकर यांनाही त्याच वेळेस सरकारी नोकरी सोडावी लागली व त्यांचाही हेतु एखाद्या खासगी शिक्षणसंस्थेंत नोकरीस राहून चरितार्थ चालविण्याचा होता. नेटिव्ह इन्स्टिटयूशनचे हेडमास्तर कै० भावे यांजबरोबर त्यांचें बोलणें होऊन भावे यांच्या शाळेंत नोकरीस राहण्याचा त्यांचा निश्चयही झाला होता.

ही गोष्ट बळवंतराव टिळक व गोपाळराव आगरकर यांस कळतांच त्यांनीं शास्त्रीबुवांची गांठ घेऊन त्यांनाही आपला बेत कळविला; व शास्त्रीबुवांचाही वरील बेतास रुकार पडून टिळक, नामजोशी व शास्त्रीबुवा या तिघांनीं १८७९ मध्यें न्यु इंग्लिशस्कूलची स्थापना केली. यावेळेस टिळक व नामजोशी हे विशेषेंकरून शाळेकरितां द्रव्यसहाय्य जमविण्याकरितां जीवापाड मेहनत करीत. यावेळेसच रा. गोळे व आगरकर यांचा स्नेह जमून गोळेही वरील मंडळीस मिळाले; व दुसऱ्या वर्षी एम. ए. ची परीक्षा झाल्यावर आपल्या वचनानुरूप गोपाळराव शाळेच्या व्यवस्थापकांपैकीं एक झाले. त्यांचे पूर्वीच रा. आपटे, धारप हेही शाळेच्या चालक वर्गास येऊन मिळाले होते.

सदर पाठशाळेनें पुढें जो मोठा लौकिक संपादन केला त्याचें श्रेय कमी जास्ती अंशांनीं या सर्व चालकांकडे येतेंच; परंतु विशेषेंकरून टिळक नामजोशी या जोडीचे शाळेच्या उत्कर्षाबद्दलचे परिश्रम वाखाणण्यासारखे होते. भाषण, लेखन व पाठशाळा हीं लोकशिक्षणाचीं मुख्य तीन साधनें होत. त्यांपैकीं पाठशाळेस या गृहस्थांकडून प्रारंभ झालाच होता. शास्त्रीबुवा आपल्या ' निबंधमालेच्या ' द्वारें आपले विचार लोकांस कळवीतच होते; परंतु, खुद्द शाळेशीं संबंध असलेलें एखादें ' पत्र ' असावें असें चालकवर्गास वाटल्यावरून ' केसरी ' व ' मराठा ' या दोन वर्तमानपत्रांचा जन्म झाला. त्यांपैकीं पहिलें शुद्ध मराठी व दुसरं इंग्रजींत सुरू करण्यांत आलें. त्यापैकीं केसरींत बहुतेक गोपाळराव आगरकरच लिहीत व त्यांचेच नांवावर तें प्रसिद्ध होत असे. ' मराठ्या ' चे टिळक संपादक होते; तरी त्यांत चालकवर्गापैकीं बहुतेक सर्व मंडळी आळीपाळीनें लिहीत. आगरकरांच्या लेखनकौशल्यानें दिवसेंदिवस ' केसरी ' ची भरभराट होऊं लागली.

केसरीस जन्मून पुरीं दोन वर्षें झालीं नाहींत तोंच त्यावर एक भयंकर प्रसंग गुजरला. केसरीमध्यें कोल्हापूर दरबारासंबंधानें कांहीं मजकूर प्रसिद्ध झाला होता त्यावर दरबारानें काम चाउविलें; आपल्या लेखाच्या पुष्ट्यर्थ केसरीकडून योग्य पुरावा न आल्यामुळें केसरी व मराठा यांचे संपादकांस डोंगरी येथील कारागृहांत १०१ दिवस काढावे लागले; चिपळूणकरांचें देहावसान याच समयास झालें; अशा रीतीनें पाठशाळेवर व सदर वर्तमानपत्रांवर एकाच वेळीं चोहोंकडून अनर्थ कोसळले; अशा वेळेस बाकीचे चालक वरील त्रयीप्रमाणेंच विद्वान् व दृढनिश्चयी नसते तर या संस्थांना बहुतेक राम ह्मणण्याचीच पाळी आली असती ! केसरी व मराठा यांच्या संपादकांनीं आपल्या बुद्धिमत्तेनें व देशहिताच्या कळकळीनें महाराष्ट्रीयांचें कसें प्रेम संपादन केलें होतें हें कारागृहांतून मुक्तता झाल्यावर त्यांची लोकांनीं मिरवणूक वगैरे काढून जो आपला आनंद व्यक्त केला यावरून उत्कृष्ट रीतीनें सिद्ध होत आहे.

१८८२ सालापासून केसरीची पुनः पुर्ववत् भरभराट होऊं लागली व वयपरत्वें याचा आकारही मोठा झाला; सामाजिक, धार्मिक, राजकीय, औद्योगिक वगैरे सर्व प्रकारच्या लेखांनीं केसरी समाजाची सेवा करूं लागला. इकडे शाळेचा उत्कर्षही दिवसेंदिवस एकसारखा वृद्धिंगत होऊं लागला. १८८३ मध्यें दक्षिणविद्याप्रसारक मंडळी स्थापन होऊन तिच्या अंतर्व्यवस्थेबद्दल कायदे कानू वगैरे करण्यांत आले; व मंत्रिमंडळ व व्यवस्थापक यांची नेमणूक करण्यांत आली. शाळेवर सर्वांचा विश्वास बसून तीस मोठमोठ्या देणग्या मिळूं लागल्या व हळूंहळूं शाळेची सांपत्तिक स्थितिही समाधानकारक होत चालली. व लवकरच ह्मणजे १८८५ मध्यें शाळेला कॉलेजचा एक वर्ग जोडण्याची परवानगी मिळाली. अशा प्रकारें विद्यार्थीदशेंत संकल्पमात्र असलेल्या गोष्टी खऱ्या अस्तित्वांत आलेल्या पाहून टिळक आगरकरांस किती वरें आनंद झाला असेल ? विश्वविद्यालयाच्या परीक्षांतही शाळेचे व कॉलेजच्या क्लासचे उत्तम निकाल होऊं लागले व आतां आपणांस पूर्ण कॉलेज काढण्याची परवानगी मिळेल अशी चालकांस बळकट आशा वाटूं लागली. अशा रीतीनें वातावरणांत जिकडे तिकडे शांतता होऊन शाळेचे उत्पादक धन्यता मानून घेत आहेत तोंच एक भयंकर तुफान होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं ! चरित्राच्या आरंभीं आह्मीं ज्या गोष्टींचा निर्देश केला होता त्यासंबंधानेंच या दोन गृहस्थांमध्यें मतभेद होऊन एकास. शाळेचा

निरोप घ्यावा लागला व दुसऱ्यास केसरीपत्राशीं आपला संबंध तोडावा लागला ! सामाजिक आधीं कीं राजकीय सुधारणा आधीं हा वाद आगरकर टिळकांमध्यें प्रथम पासूनच होता; परंतु, त्यास आतां विशेष उग्र स्वरूप आलें. सामाजिक सुधारणा प्रधान असून ती सर्वांच्या पूर्वी झाली पाहिजे असें आगरकरांचें मत होतें हें सांगावयास नकोच.

त्या मताचें पोषण 'केसरी' त योग्य प्रकारें होईल असें त्यांस वाटेना. बहुजनसमाजास गुदगुल्या करणारे लेख लिहून 'केसरी' ची अभिवृद्धि करावयाची किंवा केवळ सुशिक्षित समाजास वळण लावण्यासारखे लेख लिहून 'केसरी' स खरें समाजधुरीणत्व द्यावयाचें येवढे दोनच मार्ग 'केसरी' च्या अभिवृद्धीस शक्य होते; त्यांपैकीं पहिला विशेष आयासाचा नव्हता. बहुजनसमाजाची मनधरणी करण्याकरितां त्यांच्याच तंत्रानें आपल्या लेखणीस वळण द्यावयाचें येवढेंच कार्य पहिल्या मार्गाचें अवलंबन करणारास करावयाचें असतें; लेखणी व आपलीं मतें यांची दृष्टादृष्ट कधींही होऊं द्यावयाची नाहीं येवढेच काय ते त्यांत आयास असतात. उलट पक्षीं दुसरा मार्ग अधिक सरळ व प्रामाणिक खरा; परंतु, त्यांत अडथळे फार. जनसमूहाच्या आणि विशेषतः अशिक्षित लोकांच्या रोषास भीक न घालतां आपणास जें वाटेल तें निर्भीडपणानें कागदावर लिहिणें यांस बरीचशी विद्वत्ता, तीहून अधिक दृढनिश्चय व त्याहीपेक्षां ज्यास्त स्वार्थत्याग यांची जरूर असते. गोपाळराव हे या तीन गुणांचें माहेरघरच होत. लोकप्रियतेच्या पिंजऱ्यांतून आपली सुटका करून घेऊन अनिरुद्ध संचार करण्याची बुद्धि या नरकेसरीस व्हावी हें स्वाभाविकच होतें. ती संधी या प्रसंगीं आली व ती आमच्या चरित्रनायकानें वायाही जाऊं दिली नाहीं.

याचप्रसंगीं 'केसरी' व 'मराठा' यांचा दक्षिणविद्याप्रसारक मंडळीशीं कोणत्याही तऱ्हेचा संबंध नाहीं असें जाहीर रीतीनें प्रसिद्ध करण्यांत आलें. यानंतर सदर पत्राशीं टिळक आगरकरांचाच कायतो संबंध राहिला. त्यांतही वर सांगितल्याप्रमाणें फूट पडून आगरकर यास केसरीशीं आपला असलेला संबंध कायमचा तोडून टाकावा लागला व त्यांनीं इ. स. १८८८ मध्यें आपल्या मताचें प्रकाशन करण्याकरितां सुधारकपत्र सुरू केलें. सुधारक हें नांव लोकांस आधींच अप्रिय झालें होतें; परंतु लोकांस काय वाटतें याची आगरकरांनीं कधींच पर्वा बाळगली नसल्यामुळें स्वमतास सर्वस्वी अनुरूप असेंच नांव त्यांनीं आपल्या पत्रास दिलें. व बहुजन समाजास अप्रिय असणाऱ्या

सुधारक पक्षाचेंच साम्राज्य जनतेवर होणार हें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठींच सुधारकाचा जन्म आहे हाच त्यांनीं 'सुधारक' काढण्याचा हेतु प्रसिद्ध केला होता. या त्यांच्या कृत्यांस प्रतिबंध करण्याचें प्रतिपक्षाकडून बरेच प्रयत्न झाले; परंतु अखेर ' सुधारका ' ची एकसारखी अभिवृद्धि होत गेली. प्रथम खडतर दिसणाऱ्या मार्गांतील अडथळे आपल्या अलौकिक लेखन कौशल्यानें व विद्वत्तेनें दूर करून त्यांनीं 'सुधारकास' लवकरच चांगल्या लौकिकास आणलें. आणि अल्पवयांतच सुशिक्षित समाजाचें त्यानें प्रेम संपादलें.

या दोन विद्वान गृहस्थामध्यें दुफळी झाली ही गोष्ट दिसण्यांत जरी वाईट दिसते तरी त्यापासून एकंदर जनसमूहाचा फायदाच झाला आहे. अमुक एक विशिष्ट मार्गाचें अवलंबन करण्यास समाजास कोणत्याही विषयाच्या दोन्ही बाजू कळणें अवश्य आहे. ' केसरी ' व सुधारक हीं दोन अगदीं विरुद्ध मताचीं प्रकाशक असल्यामुळें जनतेस सामाजिक विषयांचें सर्व बाजूंनीं परिशीलन करावयास सांपडलें, हा कांहीं लहान सहान फायदा नाहीं. आणि त्यांतत्यात्यांत अशा आणीबाणीच्या प्रसंगीं संमतिवयाचे कायद्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीस ' सुधारक ' अनुकूल होता व ' केसरी ' प्रतिकूल होता हें सांगावयास नकोच. संमतिवयाच्या अनुषंगानें या दोन पत्रांत अनेक सामाजिक विषयांची चर्चा होऊं लागली व दोघांचेंही खरें स्वरूप सुशिक्षित समाजाच्या पूर्णपणें नजरेस आलें. व थोड्याच अवधींत ' सुधारकास ४ हजार वर्गणीदार झालें ! केवळ सुशिक्षित ग्राहकांचाच विचार केला तर केसरीपेक्षांहि सुधारकाची लोकप्रियता वृद्धिंगत होत गेली असें ह्मणणें भाग येतें.

इ० स० १८९२ मध्यें रा० वामन शिवराम आपटे यांचेवर अकल्पित मृत्यूचा घाला आल्यामुळें गोपाळराव हे फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल झाले ' सुधारक ' निघाल्या दिवसापासून आनरेबल गोखले हे त्याचे सहकारी संपादक होते. विशेषेंकरून त्यांतील इंग्रजी लेख गोखल्यांचे असत. परंतु वेळ नसल्यामुळें त्यांस हें काम सोडून द्यावें लागलें. त्यानंतर रा० सीताराम गणेश देवधर हेही ' सुधारकां ' त लेख लिहूं लागले. आगरकरांच्या मृत्यूनंतर यांनींच हें पत्र चालविलें होतें; व रा० पटवर्धन हे त्यांचे सहाय्यकारी झाले. या दोघांच्या नांवावर जोंपर्यंत ' सुधारक ' पत्र प्रसिद्ध होत होतें तोंपर्यंत त्याचा एकसारखा उत्कर्षच होत होता. परंतु पुढें झाळा व वर्तमानपत्र यांची सरकारी कायद्यानें फारकत झाल्यामुळें 'सुधारका ' स हल्लींचें स्वरूप आलें.

गोपाळरावांसारखा मराठी लेखक फारच क्वचित सांपडेल. अगदीं ' जोड्या ' 'सारख्या क्षुल्लक विषयापासून तों भारदस्त सामाजिक विषयापर्यंत कोणताही विषय मनोरंजक, बोधप्रद व हृदयंगम करण्याची त्यांची हतोटी अपूर्व असे. सुधारकाचा अल्प काळांत जो मोठा लौकिक झाला त्याचें कारण हेंच होय. ' असलें वर्तमानपत्र चालविण्यास आपणांस अत्यायास पडतील, आह्मी तुह्माला त्राहि त्राहि करून सोडूं ' अशी प्रतिपक्ष्यानें घातलेली धास्ती निष्फळ झाली. सामाजिक विषयांमध्यें इतर सर्व विषयांचा अंतर्भाव होत असल्यामुळें ' सुधारकां ' तून मधून मधून राजकीय, औद्योगिक इत्यादि विषयही येत.

सुशिक्षित समाजास योग्य वळण लावून सुधारणेस योग्य दिशा दिल्यानें गोपाळराव हे लोकनायक या पदवीस सर्वस्वीं पात्र झाले होते. परंतु महाराष्ट्रीयांच्या दुर्दैवानें यांच्यामागें एका भयंकर रोगाचा ससेमिरा असल्यामुळें त्यांची शक्ति दिवसेंदिवस क्षीण होत चालली व अखेर त्यांस लेखणीची कायमची रजा घ्यावी लागली. केळकरांचा मृत्युलेख हाच आगरकरांचा 'सुधारकां ' तील शेवटचा लेख ! ' टाकांतून अर्थबोधक अक्षरें येत होतीं ' तोंपर्यंत त्यांनीं लेख लिहिण्याचें सोडलें नाहीं. दम्यानें त्यांस इतकें त्राहि त्राहि करून सोडलें होतें कीं वरील मृत्युलेख लिहितांनां त्यांनीं ' आह्मांस असेंच खितपत ठेऊन इतर मंडळीवरच काळ कां उड्या टाकतो ' असे उद्गार काढले ! दम्याचा रोग अधिक होऊन अखेर त्यांनीं १८९५ मध्यें १७ जून रोजीं आपला देह ठेविला !

गोपाळरावांचा देह इहलोक सोडून गेला तरी त्यांची कीर्ती त्यांचे मागे राहिली आहे. त्यांनीं लेखनद्वारा माराठीची जी सेवा केली आहे ती मराठी भाषेचें आस्तित्व जोंपर्यंत आहे तोंपर्यंत, अशीच राहणार यांत संशय नाहीं. त्यांनीं आपल्या सद्वर्तनानें महाराष्ट्रीयांस जो कित्ता घालून दिला आहे तोही पुढील पिढीस मार्ग दर्शविण्याला उत्तम उपयोगी पडेल. सत्यप्रीति, देशाभिमान, दृढनिश्चय, धैर्य व स्वार्थत्याग हे गुण त्यांचें अंगी पूर्णतेनें वास करीत होते. परिस्थितीचें सहाय्य नसतां केवळ आपल्या अंगच्या गुणाच्या जोरावर एकट्या मनुष्यास केवढें मोठें राष्ट्रकार्य करितां येतें हें त्यांनीं आपल्या उदाहरणानें सर्व महाराष्ट्रास दाखविलें. महाराष्ट्रांतील सुधारणेचा इतिहास पुढें मागें जर कोणास लिहिण्याचा प्रसंग येईल तर त्यांस गोपाळरावास अग्रस्थान देणें भाग पडेल.



गोपाळरावजी भिडे.

M. C. C. Press, Poona.

१८

गोपाळराव भिडे.

हल्लीं आपल्या हिंदुस्थान देशाची स्थिति इतकी गुतागुतीची झाली आहे कीं तींतून त्याची सुटका कोणत्या उपायांनीं करावी या बद्दलची निश्चित दिशा अद्यापही ठरवितां येत नाहीं ! असें जरी आहे तरी इतकें खास आहे कीं शुद्ध हेतूंनीं ज्यास अमुक मार्गानें गेल्यास आपल्या देशाचा तरणोपाय आहे असें वाटतें त्यानें विचार करून किंवा दुसऱ्यास उपदेश करून स्वस्थ न वसतां त्या मार्गाचें अवलंबन करून मनःपूर्वक कळकळीनें राष्ट्रसेवा करण्यास प्रयत्न केल्यास ते अंशतः तरी सफल होतील यांत तिळमात्र संशय नाहीं. आधीं स्वार्थापलीकडे दृष्टि जाण्याची मारामार; यदाकदाचित् गेलीच तर हल्लींच्या राष्ट्रकार्यांच्या एकच गर्दीमुळें ती दहा दिशांस फाकणार; आणि मग एकना धड भाराभर चिंध्या हा परिणाम ठेवलेलाच ! सामाजिक, राजकीय, औद्योगिक, धार्मिक इत्यादि अनेक चळवळी सध्यां राष्ट्रहिताच्या नांवाखालीं मोडत आहेत. ह्या सर्व चळवळी जशा एका नांवाखालीं मोडत आहेत तसे तिचे पुरस्कर्तेही एकच आहेत. यामुळें उत्साह, कळकळ व उद्योग यांचा विभाग होऊन सर्वांचीच सारखी तारंबळ उडत आहे व चोहों बाजूंस निराशेचा सारखाच पगडा बसत आहे. या चळवळींच्या पुरस्कर्त्यांवर प्रथम जनसमूहाचा विश्वास व पूज्य भाव असतो तो कमी होऊन त्यांची सहानुभूतिही मंदावत जाते आणि तितक्याच प्रमाणानें पुढाऱ्यांचेही प्रयत्न शिथिल होत जातात ! लोकांचा अविश्वास, प्रयत्नांची निष्फळता व ती पासून उत्पन्न होणारी निराशा यांपासून जर पुढाकार घेणाऱ्या माणसांस आपली सुटका करून ध्यावयाची असेल तर त्यास एकच उपाय आहे, आणि तो हा कीं सर्वांनींच सर्व गोष्टींस हात घालण्यापेक्षां एक एक कार्य हातीं घेऊन त्यांतच आपलें बुद्धिसामर्थ्य व दीर्घोद्योग यांचा व्यय करावा. असें केल्यानें अनेक कार्यें एकाच मनुष्यास करावीं लागल्यामुळें त्यांचा जो गोंधळ उडून जातो तोही उडणार नाहीं व इष्ट कार्य

तडीस नेण्यास हवे तितके प्रयत्न करावे लागले तरी ते करण्यास उत्साह व हिंमत यांची वाण कधींही पडणार नाहीं.

आपल्या आयुष्यक्रमानें ज्यानें हें तत्त्व जगाच्या पूर्ण निदर्शनास आणलें त्या पुरुषाचे चरित्रास प्रस्तुत चरित्रमालिकेंत स्थळ मिळणें किती आवश्यक आहे हें निराळें सांगावयास नकोच. असे पुरुष गोपाळराव भिडे हे होत. यांचा जन्म कल्याणजवळ मोहपाडा गांवीं इ. स. १८४३ त झाला. याचे वडिलांचें नांव हरभट व मातुश्रीचें नांव सगुणाबाई. हरभटाचा धंदा भिक्षुकीचा असल्यामुळें त्यांनीं गोपाळास वेदाध्ययन करावयास लाविलें. गोपाळ १३ वर्षांचा झाला तों त्याची संहिता पूर्ण झाली. थोर लोकांच्या प्रौढपणास व समजुतीस लहानपणींच आरंभ होतो असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. सांप्रतच्या मनूंत केवळ वेदाध्ययनानें आपला निर्वाह नीट रीतीनें चालणार नाहीं असें वाटून गोपाळ कल्याण येथें आपल्या आतेच्या घरीं राहिला व तेथें त्यानें आपलें मराठी शिक्षण संपविलें; आपल्या बरोबरीचीं मुलें पुढें इंग्रजी शिकावयास लागलीं हें पाहून गोपाळासारख्या तेजस्वी मुलास आपणही इंग्रजी शिकावें अशी बुद्धि व्हावी हें साहजिकच होतें; परंतु, घरीं अठरा विश्वे दारिद्र्य! कोणाचा आधार नाहीं आणि इंग्रजी शिक्षण जमावें कसें! ही अडचण गोपाळापुढें दत्त ह्मणून उभी राहिली; परंतु गोपाळासारख्या दृढनिश्चयी मुलापुढें या अडचणीचें कांहींच चाललें नाहीं. आणि खरोखरच आहे कीं, अडचणींचा परिणाम सर्वांवर सारखाच होत असता तर आजपर्यंत जगांत कोणतेंही महत्कृत्य घडून येण्याची आशाच नव्हती !-या अडचणी साधारण मनुष्याच्या गतीस प्रतिबंध करितात; असाधारण माणसास त्या उत्कर्षाचीं द्वारेंच होत. या द्वाराचें उद्घाटन करण्याचें ज्यांस सामर्थ्य असतें तेच लोक मोठेपणा पावतात. वरप्रमाणें इंग्रजी शिकण्याचा निश्चय झाल्यावर गोपाळानें मधुकरी मागण्याचा निश्चय केला ! या निश्चयानें तो पुणे येथें गेला. इतक्यांत एक विशेष आश्चर्याची गोष्ट घडून आली ती अशीः— आपल्या कुलांतील कोणा मुलावर विद्यार्जनाकरितां दारोदार तुकडे मागण्याचा प्रसंग आला आहे ही बातमी सरस्वतीबाई भिडे नांवाच्या एका करारी स्त्रीस समजली. या बाईचा व गोपाळाचा कोणत्याही तऱ्हेचा आप्तसंबंध नव्हता. फक्त आडनांव एक होतें; परंतु, फक्त तेवढयाच कारणावरून या

बाईनें पुण्यास आपल्या भावाच्या येथें गोपाळाची सोय केली ! यांचें नांव कुलाभिमान !

चांगल्या व थोर मनांच्या लोकांचे आप्तही थोर व चांगले असतात असा कांहीं नियम नाहीं; बहुधा याच्या उलटच प्रकार दिसून येतो ! ज्याचें चांगलेपण त्याचेंच बरोबर ! वरील साध्वीनें गोपाळाची याप्रमाणें व्यवस्था लाविली खरी. परंतु गोपाळास तेथें फारच जाच व्हावयास लागला व अखेर त्यांस तें घर सोडणें भाग पडलें. तरी मधुकरी मागून त्यांनीं अभ्यास चालविलाच होता. परंतु, केवळ भिक्षेवर किती दिवस निभणार ! अखेर विश्रामबागच्या शाळेंतील शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यास शाळेची रजा घ्यावी लागली ! व केवळ चरितार्थाकरितां स्वतःच्या इच्छेविरुद्ध त्यांस बडनेरा येथें तारमास्तरची २५ रुपयांची नोकरी धरावी लागली. या सुमारास ह्मणजे १८६३ सालीं नागपुरास अद्याप रेल्वे झाली नव्हती. रेल्वेचें काम चालू होतें. त्यावेळेस नागपूर येथें एक हुशार तरतरित व कर्तव्यदक्ष माणसाची जरूर होती ह्मणूनच गोपाळरावास तेथें बदलण्यांत आलें. या गुणाबद्दल तेथें त्यांचा चांगला लौकिक होऊन त्यांची सर्वतोमुखीं वाहवा व्हावयास लागली. त्यावेळीं नागपुरास लोसाहेब डे० कमिशनर होते. गोपाळरावांची तरतरी पाहून त्यांस फार समाधान झालें. व असा बुद्धिमान् मनुष्य रेल्वेसारख्या गचाळ खात्यांत रखडत पडावा हें त्यांस आवडेना. या साहेबांनीं गोपाळरावास दरमहा ५० रुपयांची जागा देऊं करून त्यांस आपलें शिरस्तेदार केलें. येथपासून गोपाळरावांच्या भावी उत्कर्षास प्रारंभ झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ते डे. कमिशनरसाहेबांचे शिरस्तेदार झाले असें ह्मणण्यापेक्षां पुढें जो त्यांचा लौकिक झाला त्याचेच ते शिरस्तेदार झाले असेंच ह्मणणें सयुक्तिक दिसेल.

मे. लो साहेब हे स्वतः फार कडक व व्यवस्थित अमलदार असत. परंतु गोपाळरावांची कामाची शिस्त पाहून त्यास वारंवार समाधानच होई. गोपाळरावावर वरिष्ठपणाचा अधिकार गाजविण्याचा त्यांस कधीं प्रसंगच आला नाहीं. शिरस्तेदारीच्या कामामुळें उर्दू व इंग्रजी या दोन भाषाचें मराठींत भाषांतर करण्याची गोपाळरावास चांगलीच हतोटी साधली. व त्यांची उत्तरोत्तर बढती होत चालली. त्यांची लोअरची परीक्षा पास झाली.

होतें त्यांचें त्यांस पूर्वशिक्षण मिळणें आवश्यक होतें, ह्मणूनच कीं काय त्यांचें मन शेतीकडे वळलें. हिंदुस्थानाची शेती निकृष्ट अवस्थेस पोहोंचली ती सुधारण्यास काय उपाय योजिले पाहिजेत या गोष्टीकडे त्यांचें लक्ष्य गेलें व त्यांनीं शेतीसाठीं नागपूरजवळ मोहगांव व कोलणासूर अशीं दोन गांवें खरेदी घेतलीं. त्याठिकाणीं गोरक्षणाचा अनुभव त्यांनीं लहान प्रमाणावर सुरूं केला. हल्लींच्या विदेशी राज्यांत मांसाशनासाठीं गाईचा संहार झपाट्यानें होत जाऊन तितक्याच वेगानें हिंदुस्थानची शेती रसातळास पोहोंचत आहे. गोपाळरावजींचें या गोष्टीकडे लक्ष्य गेलें; परंतु या चळवळीस सार्वजनिक स्वरूप दिल्यास वर सांगितलेल्या स्थितीमुळें त्यास सरकारची अनुकूलता मिळणार नाहीं या विचारानेंच त्यांनीं गोरक्षणाचें काम खासगी रीतीनें सुरूं केलें. या कामांत त्यांनीं एक लाख रुपयांची पदरमोड करून गोधनवृद्धीनें शेतीची अभिवृद्धि कशी होते हें आपल्या उदाहरणानें सर्व लोकांस दाखविलें. गोपाळरावांची गोधनाबद्दल सर्वत्र कीर्ति झाली. गाय असो, किंवा खोंड असो त्यांच्या दावणींत रोडकें जनावर कधींही दिसावयाचें नाहीं असा नागपूरप्रांतीं त्यांचा लौकिक झाला. गोपाळरावांच्या या कृत्याचें अनुकरण करून प्रत्येक हिंदु आपल्या कुलदेवतेची शपथ घेऊन निदान एक गाय तरी पाळण्याबद्दल निश्चय करील व अशा रीतीनें घरोघरीं गोपाळ निपजतील तर शेतीचा केवळ जीव कीं प्राण अशा ज्या कोट्यवधि गाई आज मित्तीस कसायाच्या सुरीनें चरचर कापल्या जात आहेत त्यांस जीवदान दिल्यासारखें होऊन हिंदुस्थानच्या निकृष्ट स्थितीस पोहोंचलेल्या शेतीचेंही पुनरुज्जीवन हां हां ह्मणतां होईल.

धार्मिकदृष्ट्या गाईचें महत्त्व किती आहे हें निदान हिंदूस तरी सांगितलें पाहिजे असें नाहीं. आरोग्यदृष्ट्याही तिचें महत्त्व कमी नाहीं. किंबहुना बाल्यावस्थेंत दुर्दैवानें मातृहीन झालेल्या असंख्य अर्भकांचें प्राणरक्षण या गोमातेच्या हातूनच होतें ! अशा रीतीनें जीवितास आधारस्तंभ असलेल्या गोमातांचा प्रत्यहीं वध होत असलेला निमुटपणें पाहणें ह्मणजे निदान हिंदूस तरी मातृद्रोहाचेंच पातक जोडण्यासारखें नव्हे काय ? शेतीचें प्रधान साधन बैल होत हें सांगावयास नकोच. शेतकरी लोक दुष्काळांत माणसांपेक्षांही बैलांस अधिक जपतात. गाईच्या संहारास हिंदकडून प्रतिबंध न झाला तर शेतीस आवश्यक असणाऱ्या बैलांची उपज बंद होऊन हिंदूस उपाशी मरण्याची वेळ येईल!

परमार्थ बाजूस राहिला; परंतु स्वार्थासाठीं तरी प्रत्येक हिंदूनें गोरक्षणाबद्दल प्रयत्न करणें अवश्य नाही काय ? गाईच्या होणाऱ्या संहारास प्रतिबंध न झाल्यामुळें हल्लींच्या पिढीस शरीराचा उत्साह वाढविणारें दूध मिळेनासें झालें आहे. हल्लींची प्रजा अशक्त निपजण्यास जी अनेक कारणें आहेत त्यांत गोवध हें मुख्य होय. गाईइतकें उपयुक्त जनावर दुसरें क्वचितच सांपडेल. गोदुग्धच काय परंतु गोमूत्र व गोमय यांचीही आरोग्यदृष्ट्या व धार्मिकदृष्ट्या असलेली उपयुक्तता हिंदुमात्राच्या कुटुंबास प्रत्यहीं प्रत्ययास येत आहे. अशा उपयुक्त जनावराचा आपल्या डोळ्यांदेखत वध होत असतां स्वस्थ बसणें ह्मणजे स्वार्थघात करण्यासारखें आहे हें प्रत्येक हिंदू ह्मणविणारानें लक्ष्यांत वागविलें पाहिजे.

हल्लींच्या मनूंत गोवधाचा प्रतिबंध करण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं प्रत्येकानें गाय ही कुटुंबांतील एक माणूस समजून तिचें रक्षण केलें पाहिजे. हिंदुस्थानसारख्या शेतीवर चरितार्थ असणाऱ्या देशांत बैलांच्या व ह्मणूनच शेतीच्या जननीची हयगय होणें परिणामीं अनर्थकारक होणार आहे. गोपाळरावांचा गोधनवृद्धीचा क्रम चालू असतां गोरक्षणाच्या सार्वजनिक चळवळीस प्रारंभ झालाच होता. गोपाळराव या चळवळींत कां शिरलें नाहींत याचीं कारणें वर दिलींच आहेत. तरी खासगी रीतीनें चाललेले यांचे प्रयत्न यत्किंचितही कमी झाले नव्हते. गोधनाच्या जोरावर पंचवीस कुटुंबे पोसण्याचें गोपाळरावांच्या अंगांत सामर्थ्य आलें ! आपल्या जिनगीचा अशा रीतीनें सद्व्यय केल्याचें निदान ब्राह्मणांत तरी हें पहिलेंच उदाहरण होय.

याच वेळेस पंडित शिवदयाळ व पंडित शिवचरण या नांवाचे दोन कान्यकुब्ज ब्राह्मण गोरक्षणाची सार्वजनिक चळवळ करीत होते; व त्यांच्या प्रयत्नास दिवसेंदिवस यशही बरेंच येत चाललें; आपल्या मंडळीस गोपाळराव भिडयांसारखा पुढारी मिळाला तर गोरक्षणाच्या कामास उत्तम प्रकारचें सहाय्य होईल अशी या दोन गृहस्थांस खात्री वाटल्यावरून त्यांनीं गोपाळरावास त्याबद्दल विनंति केली. या विनंतीस गोपाळरावांनीं काय उत्तर दिलें हें सांगण्यापूर्वी वरील दोन गृहस्थांच्या सत्कार्याबद्दल चार शब्द लिहिणें आवश्यक आहे. या दोन गृहस्थांनीं गोरक्षणची चळवळ प्रथम १८८६ मध्यें सुरू केली. पंडित शिवदयाळ व पंडित शिवचरण हे कांहीं मोठेसे विद्वान् नव्हते; तरी राष्ट्रकार्याबद्दलची

त्यांची कळकळ प्रशंसनीय आहे. प्रथम गोरक्षणाचे त्यांचे प्रयत्न विशेषसे फलद्रूप होतील अशी त्यांस आशा वाटत नव्हती. उलट त्यांच्या उपदेशाचा कांहीं ठिकाणीं उपहासही व्हावयास लागला; परंतु आपण आरंभिलेलें कार्य शुद्ध असून राष्ट्रहिताचें आहे अशी त्यांची पूर्ण खात्री असल्यावरून त्यांनीं आपले प्रयत्न यत्किंचितही शिथिल होऊं दिले नाहींत. गोमातेबद्दल त्यांचीं अपूर्व श्रद्धा होती; व तीमुळेंच त्यांच्या मार्गांत अनेक संकटें आलीं तरी त्यांच्या योगानें या गृहस्थांच्या उत्साही वृत्तींत यत्किंचितही बदल झाला नाहीं ! गोरक्षणाबद्दल यांचे अंतःकरणांत खरी श्रद्धा व कळकळ असल्यामुळें त्यांच्या उपदेशानें हजारों लोकांच्या मनास द्रव येई. यांच्या प्रयत्नानें नागपूर प्रांतांत गोरक्षणाचें काम बरेंच झपाट्यानें होऊं लागलें याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

गोरक्षणाच्या सार्वजनिक चळवळीस सहाय्य करण्यास या गृहस्थांनीं गोपाळरावांस विनंति केली हें वर सांगितलेंच आहे. त्यानंतर गोपाळरावांनीं निरनिराळ्या देशांच्या शेतींचे रिपोर्ट मागवून त्या विषयाचा उत्तम अभ्यास केला; यामुळें त्यांची अशी खात्री झाली कीं, गोधनाची वृद्धि पद्धतशीर झाल्यास मांसाहारी लोकांतसुद्धां गुरांची उणीव पडत नाहीं. गोवधास प्रतिबंध करण्याचा अशक्य प्रयत्न करण्यापेक्षां गुरांची अभिवृद्धिच करणें अधिक श्रेयस्कर आहे असें त्यांचें ठाम मत झाल्यावरून त्यांनीं या गृहस्थांच्या विनंतीस मान दिला; व लवकरच ते गोरक्षणसभेचें अध्यक्ष झाले. गोरक्षणाचा गोपाळरावांनीं पुढाकार घेतल्यामुळें त्या चळवळीस एक नवीच दिशा लागली. पंडित शिवदयाळ, पंडित शिवचरण व गोपाळराव भिडे या त्रयीच्या प्रयत्नानें हिंदूचसे काय परंतु, कांहीं मुसलमानही या संस्थेचे सहाय्यकारी झाले ! गोरक्षणाचा उपदेश या तीन गृहस्थांपैकीं कोणीतरी करी; परंतु, गोमातेवर या तिघांची अशी कांहीं विलक्षण भक्ति होती कीं, गोमातेचें नांव निघतांच भर सभेंत त्यांच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वहात !

गोपाळराव या मंडळीस मिळाल्यानंतर त्यांनीं नागपूर येथें एक जंगी जाहीरसभा भरविली. त्या सभेचें अध्यक्ष नागपूर येथील प्रसिद्ध व्यापारी श्री. आप्पासाहेब बुटी हे होते. त्यावेळीं गोपाळरावांनीं तेथें जमलेल्या सर्व मंडळीस, गोरक्षणासंबंधानें उत्तम माहिती दिली. यांनीं या विषयाचा स्वतंत्र

रीतीनें अभ्यास केला असल्यामुळें यांच्या भाषणानें सुशिक्षित समाजाचेंही मन गोरक्षणाकडे वळलें व तेव्हांपासून गोरक्षणाची एकसारखी अभिवृद्धि होत चालली. गोपाळरावांच्या खटपटीनें व वजनानें या सभेस जेवढा लोकसमूह जमला होता तितका त्यापूर्वी कोणत्याही सभेस जमला नव्हता असें ह्मणतात! याप्रमाणें गोरक्षणसभेचें नायकत्व आपोआपच गोपाळरावांकडे आलें होतें तरी ते कोणतेंही काम पंडित शिवचरणलाल यांच्या सल्याशिवाय करीत नसत. गोरक्षणावर त्यांचें इतकें प्रेम होतें कीं आपल्या मागेंही आपली संस्था-चालावी या करितां त्यांनीं मरतेसमयीं ही संस्था नागपुरचे प्रमुख नगरवासी रा. सा. बळवंतराव महाजन व रा. सा. गोखले वकील यांचे हवाली केली आहे. या गृहस्थांच्या हातून संस्थेचा उत्तरोत्तर उत्कर्षच होत जाईल हें सांगा-वयास नकोच.

गोपाळरावांनीं गोरक्षणाचा शास्त्रीय दृष्ट्या विचार केला असल्यामुळें त्यांस या संस्थेंत सर्व जातींच्या लोकांची सहानुभूति मिळवितां आली; आणि त्यांच्या श्रमानें कांहीं मुसलमान लोकही या संस्थेचे आश्रयदाते झाले! योग्य दिशेनें काम करणारा असला ह्मणजे कोणत्याही कार्यांत जातिभेद आडवा येत नाहीं हें तत्व यावरून पूर्ण सिद्ध होतें. गाईची दलाली न घेण्याबद्दल हजारो महारांनींही शपथा घेतल्या! व याप्रमाणें गोरक्षणाच्या कामास सर्व बाजूंनीं प्रोत्साहन मिळूं लागलें. नागपूर प्रांतांतील कसायांचा धंदा बसला! व गोपाळरावांच्या परि-श्रमानें गोरक्षणाच्या संस्थेची फारच भरभराट झाली.

संस्थेची इतकी भरभराट झाली तरी ती स्वावलंबी होण्यास कांहीं तरी तजवीज केली पाहिजे हा विचार गोपाळरावांचे मनांत येऊन त्यांनीं एक गोरक्षण नांवाचा छापखाना काढला. गोरक्षणाचा उपदेश करण्याकरितां सर्व पुस्तकें व गोरक्षणसंस्थेचें इतर सर्व काम यांतच छापण्याची व्यवस्था झाली. या नवीन छापखान्यामुळें २५।३० मंडळीस चरितार्थाचें साधन मिळालें; छापखान्याचा खर्च भागून राहिलेल्या रकमेचा विनियोग गोरक्षणा-प्रीत्यर्थ करण्यांत यावा अशीही व्यवस्था ठरली. गोरक्षण संस्थेच्या शाखा नागपूरप्रांतात सर्वत्र स्थापन झाल्या. गोपाळरावांनीं नागपुरास एक स्वदेशी गिरणीही काढली; आणि या दोन्ही संस्था ह्मणजे छापखाना आणि गिरणी गोरक्षणसंस्थेच्या अनुषंगानें चालाव्यात अशी गोपाळरावांची योजना होती;

त्यांच्या मागें ही व्यवस्था तशीच चालू आहे कीं नाहीं हें पाहण्याचें प्रस्तुतचें स्थल नव्हे; गोपाळरावांनीं घालून दिलेली व्यवस्था हल्लीं तशी चालत नसली तरी त्याजबद्दल गोपाळराव जबाबदार नाहींत. गोपाळरावांनीं काढलेल्या संस्थांची अवनती होत असेल तर ती गोपाळरावांनीं घालून दिलेल्या व्यवस्थेचें अतिक्रमण झाल्यानेंच होणार आहे.

गोरक्षणाचा विषय राष्ट्रीयसभेनें हातीं ध्यावा अशाबद्दल गोपाळरावांनीं बरीच खटपट केली; परंतु गोरक्षण हा विषय राष्ट्रीयसभेच्या चालकांस एकदेशीयच वाटल्यामुळें त्या विषयास राष्ट्रीयसभेंत प्रवेश मिळाला नाहीं! आपल्या खटपटीचा असा परिणाम झालेला पाहून गोपाळरावांनीं असा विचार ठरविला कीं नागपुरास प्रतिवर्षी केवळ गोरक्षणाकरितांच एक राष्ट्रसभा भरवावयाची! परंतु मध्यंतरींच त्यांस मृत्यूचें बोलावणें आल्यामुळें त्यांचे हे उन्नत विचार जागच्या जागींच राहिले! गोरक्षणाचे कामीं गोपाळरावांचे एकंदर १॥ लाख रुपये खर्च झाले! या खर्चाचा मोबदलही त्यांस योग्य मिळाला. अशा रीतीनें एक जन्मांत स्वार्थ व परमार्थ यांची जोड घेऊन गोपाळराव हे सन १८९६ च्या फेब्रुवारीमध्यें इहलोक सोडून गेले!



ना. गोपाळ कृष्ण गोखले. सी-आय ई.

M. C. P. P.

१९

ना० गोपाळराव गोखले सी. आय. ई.

महत्वाकांक्षेबद्दल तत्वज्ञान्यांनीं कितीही तिरस्कार दाखविला तरी जगांत आजपर्यंत जीं कांहीं मोठीं कृत्यें झालीं आहेत त्यांपैकीं बहुतेकांचा उगम या मनोवृत्तीपासूनच झालेला आहे. आणि त्यांतून ज्या महत्वाकांक्षेशीं स्वार्थाचा बिलकुल संबंध नाहीं तिची जितकी प्रशंसा करावी तितकी थोडीच आहे. देशसेवा हेंच ज्या महत्वाकांक्षेचें ब्रीद व लोककल्याण हेंच ज्या महत्वाकांक्षेचें साध्य ती उदात्त महत्वाकांक्षा प्रत्येक राष्ट्रहितचिंतकानें आपल्या मनांत सदैव बाळगणें अगत्याचें आहे हें सांगावयास नकोच. महत्व हें सर्वांस हवेंच असतें; पण तें संपादन करणें मात्र सोपें नाहीं. उद्योग, बुद्धिमत्ता, दृढनिश्चय, स्वार्थत्याग इत्यादि गुणांच्या साहचर्यांशिवाय महत्वाची इच्छा कधींही साध्य होणार नाहीं. मनुष्यास जें महत्व येतें तें एकदम किंवा जादूनें येत नाहीं. इतर लोक ज्यावेळेस गाढ झोंपेंत घोरत असतात त्यावेळेस उन्नत पदाची इच्छा करणारा मनुष्य रात्रींचा दिवस करून परिश्रम करित असतो. आणि ह्यांतच त्याच्या महत्वाची गुरुकिल्ली आहे. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाहीं. आपल्या अंगच्या अविश्रांत उत्साहानें व तरतरित बुद्धिमत्तेनें उच्च पद पावलेले जे कांहीं थोडे लोक आज या भरतभूमीस भूषणभूत होऊन राहिले आहेत त्यांतीलच ना. गोखले हे होत.

ना. गोखले यांचा जन्म चिपळूण तालुक्यांत त्यांच्या आजोळीं कोतळूक येथें स. १८६६ च्या एप्रिल महिन्यांत झाला. त्यांचें राहण्याचें मूळ स्थळ ताम्हनमळा हें होय. हेंही गांव चिपळूण तालुक्यांतच आहे. या गांवीं त्यांचे आजे श्रीधरपंत हे खोतीचा धंदा करीत असत. तरी यांची स्थिती गरिबीचीच असे. श्रीधरपंतांचे बंधु केसोपंत हे कोल्हापुरास खाजगी कारभारी होते. त्यांनीं आपल्या पुतण्यास ह्मणजे गोपाळरावांचे वडील कृष्णाजीपंत यास कोल्हापुरास विद्याभ्यासाकरितां नेलें. कृष्णाजीपंत हेही मोठे बुद्धिमान् होते; परंतु बरची

गरिबी असल्यामुळें त्यांस लवकरच विद्याभ्यासाची रजा घ्यावी लागली. कोल्हापुरास त्यांचा मराठी अभ्यास चालू असतां न्यायमूर्ति रानडे हे त्यांचे सहाध्यायी होते. गरीबी स्थितीमुळें शिक्षणक्रम सोडल्यानंतर कृष्णाजीपंतास कागल संस्थानांत ८ रुपयांची नोकरी धरावी लागली. कृष्णाजीपंताचे एक जवळचे आप्त होते; त्यांस औरस संतति नव्हती. गोपाळास दत्तक देण्याबद्दल त्या आप्तांनीं कृष्णाजीपंतास विनंति केली. घरच्या गरिबीमुळें आपला जन्म व्यर्थ गेला; आपल्या हातून आपल्या मुलाचें शिक्षण होणार नाहीं या विचारानें 'गोपाळा' स दत्तक देण्याचा कृष्णाजीपंतानीं विचार ठरविला.

याच समयास कृष्णाजीपंतांच्या येथें एक ज्योतिषी आले. त्यांस कृष्णजीपंतांनीं आपल्या मुलाची पत्रिका दाखविली; पत्रिका पाहतां 'हा मुलगा पुढें मोठा लौकिक मिळवील; कुलदीपक होईल' असें या ज्योतिष्यांनीं सांगितलें; हें समजतांच कृष्णाजीपंतांनीं दत्तक देण्याचा बेत रहित केला. गोपाळरावांचें शिक्षण कोल्हापूर हायस्कूलमध्यें झालें. तेथें त्यास आपला विद्याभ्यास बहुतेक नादारी किंवा निमनादारीवरच उरकून घ्यावा लागला! इतक्यांत त्यांचे वयाचे बारावे वर्षी त्यांचे वडील वारले! व गोपाळरावांच्या शिक्षणाचा बोजा त्यांचे बंधु गोविंदराव यांजवर पडला. गोविंदरावांची प्राप्ती अवघी महीना १९ रुपयांची होती. तरी गोविंदरावांनीं आपल्या अल्पप्राप्तीमुळें गोपाळरावांच्या शिक्षणक्रमांत यत्किंचितही व्यत्यय येऊं दिला नाहीं ! याचें नांव 'बंधुप्रेम.' याशिवाय गोपाळरावास छात्रवृत्तीही मिळत असत. त्यामुळें त्यांच्या शिक्षणाचा कसा बसा निभाव लागत असे.

गोपाळरावांचे वडील कृष्णाजीपंत हे मरणपावल्यानंतर गोपाळरावांच्या मातुश्री व त्यांच्या लग्नाच्या तीन बहिणी हीं माणसें गोपाळरावांचे चुलते अंताजीपंत कोकणांत होते त्यांच्याजवळच राहत होतीं. गोपाळरावांच्या बहिणींचीं लग्नकार्यें वगैरे सर्व यांनींच केलीं. अंताजीपंतासारखा चुलता मिळाला नसता तर गोपाळरावांस आपल्या बंधूप्रमाणेंच आजन्म हलकी नोकरी पत्करून राहणें भाग पडलें असतें. विद्यार्थीदशेंत आपल्या चुलत्याकडून हें जें अमोलिक सहाय्य मिळालें त्याबद्दल गोपाळराव हे अद्यापही आपल्या चुलत्याचा योग्य परामर्ष घेत असतात. अंताजीपंतांनीं अगदीं अणीबाणीच्याप्रसंगीं निरपेक्षबुद्धीनें गोपाळरावांस जें सहाय्य केलें त्याचें गोड फळ त्यांस त्यांच्या वार्धक्यदशेंत

चाखावयास मिळत आहे. गोपाळरावांचें पहिलें लग्नही त्यांच्या चुलत्यांच्या हातूनच झालें. गोपाळरावांच्या मातुश्री सुस्वभावी असून धर्मनिष्ठ होत्या. त्याही १८९१ सालीं इहलोक सोडून गेल्या! गोपाळरावांचें द्वितीय कुटुंबही १९०० सालीं वारलें! त्यानंतर देशसेवेसच त्यांनीं आपली सहधर्मिणी केली असल्यामुळें पुनरपि विवाहाच्या भानगडींत ते पडले नाहींत. द्वितीय संबंधापासून झालेल्या दोन मुली येवढींच काय तीं गोपाळरावांचीं अपत्यें होत.

गोपाळराव हे राजाराम हायस्कुलमधून स. १८८० मध्यें प्रवेश परीक्षेंत पसार झाले. पुढें दोनवर्षें राजारामकॉलेजमध्येंच त्यांचा अभ्यास झाला. शेवटीं १८८४ मध्यें एल्फिन्स्टन कॉलेज मधून त्यांची बी. ए. ची परीक्षा पास झाली. कोल्हापुरास असतांना कोल्हापुर कॉलेजमध्यें हल्लीं काम करीत असलेले प्रो. विजापुरकर, कोल्हापूरचे वकील रा. राशिंगकर, सोहोनी इत्यादि गृहस्थ हे गोपाळरावांचे सहाध्यायी होत. बी. ए. झाल्यानंतर इंजिनियरिंग कॉलेजमध्यें जाण्याचा त्यांचा विचार होता. परंतु, अखेर तो रहित होऊन त्यांनीं पुण्याच्या न्यू . इंग्लिश स्कुलांत नोकरी धरली. त्या वेळेस त्यांस सुमारें ४९ रुपयेच दरमहा मिळत होता. या शिवाय कांहीं दिवस त्यांचा एक पब्लिक सर्व्हिसचा क्लासही चालू होता. न्यू स्कुलमध्यें सुमारें १॥ वर्षे नोकर या नात्यानें राहिल्यानंतर १८८६ च्या जुलै महिन्यांत ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कायमचे सभासद झाले. १८८४ मध्यें प्रथम त्यांनीं नोकरी धरली. त्यावेळेस ते इंग्रजी चौथ्या इयत्तेस कविताविषय शिकवीत होते. परंतु, त्यांची तरतरी व दीर्घोद्योग हीं चालकांच्या नजरेस येऊन अखेर १८८७ मध्यें ते फर्ग्युसन कॉलेजचे इंग्रजी अध्यापक झाले ! यावर्षी फर्ग्युसन कॉलेजला फक्त पी. ई. चा क्लास शिकविण्याचीच परवानगी होती. परंतु, उत्तरोत्तर परीक्षांचे निकाल समाधानकारक होत गेल्यामुळें या कॉलेजला बी. ए. पर्यंत सर्व वर्ग शिकविण्याची परवानगी मिळाली.

गोपाळरावांना पहिल्यापासूनच कामाची विलक्षण हौस असे; कोणतेंही काम असो तें ते आनंदानें मागत असत. हातीं घेतलेलें काम चोख रीतीनें पार पाडण्यास कितीही उद्योग करावा लागला तरी ते कधींही डगमगत नसत. यामुळें न्युस्कुल व फर्ग्युसन कालेजच्या चालकांचें यांच्यावर पराकाष्ठेचें प्रेम बसलें. व यामुळेंच त्यांनीं त्यांस १॥ वर्षांनींच लाइफ मेंबर केलें. गोपाळरावांची

स्मृति फारच अद्वितीय असल्यामुळें कोणत्याही विषयांत पूर्णता मिळविणें त्यांस सुसाध्य असे. त्यांच्या स्मृतीची अशी गोष्ट सांगतात कीं, अनेक प्रसंगी त्यांनीं जीं आजपर्यंत व्याख्यानें दिलेलीं आहेत त्यांपैकीं कोणत्याही व्याख्यानाचें फक्त विषयाचें नांव सांगितलें कीं अमळ विचार करून ते सर्व व्याख्यान बिनचुक सांगतात ! अनेक आंकड्यांच्या मोठमोठ्या रकमा एकदा अवलोकन झालेल्या असल्या कीं त्यांची विस्मृति त्यांस बहुधा होत नाहीं ! १८९१ सालीं, प्रो. टिळक यांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीशीं आपला संबंध तोडून टाकल्यामुळें गणित शिकविण्याची जबाबदारी गोपाळरावांवर येऊन पडली. बी. ए. च्या परीक्षेच्या वेळीं गणित हाच गोपाळरावांचा ऐच्छिक विषय होता. त्या विषयाचा व्यासंग सुटून यावेळेस सरासरी सात वर्षें झालीं होतीं; तरी त्याविषयाचें पुनः परिशीलन करून आपल्यावर आलेली जबाबदारी त्यानीं समाधानकारक रीतीनें पार पाडली.

गणित असो, इंग्रजी असो, अर्थशास्त्र असो किंवा इतिहास असो, कोणताही विषय असो त्यावर उपलब्ध असलेलीं बहुतेक सर्व पुस्तकें वाचल्याशिवाय गोपाळराव कधींही रहात नसत ! फर्ग्युसन कॉलेजास सर्व वर्ग काढण्याची परवानगी मिळाल्यानंतर एक संस्कृत विषयाशिवाय बाकीचे सर्व विषय शिकविण्याचा गोपाळरावांवर प्रसंग आला; परंतु, त्या सर्वही प्रसंगीं त्यांनीं विद्यार्थ्यांकडून वाहवाच मिळविली ! याचें कारण त्यांचा अविश्रांत उद्योग व असाधारण बुद्धिमत्ता हें होय. कोणतेंही काम हातीं घेतलें तरी तें पहिल्या प्रतीचें झालें पाहिजे अशी त्यांची स्वभावतःच महत्वाकांक्षा असल्यामुळें तितकी सिद्धि येईतोंपर्यंत ते आपले उद्योग कधींही शिथिल पडूं देत नसत. त्यांच्या उदात्त महत्वाकांक्षेस फर्ग्युसन कॉलेज, सार्वजनिक सभा, सुधारक पत्र इत्यादि उत्तम तऱ्हेचीं साधनें मिळाल्यामुळें तिचा सर्व बाजूंनीं सारखा परिपोष झाला. शाळेचें काम करून शिवाय त्यांचे 'केसरी' व 'मराठा' यांमधूनही लेख येत असत.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे लाइफ मेंबर झाल्यानंतर त्यांचें स्वभावस्थैर्य होण्यास त्यास एक गृहस्थांची संगति कारण झाली. हे गृहस्थ गोपाळरावांपेक्षां वयानें वै ह्मणूनच अनुभवानें मोठे होते. ह्या गृहस्थांशीं गोपाळरावांचा अनेक विषयांवर संवाद होई; या योगानें त्यांचीं त्या त्या विषयांत ठाम मतें होऊन

त्यांच्या स्वभावास योग्य व कायमची दिशा लागली. ह्या गृहस्थासंबंधानें गोपाळरावांची परमावधीची पूज्य बुद्धि आहे. हे गृहस्थ कै० गोपाळराव आगरकर होत. त्यांनीं गोखल्यांचीं तरतरी तेव्हांच ओळखली; व पुढें हा मोठ्या लौकिकास चढेल अशी त्यांस खात्री वाटावयास लागली. गोपाळरावांना लाइफ मेंबर करण्यास व त्यांचे हातून शाळेसंबंधी प्रमुख कामें घडवून आणण्यास आगरकरांचा हा गुणग्राहक व मार्मिक स्वभाव बऱ्याच अंशांनीं कारणीभूत झाला. अशा तरुण, बुद्धिमान्, दीर्घोद्योगी व होतकरू मनुष्याच्या आयुष्यक्रमास नीति व कीर्ति यांची जोड मिळावी अशी आगरकरांची उत्कट इच्छा झाली व त्यांनीं आपला मनोदय न्या० रानडे यांस कळवून गोखल्यांच्या पात्रतेबद्दल त्यांनीं बरीच शिफारस केली. तेव्हांपासून ह्मणजे १८८८ पासून तों तहत बारा वर्षेंपर्यंत गोखल्यांचा आयुष्यक्रम न्या० रानडे यांच्या मार्गोपदेशकत्वानेंच चालूं लागला. न्यायमूर्ती व गोखले यांचे तीर्थरूप यांचा संबंध सहाध्यायांचा असल्यामुळें रानडे हे त्यांचे एका अर्थी पितृव्यच होत. या दृष्टीनें पाहतां गोखल्यांना शिक्षणें देण्याचें काम रानड्यांकडे आलें हें यथार्थच झालें. रानड्यांचा मुत्सद्दीपणा, त्यांचा अनुभव त्यांचें दूरदर्शित्व या सर्व गुणांचा ' पात्रविशेषीं न्यास ' झाल्यामुळें गोखल्यांच्या हातून पुढें महत्वाची कामें झालीं. न्यायमूर्तिचें सर्व आयुष्य राजसेवेंत गेल्यामुळें त्यांना उघडपणें न करितां येणाऱ्या गोष्टी त्यांनीं गोखल्यांच्या हातून घडवून आणल्या हें त्यांच्या हातून कांहीं लहान सहान काम झालें नाहीं. या सर्वांचे श्रेय गोखल्यांच्या अंगचें तेज ओळखणाऱ्या मार्मिक आगरकरांकडे आहे हें सांगावयास नकोच.

इ. स. १८८८ मध्यें रा० सिताराम हरी चिपळूणकर यांचे मागून सार्वजनिक सभेचें काम करण्यास कोणातरी लायक माणसाची जरूर होती. आगरकरांच्या शिफारशीवरून हें काम गोपाळरावांकडे आलें. त्या वेळेस पुण्यास सार्वजनिक सभा ही मोठी वजनदार संस्था होती. लोकांचें कोणत्याही विषयासंबंधानें जें काय ह्मणणें असे तें या संस्थेच्या द्वारें सरकारास कळविण्यास उत्तम प्रकारची सोय होती. या संस्थेशीं सरकारचा प्रत्यक्ष पत्रव्यवहारही होत असे. शिवाय या संस्थेच्या विद्यमानें एक त्रैमासिकहीं प्रसिद्ध होत असे. हीं सर्व जबाबदारीचीं व विद्वत्तेची कामें गोपाळराव गोखल्यांवर

पडली; व तीं त्यांनीं सात वर्षें पर्यंत अव्याहत समाधानकारक रीतीनें पार पाडली. यावरून त्यांच्या अंगच्या योग्यतेबद्दल कोणाचीही खात्री होणार आहे. याशिवाय सुधारकपत्राचेही ते सहकारिसंपादक होते. हीं दोन्ही कामें करून शिवाय शाळा व कॉलेज हीं त्यांच्या गळ्यांत होतींच ! याशिवाय प्रत्येक राष्ट्रीयचळवळीशीं त्यांचा प्रमुखत्वानें संबंध होता !

हीं सर्व कामें त्यांचे हातून उत्तम रीतीनें पार पडलीं यांचें कारण त्यांची स्वार्थनिरपेक्ष महत्वाकांक्षा होय. अगदीं अल्पवयांत ह्मणजे केवळ १९ साव्या वर्षी त्यांच्या आयुष्यक्रमास आरंभ झाला. तेव्हांपासून आतांपर्यंत ह्मणजे सरासरी २० वर्षांत त्यांचे हातून जीं अनेक महत्त्वाचीं कार्यें झालीं त्यांपैकीं एक एक करूं ह्मटल्यास साधारण मनुष्यास एक जन्मही पुरणार नाहीं. उद्योगशीलता व श्रमसातत्य यांचा धडा गोपाळरावांच्या आयुष्यक्रमावरून भावी पिढीनें गिरविण्यासारखा आहे. मोठ्या माणसांचा राष्ट्रास हाच उपयोग असतो; त्यांच्या अद्वितीय आयुष्यक्रमाचें निरीक्षण केल्यानें भावी पिढीस तोच आयुष्यक्रम स्वीकारण्यास प्रोत्साहन येतें.

इ० स० १८९७ मध्यें विलायतेंत, हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेच्या खर्चाचा विचार करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत आलें होतें. यासंबंधानें हिंदुस्थानांतील प्रमुख लोकांच्या साक्षी घ्यावयाच्या होत्या. वरिष्ठ दर्जाच्या जागा गोऱ्या लोकांस देण्यांत येत असल्यामुळें व होमचार्जेसप्रीत्यर्थ प्रतिवर्षी कोट्यवधि रुपये खर्च होत असल्यामुळें हिंदुस्थानची स्थिति खालावत चालली हें या गृहस्थांच्या साक्षीवरून सिद्ध व्हावयाचें होतें. त्यावेळीं हिंदुस्थानांतून ना० गोखले, वाच्छा, सुरेंद्रनाथ बानर्जी वगैरे गृहस्थ साक्ष देण्याकरितां विलायतेस गेले होते. त्याप्रसंगीं ना० गोखले यांची साक्ष फारच उत्तम झाली असा तिचा सर्वत्र लौकिक झाला; व त्यामुळें विलायतेंतील बऱ्याच प्रमुख गृहस्थांची व त्यांची चांगली ओळख झाली.

गोपाळरावांचा व्याख्यानें देण्याचा पहिल्यापासूनच व्यासंग असे. त्यांचें पहिलें भाषण कोल्हापूर येथें झालें. त्यावेळेस त्यावेळचे कोल्हापुरचे पोलिटिकल एजंट प्रसिद्ध लीवॉर्नर साहेब यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. या आपल्या पहिल्या भाषणानें त्यांनीं लीवॉर्नर साहेबांकडूनही शाबासकी मिळविली. त्यांचें दुसरें भाषण पुणें येथें प्रसिद्ध क्राफर्ड कमिशनचे वेळीं झालें; त्यावेळींच पुणेक-

रांची त्यांनीं आपल्या भावी मोठेपणा बद्दल खात्री करून दिली. त्यांनीं इंग्रजी भाषेचें उत्तम ज्ञान मिळण्यासाठीं बरींच वर्षे अविश्रांत परिश्रम केले. यामुळेंच ते इंग्रजी भाषा मातृभाषेप्रमाणें सहज बोलतात ! विलायतेंत कांहीं दिवस राहण्याची त्यांस संधि मिळाल्यामुळें अलीकडे तर त्यांच्या भाषेंत एक प्रकारचें सौकर्य येऊन त्यांचें वक्तृत्व विशेष हृदयंगम वाटतें.

१८९९ मध्यें ते मुंबईच्या कौन्सिलमध्यें मध्यभागतर्फे लोकनियुक्त सभासद झाले. त्यावेळेस त्यांचीं बजेटावरील व जमीनमहसुलाच्या कायद्यावरील भाषणें सर्वत्र महशूर आहेतच. दुसऱ्या वर्षींच ह्मणजे १९०० च्या एप्रिलमध्यें त्यांची कलकत्ता येथील वरिष्ठ कायदेकौन्सिलमध्यें योजना झाली. त्यांचा आवडता विषय ह्मणजे बजेट; त्या विषयावर त्यांचें गतवर्षीं झालेलें भाषण इतकें मुद्देसूद व उत्तम साधलेलें होतें कीं, खुद्द लॉर्ड कर्झन साहेबांनींही त्याची स्तुतीच केली ! लॉर्ड कर्झन साहेबांची त्यांचे बद्दल किती आदरबुद्धि आहे हें सदर भाषणानंतर थोडयाच दिवसांनीं त्यास सी. आय्. ई. हा किताब सरकारांतून मिळाला यावरून उघड होत आहे. हिशेबाच्या व जमाखर्चाच्या कामांत ते इतके उत्तम वाकबगार आहेत कीं, हिंदुस्थानांतील लोकांस स्वराज्याचा हक्क मिळाला तर डिग्बीसाहेबांनीं ह्मटल्याप्रमाणें फडणिशीच्या जागेवर गोखल्यांची योजनाच होणें योग्य आहे.

ना. गोखले हे १८९७ मध्यें विलायतेंत असतांना प्लेगच्या बंदोबस्ताचा ऐन रंग चालला होता. यासंबंधानें ना. गोखले यास कांहीं बातमी पत्रद्वारें कळल्यावरून त्यांनीं तिकडे याबद्दल बरीच चळवळ केली. इकडील अधिकाऱ्यांच्या मनाची स्थिति त्या वेळेस क्षुब्ध झाली असल्यामुळें अगदीं निरुपद्रवी गोष्टी बोलण्याचें सुद्धां धोक्याचें झालें होतें. अशा नाजुक स्थितींत ना. गोखले यांनीं प्लेगच्या बंदोबस्तासंबंधानें इंग्लंडमध्यें जीं कांहीं विधानें केलीं होतीं तीं त्यास जाहीर रीतीनें माघारीं घ्यावीं लागलीं; या त्यांच्या कृत्याबद्दल त्यांस पुष्कळांनीं दोष लाविला; व काहींनीं तर त्यास भेकड असेंही ह्मणण्यास कमी केलें नाहीं ! ना. गोखले यांस अशा तऱ्हेचा वर्तनक्रम कां स्वीकारावा लागला याचीं कारणें जगापुढें येणें केवळ अशक्य आहे. परंतु आमच्या मतें ज्या गृहस्थाचें हातून ९७ सालानंतर दोनच वर्षांनीं गव्हर्नर-साहेबांच्या कौन्सिलांत व खुद्द वरिष्ठ कायदेकौन्सिलांत सरकारच्या वर्त-

नावर निर्भयपणानें टीका केली जाते तोच गृहस्थ केवळ भ्याडपणानें आपले शब्द परत घेण्यास तयार होईल असें ह्मणणें केवळ अन्यायाचें व असमंजसपणाचें आहे.

सेवा करावयाची तर देशसेवाच करावी असा त्यांचा प्रथमपासूनच संकल्प असल्यामुळें परवा नुकती त्यांस एक भल्यामोठ्या पगाराची जागा एका राज्यकारणपटु अधिकाऱ्यानें देऊं केली होती तरी तिचा त्यांनीं त्याग केला! हिंदुस्थानास जर कधीं काळीं हक्क मिळावयाचे असतील तर ते हिंदुस्थानांत चळवळ करून मिळणार नाहींत; त्याबद्दल इंग्लंडमध्येंच खटपट केली पाहिजे असें ना. गोखले यांस वाटत असल्यावरून त्यांचा याकरितां इंग्लंडमध्यें जाऊन कायम राहण्याचा विचार झालेला आहे. हा त्यांचा विचार फलद्रूप होवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

ना. गोखले यांचा जो येवढा लौकिक झाला त्याची गुरुकिल्ली त्यांच्या स्वार्थनिरपेक्षतेंत व उदार स्वभावांत आहे हें सांगावयास नकोच. त्यांची स्थिति साधारणच असल्यामुळें कधीं कधीं त्यांच्या औदार्याचा अतिरेकही झालेला आहे. त्यांच्या औदार्याचीं अनेक उदाहरणें देतां येतील, परंतु त्यांतील एक प्रमुखच आह्मी येथें देतों. सार्वजनिक सभेचें त्रैमासिक लिहिण्याचें काम यांचेकडे सतत साडेसाहा वर्षे होतें. त्याबद्दल गोखल्यांची सार्वजनिक सभेकडे २३०० रुपये बाकी होती. ती त्यास सभेकडून देण्यांत आली, परंतु तींतील एक छदामही न घेतां त्यांनीं ती सर्व रक्कम सभेस देणगी ह्मणून दिली!

ज्या ज्या संस्थेशीं गोखल्यांचा संबंध होता त्या सर्वांवर त्यांचें पराकाष्ठेचें प्रेम असे. गेल्या वर्षी फर्ग्युसन कॉलेजची त्यांनीं जेव्हां कायमची रजा घेतली तेव्हां आपल्या आवडत्या संस्थेचा निरोप घेतांना त्यांनीं जें भाषण केलें त्यावरून त्यांच्या विद्यार्थ्यांचीही त्यांच्या या प्रेमाबद्दल पूर्ण खात्री झाली. सार्वजनिक सभेमध्यें दुफळी झाल्यामुळें गोखले व त्यांचे पक्षीय यांस 'डेक्कन सभा' नांवाची दुसरी संस्था काढावी लागली. ना० गोखले हे थिऑसफिक सोसायटीचे मेंबर आहेत येवढें सांगितलें ह्मणजे त्यांचीं धर्मासंबंधानें काय मतें आहेत हें निराळें सांगावयास नकोच.



रा. ब. रंगनाथ नरसिंह मुधोळकर.

M.C.C. Press Poona.

रा० ब० रंगनाथ नरसिंह मुधोळकर.

रंगराव मुधोळकर यांचा जन्म ता. १६ माहे मे स. १८५७ यावर्षी धुळें येथें झाला. रंगरावांचा जन्म झाला त्यावेळीं रंगरावांचे वडील नरसिंहराव हे धुळें येथें डिस्ट्रिक्ट जजाचे कोर्टांत रेकार्डकीपर होते. त्यांची प्राप्ती बेताचीच होती; शिवाय कुटुंबाचा परिवार फार मोठा, यामुळें त्यांना गरीबींतच दिवस काढावे लागत. त्यांना तीन मुलगे, पैकीं बळवंत व श्रीनिवास यांचा विद्याभ्यास चालू होता व रंगराव हे तर लहानच होते. यावेळेस यांच्या पांची कन्यांचीं लग्नें झालीं असून दोन उपवर होत्या ! येवढा मोठा संसारशकट हाकण्याची जबाबदारी एकट्या नरसिंहरावावर पडली होती तरी त्यांनीं आपलें दैन्य कोणासही न दाखवितां व कोणाचेंही एक पाव आणा कर्ज न करितां आपला प्रपंच चालविला होता. इतकेंच नव्हे परंतु ' आतिथ्य ' 'शिवपूजन' वगैरे गृहस्थाश्रमींच्या अवश्य धर्माचेंही त्यांचे हातून योग्य प्रतिपालन होई. यांच्या पत्नी सावित्रीबाई ह्मणजे आमच्या चरित्रनायकाच्या मातुश्री याही मोठ्या धर्मिष्ठ असत.

नरसिंहरावांच्या वाडवडिलांचें मूळचें राहण्याचें ठिकाण जमखिंडी हें होय. परंतु सुमारें १०० वर्षांपूर्वी त्यांचे पूर्वज जमखिंडी सोडून मुधोळ येथें रहावयास आले; व त्यावरूनच हें कुटुंब 'मुधोळकर' या आडनांवानें प्रसिद्ध झालें. यांनीं मुधोळदरबारांत मोठमोठीं राजकारणीं व जबाबदारीचीं कामें केलीं. मुधोळकर पेशव्यांच्या दरबारांस मुधोळ जहागिरीतर्फे वकील असत. यामुळें ह्यांचें बहुतेक पुणेमुक्कामींच राहणें होत असे. पुढें रावबाजींच्या कारकीर्दींत पेशवाईचा अस्त झाल्यानंतर मुधोळकर यांस अर्थातच पुणें सोडावें लागलें. व त्यांस इंग्रज सरकारच्या राज्यांत नोकरी धरणें भाग पडलें; या निमित्तानेंच त्यांचें धुळें येथें वास्तव्य झालें. आपले चुलते बाळाजीपंत व कृष्णराव यांबरोबर नरसिंहराव हेही धुळ्यास आले व पुढें धुळ्यासच त्यांनीं प्रपंच थाटला. बाल्यावस्थेंत रंगरावांची प्रकृति फारच अशक्त होती. त्यावेळेस त्यांच्यावरून अनेक जीवावरचीं दुखणीं गेलीं. परंतु, पुढें त्यांच्या हातून महत्वाचीं कार्यें होणार होतीं ह्मणूनच कीं काय त्यांचा त्यांतूनही निभाव लागला ! रंगरावांचे

शिक्षणास त्यांचे पांचवे वर्षापासूनच प्रारंभ झाला. चारपांच वर्षांत मराठी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सन १८६७ च्या जून महिन्यांत त्यांच्या इंग्रजी अभ्यासास सुरवात झाली. त्यावेळेस त्यांचे वडील बंधु बळवंतराव हे वऱ्हाडांत अकोट येथील इंग्रजी मराठी शाळेचे हेड मास्तर होते. धुळें हायस्कुलांत असतांना रंगरावांनीं आपल्या हुशारीनें सहाध्यायांत अग्रस्थान मिळवून तेथील कलेक्टर मि. मूर यांजकडून अनेक बक्षिसें मिळविलीं. त्यांच्या चलाख बुद्धीच्या योगानें त्यांजवर सर्व शिक्षकांचें विशेष प्रेम असे. इ. स. १८७३ सालीं ह्मणजे त्यांचे वयाचे १६ वे वर्षी ते प्रवेशपरीक्षा पास झाले. नंतर दुसरेच वर्षी त्यांनीं एलफिन्स्टन कालेजमध्यें आपलें नांव घातलें व तेथेंच त्यांचा वरिष्ठ शिक्षणाचा अभ्यास सुरा झाला.

नामदार ज. चंदावरकर, रा. भाटवडेकर हायकोर्ट वकील, दयारामगिडूमल डि. जज्ज, कोल्हापुरचे दिवाण रा. सबनीस, गणपतराव खापर्डे इत्यादि गृहस्थ रंगरावांचे कॉलेजांतील सहाध्यायी होत. त्यांत अभ्यासामध्यें दयाराम व रंगराव यामध्येंच विशेष स्पर्धा असे व ह्मणूनच पहिल्या दोन नंबरांची वाटणी आळीपाळीनें या दोहोंमध्येंच होई! एलफिन्स्टन कालेजांतील प्रोफेसरांची रंगरावांच्या बुद्धिमत्तेबद्दल विशेष आदरबुद्धि होती; त्यांतल्या त्यांत रंगराव पुढें चांगल्या नांवलौकिकास येईल अशी त्या कालेजचे लोकप्रिय प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ यांची पूर्ण खात्री झाली होती. आपल्या अंदाजाबरहुकुम रंगरावांचा आयुष्यक्रम पाहून "प्रथमपासूनच त्याजकडे माझें लक्ष गेलें होतें व त्याच्या आयुष्यक्रमाबद्दल मीं जो अंदाज ठरविला होता तो पूर्णपणें खरा ठरला" असें वर्डस्वर्थ यांनीं उद्गार काढले होते! रंगराव हे फ. ए. च्या परीक्षेंत इ. स. १८७५ त पास झाले. पुढच्या वर्षीच त्यांची बी. ए. ची परीक्षा व्हावयाची परंतु आजारीपणामुळें त्यांचें एक वर्ष फुकट गेलें व अखेर ते १८७७ च्या अखेरीस बी. ए. ची परीक्षा पास झाले.

याच वर्षाच्या जून महिन्यांत गणपतराव किबे यांच्या बक्षिसाकरितां त्यांनीं इंग्रजींत एक निबंध लिहिला व त्याबद्दल त्यांस बक्षिसही मिळालें. त्यांची बी. ए. ची परीक्षा पास झाली त्याचवर्षी त्यांचे वडिल स्वर्गस्थ झाले! परीक्षा चालू असतांच वडील अत्यवस्थ असल्याबद्दलची बातमी समजल्यामुळें त्यास परीक्षेचे कागद समाधानकारक रीतीनें लिहितां आले नाहींत. यामुळें बी. ए. च्या परीक्षेस असलेल्या दोन्ही बक्षिसांपैकीं कोणतेंही बक्षिस यांना मिळालें नाहीं! पितृवियोगाच्या दुःखप्रदर्शनार्थ प्रि. वर्डस्वर्थ

यांकडून रंगरावांस जें पत्र आलें त्यांत ' तुमचीं उत्तरें फारच चांगलीं होतीं. चार पांच मार्क कमी पडल्यामुळें दोहोंपैकीं एकही बक्षिस आपणांस मिळालें नाहीं याबद्दल परीक्षकांस वाईट वाटतें' असा मजकूर होता. बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर रंगरावांस कॉलेजमध्यें फेलोची जागा मिळाली. पुढें त्यांनीं एल्. एल्. बीच्या अभ्यासास प्रारंभ केला व १८८० च्या डिसेंबर महिन्यांत त्यांची तीही परीक्षा पास झाली. व येथें त्यांची विद्यार्थिदशा संपून त्यांच्या प्रौढ आयुष्यक्रमास आरंभ झाला.

इ. स. १८८१ च्या फेब्रुवारी महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत वकिली करण्याकरितां ते गेले. त्यावेळेस ज्युडिशियल कमिशनरची कचेरी अकोला येथें असल्यामुळें रंगराव त्याच शहरीं वकिली करूं लागले. ज्याप्रमाणें विद्यार्थीदशेंत त्याप्रमाणेंच या धंद्यांतही थोड्याच अवधींत त्यांनीं चांगला लौकिक संपादन केला ! व वऱ्हाडप्रांतांतील सर्व महत्वाचीं कामें रंगरावांकडेच येऊं लागलीं ! सन १८८३ च्या आगष्ट महिन्यांत ज्युडिशियल कमिशनरचें कोर्ट अकोल्याहून उमरावतीस आलें; त्या वेळेस रंगरावांसही अकोला सोडून उमरावतीस यावें लागलें. तेव्हांपासून आतांपर्यंत ते याच शहरीं रहात आहेत. रंगरावांच्या आगमनानें उमरावतीस बऱ्याच नव्या चळवळी जन्मास आल्या. केवळ धंदा चालवून आपणांस पैशाची किफायत उत्तम झाली ह्मणजे संपलें असें समजणारांपैकीं रंगराव नसल्यामुळें हिंदुस्थानची सामाजिक व राजकीय स्थिति कशी सुधारतां येईल याबद्दल त्यांचे अहर्निश विचार चालू असत व अद्यापही त्यांचा तो क्रम अव्याहत चालू आहे.

राजकीय हक्क संपादन करण्याकरितां योग्य दिशेनें सदैव उद्योग करणें, समाजाच्या वाढीस विघातक अशा ज्या कांहीं चाली असतील त्यांचा निषेध करून त्या दूर करण्याकरितां प्रयत्न करणें, लोकमत जागृत करून त्यास आपली स्थिति सुधारण्यास कोणकोणते प्रयत्न केले पाहिजेत याबद्दल शिक्षण देणें, देशी उद्योगधंदे व व्यापार यांच्या उत्कर्षाविषयीं झटणें इत्यादि गोष्टी सिद्धीस नेण्याचा संकल्प करून त्यांनीं आपल्या पुढील आयुष्यक्रमाचा मार्ग आंखून ठेविला; व तदनुसार त्यांचे प्रयत्न आज मित्तीपर्यंत चालू आहेत. अशा रीतीनें आजपर्यंत यांच्या हातून झालेल्या प्रयत्नांचें पहिलें फळ ह्मटलें ह्मणजे १८८१ सालीं अकोला मुक्कामीं ' वऱ्हाड ट्रेडिंगकंपनीची स्थापना होय, ही संस्था स्थापन करण्यास रंगरावास त्यांचे मेहुणे रा. बळवंतराव दिवेकर यांचें उत्तम सहाय्य झालें. पाश्चात्य व्यापारी पद्धतीचें शिक्षण देशी

उद्योगधंदेवाल्यांस मिळावें हाच या संस्थेचा हेतु होता. व्यापारवृद्धीस मुख्यतः भांडवलाची अपेक्षा असते ही गोष्ट जरी खरी आहे तरी योग्य प्रकारची दिशा असल्याशिवाय केवळ भांडवल निरुपयोगी ठरतें. याकरितां या कामीं सुशिक्षित लोकांनीं पुढाकार घेऊन ही उणीव भरून काढली पाहिजे असें रंगराव व त्यांचे सहकारी यांचें ठाम मत असल्यामुळें त्यांनीं या दिशेनें प्रयत्न करण्यास आरंभ केला.

पुढें लवकरच या संस्थेच्या विद्यमानें अकोल्यास एक कापडाचें दुकान स्थापित झालें. वऱ्हाड प्रांतांत अशा तऱ्हेची संस्था ही प्रथमच होय. अलीकडे पुष्कळ सुशिक्षित लोक धंद्याचा शोध करीत असतात; त्यांचे या गोष्टीकडे लक्ष्य गेल्यास देशहित व स्वार्थसाधन या दोहोंची त्यांस अनायासें सांगड घालतां येईल. अकोला येथें स्थापन झालेल्या दुकानाची सर्व व्यवस्था प्रमुखत्वानें रंगरावच पाहत असत; दोन वर्षांनंतर इतर महत्वाच्या कामामुळें रंगरावांस दुकानाकडे पूर्वीप्रमाणें लक्ष्य पुरवितां येईना ह्मणून त्यांनीं तें काम दुसऱ्या योग्य गृहस्थावर सोपविलें. रंगरावांनीं घालून दिलेल्या पायावरच दुकानाचें काम चालत असल्यामुळें ह्या कंपनीमार्फत निघालेलीं सर्व दुकानें अद्यापही भरभराटीनें चालू आहेत.

ऐकमत तयार करणारें एखादें मासिक पुस्तक चालवावें अशी याचवेळीं रंगरावांची इच्छा होती; परंतु रा. बळवंतराव दिवेकर यांच्या अकालीं मृत्यूमुळें या त्यांच्या हेतूस कृतीचें स्वरूप आलें नाहीं. तरी तेव्हांपासून आतांपर्यंत इतर रीतींनीं त्यांचा लेखनव्यासंग चालू आहेच. इ. स. १८८४ मध्यें देवरावबाबा, अण्णासाहेब महाजनी, दत्तोपंत भागवत व रंगराव मुधोळकर यांनीं 'वैदर्भ' नांवाचें एक साप्ताहिक पत्र सुरू केलें. तेव्हांपासून आतांपर्यंत त्यांचे संपादक व्यंकटराव मुधोळकर हे आहेत. त्यांतील इंग्लिश लेख बहुतेक रंगरावांचेच असत. लेखक या नात्यानें रंगरावांचा जोंपर्यंत या पत्राशीं संबंध होता तोंपर्यंत या पत्राचा बराच लौकिक होता.

याच वेळेस लेडी डफरिन फंडाची उभारणी झाली. हिंदु स्त्रियांना स्त्रीवैद्यांकडूनच औषध मिळावें हाच या फंडाचा हेतु आहे. वैधव्यदुःखसागरांत बुडालेल्या स्त्रियांना विशेषतः या संस्थेपासून चांगला उपयोग होईल असें वाटल्यावरून या फंडाची वऱ्हाडांत जी कमिटी आहे तिचे रंगराव एक प्रमुख तहाहयात सभासद झाले व त्यांनीं स्वतः या फंडास ६०० रुपये वर्गणी दिली. या फंडाचें काम अद्यापही चालू आहेच.

राजकीय बाबतींत लोकमत सरकारास कळणें अवश्य आहे व त्याकरितां वऱ्हाडांत एक लोकनियुक्त सार्वजनिक संस्था असावी असें रंगरावांस वाटून त्यांच्या प्रयत्नानें इ. स. १८८६ सालीं ' वऱ्हाडसार्वजनिक सभा, स्थापन झाली. मोरोपंत जोशी, यशवंतराव केसकर व रंगराव हे या सभेचे चिटणिस होते. या त्रयीनें १८९८ पर्यंत या सभेचें काम नेटानें चालविलें होतें. या सभेमार्फत सरकारास जे अर्ज गेले त्यांतील बहुतेक अर्ज रंगराव यांनींच तयार केले होते. थोड्याच अवधींत सभेचें महत्व इतकें वाढलें कीं, नवीन कायदेकानूंसंबंधानें ह्या सभेस सरकारकडूनही अभिप्राय विचारण्यांत येई ! हे अभिप्राय रंगरावच तयार करीत. दक्षिणेकडील शेतकरी लोकांच्या हिता-करितां केलेला कायदा हिंदुस्थानांतील इतर प्रांतासही लागू करण्यांत याव । याबद्दल रंगरावांनीं एक लेख सरकाराकडे पाठविला होता. या लेखाच्या भार-दस्तपणाची व मुद्देसूदपणाची प्रशंसा करण्यापेक्षां त्याबद्दल सरकाराकडून सभेच्या चिटणिसांचे अर्थात रंगरावांचे आभार मानण्यांत आले येवढी गोष्ट सांगितली असतां त्या लेखाचें महत्व कोणासही सहज समजून येण्यासारखें आहे.

देशहिताकडे रंगरावांचें प्रथमपासूनच लक्ष्य असल्यामुळें त्यांना राजकीय गोष्टीसंबंधानें अनेक विषयांचें परिशीलन करावें लागलें. त्यांतल्यात्यांत ज्या विषयांचा त्यांनीं विशेष अभ्यास केला होता ' तो जमीनधाऱ्याची पद्धत ' हा होय. कायमधाऱ्याची पद्धत असल्यापासून कोणते फायदे आहेत व वारंवार सारा बदलल्यामुळें शेतकरी वर्गावर कोणते परिणाम होतात ह्याबद्दल त्यांनीं अनेक मुद्देसूद लेख लिहिले आहेत. 'रिव्हिजन सर्वे संबंधीं लोकमत' या नांवाचा त्यांचा सुमारें ८० पानांचा एक इंग्रजी लेख सुप्रसिद्ध आहे. वऱ्हाड सार्वजनि-कसभेचे चिटणीस असतांना त्यांनीं रिव्हिजन सर्वेसंबंधानें अनेक अर्ज सरकाराकडे पाठविले होते. तसेंच कर्जबाजारीपणामुळें शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांच्या घरांत जाऊं न देण्याविषयीं काय तजवीज करावी याबद्दल त्यांनीं जो लेख लिहिला आहे तोही त्या विषयाचा अभ्यास करूं इच्छिणारानें अवश्य वाचण्यासारखा आहे.

पूर्वी ह्मणजे सुमारें १८८७ पावेतों वऱ्हाडांत दिवाणीचें काम मुलकी अधिकाऱ्यांकडेच असे. त्यामुळें अर्थातच ज्युडिशियल कमिशनरास प्रांतांत फिरावें लागे व लोकांस आपली दाद मागण्यास बरीच अडचण पडे. ती अडचण नाहींशी करण्याकरितां रंगरावांनीं एक लेख तयार करून तो सभेमा-र्फत वऱ्हाडप्रांताच्या स्थानिक सरकाराकडे पाठविला. त्यांत दर्शविलेले उपाय

सरकारास पसंत पडले. यासंबंधानें रंगरावांनीं वर्तमानपत्रांतही अनेक लेख प्रसिद्ध केले; सन १८८९ सालीं वऱ्हाडांतील दिवाणी कोर्टासंबंधी जो कायदा झाला त्याबद्दलचें श्रेय या अर्जास व वर्तमानपत्रांतील लेखास देणें योग्य आहे.

वऱ्हाडास स्वतंत्र लेजिस्लेटिव्ह काउन्सिल नसल्यामुळें त्या प्रांतास हिंदुस्थानसरकारानें केलेले कायदे, अवश्य ते फेरफार करून, लागूं करण्यांत येतात. वरिष्ठ कायदेकाउन्सिलांत कायद्याचे जे मसुदे तयार होतात त्यावर वऱ्हाडांतील प्रमुख गृहस्थांचा अभिप्राय मागविण्याचा प्रचार स० १८८६ पासून अस्तित्वांत आला. रंगराव वऱ्हाडांतील प्रमुख गृहस्थ असल्यामुळें तेव्हांपासूनच्या बहुतेक सर्व कायद्यांच्या मसुद्यावर त्यास अभिप्राय देण्याचा प्रसंग येई. त्यांचे अभिप्राय जसे स्पष्ट व निर्भीडपणानें दिलेले असत तसेच ते भारदस्त व पोक्तही असत. यामुळें त्यांच्या लेखांच्या योगानें साहजिकपणेंच अधिकारी वर्गावर वजन पडूं लागलें. वऱ्हाडांत स्थानिकमहत्वाचे कायदे तयार करण्याकरितां विशिष्ट कमिट्या नेमण्यांत आल्या. त्यावेळेस या कमिट्यांत सरकारी नोकर नसलेले असे दोन तीन गृहस्थ असत. यामध्येंच रंगरावांचीही योजना झाली होती. या कमिटीच्या हातून बऱ्याच महत्त्वाच्या कायद्यांचे मसुदे तयार झाले. परंतु, त्यांतल्या त्यांत महत्त्वाची कमिटी म्हटली म्हणजे वऱ्हाडांतील लँड रेव्हिन्युकोड तयार करण्याची होय. या कमिटीचें काम बरेच दिवस चाललें होतें. लँड रेव्हेन्यु कोडाचा जो कायदा तयार झाला त्यामध्यें रंगरावांच्या बुद्धिमत्तेचा उपयोग प्रमुखत्वानें झाला.

प्रत्येक महात्वाच्या कार्यांत रंगरावांचे दुसरे सहकारी म्हटले म्हणजे उमरावती येथील वकील रा. मोरोपंत जोशी हे होत. या दोघांनीं वऱ्हाड सार्वजनिकसभेचें काम सुमारें बारा वर्षेपर्यंत मोठ्या उत्साहानें व आस्थेनें चालविलें होतें; परंतु सन १८९९पासून या दोघांनांही इतर कार्यामुळें सभेच्या चिटणीशीचें काम करण्यास सवड होईना. तेव्हांपासून ती सभा बहुतेक नामधारीच झाली आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

आमच्या इकडील सार्वजनिक कामांत एक मोठी उणीव भासते ती ही होय कीं, ज्यांनीं एकदां जें काम अंगावर घेतलें तें त्यास शेवटपर्यंत करावें लागतें; नाहींतर कित्येक चांगल्या लौकिकास चढलेल्या संस्थांसही एकदम राम म्हणण्याची पाळी येते! याचें कारण दिवसेंदिवस कर्त्या पुरुषांचा दुष्काळ पडत आहे हें होय. हा परिणाम कां व्हावा हें पाहण्याचें हें स्थळ नव्हे; परंतु महत्वाची


कार्यं हातांत घेणाऱ्या गृहस्थांनीं अंगीकृत कार्य शेवटपर्यंत सुरळित चालेल असें प्रथमपासूनच धोरण ठेवून त्या कामाची जबाबदारी झेपण्यास पात्र असे विद्यार्थी तयार केल्यास व ही गुरुशिष्यपरंपरा अव्याहत चालल्यास हल्लीं जो कित्येक उपयुक्त संस्थांचा कालेंकरून उपासमार होतो व अखेर त्या लयास जातांना दिसतात तसा प्रकार होणार नाहीं असें वाटतें.

सन १८८५ सालीं राष्ट्रीयसभेचा जन्म झाला. १८८८ सालीं रंगराव हे तिच्या प्रमुख चालकांपैकीं एक झाले. तेव्हांपासून आजपर्यंत ते तिची एकसारखी निःसीम भक्तीनें सेवा करीत आहेत. हिंदुस्थानाची राजकीय स्थिति सुधारण्यास हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत प्रयत्न करण्यापेक्षां त्यासंबंधानें विलायतेंतील लोकांचें मत जागृत करून त्यांची सहानुभूति संपादन केल्यास कार्यभाग लवकर होईल अशी कल्पना प्रथम १८८९ मध्यें निघाली. ती कायम होऊन हिंदुस्थानतर्फे कांहीं प्रतिनिधि विलायतेस पाठविण्यांत यावे असें बहुमतानें ठरलें; परंतु अखेर तिघांनींच कायती या कामाबद्दल आपली तत्परता दाखवून तदनुसार वर्तन केलें ! ते तिघे गृहस्थ ह्मणजे आमचे चरित्रनायक रंगराव, मोरोपंत जोशी व सुरेंद्रनाथ बानर्जी हे होत. हे तिघेही गृहस्थ १८९० च्या एप्रिलअखेर हिंदुस्थानच्या किनाऱ्याचा निरोप घेऊन इंग्लंडास निघाले. ता. ११ मे रोजीं हे विलायतेस पोहोंचले. लंडन येथें पोहोंचल्यानंतर ९२ तासांच्या आंतच त्यांचीं रीडिंग येथील सभेपुढें व्याख्यानें झालीं.

या विलायतच्या प्रवासांत एक मनोरंजक व महत्वाची गोष्ट घडून आली तिचा निर्देश केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. ती गोष्ट ही होय कीं, सुमारें शंभर वर्षांपूर्वी अमेरिकेचा प्रतिनिधि प्रसिद्ध बेंजामिन फ्रांकलिन हा इंग्लंडास गेला होता. त्या वेळेस लंडन येथें ज्या बिन्हाडांत तो राहिला होता. तेंच घर कर्मधर्मसंयोगानें मुधोळकर व जोशी यांस उतरण्यास मिळालें ! परिस्थितीच्या मानानें पाहतां ह्यांच्या हातून पुढें जें मोठें देशकार्य झालें त्याचा हा शुभ शकुनच समजला पाहिजे. असो. विलायतेंतील जनसमूहास हिंदुस्थानची खरी स्थिति समजवून देण्याकरितां रंगरावांनीं जे परिश्रम केले त्याबद्दल त्यांची जितकी प्रशंसा करावी तितकी ती अपूर्णच होणार आहे. रीडिंग म्यांचेस्टर, बर्मिंगह्याम, गेट्सहेड, न्यूकॅसल, डंडी, अबर्डीन, एडिंबरो, लंडनैपकीं केनिंगटन इत्यादि इंग्लंड व स्काटलंडमधील प्रसिद्ध स्थळीं त्यांचीं व्याख्यानें झालीं. हीं मुद्देसूद, भारदस्त, माहितीनें भरलेलीं व नेमस्त भाषणें ऐकून तेथील लोकांचें मन वेधून गेलें.

रंगरावांचा तिकडील लोकांकडून जागोजाग जो बहुमान झाला त्यावरून खुद्द इंग्रजलोक निराळे व हिंदुस्थानांत अधिकारारूढ झालेले इंग्रजलोक निराळे हें तत्व कोणाच्याही लक्षांत येणार आहे. हिंदुस्थानांतून गेलेल्या प्रतिनिधींच्या अभिनंदनार्थ मि. स्वॉन व त्यांची पत्नी यांजकडून एक मोठी मेजवानी देण्यांत आली. त्यावेळीं रंगराव यांनीं आपल्या भाषणांत तिकडील लोकांस ही गोष्ट स्पष्टपणें सांगितली. "तुह्मीं आह्मांस जसें वागवीत आहां तसें आह्मांस वागविण्याची तुमच्या हिंदुस्थानांतील बंधूंची वहिवाट नाहीं. ममता तर लांबच राहूंद्या. परंतु, साधा शिष्टाचारही तेथें आमच्या वाट्यास येत नाहीं! आणि ह्मणूनच आपल्या या सत्काराची आह्मांस विशेष थोरवी वाटत आहे." अशा आशयाचे उद्गार तेथें जमलेल्या इंग्रज समाजापुढें रंगराव यांनीं काढले होते.

"ब्रिटिशराज्यापासून एकंदरींत हिंदुस्थानचें हित झालें आहे हें हिंदुस्थानांतील लोक जाणून आहेत; परंतु, या हिताबरोबर कित्येक आपदाही हिंदुस्थानवासीयांच्या वाट्यास आल्या आहे त्यांचा प्रतिकार करणें इंग्रजलोकांचें कर्तव्य आहे. इंग्लंडांत दर माणशीं उत्पन्न ६९० रुपयांचें आहे. तेंच हिंदुस्थानांत अवघें २० च रुपयांचें आहे ही गोष्ट ध्यानांत ठेविली ह्मणजे हिंदुस्थानच्या दारिद्र्याविषयीं दुसरें प्रत्यंतर देण्याची आवश्यकता नाहीं. सर वुलियम हंटरसाहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें हिंदुस्थानांत ४० लाख लोकांना वर्षभर पोटभर भाकर मिळण्याची सुद्धां पंचाईत पडते! आसामचे चीफ कमिशनर इलियटसाहेब यांचे ह्मणण्याप्रमाणें तर सुमारें सात कोटी लोकांना पोटभर अन्न सबंध जन्मांत माहीत नसतें! इ. स. १८७८ सालीं मुद्दाम एक कर बसवून एक मोठा दुष्काळनिवारक फंड उभारण्यांत आला. हा कर फक्त कारागीर व्यापारी लोकांवर ह्मणजे ज्यांना कायदेशीर चळवळीची कल्पनाही नसते अशा लोकांवर बसविण्यांत आला हें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. दुष्काळाकरितां जमविलेल्या फंडाचा विनियोग दुष्काळनिवारणार्थच झाला पाहिजे होता; परंतु, या फंडाचा अफगाणलढाईमध्यें चकाचूर उडविण्यांत आला! आणि एकंदर २२ कोटी फंडापैकीं फारतर २॥ लक्ष रुपये दुष्काळनिवारणाचे कामीं लागले असतील!" रंगराव यांनीं आपल्या भाषणांत वरील गोष्टींचें सप्रमाण विवेचन केलें व शिवाय हिंदुस्थानचा व्यापार रसातळास कसा पोहोंचला, राज्यव्यवस्थेंत हिंदुलोकांचा शिरकाव नसल्यामुळें तीप्रीत्यर्थ कोट्यवधि रुपये व्यर्थ कसे खर्च होत आहेत इत्यादि गोष्टीही त्यांनीं उत्तमरीतीनें इंग्लंडांतील लोकांच्या नजरेस आणून दिल्या.



पंडित अयोध्यानाथ (कौ)

२१

नामदार पंडित अयोध्यानाथ.

"वायव्यप्रांतांतील माझे देशबांधव देशाभिमानी, व कळकळीचे आहेतच; पण ते तसे नाहींत असें जर दुर्दैवानें आढळून आलें, तर मी आपल्या स्वतःच्या पिशवींतून ५०००० रुपये खर्च करीन; पण अलाहाबादेस राष्ट्रीयसभा करून दाखवीन." कायात्राचामनें करून आपला देह राष्ट्रीयसभेस वाहिलेल्या व एकंदर देशांतील राष्ट्रीयसभाभक्तांच्या प्रीतीस पात्र झालेल्या महान् देशभक्त पंडित अयोध्यानाथजींच्या तोंडांतून वरील अवतरणांतर्गत शब्द इ.स. १८८८ सालीं बाहेर पडले होते. आपण ज्या संस्थेस पूज्य मानतों, तिचे प्रीत्यर्थ एवढा थोरला मोठा स्वार्थत्याग प्रसंग आला तर करण्यास तयार होणारे व तसें स्पष्टपणें एकीकडे नव्हे तर भरसभेंत बोलून दाखविणारे गृहस्थ सध्यांच्या राष्ट्रीयसभामंडळांत हाताच्या बोटावर मोजण्याइतके तरी सांपडतील काय? पंडितजींस बोलून दाखविल्याप्रमाणें राष्ट्रीयसभेप्रीत्यर्थ घस सोसावी लागली नाहीं; अथवा वायव्यप्रांतांतील देशाभिमानी व आस्थेवाईक लोकांनीं आपल्या कर्तृत्वानें ती घस त्यास लागूं दिली नाहीं; ही गोष्ट अभिनंदनीय होय. पण तशी वेळ आली असती तर पंडितजी आपल्या प्रतिज्ञेपासून रेसभरही ढळले नसते; ही गोष्ट कोणालाही कबूल झालीच पाहिजे. धाडस, दृढनिश्चय, दीर्घोद्योगित्व व देशाभिमान हे गुण पंडितजींच्या हाडींमासीं खिळलेले होते व त्यांचेंच मूर्तिमंत चित्र आरंभींच्या शब्दांमध्यें दृग्गोचर होत आहे.

अशा या महात्म्याचा जन्म चैत्र शुद्ध ६ संवत् १८९७ ह्मणजे ता० ८ एप्रील सन १८४० रोजीं इतिहासप्रसिद्ध आग्रा शहरीं झाला. हे जातीनें काश्मीरी ब्राह्मण होत. पंडित अयोध्यानाथ यांचे वडील पंडित केदारनाथ हे मोठे विद्वान्, मुत्सद्दी व सतत उद्योगी ह्मणून त्या प्रांतीं गाजलेले होते. जाफरच्या नबाबाचे हे कांहीं दिवस दिवाण होते; पण त्यांनीं ती दिवाणगिरी सोडून देऊन

ते आग्रा येथील प्रसिद्ध व्यापारी झाले. पंडित केदारनाथ यांच्या मागें त्यांच्या धंद्याचें काम पुष्कळ असे; पण आपल्या चिरंजिवाच्या विद्याभ्यासाची काळजी घेणें या कामास ते अत्यंत महत्त्व देत असत. याकामीं त्यांचे हातून एक दिवसही हयगय झाली नाहीं. पंडित अयोध्यानाथ हे लहानपणापासून जात्याच बुद्धिमान्, निरलस व व्यवस्थित असून वडिलांच्या काळजीपूर्वक शिक्षणाची जोड मिळाल्यामुळेंच ते पुढें मोठ्या नांवलौकिकास चढले; हें प्रत्येक मुलानें व त्याच्या वडिलांनीं लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. पंडितजी आपल्या वयाच्या तेराव्या वर्षी आग्रा काॅलेजांत जाऊं लागले. पर्शियन व अरबी या दोन भाषांवर त्यांची मोठी भक्ति असे. काॅलेजांत असतांच त्यांच्या भावी मोठेपणाचीं चिन्हें दिसूं लागलीं. इ. स. १८६०।६१ सालच्या 'पाप्युलर एजुकेशन' संबंधीं सरकारी रिपोर्टांत पंडितजींचें नांव 'हुषार व नांवारूपास येण्यायोग्य विद्यार्थी' म्हणून मुद्दाम दाखल करण्यांत आलें असून इतिहास व तत्त्वज्ञान या विषयासंबंधीं प्रश्नांची वार्षिक परिक्षेचे वेळीं त्यांनीं जीं उत्तरें दिलीं, त्यांबद्दल तर सदर रिपोर्टांत पंडितजींच्या 'असाधारण बुद्धिमत्तेची व विचारशक्तीची' फारच तारीफ केली आहे.

इ. स. १८६२ सालीं पंडितजींनीं काॅलेज सोडिलें व आग्रा येथेंच त्यानीं वकिलीच्या धंद्यास सुरवात केली. यावेळीं आग्रा येथें 'व्हिक्टोरिया काॅलेज' स्थापना करण्याकरितां तेथील पुढारी व सन्माननीय नागरिकांनीं खटपट चालविली होती; त्यांत पंडितजींनीं अग्रेसरत्व मिळवून लोकांकडून धन्यवाद मिळविले. सदर 'काॅलेज' स्थापन होण्यांत आग्रा येथील ज्या लोकांचे श्रम, कळकळ व औदार्य कामास आलें, त्यांत पंडित अयोध्यानाथ यांचा बराच भाग आहे. छात्रवृत्ति सोडल्याबरोबर आग्रा येथें त्यांच्या हातून पहिलें महत्कार्य झालें तें हेंच होय. पंडित अयोध्यानाथ यांच्या हातून, ताजमहालामुळें जगतांत गाजत असलेल्या आग्रा शहरांत आणखीही कित्येक महत्कार्यें झालीं असतीं; पण या महात्म्याच्या हातचा तो महल्लाभ मिळणें त्या शहराच्या नशीबीं नव्हतें; कारण वायव्यप्रांत सरकारची राजधानी आग्रा येथून अलाहाबाद ऊर्फ प्रयाग येथें आली; व त्यामुळें पंडितजींनाही आग्र्यास रामराम ठोकून अलाहाबाद येथें यावें लागलें. पंडितजींचा यापुढील सर्व काळ अलाहाबाद येथेंच गेला. इ. स. १८६९ मध्यें आग्रा येथील 'लाॅ प्रोफेसर'ची जागा रिकामी झाली.त्या

जागेकरितां अनेक लोकांचे अर्ज आले असतांही ते बाजूला ठेऊन सरकारानें पंडितजींचें उत्कृष्ट कायद्याचें ज्ञान लक्ष्यांत घेउन त्यांचा अर्ज नसतांही ती सन्माननीय जागा त्यांस देऊन त्यांचा बहुमान केला.

अलाहाबाद येथें आल्यावर पंडितजींचा वकीलीचा धंदा बराच वाढून त्यांस पैशाची प्राप्ति चांगली होऊं लागली. एकदां पैसे मिळूं लागल्यावर ते मिळविण्यास लागणाऱ्या श्रमाशिवाय इतरव्यवसायाकडे कोणाचें लक्ष्य जात नाहीं; निदान विद्यार्जनाकडे तरी त्यांचें दुर्लक्ष्य होतेंच; पण पंडितजींचें तसें झालें नाहीं. वकीलीचें काम व इतर सार्वजनिक कामें आस्थेनें करूनही पर्शियन व आरबी वाङ्मयाचा व्यासंग त्यांचा नित्य चालत असे; व इंग्रजी वगैरे भाषेंतील पुस्तकें वाचून आपलें ज्ञानभांडार वाढविण्याचा त्यांचा क्रम आमरणांत अव्याहत चालला होता. इ. स. १८७९ मध्यें ' इंडियन हेरल्ड ' नामक दैनिक पत्र अलाहबाद येथें निघूं लागलें; तें काढण्यांत पंडितजींचें साह्य व श्रम फार होते; किंबहुना त्याचें जनकत्व त्यांजकडेच होतें ह्मटलें तरी चालेल. सतत तीन वर्षेंपर्यंत ' पायोनिअर ' सारख्या जंगी पत्रांशीं त्यानें स्पर्धा केली; पण अखेर कांहीं विलक्षण कारणामुळें तें पत्र बंद करावें लागलें. यानंतर इ. स. १८९० मध्यें त्यांनीं ' इंडियन यूनियन ' नामक दुसेंर एक वर्तमानपत्र काढलें; व तें लोकोपयोगी होण्याकरितां त्यांनीं पुष्कळ श्रम केले. असो.

वायव्यप्रांतांतील कायदेकौन्सिलचे पहिले देशी सभासद पंडित अयोध्यानाथ हे होत. कलकत्ता व अलाहाबाद या दोन्ही युनिव्हर्सिटी सेनेटचे हे प्रमुख सभासद होत; व त्याठिकाणीं त्यांनीं केलेलीं कामें प्रशंसनीय व लोकमान्य अशींच होतीं; पण सर्व हिंदुस्थानांत पंडितजींची कीर्ति गाजली व सर्व हिंदुस्थानवासियांस त्यांच्याबद्दल जो अभिमान व जी पूज्यबुद्धि वाटूं लागली व अद्यापही वाटत आहे; त्याचें कारण ते कायदेकौन्सिलचे सभासद होते हें नव्हे; अथवा कलकत्ता आणि अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्यें त्यांनीं कामगिऱ्या बजावल्या, हेंही नव्हे; तर त्यांनीं हिंदुस्थानच्या ' राष्ट्रीयसभेची ' जी कामगिरी केली, तिचे उन्नतीबद्दल जे परिश्रम केले व तिचे हेतु सिद्धीस जाण्याकरितां जी खटपट केली त्यायोगें पंडितजींचें नांव हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत दुमदुमून राहिलें आहे; ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

पंडित अयोध्यानाथ यांच्यासारखी राष्ट्रीयसभेची सेवा एकनिष्ठपणें करणारी जर खरोखर दहाबीस मंडळी त्यावेळीं असती तर सध्याची ' राष्ट्रीय सभा ' आज मित्तीस कांहीं निराळ्या स्वरूपांत आपणास पाहण्यास मिळाली असती, यांत संशय नाहीं. इ. स. १८८५ सालीं प्रथमतः मुंबईंत या राजकीय सुधारकांची जी पहिली सभा झाली, त्यांत पंडित अयोध्यानाथ हे जरी नव्हेत; इ. स. १८८६ सालीं कलकत्त्यास ही ते गेले नाहींत; आणि १८८७ सालीं मद्रासच्या सभेंतही ते दिसले नाहींत; तरी इ. स. १८८८ सालीं राष्ट्रीयसभा भरविण्याची पाळी जेव्हां खुद्द अलाहाबादेवर आली; तेव्हां पंडितजी या राष्ट्रसेवेस पुढें सरसावले; व पहिल्या तिन्ही सभांपेक्षांही ही चवथी राष्ट्रीयसभा त्यांनीं मोठ्या थाटानें पार पाडून दाखविली. स्वागतकमेटीचे ते अध्यक्ष होते; व पहिले दिवशीं सभेचे आरंभीं त्यांनीं जें संस्मरणीय भाषण केलें; त्यांत त्यांनीं आपल्या स्वतःच्या व आपल्या देशबांधवांच्या सद्धेतुबद्दल अशी चिकित्सा केली कीं, त्यायोगें राष्ट्रीयसभेस अनेक युरोपियन व देशी सद्गृहस्थांची या देशांत व इंग्लंडांत सहानुभूति मिळाली; व यावेळेपासूनच राष्ट्रीयसभेच्या भरभराटीस सुरवात झाली म्हणण्यास हरकत नाहीं.

राष्ट्रीयसभेला सालदरसाल हजर राहून चार दिवसपर्यंत देशाभिमानाच्या व देशहितकर्तृत्वाच्या लांबलांब गप्पा ठोकणाऱ्या लोकांपैकीं पंडित अयोध्यानाथ हे नव्हते. राष्ट्रीयसभा सुरू असतांना जसे ते खपत; त्याप्रमाणेंच तिच्या कामाकरितां ते बाराही महिने एकनिष्ठपणें खपत असत. एक दिवस देशाभिमानाच्या वाऱ्यानें हलकल्लोळ उडवून द्यावयाचा; व दुसरे दिवशीं त्याची ओळखही विसरावयाची, असला निंद्य प्रकार पंडितजींच्या हातून राष्ट्रीयसभेच्याच नव्हे तर कोणत्याही कामांत कधीं झाला नाहीं. सन १८८८ सालीं अलाहाबादेस राष्ट्रीयसभा करण्याचें ठरलें; तेव्हां ते स्वतः सर्व प्रांतभर हिंडले व औत्सुक्य, देशाभिमान, वक्तृत्व आणि दृढनिश्चय या गुणांच्या साह्यानें त्यांनीं राष्ट्रीयसभेचें असें सुंदर चित्र लोकांपुढें उभें केलें कीं, शत्रूच्या टोळींतील लोकही भराभर राष्ट्रीयसभेच्या मंडळांत सामील झाले. बंगाल्यांतील ' इंडियन मिरर ' नामक प्रमुख वर्तमानपत्र पंडितजींच्या भाषणशैलीबद्दल पुढीलप्रमाणें अभिप्राय देतें. " पंडितजींची भाषणशैली शुद्ध आणि रसाळ

असे . त्यांच्या मनाची जी खात्री असे , तीच ते बोलून दाखवीत असत ; आणि ती स्वतःच्या शब्दांनीं स्पष्टपणें समाजापुढें मांडण्याची त्यांची हतोटी प्रशंसनीय असे. पंडित अयोध्यानाथ यांच्या देशाभिमानाबद्दल शंका घेण्यास मुळींच जागा नाहीं ; किंबहुना त्यांचा देशाभिमान कमालीच्या सीमेचा होता असें ह्मणण्यासही हरकत नाहीं . ते एखाद्या छोट्या सभेंत बोलत असोत अथवा एखाद्या जंगी सभेंत उच्च स्थानावर बोलण्यास उभे राहिलेले असोत, प्रेक्षकांचीं मनें लोहचुंबकाप्रमाणें त्यांच्याकडे ओढ घेत. बोलतांना अंगविक्षेप व हावभाव करण्याची संवय त्यांना फार होती; इतकी कीं, केव्हां केव्हां त्यांचे ते अंगविक्षेप अधिक होत; तथापि खरा देशाभिमान, शुद्ध वक्तृत्व, व स्वदेशबांधवांविषयीं कळकळ या गुणापुढें फाजील अंगविक्षेपांचा त्यांचा दोष कोणाच्याच लक्ष्यांत येत नसे. " असो.

राष्ट्रीयसभेचे जनरल सेक्रेटरी व जनक मि. ए. ओ. ह्यूम यांनीं विलायतेस जाण्याचा आपला हेतु, जेव्हां प्रदर्शित केला, तेव्हां सर्व लोकांस अशी भीति पडली कीं, जर मि. ह्यूम यांचे सारखा उद्योगी, कळकळीचा व दृढनिश्चयी सेक्रेटरी राष्ट्रीयसभेस न मिळेल तर नुकतीच नांवारूपास येत चाललेली ही संस्था बुडेल; पण आमच्या देशाच्या व लोकांच्या भाग्यानें मि. ह्यूम यांचेपेक्षांही कांकणभर जास्त गुणी असे पंडित अयोध्यानाथ हे गृहस्थ आढळले व त्यांच्या गळ्यांत सर्व लोकांनीं एकमतानें राष्ट्रियसभेच्या जॉईंटजनरल सेक्रेटरीची माळ घातली. हें सन्माननीय काम आमरणान्त पंडितजींच्या हातून किती उत्तम प्रकारें पार पडलें, हें सर्वांस ठाऊक आहेच. मि. ह्यूम यांच्या मागें मुख्य सेक्रेटरीचें किंबहुना राष्ट्रीयसभेच्या सर्व कामाचें ओझें पंडितजींवर पडणार, अशी सर्व लोकांची अटकळ होती; पण ईश्वरी नेमानेम कांहीं निराळेच असतात! देशहिताच्या कामीं अग्रेसरत्व मिळविणारे आमचे तरुण पंडित, वृद्ध ह्यूम साहेबांच्या आधींच अक्षयसुख भोगण्यास परलोकीं निघून गेले.!! पंडित अयोध्यानाथ यांनीं जी अलौकिक देशसेवा केली, त्याचे स्मरणार्थ त्यांना राष्ट्रीसभेचे अध्यक्ष नेमावे, अशा चोहोंकडून सूचना होऊं लागल्या; व त्याप्रमाणें नागपूर येथें भरणाऱ्या राष्ट्रीयसभेचें अध्यक्षस्थान त्यांना द्यावयाचें हें ठरलेंही ; पण मुंबई व बंगाल इलाख्यास अनुक्रमें चार व दोन वेळ हा मान मिळाला असतां मद्रासला मुळींच मिळाला नाहीं, सबब नागपुरच्या सभेस कोणातरी मद्रासी गृहस्थास

हा मान द्यावा; व नंतर वायव्यप्रांतास द्यावा, असें ठरलें; व त्यास पंडित अयोध्यानाथ यांनीं मोठ्या आनंदानें संमति दिल्यामुळें नामदार आनंदाचार्लू यास तो सन्मान देण्यांत आला. नामदार आनंदाचार्लू यांनीं नागपूरच्या राष्ट्रीयसभेंत अध्यक्ष या नात्यानें जें भाषण केलें, त्यांत ते ह्मणतात:— "नामदार पंडित अयोध्यानाथ हे तुमच्या आणि माझ्या दुर्दैवानें मद्रासी नाहींत; तथापि त्यांनीं आजच्या या जागेचा मान मद्रासेस घेऊं दिला, ही मोठ्या औदार्याची गोष्ट आहे; जर ते असें न करिते तर, मला ही गोष्ट प्रांजलपणें कबूल करावी लागेल कीं, या राष्ट्रीयचळवळीचे चालक, देशकार्यांत एकनिष्ठ, धाडसी, व कळकळीच्या पंडितजींबरोबर माझा टिकाव लागला नसता; व हा मान त्यांसच मिळाला असता यांत संशय नाहीं. परंतु, तो राष्ट्रीय मान त्यांस मिळावा असा ईश्वरी संकेतच नव्हता. नागपूरच्या राष्टीसभेचें काम संपवून ते परत अलाहाबादेस जात असतां वाटेनें त्यांस शीत विकार झाला; आणि विद्वान व अनुभवी डाक्टर–वैद्यांचे शेंकडो उपाय निष्फळ होऊन किंबहुना एकंदर मानवी यत्न निरुपयोगी ठरून ता. ११ जानेवारी १८९२ रोजीं पहाटेस दुष्ट काळानें त्या महात्म्यास आमच्यांतून अचानक ओढून नेंलें !! झालें !! आटपला कारभार !!! राष्ट्रीय सभेचा आधारस्तंभ, हिंदुस्थानचा तारा, लोकांचा उदार मित्र, देशाभिमानाचा मूर्तिमंत पुतळा, व दृढनिश्चय–उद्योग–इत्यादि गुणांचा बाळबोध कित्ता आमच्या दृष्टीसमोरून नाहींसा झाला !! उत्तरेस गौरीशंकराच्या शिखरापासून तो दक्षिणेस रामेश्वरापर्यंत पश्चिमेस सिंधूनदापासून तों पूर्वेस ब्रह्मपुत्रनदापर्यंतचा प्रचंड हिंदुस्थानदेश शोकसागरांत निमग्न झाला !! पंडितजींच्या मृत्यूची वार्ता विजेच्या धक्क्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानास भासली ! हिंदुस्थानाकरितां विलायतेस कळकळीनें उद्योग करणाऱ्या ब्राडलॉसाहेबांच्या मृत्यूनें झालेला शोक कमी झाला नाहीं तोंच पूर्वीपेक्षांही जबरदस्त अशी ही दुसरी आकाशाची कुऱ्हाड या देशावर कोसळली !! पण उपाय काय ? आमच्या रडण्यानें अथवा ओरडण्यानें काय होणार ? ईश्वरी नेमानेम त्यायोगें टळण्याचा संभव नाहीं; आणि ह्मणूनच आमच्या इच्छेस न जुमानतां अथवा आमच्या इच्छेची पर्वा न करितां त्या सर्व शक्तिमान् परमेश्वरानें पंडित अयोध्यानाथासारखें आमच्या संग्रहीं असलेलें रत्न एकाएकीं हिरावून नेलें.!!

पंडित अयोध्यानाथ यांच्या मृत्यूनें लोकांचा एक जबरदस्त व धाडसी पुढारी नाहींसा झाला ! सरकाराचा एक खरा आणि प्रामाणिक सल्लामसलतगार हरपला ! कलकत्ता व अलाहाबाद युनिव्हर्सिटींतील एक उत्तमोत्तम सेनेटर गेला ! आणि वायव्यप्रांतांतील एक उत्तम कायदेपंडित मावळला ! ! अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर यांनीं पंडितजींच्या मृत्यूनंतर कानव्होकेशनचे वेळीं केलेल्या भाषणांत पुढीलप्रमाणें उद्गार काढले, " ते आपल्या या सभांना नियमित हजर राहून शिक्षणसंबंधीं विषयाकडे चांगलें लक्ष्य देत; इतकेंच नव्हे तर त्यांचें यासंबंधीं ज्ञान व विचार फार प्रौढ असत; ते असे गृहस्थ होते कीं, त्यांच्या संबंधीं अभिमान कोणत्याही देशास व कोणत्याही जातीस वाटलाच पाहिजे. त्यांची वर्तणूक निर्मळ असे, त्यांची बुद्धिमत्ता अलौकिक होती आणि त्यांच्या अंगचे गुण वर्णनीय होते " पंडितजींच्या मृत्यूमुळें अलाहाबाद हायकोर्टांतील एक उत्तमोत्तम कायदेपंडित व निर्मळ आणि सचोटीच्या वर्तनाचा मनुष्य नाहींसा झाला. अलाहाबाद हायकोर्टाचे जज्ज नामदार जस्टिस नॉक्स यांनीं पंडितजीच्या संबंधानें आपल्या ठिकाणीं असलेली पूज्यबुद्धि व सन्मान व्यक्त करण्याकरितां एक फुलाचा हार त्यांच्या प्रेतावर घालण्यास पाठविला ! व कोर्ट भरल्यावरही चीफ जस्टिससाहेबांनीं पंडितजींच्या थोर बुद्धिमत्तेबद्दल पुढीलप्रमाणें उद्गार काढले:— " पंडित अयोध्यानाथ यांचें भाषण आह्मास नेहमीं ऐकावेंसें वाटे; व त्यांच्या भाषणांत आह्मांस कायद्याची माहिती पुष्कळच मिळे. "

पंडित अयोध्यानाथ यांच्या अंगांतील विशेष राष्ट्रीय गुण ह्मटले ह्मणजे निस्पृहता, धाडस, दीर्घोद्योग, कळकळ आणि प्रामाणिकपणा हे होत. अमुक एक उत्तम आहे, अशी त्यांच्या मनानें त्यांस साक्ष दिली, ह्मणजे मग प्राणाचीही पर्वा न करितां ते त्या कामाचा पिच्छा घेत, व मध्यें येणाऱ्या अडचणींशीं वाघाप्रमाणें लढत. इ. स. १८८८ सालीं अलाहाबादेस राष्ट्रीयसभेची चवथी बैठक झाली; त्यावेळीं या देशांतील बड्या बड्या अधिकाऱ्यांनीं शेंकडों तऱ्हेच्या अडचणी त्यांच्या मार्गांत आणल्या; पण त्यांची पर्वा न करितां राष्ट्रीयसभेचें काम उत्तम रीतीनें पार पाडण्यास पंडित अयोध्यानाथ यांचे एकट्याचेच श्रम कारणीभूत झाले. गव्हर्नरजनरल लॉर्ड डफरीन, लेफ्टनंट गव्हर्नर सर कॉलव्हिन यांच्या सारखे बडे सरकारी अधिकारी व सर

सय्यद अहमद व राजा शिवप्रसाद यांच्यासारखे वजनदार गृहस्थ राष्ट्रीयसभेवर तिलांजली वेऊन उभे असतां ती पार पाडणें हें सामान्य बुद्धिमत्तेचें सामान्य धाडसाचें, सामान्य कळकळीचें व सामान्य देशाभिमानाचें काम खचित नाहीं, हें कोणालाही कबूल करावेंच लागेल. परमेश्वरानें त्यांस जर आणखी आयुष्य दिलें असतें तर राष्ट्रीयसभेचें काम सर्वत्र विजयी करण्यांत त्यांना अग्रस्थान मिळालें असतें. पण ईश्वरी संकेत तसा नव्हता, त्यास उपाय नाहीं ! ! तथापि या भूतलावर अखेरचा निःश्वास टाकीपर्यंतचा त्यांचा सर्व काळ देशहित व देशाभिमान यांतच गेला, व तो तसा गेला, हें सर्वांस कळलें, हेंच त्यांच्या त्या श्रमाचें सार्थक होय !



पंडित मदनमोहन मालविय

M.C.C. Press Poona

२२

पंडित मदन मोहन मालवीय

गंगा आणि यमुना यांच्या संगमावर राहून कोणी मोक्षप्राप्तीची इच्छा करितात तर कोणी आपल्या देशबांधवांस दास्यत्वांतून मुक्त करण्यासाठीं झटत असतात. हिंदुस्थानची प्रजा आणि इंग्रज सरकार राजा अशा या संगमावर राज्यकारस्थानी पुरुषांशिवाय इतर तपश्चर्येस कोणी पात्रच नाहीं. गंगेचें पाणी घेऊन गंगेवर अभिषेक करावयाचा, तद्वत् वकिली, व्यापार, किंवा नोकरी करून जें कांहीं द्रव्य हिंदुस्थानच्या - क्षेत्रापासून आपण शेतकरी मिळवितों तेंच त्या क्षेत्रासाठीं खर्च करावयाचें अशी वृत्ति ज्यांची झाली आहे त्यांतील पंडित मदन मोहन मालवीय हे एक होत.

पंडितजी हे बृजनाथ मालवीय यांचे चिरंजीव. यांच्या आज्याचें नांव प्रेमधर मालवीय. ता. १८ दिसेंबर सन १८६२ त प्रयागतीर्थावर यांचें जन्म झालें. माळवा देश सोडून ३०० वर्षांपूर्वी जे लोक काशी व प्रयाग येथें येऊन राहिले, त्यांतील एका कुटुंबांत यांचा जन्म झाला असल्यामुळें यांना मालवीय ब्राह्मण ह्मणण्याचा तिकडे प्रघात पडला. पंडितजींची परंपरा फारच श्रेष्ठ्पैकीं आहे प्रत्येक पिढीला धार्मिक किंवा विद्वान् असे पुरुष यांच्या वंशांत निर्माण झाले आहेत. आणि कधीं कधीं तर विद्वत्ता आणि धर्म या दोघांनीं कांहीं कांहीं पुरुषांत वास केलेला आहे. तेव्हां " शुद्धबीजापोटीं। फळें रसाळ गोमटीं ॥ " या न्यायानें पंडीतजी आपल्या कुलास शोभवीत असतील यांत कांहीं संशयच नाहीं.

पंडितजींनीं हिंदी व संस्कृत या दोन भाषांचें अध्ययन घरीं व पाठशाळेंत मिळून केलें; व तें पुरें झाल्यानंतर सरकारी शाळेंत ते इंग्रजी शिकूं लागले. याप्रमाणें त्यांची तीन्ही भाषांची तयारी झाली. म्यूर सेंट्रल कॉलेजमध्यें अभ्यास करून सन १८८४ च्या आरंभीं ते बी. ए. च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. पुढें अभ्यास करावयाचा परंतु गृहस्थिति द्रव्याच्या बाजूनें अनुकूल

नसल्यामुळें त्यांना नोकरींतच पडावें लागलें. परंतु नोकरी अध्यापकाचीच होती. हें त्यांतल्या त्यांत त्यांना समाधान वाटलें. ज्या शाळेंत ते पाटी दप्तर घेऊन शिकावयास जात असत त्याच शाळेंत त्यांना इंग्रजी वाङ्मयाचे गुरुजी नेमण्यांत आलें. याठिकाणीं अध्यापकाचें काम तीन वर्षें केलें. पुढें त्यांस आपल्या विद्वत्तेचें चीज करण्यास चांगलें क्षेत्र सांपडलें. औधप्रांतांत राजा रामपालसिंह ह्मणून रामपूरचे प्रसिद्ध तालुकदार होते. त्यांनीं **'हिंदुस्थान'** ह्मणून हिंदीभाषेंत एक रोजचें वर्तमानपत्र चालविलें होतें. त्या रामपालसिंहांनीं या पत्राचें संपादकत्व पंडितजीस पतकरता का ह्मणून विचारिलें. ही गोष्ट मान्य करून सन १८८७ च्या मे महिन्यांत त्यांनीं आपल्या नोकरीचा राजीनामा दिला; व **हिंदुस्थानास** हातीं धरलें. त्याची त्यांनीं अडीच वर्षें एकनिष्ठेनें आपलें बुद्धि-सामर्थ्य खर्च करून सेवा केली. सरकारी अधिकाऱ्यांनीं त्या वेळच्या आपल्या रिपोर्टांत पंडीतजींबद्दल गुणग्राहकता दाखविली. हें उभयतांसही भूषणावह झालें.

पंडितजींच्या अंगीं समयसूचकता, कल्पकता आणि विषयव्यासंग हे गुण असल्यामुळें त्यांनीं वकीलीचा अभ्यास करावा असें त्यांची मित्रमंडळी व नातेवाईक त्यांस नेहमीं ह्मणत; परंतु त्यांच्या मनाचा कल त्या दिशेला होई-चना. २–२॥ वर्षें संपादकत्वांत घालल्यावर त्यांचें त्यांनाच वाटलें कीं आपण तो अभ्यास करावा. मालकांनेंच त्या त्यांच्या ह्मणण्यास रुकार दिला. आढेवेढे घेतले नाहींत; इतकेंच नव्हे तर द्रव्यद्वारा व दुसरी शक्य ती मदत करण्याचें राजेसाहेबांनीं वचन दिलें. अलहाबाद हायकोर्टाची वकीलीची परीक्षा त्यांनीं सन १८९१ च्या मार्च महिन्यांत दिली. तींत ते पास झाले. पुढें सन १८९२ च्या जानेवारी महिन्यांत अलहाबाद युनिव्हर्सिटींतून त्यांस एल्. एल्. बीची डिग्रीही मिळाली. तेव्हांपासून ते अलाहाबाद येथें वकीली करीत आहेत.

सार्वजनिक कामांचा नाद पंडितजींस सन १८८० सालापासूनच लागलेला आहे. निरनिराळ्या हिंदुजातींचें प्रेम वाढावें; देशी भाषेच्या शिक्षणाची प्रगति व्हावी; समाजांतील अनिष्ट चाली नाहींशा व्हाव्या; जेथें जेथें सरकारशीं समाजाचा संबंध आला तेथें तेथें आपल्या समाजाच्या इच्छा व गरजा सरकारापुढें मांडता याव्या इत्यादि हेतु मनांत धरून त्यांनीं सन १८८० सालींच अलहाबाद येथें हिंदुसमाज नांवाची एक संस्था स्थापन केली. सन १८८५ सालीं राष्ट्रीय सभेचें जन्म मुंबई येथें होऊन ठिकठिकाणचे प्रतिनिधि तेथें जमले होते. परंतु

पंडीतजींनीं इच्या जन्माच्या अगोदरच आपल्या संस्थेस हें रूप आणून ठेवलें होतें. वायव्येकडील प्रांतांतील निरनिराळ्यां शहरांतून व ठिकाणांतून हिंदुसमाजाच्या परिषदेस प्रतिनिधि आले होते व राष्ट्रीय सभेच्या अगोदरच ४।९ महिने एक टोलेजंग सभा अलहाबादेस भरली होती. अर्थात् राष्ट्रीय सभेच्या कमेटया ठिकठिकाणीं स्थापन झाल्या तशी एक अलहाबादेस झाली. तेव्हां तिच्या चिटणिशीच्या जागेस यांच्याशिवाय दुसरा कोणीही योग्य मनुष्य आढळला नाहीं. पण त्यांनीं आपल्या शिरावर तेव्हांपासून जें काम घेतलें आहे तें अद्यापि तसेंच नेटानें चालविलें आहे. स्वदेशाभिमान त्यांच्यांत जागृत आहे व लोकांचा पुढारीपणा इमानानें व कायदेशीरपणें कसा चालवावा याचें रहस्य त्यांस चांगलें अवगत आहे. तेव्हां अशा मनुष्यास देवानें आयुष्य देऊन लोकोपयोगीं कामें जास्त करवून घ्यावीं येवढेंच त्या नियंत्यापाशीं आपलें सर्वांचें मागणें असावयाचें दुसरें काय !



राय ब· पी·आनंदाचार्लु

M.C.C. Press Poona.

रायबहादुर पी. आनंदाचार्लु.

हल्लींच्या पिढींत, पाश्चात्यविद्येंत प्रवीण होऊन देशांतील राजकीय चळवळींत पुढाकार घेतलेले जे कांहीं प्रसिद्ध हुशार व तरतरीत लोक आहेत त्यांपैकीं रायबहादुर आनंदाचार्लु हे एक होत. मद्रास शहरांत ज्या कांहीं राजकीय चळवळी आहेत त्यांत हे प्रमुखत्वानें असतात. १८९१ सालीं नागपुरास जी राष्ट्रीयसभेची बैठक झाली तिचे हे अध्यक्ष होते. यावरून यांची किती योग्यता आहे हें वाचकांस कळून येईलच. तेव्हां अशा पुरुषाचें चरित्र अंशतः तरी महाराष्ट्र वाचकांस माहित असावें ह्मणून तें प्रस्तुतस्थलीं संक्षेपरूपानें देतों.

आनंदाचार्लु यांचा जन्म, उत्तर अर्काटांत चित्तूर ह्मणून एक (मद्रासपासून सुमारें १०० मैलांच्या अंतरावर) त्याच प्रांताच्या राजधानीचें शहर आहे तेथें झाला. हे जातीनें द्रविड ब्राह्मण असून ह्यांच्या घराण्याची स्थिति ह्यांच्या जन्माचे वेळेस साधारण बरी होती. ह्यांचे वडील सच्छील असून चित्तूर येथील जिल्हा कोर्टांत नोकर होते. मरण्याचे अगोदर ते शिरस्तेदाराच्या जागेपर्यंत चढले होते. ते जेव्हां वारले त्यावेळेस आनंदाचार्लु हे केवळ १२ वर्षांचे होते. अर्थात् त्यांच्या शिक्षणासंबंधीची सर्व जबाबदारी त्यांच्या सुशील मातोश्रीवर येऊन पडली. तेव्हां ती आपल्या मुलास उत्तम प्रकारचें शिक्षण देण्याच्या हेतूनें त्यास घेऊन मद्रासेस आली. मद्रासेस 'पेचाप्पा' नांवाच्या सद्गृहस्थाच्या औदार्यानें एक शाळा स्थापन झालेली होती. त्या शाळेंत आनंदाचार्लु यांचें मॅट्रिक्युलेशन पर्यंत शिक्षण झालें. शाळेंत असतांना ते आपल्या मृत वडिलांचे मित्र रंगनादम् शास्त्री यास वारंवार भेटत असत. हे मद्रास येथील स्मॉलकॉज कोर्टांतील एक न्यायाधीश असून दक्षिणेंत चालत असलेल्या भाषेमध्यें प्रवीण असल्याबद्दल त्यांची फार ख्याती होती. त्याचप्रमाणें ते विद्याव्यासंगी असून स्वतंत्र विचारांचे भोक्ते होते. हे दोन्ही गुण त्यांच्याच संसर्गानें आनंदाचार्लु यांचे ठायीं

विकसित झाले. आनंदाचार्लु ह्यांची बुद्धिमत्ता चांगल्या प्रकारची होती. यामुळें शाळेंत असतांना तेथील प्रत्येक शिक्षकास ते प्रिय झाले होते. इंग्रजी सातव्या यत्तेंत असतांनाच त्यानीं आपलें वाङ्मयात्मक ज्ञान इतकें वाढविलें होतें व अभ्यासक्रमांतही सर्वांपेक्षां ते इतके पुढे गेलेले होते कीं, शाळेच्या प्रिन्सिपालनें, 'हा मुलगा आपल्या गैरहजरींत आपला वर्ग शिकविण्यास लायक आहे' असे उद्गार त्यांच्या संबंधानें एकदां काढले होते. ह्याच शाळेंतून ते मॅट्रिक्युलेशन पास झाले. नंतर ते प्रेसिडेन्सी कॉलेजांत जाऊं लागले. तेथून मद्रास युनिव्हर्सिटीची पहिली परीक्षा पास झाल्यावर त्यानीं कांहीं दिवस बी. ए. चा अभ्यास करून कॉलेज सोडलें. पुढें कांहीं दिवसानीं ते बी. ए. झाले. नंतर त्यांनीं ज्या शाळेंत आपलें प्राथमिक शिक्षण पुरें केलें. त्याच शाळेंत मास्तरची जागा पतकरली. ह्या कामांतही त्यांनीं चांगला लौकिक संपादन केला. शाळेंत शिक्षकाचें काम करीत असतां त्यांनीं वकिलीचा अभ्यासही चालू ठेवला होता. १८६९ त त्यांनीं मद्रास युनिव्हर्सिटीची बी. एल्. नावाची कायद्याची परिक्षा दिली व तींत ते पास झाले. नंतर लवकरच त्यांना मद्रास हायकोर्टांत वकिली करण्याची सनद मिळाली. अर्थातच त्यांनीं शिक्षकाचें काम सोडलें. हायकोर्टांत त्यांचें काम चांगलें चालूं लागल्यामुळें लोकांत लवकरच त्यांची प्रसिद्धि झाली. मानवी स्वभावाचें परीक्षण करण्याची खुबी त्यांना चांगली साधली आहे असें ह्मणतात. वकील ह्या नात्यानें निरनिराळ्या प्रकारच्या लोकांशीं दळणवळण ठेवण्याचा प्रसंग वारंवार येत असल्यामुळें वरील गोष्ट साधणें संभवनीय आहे. कायद्याच्या ज्ञानाशिवाय इतर विषयांचेंही त्यांस चांगलें ज्ञान आहे. त्यांचें वाचन बरेंच विस्तृत आहे. राजकीय बाबतींत तर ते पूर्ण निष्णात असून लोकांच्या गरजा काय आहेत हें त्यांस चांगलें ठाऊक आहे असें ह्मणतात. १८७४ मद्राससरकारनें जें म्युनसिपल बिल पुढें आणलें होतें; त्याचा प्रतिकार करण्याकरितां भरलेल्या सभेंत ह्यांनीं एक उत्तम भाषण केलें; व तेव्हांपासून मद्रासच्या बहुतेक चळवळींत यांचें अंग आहे. मद्रासम्युनसिपालीटीच्या कमिशनरचें काम यांनीं सुमारें ८ वर्षें केलें असून त्याठिकाणीं यांचें चांगलें वजन आहे. ह्यांचें राजकीय बाबतींतील धोरण नेमस्त व निर्भिड असें आहे. त्याचप्रमाणें निर्भयपणाही यांच्या अंगीं बराच आहे. लॉर्ड रिपन आपली कारकीर्द आटपून जेव्हां विला-

यंतेस जाण्यास निघाले तेव्हां त्यांना निरोप देण्याकरितां मद्रासच्या पुढाऱ्यांनीं एक डेप्युटेशन मुंबईस पाठविलें होतें. त्यांत आनंदाचार्लू यांची सभासदाचे जागीं नेमणुक केलेली होती. राष्ट्रीयसभेशीं यांचा संबंध तिच्या आरंभापासूनच आहे व तिच्या प्रत्येक बैठकीस हे नियमानें हजर होत असतात. त्या सभेचे जे इतर पुढारी आहेत त्यांच्यांशीं यांचें चांगलें सख्य असून सर्वांशीं मिळून मिसळून वागण्यास हे नेहमीं तत्पर असतात. मद्रासला भरलेल्या एका राष्ट्रियसभेच्या बैठकीचे वेळीं पाहुण्यांचें आदरातिथ्य करणाऱ्या मंडळीचे हे सेक्रेटरी होते. व त्या नात्यानें त्यानीं राष्ट्रीयसभेची चांगली सेवा केली. त्यावर्षी त्या सभेचें काम चांगल्या तऱ्हेनें पार पडण्यास यांचे श्रम बरेच कारणभूत झाले होते. लोकांवर त्यांचें जें वजन होतें त्यामुळेंच त्यांच्याकडून राष्ट्रीयसभेच्या प्रतिनिधीस राहण्यास तंबू मिळाले व इतर व्यवस्था झाली; ते चांगले वक्ते असून मोठे कार्यकुशल आहेत. ते विशिष्टाद्वैतमताचे असून सदाचारी व धर्ममार्गानें वागणारे आहेत. संकृत भाषेंत ते चांगले प्रवीण असून मद्रास इलाख्यांत जेवढ्या ह्मणून प्रसिद्ध देशी भाषा आहेत तेवढया सर्व त्यांना येतात. त्यांची सांपत्तिक अवस्थाही चांगली आहे. दोन मोठया जमीनजुमल्याचे ते मालक आहेत. यांना त्यांच्यापेक्षां लहान असे सहा बंधु असून त्यांपैकीं कोणी वकील तर कोणी जज असे आहेत. मद्रासमध्यें राजकीय चळवळ चालविणारी जी ' महाजन सभा ' आहे तिच्या उत्पादकांपैकीं हे एक असून त्यांनीं कांहीं दिवस त्या सभेच्या सेक्रेटरीचें काम केलेलें आहे. लहानापासून तों थोरापर्यंत सर्वप्रकारच्या माणसास त्यांच्याकडे जाण्यास मुभा आहे. त्यांच्या घरीं प्रतिबंध अथवा अडकाठी मुळींच नाहीं. वाटेल त्यास त्यांना भेटतां येतें. त्यांची राहणीही साधी आहे व त्यांची वागण्याची पद्धतही चांगली आहे. हिंदुस्थानसरकारनें मागें एकदां जें ' पब्लीकसर्व्हीस कमिशन ' नेमलें होतें. त्या कमिशनपुढें मद्रासच्या वतीनें ज्या पुढारी लोकांच्या साक्षी झाल्या त्यांत आनंदाचार्लू यांची साक्ष प्रमुख असून बरीच लांबलचक होती. अलीकडे तर मद्रासेंतील प्रत्येक महत्वाच्या चळवळींत हे पुढारी असतात; इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील इतर चळवळींतही यांचें थोडें फार अंग असतें. राष्ट्रीयसभेच्या द्वारें ते इतर प्रांतांतील लोकांच्याही उपयोगीं पडतात. यांची बरींच भाषणें प्रसिद्ध आहेत; त्यांपैकीं पहिल्या राष्ट्रीयसभेच्या बैठकींत

' इंडिया कौन्सिल इन् इंग्लंड ' यासंबंधाचें व १७ राष्ट्रीयसभेच्या वेळीं अध्यक्ष ह्या नात्यानें केलेलें अशीं दोन भाषणें महत्वाचीं आहेत. हे गृहस्थ अद्याप हयात असून राष्ट्रीयसभा व इतर राजकीय सभा ह्यांच्याद्वारें देशकार्य करण्याचे त्यांचे प्रयत्न अव्याहत चालू आहेत. व्याख्यानें व निबंध ह्या दोन मार्गींचाही ते कधीं कधीं अवलंब करीत असतात. निबंधलेखनांतही ते कुशल आहेत. परमेश्वर करो आणि त्यांच्या प्रयत्नास कांहीं तरी यश येवो अशी इच्छा प्रदर्शित करून आह्मी हा अल्पसा चरित्रलेख येथें समाप्त करतों.



M.C.C.P.P.

सर टी. माधवराव (कैं०)

२४

राजा सर टी. माधवराव

ह्या थोर पुरुषाचें नांव ज्यास माहित नाहीं असा पुरुष आमच्या देशांतील सुशिक्षित समाजांत विरळाच. मद्रास इलाख्यांत तर ह्यांचें नांव सर्वतोमुखीं आहे. दलहौसी साहेबानें आपल्या कारकीर्दीत देशी संस्थानांचें जें सत्र आरंभिलें होतें, त्यांत, संस्थानांत कर्त्यापुरुषांचा अभाव झाल्यामुळें अनेक संस्थानांच्या आहुति पडल्या. मद्रास इलाख्यांतील त्रावणकोर नांवाच्या संस्थानावरही असा प्रसंग येण्याच्या बेतांत होता. परंतु, राजा सर टी. माधवराव ह्यांच्या मुत्सद्दीपणामुळें तो टळला. राजा सर टी. माधवराव ह्यांची महत्त्वाची कामगिरी हीच होय. आणि यामुळेंच यांचें नांव मद्रास इलाख्यांतील आबालवृद्धांस माहित झालें आहे.

माधवराव हे जातीनें महाराष्ट्र ब्राह्मण असून त्यांचा जन्म इ. स. १८२८ त तंजावर येथें झाला. यांचे वडील रंगराव हे त्रावणकोरचे दिवाण होते. माधवराव हे त्यांचे सर्वांत धाकटे चिरंजीव. माधवरावांचें घराणें नामांकित कुलीन मराठ्यांचें असून त्यांतील बहुतेक पुरुष चांगले लौकिकवान निपजलेले होते. परंतु माधवरावांनीं आपल्या बुद्धिबलानें व कर्तृत्वशक्तीनें पूर्वजांचीं नांवें मागें पाडलीं व ' पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा ' ही तुकारामाची उक्ति आपल्या स्वतःसंबंधानें बऱ्याच अंशीं सार्थ करून घेतली. माधवरावांचे अंगीं जे गुण पुढें विकास पावले त्यांचा प्रादुर्भाव लहानपणींच त्यांचे ठायीं दिसून येत होता. त्यांचें बुद्धिवैभव तर इतकें विलक्षण होतें कीं, तें पाहून त्यांचे युरोपियन शिक्षक चकित होत असत. ह्यांचें इंग्रजी शिक्षण मद्रास येथील इंग्रजशाळेंत, तत्कालीन प्रसिद्ध प्रोफेसर मि. पॅविल ह्यांच्या हाताखालीं झालें. त्यांची विलक्षण बुद्धिमत्ता व असामान्य ग्राहक शक्ति, त्याचप्रमाणें त्यांचीं बहुतेक (शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या) विषयांतील पारंगतता हीं पाहून पॅविल साहेबांच्या मनांत त्यांच्याविषयीं लवकरच फार आदर उत्पन्न

झाला; तो इतका की ते जेव्हां पुढें रजेवर गेले तेव्हां त्यांनीं, गणितशास्त्र व सृष्टिपदार्थशास्त्र हीं शिकविण्यास आपल्या ऐवजीं माधवरावांची नेमणुक केली. इंग्रजींत व गणितांत माधवरावांच्या वेळीं त्यांच्याइतका प्रवीण दुसरा कोणीही विद्यार्थी नव्हता; असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. शिक्षणक्रम आटोपल्यावर १८४९ त त्यांनीं मद्रासच्या अकाउंटंटजनरलच्या ऑफिसांत नोकरी धरली. तेथें सुमारें दोन अडीच वर्षे नोकरी केल्यावर त्यास त्रावणकोरच्या राजकन्येच्या शिक्षकाची जागा सांगून आली. सरकारी नोकरीपेक्षां संस्थानच्या नोकरींत आपल्या अंगची करामत दाखविण्यास जास्त अवकाश सांपडेल व तेथें आपली योग्य महत्त्वाकांक्षा सफल होऊन आपल्या अंगच्या गुणांचें चीज होईल व मग आपला उत्कर्षही सहजच होईल; असें वाटल्यामुळें त्यांनीं सरकारी नोकरीचा एकदम राजिनामा दिला. आणि त्रावणकोर संस्थानाकडून आलेली जागा पतकरली. अशा रीतीनें त्यांचा त्रावणकोर संस्थानांत शिरकाव झाला. राजकन्येच्या शिक्षकाचें काम सुमारें चार वर्षेपर्यंत केल्यावर त्रावणकोरदरबारनें माधवरावांची नेमणूक जमाबंदीकडे केली. हें नवीन काम माधवरावांनीं इतकें चोख बजाविलें कीं, त्यांच्या कामाबद्दल त्यावेळचे त्रावण कोर येथील रेसिडंट जनरल कलन व खुद्द महाराजसाहेब ह्या दोघांनीही धन्योद्गार काढले ! त्यांनीं बजाविलेल्या ह्या कामगिरीबद्दल खुष होऊन त्या उभयतांनीं ह्यांस त्रावणकोरच्या नायब दिवाणाची जागा दिली. ही जागा मिळतांच माधवरावांच्या अंगचा मुत्सद्दीपणा, राजकारणपटुत्व व राजकार्यकुशलता इत्यादि गुणांचा विकास होण्यास प्रारंभ झाला. माधवराव नायबदिवाण झाले त्यावेळेस त्रावणकोर संस्थानची राजकीय स्थिति अत्यंत शोचनीय होती. त्या संस्थानचा राज्यकारभार सुनियंत्रित नव्हता व ही संधी साधून ब्रिटिश राज्यरूपी होमकुंडांत ब्रिटिशसाम्राज्यदेवतेच्या प्रीत्यर्थ देशी राज्यांची आहुति देण्यास तयार असलेला जो दलहौसी साहेब त्यानें कांहीं नियमित काळांत राज्यव्यवस्था सुधारली नाहीं तर राज्य खालसा करण्याची संस्थानास धमकी दिली होती. अशा स्थितींत माधवरावांचा मार्ग किती बिकट झाला असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. परंतु, माधवराव ह्या प्रसंगास मुळींच डगमगले नाहींत. त्यांनीं सुमारें एक वर्षाचे आंतच संस्थानची राज्यव्यवस्था इतकी शिस्तवार व सुनियंत्रित केली कीं, संस्थानच्या शत्रूस व हित-

चिंतकांस त्यांच्या कृतीचें सारखेंच नवल वाटलें ! माधवरावांच्या ह्या कामगिरीबद्दल तत्कालीन पोलिटिकल कामगारानें पुढील उद्गार काढले आहेत.

* " पूर्वी त्या ठिकाणीं सर्व बेबंदशाई होती तिचें समूळ निर्मूलन करून अवघ्या एक वर्षांतच त्यांनीं राज्यांत पूर्ण व्यवस्था केली. न्याय देण्याच्या कामांत त्यांनीं कधींही कोणाची पर्वा केली नाहीं किंवा कोणाचा पक्षपात केला नाहीं. त्यांच्या अमदानींत दरोडेखोरांचा नायनाट होऊन वसूलही वाढत गेला. त्यांच्या हातच्या ठरावावरून व इतर सरकारी कागदांवरून त्यांचें औदार्य, बुद्धिस्थैर्य व त्यांच्या मतांतील मुत्सद्दीपणा हीं स्पष्टपणें दिसून येत आहेत." याप्रमाणें माधवरावांनीं आपल्या बुद्धिबलाच्या व कर्तृत्वशक्तीच्या जोरावर इंग्रजसरकारच्या घशांत पडूं पाहणारें त्रावणकोर संस्थान वांचविलें ! माधवरावांची ही कृति राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्यामुळें दलहौसी साहेबांच्या अनावर राजतृष्णेस अंशतः तरी आळा बसला ही गोष्ट कांहीं कमी महत्त्वाची नाहीं. शिवाय योग्य संधी मिळाली असतां नेटिव्ह लोकही राज्यकारभार सुनियंत्रितपणें हाकूं शकतात हें तत्त्व इंग्रजलोकांसारख्या अहंमन्य लोकांचे निदर्शनास स्वतःचे उदाहरणानें आणून दिलें; हेंही राष्ट्रीयदृष्ट्या मोठेंच कार्य त्यांच्या हातून घडलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असो; माधवरावांनीं जेव्हां त्रावणकोरची अंतस्थिति सुधारून त्याजवर येणारें संकट टाळलें त्या वेळेस त्रावणकोरच्या दिवाणाचें काम त्यांचे चुलते कृष्णराव हे पहात असत. हे १८५७ त वारले. तेव्हां रिकामी झालेली दिवाणाची जागा माधवरावांस मिळाली. त्यावेळीं त्यांचे वय फक्त ३० वर्षांचें होतें. इतक्या अल्प व तरुण वयांत एवढ्या मोठ्या संस्थानचा कारभार चालवावयाचा ह्मणजे सामान्यतः अंमळ कठीणच. परंतु, माधवरावांचे ठायीं राजकार्यकुशलता व मुत्सद्दीपणा ह्यांचा पूर्ववयांतच विकास होत गेल्यामुळें त्यांस दिवाणाचें काम करण्यास मुळींच अडचण पडली नाहीं. हें काम त्यांनीं

* 'Within the hosrt pasce of a year, Mr Madhavarao has called forth order out of disorder; has distributed justice between man, anb without fear, or favour; has expelled dacoits; has raised the revenues; and his minutes and state papers show the liberality, the soundness and the statesmanship of his views and principles."

सुमारें १४ वर्षेपर्यंत केलें. तेवढ्या कालांत त्यांनीं संस्थानांत अनेक प्रकारच्या सुधारणा केल्या व संस्थानांतील अव्यवस्था पार नाहींशी करून राजा व प्रजा ह्या दोघांचेंही अनेक प्रकारें हित केलें. त्यांनीं घालून दिलेली शिस्त इतकी उत्तम होती कीं, त्यांच्या मागून जे जे नवीन दिवाण झाले त्यांनीं तिच्या अनुषंगानेंच राज्यकारभार चालविला. मोठमोठ्या इंग्रजी अधिकाऱ्यांनीं माधवरावांचा कारभार पाहून धन्योद्गार काढले आहेत. एकानें तर त्यांच्या कारकिर्दीसंबंधानें थोडक्यांत " He found Travancore a den of misrule; he left it a model native state " असें वर्णन केलें आहे.

माधवरावांनीं त्रावणकोर संस्थानांत जें काम केलें तें इंग्रज सरकारालाही पसंत पडलें व त्याबद्दल त्यांनीं त्यांस के. सी. एस्. आय्. हा किताब १८६६ मध्यें दिला. खुद्द त्रावणकोरच्या महाराजांनीं ह्याबद्दल त्यास दरमहा एक हजार रुपयांचें पेन्शन करून दिलें. माधवरावांनीं जेव्हां त्रावणकोरच्या दिवाणगिरीचें काम सोडलें तेव्हां त्यांचें वय ४५ वर्षांचें होतें. ह्या सुमारास त्यांस हिंदुस्थानसरकारनें आपल्या कायदे मंडळांतील एक जागा देऊं केली होती. परंतु माधवरावांनीं तिचा स्वीकार केला नाहीं. माधवरावांनीं त्रावणकोरचें दिवाणपद सोडून दिलें खरें; परंतु, ह्या कामांत त्यांनीं जें कौशल्य दाखविलें त्यामुळें त्यांस त्याच जागेवर आणावें असें तुकोजीराव होळकरांस वाटलें व त्याप्रमाणें त्यानें १८७३ त आपल्या संस्थानचें दिवाणपद माधवरावांस दिलें. ह्या संस्थानांतही माधवरावांनीं कांहीं सुधारणा केल्या; परंतु सुमारें २ वर्षांपेक्षां जास्त दिवस त्यांना होळकर सरकारच्या पदरीं राहतां न आल्यामुळें त्यांच्या हातून सदर संस्थानचे कारभारांत विशेष कांहीं सुधारणा झाली नाहीं. दोन वर्षांपेक्षां जास्त दिवस त्यांना वरील जागीं राहतां न येण्याचें कारण असें कीं, १८७५ च्या सुमारास बडोद्याचे मल्हारराव गायकवाड यांजवर विषप्रयोगाचा खटला होऊन त्यांची मद्रासेस जेव्हां उचलबांगडी झाली तेव्हां त्या गादीचे वारस (हल्लींचे सयाजीराव) हे लहान होते ; यामुळें त्यांच्या संस्थानचा कारभार पाहण्यास कोणी तरी हुषार मनुष्य पाहिजे होता. असा हुशार मनुष्य माधवरावांपेक्षां त्यावेळेस"निदान ब्रिटिश सरकारच्या मतें–कोणी नव्हता. अर्थातच इंग्रज सरकारनें त्यास ह्या जागेवर नेमलें . ह्या जागेवर त्यांनीं सुमारें ७ वर्षेपर्यंत

काम केलें. तेवढ्या काळांत त्रावणकोरप्रमाणें ह्याही संस्थानांतील अव्यवस्था मोडून प्रत्येक खात्यांतील कामाची नीट शिस्त लावून दिली; व जें बडोदें संस्थान त्यांच्या पूर्वी अनेक बखेड्यांचें माहेरघर होतें तेंच त्यांनीं आपल्या कारकीर्दींत सुव्यवस्थित करून त्यांस एकप्रकारचें चांगलें वळण लाविलें व त्यांचें महत्वही वाढविलें. बडोदे संस्थानांतील काम त्यांनीं इतक्या उत्तम प्रकारें बजाविल्यामुळें इंग्रजसरकारानें त्यांस ' राजा ' हा किताब दिला. खुद्द महाराजांनीं त्यांस दिवाणगिरी सोडतांना (इ० स० १८८२) दोन लाखांची देणगी दिली. बडोदे संस्थानांत माधवरावांनीं काय काय महत्त्वाची कामें केलीं हें सांगूं केल्यास फार विस्तार होणार आहे; तेव्हां स्थलाभावामुळें त्या भानगडींत न पडतां फक्त इतकेंच सांगतों कीं, इंग्रजी मुलखांत इंग्रजांच्या हातून ७० वर्षांत जी सुधारणा झाली ती माधवरावांनीं बडोदेसंस्थानांत ७ वर्षांत केली ! आणि हीच गोष्ट मनांत आणून इंग्रज सरकारनें त्यांस वरील किताब देऊन त्यांचा बहुमान केला.

बडोद्याची दिवाणगिरी सोडल्यावर माधवरावांनीं कोणतीच नोकरी धरली नाहीं. त्यांनीं आपलें पुढील आयुष्य स्वस्थतेंत घालविलें; तथापि प्रसंगविशेषीं ते आपल्या देशबांधवांच्या हिताप्रीत्यर्थ अनेक प्रकारच्या खटपटी करीत. राष्ट्रीयसभेसंबंधानें त्यांची आदरबुद्धि असे व १८८७ मध्यें मद्रासेस तिची जी बैठक झाली त्यावेळेस ह्यांनीं त्या सभेच्या पुढाऱ्यांस चांगली मदत केली व पाहुण्यांचें आदरातिथ्य करणाऱ्या मंडळीच्या अध्यक्षाचें काम स्वतः केलें. त्यावेळेस त्यांनीं जें गंभीर भाषण केलें तें फारच चांगलें असून राजकीय बाबतींत पुढाकार घेणारांनीं लक्ष्यपूर्वक ध्यानांत ठेवण्यासारखें होतें. मुंबई व मद्रास ह्या दोन्ही ठिकाणच्या युनिव्हर्सिट्यांचे ते फेलो होते. व मद्रास युनिव्हर्सिटीचे पहिले देशी व्हाईस-चान्सेलर होण्याचा मान यांसच मिळाला.

माधवरावांची चित्तवृत्ति स्थिर असून त्यांच्या अंगीं विलक्षण धैर्य होतें. कोणत्याही गोष्टीसंबंधानें पूर्ण विचार करून खात्री पटल्याशिवाय ते कधींही कांहीं बोलत नसत. परंतु, एकदां अशी खात्री झाली ह्मणजे त्यासंबंधानें जें कांहीं करणें किंवा बोलणें असेल तें ते निर्भयपणें करीत अथवा बोलत असत. आपलें योग्य कर्तव्य करण्यास ते कधींही चुकले नाहींत. आपल्या धन्याचें

हित करण्यांत ते नेहमीं दक्ष असत. त्यांच्या शत्रूसंबंधानें ते नेहमीं उदारबुद्धि दाखवीत; व गरीब अथवा दुर्दैवी लोकांवर नेहमीं दया करीत. स्वतःच्या हिताची त्यांनीं फारशी परवा केली नाहीं. परंतु, लोकांच्या कल्याणाकडे कधींही दुर्लक्ष केलें नाहीं. अशा प्रकारचा थोर, उदार, शहाणा व मुत्सद्दी असा हा पुरुष इ० स० १८९१ त वारला !



सरटी. मुत्तुस्वामी अय्यर (कै.)

M.C.C.P.P.

२५

सर टी. मुथुस्वामी ऐयर.

(हायकोर्ट जज्ज.)

टाकीचे घाव सोसल्याविना देवकळा प्राप्त होत नाहीं किंवा दुःखाअंतीं सुख, या सामान्य नियमास अनुसरून असें एक ह्मणतां येण्याजोगें आहे कीं जेवढे जेवढे ह्मणून उच्च पदवीस चढलेले लोक आढळतात तेवढे सगळे किंवा त्यांतील बहुतेक पूर्वी अगदीं हीन स्थितींत असले पाहिजेत; आणिं तशीं उदाहरणें घडल्याचें आपण पुष्कळदा पाहिलें आहे व ऐकिलेंही आहे. प्रस्तुत चरित्रनायकाच्या एकंदर आयुःक्रमाचा विचार केला असतां, वरील गोष्टीचेंच पोषण होत आहे.

मुथुस्वामींचें घराणें अगदीं गरीबीचें तर खरेंच, पण मोठें कुलीन असें होतें. त्यांचें जन्म तंजावर जिल्ह्यांतिल बचूवाडी नावांच्या एका खेडेगांवीं ता० २८ जानेवारी सन १८३२ रोजीं झालें. हे अगदीं अल्पवयी असतांच त्यांचे वडील परलोकवासी झाले आणि त्यांचे परिपालनाची सर्वतोपरी जोखीम यांचे मातुःश्रीवर पडली. पति निवर्तल्यावर थोड्याच दिवसांत जें कांहीं थोडें खिडूकमिडूक होतें तें बरोबर घेऊन यांची आई तिरुवेरूर गांवीं आल्या. या गांवीं यांचा तामील भाषेचा अभ्यास झाला. शाळेंत ठेवून मुलाला विद्या शिकवणें द्रव्याभावामुळें बिचाऱ्या आईस फार जड जाऊं लागलें; व यामुळेंच अगदीं बालवयांतच श्री० मुथुस्वामीस साध्वी आईच्या व आपल्या निर्वाहार्थ अत्यंत नीच असें परदास्य करणें प्राप्त झालें.

प्रथम तिरुवेरूर येथील कुळकर्ण्यापाशीं दरमहा १ रुपया पगारावर ते मदतनीस ह्मणून राहिले. पुढील भाग्योदय पाहणें बिचारीचा नशिबीं नसल्यामुळें त्यांच्या मातुश्री पुढें लवकरच वारल्या. सन १८४६ पावेतों ते त्या कुळकर्ण्यापाशींच होते. वरील मदतनीसाचें काम करीत असतां एकदोनदां छोटया मुथुस्वामींची तीव्र बुद्धि तेथील तहशीलदार मुथुस्वामी नायकन यांचें

घ्यानीं येऊन त्यांनीं त्यांस आश्रयास ठेवलें. वरील तहशीलदार यांनीं त्यांना प्रथम वर्ष दीडवर्ष नागापट्टम येथें मिशन हायस्कूलमध्यें घातलें व मग मद्रासेस पाठवून दिलें. तेथें सर टी० माधवराव वगैरेंच्या देखरेखीखालीं त्यांचा विद्याभ्यास उत्कृष्ट प्रकारचा होऊन ते दरसाल स्कॉलरशिपा व बक्षिसेंही मिळवूं लागले. त्यावेळच्या मुलांत यांच्या तोडीचा गणित व ज्योतिष या विषयांत प्रवीण असा दुसरा कोणीच नव्हता. सन १८९४ सालीं " राष्ट्रीय दुर्गुण व ते नाहींसे करण्यास उपाय " या विषयावर उत्तम निबंध लिहिणारास मद्रासच्या कौन्सिल ऑफ् एज्युकेशननें ५०० रुपयांचें बक्षीस लावलें होतें. एकंदर उमेद्वारांत मि० मुथुस्वामींचाच निबंध पहिल्या प्रतीचा उतरून ते सर अलेक्झँडर अर्बुथनॉटसारख्यांच्या आदरास पात्र झाले.

हायस्कूलचें शिक्षण संपलें तेव्हां मुथुस्वामी लग्न झालेले असल्यामुळें त्यांनीं विलायतेस जाण्याचा मानस सोडून दिला. यानंतर त्यांनीं ६० रुपयांवर शिक्षकाची जागा पतकरली. पुढें कांहीं दिवस तंजावरच्या कलेक्टराचे ते रेकॉर्डकीपर होते. नंतर सन १८९६ मधें सर अर्बुथनॉट—त्या वेळचे विद्याखात्याचे डायरेक्टर— यांनीं त्यांस दरमहा १५० रुपये पगारावर शाळांचे इन्स्पेक्टर नेमले. याचवर्षी मद्रास सरकारानें वकिलीची परीक्षा सुरू केली. एकंदर इलाख्यांत त्या वेळीं फक्त तीनच इसम उत्तीर्ण झाले व त्यांत मुथुस्वामी पहिले आले व दि० ब० रघुनाथराव दुसरे आले. पुढें त्रांकीबारचे डिस्ट्रिक्ट मुन्सफाचे जागीं त्यांची नेमणूक झाली व मग मद्रासच्या इनाम कमिशनांत त्यांनीं काम केलें. सन १८९९ सालीं तंजावरास डे० कलेक्टराचे जागीं ते होते. वरील प्रत्येक जागीं त्यांच्या अंगच्या कर्तृत्वाची फारच वाहवा होत गेली. सन १८६५ सालीं ते दक्षिण कानड्याचे सबजज्ज होते व १८६८ सालीं मद्रासच्या पोलिस मॅजिस्ट्रेटची जागा त्यांस मिळाली. या जागेवर असतां कायद्याचा, शास्त्र या दृष्टीनें त्यांनीं फार अभ्यास केला. हायकोर्टाचा व प्रीव्ही कौन्सिलाचा एकही ठराव, त्याची पुरती छान केल्याशिवाय, त्यांनीं आपलें दृष्टीखालून जाऊं दिला नाहीं. यामुळें वस्तुस्थितीवरून सारासार निर्णय करण्याची शक्ति व कायद्यांतील पारंगतता त्यांचे डोक्यांत पूर्णपणें बिंबली होती.

न्यायाचे कामीं पक्षपात व भीति यांचें वारें सुद्धां त्यांस नसे. त्यांच्या

न्यायनिष्ठुरतेबद्दल अशी एक गोष्ट प्रसिद्ध आहे कीं ते मद्रासेस पोलिस मॅजिस्ट्रेट असतां त्यांचेपुढें एका एतद्देशीयानें आपण एका हायकोर्ट जज्जाचे बंगल्यावर गेलों असतां त्यानें आपल्यास विनाकारण मारहाण केली म्हणून फिर्याद दिली होती. आपल्या बेंचांतील वरिष्ठ मॅजिस्ट्रेटाचे म्हणण्यास न जुमानतां त्यांनीं त्या हायकोर्ट जज्जास आपलेपुढें हजर राहण्यासाठीं एकदम समन्स काढलें व हजर झाल्यावर त्यास तीन रुपये दंड ठोठावला.

मॅजिस्ट्रेटी काम करीत असतांनाच ते बी. एलच्या परीक्षेस बसून पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. यानंतर ते स्मॉलकॉज कोर्टाचे जज्ज झाले. सन १८७७ सालीं दिल्लीस भरलेल्या "इंपीरियल असेंब्लेजला" मद्रास सरकारनें त्यांस निमंत्रण केलें होतें. त्यावेळीं व्हाइसरॉयांकडून सन्मानदर्शक चांद त्यांना देण्यांत आला. पुढें सन १८७८ सालीं सी. आय्. ई. ची बहुमानव्यंजक पदवी त्यांस अर्पण करण्यांत आली. पदवीदानाचे वेळीं त्या वेळच्या गव्हर्नरांनीं त्यांचा मोठा गौरव केला. याच वर्षी मद्रास सरकारानें त्यांना हायकोर्ट जज्जाची अत्युच्च जागा देऊन त्यांच्या आंगच्या गुणांचें व त्यांनीं केलेल्या बिनमोल सेवेचें चीज केलें. नेटिवास एवढ्या अधिकारावर नेमिल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. यूरोपियन रीतरिवाजास अगदीं अनभ्यस्त असल्यामुळें आपल्या हातून हें काम कसें निभावतें, याची त्यांना प्रथम मोठी शंका वाटली. परंतु असल्या यःकश्चित् गोष्टीमुळें स्वकर्तव्यांत रतिमात्र उणेपणा राहूं देण्याइतके कमजोर मनःप्रवृत्तीचे मुथुस्वामी हे कधींच नव्हते. त्यांचें प्रथमचेंच जजमेंट वाचून हायकोर्टांतील वकीलमंडळी अगदीं थक्क होऊन गेली. न्यायाधीशाचे अंगीं अवश्यक असणारी शांति, निःपक्षपातीपणा, परिश्रम, आकलनशक्ति, स्मृति, तारतम्यज्ञान व कायद्याचा अचूकपणा इत्यादि गुण त्यांचेपाशीं मूर्तिमंत वास करीत होते. भानगडीचे मोकदमे श्री० मुथुस्वामींचेकडे यावयाचे, असा ठरावच जणु हायकोर्टांत झाला होता, त्यांचे आजपर्यंतचे ठराव नांवाजलेल्या मोठमोठ्या इंग्लिश न्यायाधीशांच्या तोडीचे आहेत. न्यायदान ही गोष्ट अतिमहत्त्वाची व परम पवित्र अशी कामगिरी आहे, असें ते समजत. एकदां मद्रासच्या युनिव्हर्सिटी कान्व्होकेशनचे वेळीं नूतन पदवीधरांत औपचारिक उपदेश करतांना ते म्हणाले न्यायमंदिर हें पवित्र देवालय असून न्यायाधीश हे केवळ सत्यान्वेषी देवच आहेत. या देवालयांत अपवित्र